रमलशास्त्र

अथवा

यवनीय फल ज्योतिष

लेखक : बाळकृष्ण मल्हार लाड.

प्रकाशक : श्रीरामतत्व प्रिंटिंग प्रेस, [redacted] [redacted]

किंमत १५ रुपये

(3-2)

रमलशास्त्र

अथवा

यवनीय फल ज्योतिष.

(संस्कृत, पारशी, उर्दू वगैरे ग्रंथाच्या आधारे)

बाळकृष्ण मल्हार लाड, यांनी रचिलें

व

गोविंदराव आबाजीराव सावंत,

यांनी [redacted] येथें आपल्या

“[redacted]” छापखान्यांत छापिले.

सुधारून वाढविलेली आवृत्ति ४ थी.

पुनर्मुद्रण सन १९७५

मुद्रक व प्रकाशक :—

गोविंदराव आबाजीराव सावंत,

श्रीरामतत्त्व-प्रकाश प्रेस, [redacted].

प्रस्तावना

आदित्यानामहंविष्णुर्ज्योतिषांरविरंशुमान् ।।
मरीचिर्मरुतामस्मि नक्षत्राणामहंशशी ।

—।। श्रीमद्भगवद्गीता ।।

श्रीजगन्नियंत्याच्या तेजांशाने प्रगटलेले सूर्य, चंद्र, पृथ्वी तारे इत्यादिक गोल प्राणीमात्रांच्या सुखदुःखाकरितां कसकसें कारणीभूत करून ठविले आहेत. याची प्रचीति श्रीनारदादि देवर्षींनी ज्योतिष केरळ, पंचपक्षी, स्वरशास्त्र, सामुद्रिक, रमल इत्यादि ग्रंथाद्वारे पुढील पिढीस करून दिल्यामुळ भास्कराचार्य, जगाम, आदम, दानियल, लुकमाने, हकीम, यवनाचार्य, नेपोलियन बोनापार्ट वगैरे विद्वद्वर्यांनी संस्कृत, पारसी, अरबी, उर्दू आणि इंग्रजी भाषेंत आपापल्या बुद्धिसामर्थ्यानें अनेक ग्रंथ लिहून अज्ञजनांवर उपकार केलेल्या सव ग्रंथांचे साररूपी हे " रमलशास्त्र अथवा यवनीय फलज्योतिष " नामक ग्रंथ होय.

ही रमल विद्या एकेकाळी यवन लोकांत सर्वत्र प्रसिद्ध असल्यामुळें या आर्यावर्तातील एका साहसी विद्वानाने त्या देशांत जाऊन त्यांच्या लिपीतील ही अपूर्व व अलभ्य विद्या शिकून यवन भाषेंतील मूळ शब्द व कांहीं रीती कायम ठेवून संस्कृत भाषेंत ग्रंथ प्रसार केलेल्या त्या यवनाचार्यांचे नांव कोणीही विसरता कामा नये.

ईशेच्छने दुसऱ्या आवृत्तीचे पुनर्मुद्रण करण्याचा सुयोग आल्यामुळें यांत बऱ्याच सुधारणा केल्या आहेत. जागजागी संशयनिरसनार्थं टिपा उदाहरणें व अधिक माहिती दिल्यामुळें १ ल्या आवृत्तीपेक्षां ही दीडपटीने अधिक वाढली आहे. पूर्वीप्रमाणेच याचे तीन भाग ठेवून १ ल्या भागांत पान १ ते ९४ पर्यंत या शास्त्राची उत्पत्ती, फांसे, [illegible]सिद्धि, कुंडली तयार करण्याच्या रीती, रवि, चंद्र, इत्यादि ग्रहांचा, राशीचा व तत्त्वांचा संस्कार, तत्त्वाचे मित्रत्व शत्रुत्व, शकलांचे गुणवर्णन, दिननिर्णय प्रश्न सांगण्यास लागणारी उपकरणें संख्या

निर्णय वगैरे वगैरे दुसऱ्या भागांत पान ९५ ते १९८ पर्यंत सर्व प्रकारचा प्रश्नसमुदाय असून प्रत्येक प्रश्नास सर्व ग्रंथाच्या आधाराने सोडविलेल्या सुलभ रीती आणि तिसऱ्या भागांत पान १९९ ते २१६ पर्यंत वर्ष, मास व प्रत्येक दिवशी घडणारी व देशांत घडणाऱ्या फलांचा विचार लिहून या ग्रंथाची समाप्ती केली आहे.

पाठकांना यांतील १ ल्या भागाची पूर्ण माहिती व अभ्यास केल्याविना दुसऱ्या व तिसऱ्या भागांतील प्रश्नसमुदायांतील फलें सांगण्यांस प्रवृत्त होऊ नये अभ्यास पूर्ण झाल्यावर देशकाल स्थिती लक्षांत आणून ग्रंथात वेळोवेळी सांगितलेल्या सूचनांचा विचार करून उत्तरे द्यावी. पाठकास अभ्यासाकरितां अवश्य लागणारे फांसे त्यांनी तयार करून घ्यावेंत.

हा ग्रंथ वाङमयाचा नसून पारशी, उर्दु वगैरे मूळ शब्दांवर याची रचना असल्यामुळें व्याकरणशास्त्र आणि छंदस्सशास्त्राचा अभाव होऊन अर्थविपर्यास कांही ठिकाणी होतो तर पाठकांनी मूळाकडे लक्ष देऊन नीरक्षीर न्यायानें वागावें अशी विनंती आहे.

— प्रकाशक.

ॐ

रमल शास्त्र.

* * * * *

॥ दिक्कालाद्यनवच्छिन्नानंतचिन्मात्रमूर्तये ॥
॥ स्वानुभूत्यैकसाराय नमः शांताय तेजसे ॥ श्रीं ॥

॥ वांच्छा सज्जनसंगमे परगुणे प्रीतिर्गुरौर्नम्रता ॥
॥ विद्यायां व्यसनं स्वयोषिति रतिर्लोकापवादाद्भयम् ॥
॥ भक्तिः शूलिनि शक्तिरात्मदमने संसर्गमुक्तिःखले ॥
॥ श्वेते येषु वसंति निर्मलगुणास्तेभ्योनरेभ्यो नमः ॥ १ ॥

अर्थः– सज्जन संगतीजी इच्छा, दुसऱ्यांच्या उत्तम गुणाविषयीं प्रीति, गुरूच्या ठायीं नम्रता, विद्येचा व्यासंग, स्वस्त्रीच्या ठायींच प्रीति, लोकापवादाचें भय, जगदीशाची अनुपम भक्ति, स्वतःचें संयमन करण्याची शक्ति आणि दुर्जनाचा संसर्ग न होण्याची इच्छा, अशा सर्व निर्मलगुणमंडित नरोत्तमांना, (नारायणाला) माझा नमस्कार असो.

रमल शास्त्रोत्पत्ति.

॥ कैलासशिखरे रम्ये नानाद्रुमलतान्विते ॥
॥ शुद्धस्फटिकसंकाशे नानापक्षिसमाकुले ॥
॥ नानाश्रृंगैः समायुक्तेर्मणिवैडूर्यमंडिते ॥
॥ स्थितं ह घुवाच गौरीशंप्रीत्या तत्परमानसा ॥ २ ॥

अर्थः–शुभ्र स्फटिकाप्रमाणें प्रकाशणाऱ्या कैलास शिखरी अनेक प्रकारची झाडे व वेलीनीं युक्त असून जिकडे तिकडे नानाविध पक्ष्यांचा कलकल ध्वनि व पहावें तेथें शृंगाकृति पर्वत शिखरें असून, मध्यभागी मणी, वैडूर्य, पुष्पराग अशा रत्नखचित सिंहासनावर महादेवाची स्वारी अत्यानंदांत विराजमान झालेली संधि पार्वतीनें पाहूनः—

॥ भगवन् देवदेवेश शशांकांकितशेखर ॥
॥ ब्रूहि मे परमंज्ञानंप्रश्नोत्थं च शुभाऽशुभं ॥
॥ भूतं भविष्यमाणं च वर्तमानं तथैव च ॥
॥ विज्ञानं सर्वकालानां येंन जानाति साधकः ॥ ३ ॥

अर्थः–जटामुकुटीं चंद्रास धारण करून शांतरूपीं भासणाऱ्या देवाधिदेवा ! वर्तमान, भूत आणि भविष्यकालीं होणाऱ्या स्थितीचें ज्ञान साधकांस सर्वकालीं समजण्याचा सोपा उपाय कृपा करून सांगा !

॥ पार्वत्याः वचनं श्रुत्वा शिवो हर्षितमानस
॥ एतस्मिन्नंतरे चंद्रात्सुधाबिंदुःपुरोऽपतत् ॥
॥ चतुरस्त्रः चतुष्कोणः स बिंदुःपरमृतस्यच ॥
॥ बिंदौ पतितमात्रे तु वन्ह्याः दय समागताः ॥ ४ ॥

अर्थः– पार्वतीची विनंति ऐकतांच महादेव अत्यानंदानें तल्लीन होऊन डोलूं लागले, त्या डुलकीसरसी मस्तकीं असलेल्या चंद्रापासून अमृतबिंदु चतुष्कोनाकृत नें खालीं पडतांच तेज, वायु इत्यादि तत्वें उत्पन्न झाली.

॥ तस्य बिंदोश्चतुर्दिक्षु वन्हिर्वायुर्जलं धरा ॥
॥ प्राच्यामग्निर्जलं वायुर्य म्यें सौम्ये धराजले ॥
॥ आवयोरंतरे चेयं विद्योत्पन्ना च क्रीडया ॥
॥ अतो रमलनाम्नाहि भविष्यति महीतले ॥ ५ ॥

अर्थः–तो बिंदु क्रमानें पूर्व, पश्चिम, उत्तर आणि दक्षिण दिशेस परतल्यामुळें, चतुर्दिशाधिपति तेज, वायु, जल आणि पृथ्वी हें क्रमानें येऊन त्यांनीं आपापल्या भागांचा स्वाद घेंतला, तें पाहून महादेवानें या सृष्टीची रचना आपल्या विराट देहास अनुसरून स्थापित करण्याकरितां, तो बिंदूंच विराट देह असें कल्पून जसजसा त्या दिक्पालांनीं स्वाद घेतला त्या त्या रीतीनें तत्वें स्थापन केलीं. त्या विराट देहाचें शिर त्या स्थानीं पूर्व दिशाधिपति तेज; मुखापासून हृदयापर्यंत पश्चिम दिशाधिपति वायु; जठरापासून गुल्फापर्यंत उत्तरदिशाधिपति जल; आणि गुल्फ तें पादतलापर्यंत दक्षिण दिशाधिपति पृथ्वी; अशी तत्वें

त्या त्या स्थानीं स्थापन करून तेज, वायू आणि जल तत्वें वजनांत हलकीं असल्यानें आणि पृथ्वी तत्व जड असल्यानें सर्व तत्वांचा एकमेकांशीं संयोग करून त्या त्या तत्वास देवता व उपदेवतांचा संबंध जोडून देवता स्थापन केल्या त्याः– तेज तत्वास गुरु, राहू, सूर्य आणि केतु; वायु तत्वास शुक्र, मंगळ, बुध आणि शुक्राचा अंश; जल तत्वास गुरु, मंगळ, चंद्राचा अंश आणि चंद्र व पृथ्वी तत्वास बुध, शनी, सूर्यांचा व शनीचा अंश या रीतीनें नवग्रहरूपी देवता त्या त्या स्थानीं विराट देहावर स्थापन केल्यानंतर त्या विराटरूपाचें बारा भाग पाडून राशींची स्थापना केलीं व या राशींस स्थीर रूप देऊन मस्तकी मेष; मुखावर वृषभ; कंठ ते हृदयापर्यंत मिथुन; हृदयावर कर्क; पोटावर सिंह; कंबरेवर कन्या; नाभीवर तूळ; गुह्यावर वृश्चिक; जंघांवर धन; मांड्यावर मकर; घोट्यावर कुंभ; आणि पादतलांवर मीन; याप्रमाणें विभागून पुनः त्यांचे १६ भाग (शकलें) पाडून त्या भागांस नावरूप देऊन, त्यांवरून भूत, भविष्य व वर्तमान वगैरे जाणण्याचें शास्त्र लिहून पार्वतीस बोध केला; आणि

॥ यथादर्शे कलाहीनश्चंद्रमा न प्रकाशते ००० ॥
॥ च्युताऽमृतोप्यतोदेहा तस्माच्च पुरुषाकृतिः ॥
॥ यद्वनंद्विघ्नकर्तव्यस्तदायेकाभवेद्ध्रुवं ॥
॥ बिंदुभिः पूरिताचेयं संख्याभिर्वसुभिः ०००० ०००० स्तथा ॥
॥ आभ्यां मनुमिताश्चान्ये बालरूपा भवंति हि ॥
॥ नाधिक्यं न्यून जायंतें षोडशांकितरूपका ॥ ६ ॥

अर्थः– प्रथम शंकराच्या मस्तकांतून जो बिंदु (०) पडला तो कलाहीन असूनः त्याचें चार विभाग

० तेज
० वायु
० जल
० पृथ्वी

पुरुषाकृतीचें झाल्यामुळें त्यास दर्श असें नांव दिलें आहे. (यवनांनी आपल्या ग्रंथांत त्या दर्शरूपी ००० चिन्हास तरीख असे नांव दिले आहे) तें दर्श आहे त्या स्थितींतच राहिल्यास सर्व जग अंधःकारमय होईल, ह्मणून पौर्णिमेच्या प्रकाशाची आवश्यकता असल्यानें त्या बिंदूस (० ०) द्विगुण करून एकमेकांच्या संयोगानें ह्मणजे बिंदु बिंदूस मिळविल्यानें त्या बिंदूस चलन शक्ति उत्पन्न होऊन अशी – लांब रेघ बनली, अर्थात ०००० ०००० आठही

बिंदूंच्या संयोगानें अशा ☰ चार रेखा बनल्या; हीच ती पौर्णिमा (प्रकृति) झाली. [यास ☰ यवन लोक 'जमात' असें म्हणतात] सर्व स्थावर जंगमाच्या उत्पत्तीस प्रकृति (माता) पुरुषा (पिता) चा संबंध असल्यानें आहेत त्या स्थितित राहणारा (०) बिंदु पुरुष आणि दोन बिंदूच्या संयोगाने होणारी ही वाढ (–) प्रकृति; वरील चार ☰ रेखा आणि या चार ⁘ बिंदुंच्या साह्यानें पुत्र, पौत्र, प्रपौत्र ह्मणजे दोन्हीचें चार, चारीचें आठ आणि आठाचें १६ होऊन षोडश कला पूर्ण झाल्या. १६ च्या पलीकडे त्यांच्या उत्पत्तीचा मार्ग खुंटल्यानें त्या सोळा चिन्हांस यवनांनीं आपल्या भाषेंत शकल (चिन्ह) असें नांव दिलें

शंकरानें दिलेली नांवें.

॥ वाग्मी लोहित उष्णगुर्विदुरथा पातस्तथा बोधनो ॥
॥ वत्क्रः सौरिशनिश्चरौ ननु तथा तीक्ष्णांशुदैत्यार्चितौ ॥
॥ सूरिश्चार कविह्यमामि सहितैः शीतांशुसौम्येतथा ॥
॥ वर्णैरद्वह संख्यकैः खलु बुधा दिव्यंति खेटैरिमे ॥ ७ ॥

अर्थः–त्या सोळा शकलांस (चिन्हांस) १ वाग्मी, २ तीक्ष्णांशु, ३ पात, ४ सौम्य, ५ दैत्यार्चि, ६ मंदग, ७ सौरी, ८ लोहित, ९ विधु, १० उष्णगु, ११ सूरि, १२ वत्क्र, १३ आर, १४ कवि, १५ बोधन आणि १६ शीतांशु अशीं नांवें देऊन अ. व. द. ह. संख्याक्रम लिहून त्या त्या नांवाच्या ग्रहांनीं उपयोग करण्याची रीत बुधजनांस समजण्याजोगें लिहून,

॥ येते बद्धाग्रहैर्ज्ञेया स्तथा लग्नश्च राशिभिः ॥
॥ पाशकैः संभवा प्रश्ने फलं खेटानुमानतः ॥ ८ ॥

अर्थः– ग्रहांनीं युक्त झालेल्या या गणित शास्त्रास दीर्घ वर्तुळाकार ०० ⁘ ⁘ ⁘ ⁘ ०० या द्वादश राशीनीं व ग्रहानीं बद्ध करून या शास्त्रावरून प्रश्न कुंडली तयार करण्याकरितां फांसे तयार करण्याची रीत दाखवून–

॥ एवं देवो वरं दत्वालिख्य भूर्जस्य पत्रके ॥
॥ कैलासस्य गुहामध्ये ध्रुवं स्थापितवान्पुरा ॥ ९ ॥

अर्थः–प्रश्नफले भूर्जपत्रावर लिहून ग्रंथास वर देऊन तो कैलास पर्वताच्या गुहेंत झाकून ठेविला.

मृत्युलोकीं प्रगटलेला काल.

॥ युगेच द्वापरस्यांते आदमो मुनिपुंगवः ॥
॥ तपस्तेपे महातेजाः साक्षात्सूर्य इवापरः ॥ १० ॥


अर्थः तपोबलानें इहपरलोकीं सूर्याप्रमाणें प्रकाशणाऱ्या 'आदम' ऋषीनें द्वापार युगाच्या अंतीं हा ग्रंथ मृत्युलोकीं प्रसिद्धीस आणिला.

फांशाकरितां धातु.

तांब्र (रविचें) रुपें (चंद्राचें) पितळ (मंगळाचें) शीस (बुधाचें) सोनें (गुरुचें) कथिल (शुक्राचें) आणि लोखंड (शनीचें); नवग्रहांपैकीं राहू आणि केतु हे ग्रह कालमान दाखवीत नाहींत व हे ग्रह शनिग्रहाप्रमाणेंच फल देणारे असल्याबद्दल त्या ग्रहांच्या धातु घेण्याबद्दल यवन आणि संस्कृत ग्रंथांत कोठेंच सांगितलेलें आढळत नाहीं,) या सप्त ग्रहांच्या प्रत्येक धातु तीन तीन मासें प्रमाणें २१ मासें घ्यावे व त्या धातूचें आठ तुकडे करण्याची रीत खालीं दाखविलेली लक्ष्यपूर्वक पहावी.


फांसे तयार करण्याची रीत.

॥ रमलशास्त्रेषु प्राधान्यं पाशकं तद्विधिं ब्रुवे ॥
॥ वेदशून्यांकितं तूर्ध्वं तदधः खद्वयांकितम् ॥
॥ दार्श्वेघ्नेकांकितं त्वेवं पाशाश्टक दृढं कुरु ॥
॥ द्विधाकीलकयोः प्रोक्तं शिथिलं वेदसंख्यया ॥ ११ ॥


अर्थः—वर सांगितलेंल्या पैकीं सहा ग्रहांच्या धातु घेऊन कढवून त्याची अशी  एक लांब चतुष्कोन पट्टी करून तिचे आठ तुकडे ज्याच्या चारही बाजू सारख्या असाव्या असें करावें. त्या प्रत्येक तुकड्याच्या वरील भागी ⁘ असें चार बिंदू चिन्हें स्पष्ट दिसण्याजोगी करा व त्या चतुष्कोण तुकड्याच्या खालील भागीं ⁚ अशीं दोन बिंदूंची चिन्हे करा व तो तुकडा तर्जनी व आंगठ्याच्या दरम्यान धरला ह्मणजे आपल्यासमोर जो भाग

दिसतो त्यावर आणि त्याच्या मागील भागावर ०० ० याच रीतीची बिंदूंची चिन्हें दोन्हीं बाजूस मांडून झाल्यावर ज्या दोन बाजू त्या तुकडयाच्या खुल्या राहतात त्याच्या मध्यभागीं एक आरपार छिद्र सळचा जाण्याजोगें पाडा, याच रीतीनें बाकीच्या सातहीं तुकडयावर चिन्हें व छिद्रें तयार करून दोन राहिलेल्या सळया लोखंडाच्या करून प्रत्येक सळयींत वरील चार चार तुकडें घालून ते तुकडें त्या सळयींतून पडूं नयें ह्मणून त्या प्रत्येक सळयीची दोन्हीं टोकें रुंद करा व ती सळी त्या तुकडयांत खेळती अशी असावी, कारण प्रश्न पहातांनां फासे घोळवून टाकावें लागतात. खाली आकृति पहा.


वरील भाग.




समोरचा भाग.



खालचा भाग-



मागचा भाग.



फांसे करण्याची वेळ.

॥ एवं पाशयुगं कुर्यात्सायने मेषगे रवौ ॥
॥ घट्टनं पाशकानां च ततः शून्यं च कारयेत् ॥
॥ मेष संक्रांतिदिवसे ताभ्यां प्रश्नं च कारयेत् ।
॥ पट्टिकायां शुभदिने प्रश्नार्थं पातयेत्सुधीः ॥ १२ ॥

अर्थः-वर सांगितल्याप्रमाणें चार चार तुकडयांच्या दोन माळा सायनमेष (प्रतिवर्षी मार्च महिन्यांत २०।२१ तारिखेचें सुमारास मेष राशीस सूर्य येतो त्या दिवशीं) राशीस तयार करून त्या तुकडयांवर त्याच दिवशी शून्यें मांडून प्रश्न फलें पहाण्याकरितां फळीवर शुभदिनीं फांसें टाकावे.

फळी तयार करणें.

॥ सपादद्वयहस्तं स्याद्दीर्घमर्धेन विस्तरम् ।
॥ स्निग्ध काष्टस्य पीठं वै कृत्वा तस्योपरि न्यसेत् ॥
॥ वालुकागंगातीरस्थाप्यथवा शुद्धभूमिजा ।
॥ द्वादशाब्दकुमारेण नीता कीटादिवर्जिता ॥ १३ ॥

अर्थः– ५४ अंगुळें लांब आणि ३० अंगुळें रुंद अशी एक चंदन वगैरे तैलयुक्त लाकडाचीं फळी तयार करून १२ वर्षाच्या मुलाकडून गंगातीरचीं अथवा शुद्ध भूमीची स्वच्छ वाळू आणून त्या फळीवर पसरून खालीं दाखविलेल्या लेखर्णनें कुंडली तयार करावी.

लेखणी तयार करणें.

॥ रमलनिपुणहस्ते लेखणी लंबचंचू ।
॥ सकलनिजशरीरें ग्रंथिला नैव भूयात् ॥
॥ सममपि च तथास्तां चंचुयुग्मं च तस्या ।
॥ स्त्रिपुरहर मनोज्ञेयं तवैव प्रपंचः ॥ १४ ॥

अर्थः— लांब, गांठ नसलेली, आणि पुढील टोकें लांब व समान कातरलेलीं अशी लेखणी रमलज्ञामें वापरावीं.

मंत्रसिद्धी.


॥ ॐह्रीं सांब सदाशिवाय भोलाभैरवाय ॐहूं फट् स्वाहः ॥

हा मंत्र एकांतस्थळीं अथवा स्मशान भूमींत ५०००० वेळां जपून सिद्ध करावा.

प्रश्न पहाण्याची वेळ व न पहांण्याचीं कारणें.

मंगळवार, शुक्रवार आणि शनिवार या दिवशीं, ३, ५, १३, १६, २१, २४ व २५ या मुसलमानीं तारखेस, अकाली अभ्राच्छादित आकाश अल तसेर, सूर्योदयापासून ११। घटिका दिवस आल्यावर व सूर्यास्तानंतर ११। घटिका रात्र क्रमिल्यावर आणि प्रश्न कुंडलींच्या १ ल्या अथवा १५ व्या स्थानीं ≣ ०००० या दोन शकलांपैकीं कोणतेंहीं शकल आल्यास, प्रश्नकर्ता ज्योतिषासन्मुख नसतांनां आणि पुढें दिलेल्या होरा कोष्टकांतील प्रत्येक वाराच्या खालीं शकलांच्या समोर उजवीकडे शु. म. अ. अशीं अक्षरें घातली आहेत तीं 'शु' ह्मणजे शुभ वेळ,'म' ह्मणजे मध्यम वेळ आणि 'अ' ह्मणजे अशुभ वेळ अशा दर्शविणाऱ्या

शब्दांच्या अद्याक्षरांपैकीं 'अ' अक्षर जेथें आहे. त्याचे डावेकडील १ ल्या कोष्ट-
कांत सूर्योदयापासून सूर्यास्तापर्यंत आणि सूर्यास्तापासून सूर्योदयापर्यंत ज्या ज्या
घटिका व तास दिले आहेत त्या अशुभ घटिकांच्या वेळीं आणि स्वतः
ज्योतिषी शारीरिक मानसिक व्यथेंत सांपडला असेल व चोराचें नांव, भूगत
धन आणि मुष्ठीप्रश्नाकरितां कुंडली तयार करून फल सांगू नये असें संस्कृत
आणि यवन ग्रंथांत सांगितल्यामुळे त्याकडे ज्योतिषांनीं अवश्य लक्ष्य पुरवावे.
वरील कारणें व वेळां सोडून प्रश्न पहावे. उदाहरणः— रविवारी सकाळीं ७॥
घटिकेचें अमलास ह्मणजे ९ वाजण्याचें सुमारास कोणी प्रश्नकर्ता आला व
प्रश्न विचारूं लागला ह्मणून पुढील होरा कोष्टकांतील रविवार या सदरा-
खाली ३ तास अगर ७॥ घटिकेच्या पुढील भागी नजर फकली तेथें ☰ ०
अशीं शकलें असून त्यासमोर 'म' हें अक्षर असल्याने ती मध्यम वेळ परंतु वर
कुंडलीच्या प्रथम स्थानीं ☰ हें शकल आल्यास सांगू नयें असें आहे कारण
तेंच शकल होरा रूपानें उदय अथवा लग्न असें कल्पून सांगू नयें; परंतु वर
कुंडलीच्या प्रथम स्थानी ☰ हें शकल आल्यास सांगू नयें असें आहें कारण
तेंच शकल होरा रूपानें उदय अथवा लग्न असें कल्पून सांगू नये; परतु त्यांत
वेळेचा विचार करितां एका २॥ घटिकेंत अथवा १ तासांत ☰ ० ह्या दोन
शकलांचा होरा असल्याने यांतील १ लें शकल १। घटिकेचें व दुसरे १। घटिकेचें
आहे. याहीपेक्षां ज्योतीषी सूक्ष्म विचार करील तर त्या वेळेचें तत्वहीं त्याच्या
ध्यानी येईल. असो, प्रश्नकर्ता ९ वाजण्याचे वेळीं ह्मणजे ३ ऱ्या तासांत
असल्यामुळें ० या शकलाचा अंमल त्यावेळी असल्यानें प्रश्न पहाण्यास हरकत
नाहीं. अलीकडे घटिका वगैरेंची माहिती ज्योतीषी लोकांची नाहींशी झाल्या-
कारणानें घड्याळाचा उपयोग केल्यास हें होरा कोष्टक बरेंच उपयोगी पडेल.



सूर्योदय तें सूर्यास्तापर्यंतचें होरा कोष्टक.


उदयापासून अस्तापर्यंत घटिका व तास		रविवार	सोमवार	मंगळवार	बुधवार	गुरुवार	शुक्रवार	शनिवार
१	२॥	शु. ooll lolo	शु. oooo llol	अ oloo loll	म lool llll	शु lloo olll	शु. looo oolo	अ. lilo ollo
२	५	श lcoo oolo	अ. lllo ollo	शु. ooll lc lo	श oooo llol	अ oloo loll	म. lool llll	श. lloo olll
३	७॥	म. lool llll	शु. lloo olll	शु looo oolo	अ. lllo ollo	शु. ooll lolo	शु oooo llol	अ. oloo loll
४	१०	शु oooo llol	अ. oloo loll	म. lool llll	शु. lloo olll	श. looo oolo	अ. lllo ollo	श. ooll lolo
५	१२॥	अ. lllo ollo	शु. ooll lolo	श oooo llol	अ. oloo loll	म. lool llll	शु ooll olll	शु looo oolo
६	१५	शु lloo olll	अ. looo oolo	अ. ll o ollo	शु. ooll lolo	शु. oooo llol	अ oloo loll	म. lool llll
७	१७॥	अ. oloo loll	म. lool llll	शु. llo olll	शु. looo oolo	अ. lllo ollo	शु ooll lolo	श. oooo llol
८	२०	शु ooll lolo	शु. oooo llol	अ. oloo loll	म. lool llll	शु. lloo olll	शु. looo oolo	अ. lllo ollo
९	२२॥	शु looo oolo	अ. lllo ollo	शु ooll lolo	शु. oooo llol	अ. oloo loll	म. lool llll	शु. lloo olll
१०	२५	म. lool llll	शु. lloo olll	शु. looo oolo	अ. lllo ollo	शु. ooll lolo	शु. oooo llol	अ. oloo looll
११	२७॥	शु oooo llol	अ. oloo loll	अ. lool llll	शु. lloo olll	शु. looo oolo	अ. lllo ollo	श. ooli olol
१२	३०	अ. lllo ollo	शु. ooll lolo	शु. oooo llol	अ oloo loll	म. lool llll	श lloo olll	श. looo oolo

सूर्यास्तापासून सूर्योदयापर्यंतचें होरा कोष्टक.


सूर्यास्तापासून सूर्योदयापर्यंत तास	घटिका	रविवार	सोमवार	मंगळवार	बुधवार	गुरुवार	शुक्रवार	शनिवार
१३	३२॥	शु. lloo olll	शु. looo oolo	अ. lllo ollo	शु. ooll lolo	शु. oooo llol	अ oloo loll	म. lool llll
१४	३५	अ. oloo loll	म. lool llll	शु. lloo olll	शु. looo colo	अ. lllo ollo	शु ooll lolo	शु. oooo liol
१५	३७॥	शु. ooll lolo	शु. oooo llol	शु oloo lolo	म. lool llll	शु. lloo olll	शु. looo oolo	अ. olll ollo
१६	४०	शु. looo oolo	अ. lllo ollo	शु lolo olll	शु. oooo llol	अ. oloo loll	म. lool llll	शु. lloo olll
१७	४२॥	म. lool llll	शु. lloo olll	शु looo oolo	अ. lllo ollo	शु. ooll lolo	शु oooo llol	५. oloo loll
१८	४५	शु. oooo llol	अ. oloo loll	म lool llll	शु lloo o'll	शु. looo oolo	अ. lllo ollo	शु. ooll olol
१९	४७॥	अ. lllo ollo	शु. ooll lolo	शु. oooo llol	अ. oloo loll	म. lool llll	शु lloo olll	शु. looo oolo
२०	५०	शु lloo olll	शु. looo oolo	अ. ll o ollo	शु. ooll lolo	शु. oooo llol	अ. oloo loll	म. lool llll
२१	५२॥	अ. oloo loll	म. lool llll	शु lloo olll	शु. looo oolo	अ. lllo ollo	शु. ooll lolo	शु. oooo llol
२२	५५	शु. ooll lolo	शु. oooo llol	अ. olo: loll	म. lool llll	शु lloo o ll	शु. looo -oolo	अ. lllo ollo
२३	५७॥	शु. looo oolo	अ. lllo ollo	शु. ooll lolo	शु oooo llol	अ oloo lol	म. lo l llll	शु. lloo olll
२४	६०	म. lool llll	शु. lloo olll	शु. looo oolo	अ. lllo ollo	शु. ooll lol	शु. oooo llol	अ. oloo loll

प्रश्नाकरितां फांसे टाकण्याची रीत.

॥ लाह्यनं पाशके योज्यं स्वेष्टदेवं गरूस्मरन् ॥
॥ पाशकं मंत्रयेदादौ सप्तवारं ततः क्षिपेत् ॥ १५ ॥

अर्थः-ज्योतिषानें फांसें उजव्या तळ हातांत या रीतींचीं चारी चिन्हे (या प्रत्येकी चिन्हास लह्यान  शकल असें म्हणतात.) वर दिसण्याजोगें ठेऊन आपल्या कुल देवतेस आणि गुरुस मनांत देवें स्मरण करुन वरील मन्त्रानें ७ वेळा अभिमंत्रुन फांसे सातवेळ हातांत घालऊन फळींवर टाकावें, मग वरील भागास जशा खुणा दिसतील तशा मांडून कुडलीं तयार करावं ; कुडलची रीत पुढें सांगितलीं आहे.

शकलांचीं नांवें व खुणा.

  या दोन शकलांची उत्पत्ती मागें सांगितलीच आहे. या दोन्हीं वरुन बाकीचीं १४ शकलें कशीं झाली हे वर्णन करीत बसल्यास पाठकांचे मन घोटाळेल तरी वरील मूळ प्रकृति पुरुष शकलांतील बिंदू व रेषा घेऊन बाकीची तयार केलीं आहेत. उदाहरणार्थ  या शकलांतील वरील एक बिंदु घ्या आणि  या शकलांतील वरील एक रेघ सोडा ह्मणजे  हें लह्यान नामक शकल (चिन्ह) तयार होतें. याचप्रमाणे एकांतील बिंदु सोडत एकांतील रेखा सोडत तयार केले ह्मणजे हे  कबजतुल् दाखोल नामक शकल तयार होतें. याच रीतीनें बाकीचीं पुढील शकलें तयार होतात. खालील कोष्टकांकडें थोडेसे लक्ष्य पोचविलें ह्मणजे सहज पाठकांच्या ध्यानांत येईल. आतां कोष्टकांत क्रमवार अंक आणि शकलें व त्यांचीं शंकरानी ठेविलेली नांवें व आदम ऋषी त्या शकलांस दिलेलीं यवनीय नांवें दिली आहेत; ती यवनीय नावें मात्र ज्योतिषास क्रमांकांस अनुसरून तोंडपाठ असलीच पाहिजेत त्या नावांवर आणि क्रमांकावर या शास्त्राचा पाया असल्यानें तीं नांवें जर तोंडपाठ नसतील तर या शास्त्रांत लक्ष्य घालणाऱ्याचें श्रम व्यर्थ जातील.

क्रमांक	मूल शकलें	उपयोग करण्याकरितां मि० शकलें	शंकरानें ठेविलेलीं नांवें	यवनांनीं ठेविलेली नांवें
१	o o o o o o o	olll	वाग्मी:	लह्यान.
२	o o o o o o	lolo	तीक्ष्णांशु:	कबजतुल् दाखील.
३	o o o o o o	olol	पात:	कबजतुल् खारीज
४	o o o o o o o o	llll	सौम्य:	जमात.
५	o o o o o	oolo	दंत्यार्चि:	फरहा.
६	o o o o o o	ollo	मंदग:	उकला.
७	o o o o o o o	lllo	सौरि:	अंकीस.
८	o o o o o o o	loll	लोहित:	हुमरा.
९	o o o o o o o	llol	विधु:	बयाज.
१०	o o o o o o	ooll	उष्णगू:	नुस्रतुल् खारीज.
११	o o o o o o	lloo	सूरि:	नुस्रतुल् दाखील.
१२	o o o o o	oool	वल्क:	उत्पतुल् खारीज.
१३	o o o o o	oloo	आर:	नकी.
१४	o o o o o	looo	कवि:	उत्पतुल् दाखील.
१५	o o o o o o	lool	बोधन:	इज्जातमा.
१६	o o o o	oooo	शीतांशु:	तरीख.

कुंडली तयार करण्याची रीत.

॥ पाशकौ च ततो योज्यौ प्रस्तारं कारयेत्सुधीः ॥
॥ वक्ष्यमाण प्रकारेण तस्मात्प्रश्नं वदेब्दुधः ॥ १६ ॥

अर्थः—प्रश्न सांगण्याकरितां फासे टाकून कुंडली तयार करणें तीः—

फक्त स्थानाक कुंडली.

८	७	६	५	४	३	२	१
१२		११		१०		९	
	१४				१३		
	१६				१५		

बाजूस दाखविलेल्या आकृतींत प्रथमतः पाठकास स्थानें समजण्याकरितां अंक घातले आहेत तीं मूलस्थानें शकुन क्रमांस अनुसरून आहेत. यांतील १ या अंकांत पहिलें लह्यान शकल, २ या अकांत दुसरें कबजतुल् दाखील शकल. ३ या अंकांत तिसरे कबजतुल् खारीज शकल; असें क्रमानें १६ शकलें ज्या वेळीं प्रश्नकर्त्या करिता कुंडली तयार करण्याचा प्रसंग येतो तेव्हां ती शकलें त्या त्या स्थानीं स्थित असून कायम आहेत असें जाणावें ती स्थित शकलें केव्हांही बदलत नाहीत म्हणून त्यास शकुनक्रम असें नांव दिलें आहे. फक्त प्रश्नाच्यावेळी मात्र फांसे टाकल्याबरोबर प्रश्नकर्त्याच्या वेळेप्रमाणें जीं जीं शकलें तयार होतील त्यांवरून मात्र फल सांगावीं. प्रश्न फलें सांगतांना पाठकांस अडूं नये ह्मणून त्यांनीं कुंडली मांडण्याचें पूर्वी ही स्थान कुंडली मांडलीच पाहिजे. कुंडली मांडण्याची रीत यवन शास्त्रांत उजवींकडून मांडण्याबद्दल वर्णन केल्याप्रमाणें पाठकांनीं वागावें.

कुंडलीच्या विभागांची नांवें.

कुंडलींतील १ २ ३ ४ या स्थानांत उमहात; ५ ६ ७ ८ या स्थानांस बिनहात; ९ १० ११ १२ या स्थानांस मुतवलिदात आणि १३ १४ १५ १६ या स्थानांस जवायदात अथवा जायदात अशीं नांवें दिली आहेत. हीं नांवें स्थानकुंडलींतील अंकास व त्या त्या अंकाच्या ठिकाणीं प्रश्नकर्त्याच्या इच्छेनुरूप पडणाऱ्या शकलांस अर्थात् प्रश्न कुंडलीतील शकलांसहीं दिलीं आहेत. उदाहरणः—बिनहातांतील शकलें ह्मणजे येथें प्रश्न करतानां पडलेलीं शकलें समजावी. आणि बिनहातांतील मूल

शकलें अगर शकुनक्रमानें शकलें घ्या असें जर लिहिलें असेल तर, प्रश्न कुंडलींत पडलेली न घेतां ० ० ० ० हीं त्या स्थानांत गुप्त रीतं ने स्थित असलेलीं क्रमांक शकलें घ्यावींत-या शास्त्रांचें ज्ञान झालेले ज्योतिषी स्थानकुंडली मांडीत नाहींत. याचें कारण तीं स्थ नें व मूळ शकलें त्यांच्या घ्यानीं मनीं बसलेली असतात, ह्मणूनच मागें क्रमांक व शकलें मुखोद्‌गत असली पाहिजेत असें लिहिलें आहे.

रीत १ लीः–स्थानांक घालून तयार झाल्यावर मागील सर्व रीती लक्ष्यात आणून फांसे टाकावें. टाकिल्याबरोबर प्रश्न ० ० ० ० १ २ ३ ४ करणाऱ्याची इच्छा दर्शविणारी हीं चार चिन्हें पीठावर दृष्टीस पडली तीं स्थानांक कुंडलीतील ४ ३ २ १ या अंकाखालीं क्रमाने जसें फांसे पीठावर पडलें; तसेंच दोन शून्याच्या ठिकाणीं मागें सांगितल्याप्रमाणें रेखा व एक शून्याच्या ठिकाणीं तसेंच शून्य मांडिल्यानें चार शकलें प्रथमतः तयार झालीं आतां बाकीचीं या चार ८ ७ ६ ५ स्थानांतील शकलें कशीं तयार करावीं यांकडे पाठक थोडेसें काळजीपूर्वक आपलें लक्ष्य पुरवतील तरच त्यांना चटकन् समजेल. वर १ ल्या स्थानांत असलेल्या या शकलाच्या उजवीकडें पाठकांची समजूत होण्यास १ २ ३ ४ असें अंक घातलें आहेत त्यांतील या वरील अंकाच्या डावीकडें मांडलेल्या चारी शकलांच्या सरळ रेषेंतील क्रमानें ४ ३ २ १ या चारी अंका खालील – ० – ० ही चिन्हें म्हणजें बिंदु व रेखा घेऊन क्रमवार वरून खालीं उतरत्या जशाच्या तशा मांडाव्या ह्मणजे ५ व्या स्थानाचें ० हे शकल त्या ५ व्या अंकाखालीं मांडावे पुढे ५ व्या स्थानीं मांडलेले शकल पहा. २ ह्या अंकाच्या डावीकडील सरळ रेषेंतील ४ ३ २ १ याच अंकाखालील क्रमवार ० ० ० – रेखा व बिंदू असलेल्या वरून खालीं उतरत ६ व्या स्थानीं मांडा ह्मणजे तेथें ० हें शकल येतें. तसेंच ३ या अंकाच्या डावेकडील सरळ रेषेंतील ४ ३ २ १ त्याच अंकाखालील क्रमवार – – – – तेथील चारी रेखा वरून खालीं उतरत ७ व्या स्थानीं मांडा, ह्मणजे तेथें ☰ हें शकल यतें. आणि ४ या अंकाच्या डावेकडील

सरळ रेषेंतील ४ ३ २ १ याच अंकाखालचे सरते शेवटची ० ० ०– रेखा व बिंदु वरून खाली उतरत ८ व्या स्थानीं मांडल्याणें तेथें –००० हें शकल आलें. अर्थात् ५ ते ८ पर्यंतची शकलें तयार झालीं.

राहिलेलीं ९ ते १६ पर्यंतचीं शकलें तयार करणें तीः– १ ल्या स्थानांव आणि २ ऱ्या स्थानांतील दोन्हीं शकलें गुणून तयार होणारे शकल ९ व्या स्थानांत; ३ ऱ्या व ४ थ्या स्थानांतील दोन्हीं शकलें गुणून येणारें शकल १० व्यात; ५ व्या आणि ६ व्या स्थानांतील शकलें गुणून ११ व्यांत; ७ व्या व ८ व्या स्थानांतील दोन्हीं गुणून १२ व्यांत; ९ व्या व १० व्या स्थानांत असलेलीं शकलें गुणून येणारें १३ व्यांत; ११ व्यांत व १२ व्यांत असलेलीं शकलें गुणून १४ व्यांत; १३ व्यांत व १४ व्यांत असलेलीं शकलें गुणून येणारे शकल १५ व्यांत आणि १५ व्या स्थानांतील शकलास कुंडलीच्या १ ल्या स्थानांतील शकलानें गुणून १६ व्या स्थानांत स्थापन करावें ह्मणजे पूर्ण कुंडली तयार होतें.

शकलें गुणण्याचीं रीत.

०, ० अशा दोन बिंदूनी गुणून रेखा होते आणि –, – अशा दोन रेखांचें गुणन – अशी एक रेखाच बनते आणि ०; – अशी एकच शून्य व रेखेचे गुणन ० शून्य होते. सारांश, दोन विषम चिन्हांचा गुणाकार शून्य ० आणि दोन समचिन्हांचा गुणा (बिंदु असोत अगर रेखा असोत) कार रेखा – बनतें. ही रीत पाठकांनीं चांगली लक्ष्यांत ठेवावी. पुढील सर्व प्रकार गुणण्याचाच असल्यामुळें रेखा येण्याचें ठिकाणीं शून्य, अगर शून्य येण्याचें ठिकाणीं रेखा, जर नजर चुकीनें आल्यास कुंडली सर्व खोटी होऊन फलेंही विपरीतच येतील. सावधगिरी ठेविली असूनही चूक झाली आहे कीं काय हेंही पहाणें अवश्य आहे ह्मणून पुढील ठोकताळ्याची रीत लक्ष्यांत असावी.

९ व्या स्थानांतील शकल तयार करण्याकरितां २ व १ या स्थानांतोल हीं –०–० ०––– दोन्हीं शकलें वर सांगितलेल्या रीतीप्रमाणें गुणतांच ००–० हें शकल तयार झालें तें ९ व्या स्थानीं आणि ४–३ या स्थानांतील ही दोन्हीं –०–० ००–० शकलें घेऊन गुणल्यानें हें ०––– शकल तयार झालें त्यास १० व्या स्थानीं स्थापन केलें.

११ व्या स्थानांतील शकल तयार करण्याकरितां रीतींत सांगितलेल्या ६-५ या दोन्ही स्थानांतील ही (— ० ० ०) (० — ० —) शकलें गुणल्याने (० ० — ०) हें शकल तयार झालें त्यास ११ व्या स्थानीं स्थापन केले. आणि ८-७ या स्थानांतील हीं (— ० ० ०) (— — — —) दोन्हीं गुणल्यानें (— ० ० ०) हें शकल तयार झालें तें १२ व्या स्थानीं स्थापिलें.

१३ व्या स्थानांतील शकल तयार करण्याकरितां १० आणि ९ या स्थानांतील ही (० — — —) (० ० — ०) दोन्हीं शकलें गुणल्यानें हें (— ० — ०) शकल तयार झालें तें १३ व्या स्थानीं स्थापिलें व १२-११ या स्थानांतील (— ० ० ०) (० ० — ०) हीं दोन्हीं शकलें गुणल्यानें १४ या स्थानीं (० — ० —) हें शकल स्थापिलें.


१५ व्या स्थानांतील शकल तयार करण्यास १४ १३ या स्थानांतील (० — ० —) (— ० — ०) हीं दोन्हीं शकलें गुणल्याने (० ० ० ०) शकल तयार झालें तें १५ व्या स्थानीं स्थापिलें.

१६ व्या स्थानांतील शकल तयार करण्यास वरील रीतींत सांगितल्याप्रमाणें १५ आणि १ या स्थानांतील (० ० ० ०) (० — — —) हीं दोन्हीं शकलें गुणल्यानें (— ० ० ०) हें शकल झालें, त्यास १६ व्या स्थानीं स्थापन केलें. याप्रमाणें केलेली ही पूर्ण कुंडली पुढें मांडली आहे, ती पाठक पहातील तर कुंडलीचा सर्व प्रकार पूर्णपणें कळून येईल.


ठोकताळा पहाण्याची रीत.

कुडलीं पूर्ण झाल्यावर तिच्या १५ व्या स्थानीं (— ० — ०) (० — ० —) (— — — —) (० — — ०) (० ० — —) (— — ० ०) (— ० ० —) (० ० ० ०) या आठ शकलांपैकीं एखादे शकल आल्यास खरी आहे. आणि बाकीच्या आठ शकलांपैकीं एखादे आल्यास कुंडली तयार करतांना खास चुकलीं आहे असे जाणावें. चुकली असे दिसून आल्यास पुनः शोध करावा.

ही आंकावरून तयार केलेली कुंडली खाली.
याचप्रमाणें पुढील सर्व कुंडल्या करणेच्या
आहेत असें समजावें.



रीत २ रीः—ज्योतिष्यानें आपल्या उजव्या नाकपुडींतून वाहणाऱ्या श्वासास



रोधून ब्रह्मस्थानीं कुंभक (स्थिर) करावा; त्या रोधलेल्या वेळापासून जोपर्यंत आपल्या हातून श्वास स्थिरावतो,त्या अवधींत बाजूस दाखविल्या प्रमाणें न मोजतां बिंदु मांडावे व श्वासाचे रेचक (सोडणे) डाव्या नाकपुडीनें करावें; नंतर ते सर्व बिंदु मोजून जी संख्या होईल, त्या संख्येस* ४-७-१२-१६ या संख्येनें निरनिराळें भागावें व शेषांकात क्रमवार ७-७-७-७ मिळवावें, मिळविलेलीं संख्या १६ च्या वर होईल तर, तींत १६ कमी करून आलेल्या शेषांकास अनुसरून शकल मांडावें. १६ अगर सोळापेक्षां कमी आल्यास क्रमांकास अनुसरून शकलें मांडावीं. याप्रमाणें चार शकलें मांडल्यावर बाकीचीं ५ पासून १६ पर्यंतची १२ शकलें १ ल्या रीतींत सांगितल्याप्रमाणेंच तयार करावी. उदाहरणः— वर्तुळांतील संख्या ३७ झाली $\frac{३७}{४-७-१२-१६}$ तीस ४ ने भागिले $\frac{३७}{४}$ = शेष १ राहिला, यांत ७ मिळविल्यानें ८ झाले. या अंकाचे मूल शकल (पृष्ट १७ यांत मांडून

* ४ तत्व, ७ ग्रह, १२ राशी आणि १६ शकलें आणि शेषांकात पुनः ७ मिळविणें ते ग्रह याप्रमाणें हीं संख्या आहे.

दाखविलेली कुंडलीं पहा) –/o/–/– हें १ ल्या स्थानीं, तसेंच ३७ या संख्येस ७ नें भागिल्यावर २ शेष राहिलें, त्यांत ७ मिळविल्याने ९ चा अंक झाला; याचें शकल –/–/o/– हे २ ऱ्या स्थानीं, ३७ या संख्येस १२ नीं भागतांच १ शेष राहिला, त्यांत ७ मिळविल्यानें ८ झाले, त्या अंकाचे क्रमिक शकल –/o/–/– हें ३ ऱ्या स्थानीं आणि त्या ३७ संख्येंस १६ या संख्येने भागतां ५ शेष राहिले, व त्यांत ७ मिळविल्याने १२ संख्या झाली. वरील नियमाप्रमाणें शकल o/o/o/– ४ थ्या स्थानीं स्थापन केले. या रीतीनें १–२–३–४ या स्थानांची शकले तयार झाल्यावर बाकीच्या १२ स्थानांची शकलें १ ल्या रीतींत सांगितल्याप्रमाणें तयार करीत कुंडली मांडावी.

रीत ३ रीः– प्रश्नकर्त्यास १६ अंकापेक्षां अधिक अंक त्याच्या इच्छेप्रमाणें ४ वेळां सांगण्यास सांगावे, सांगितलेल्या प्रत्येकीं निरनिराळ्या अंकास २ ऱ्या रीतींत सांगितल्याप्रमाणें त्या त्या संख्यांस ४-७-१२-१६ नीं भागून प्रत्येक शेषांकांत ७ मिळवून पूर्ण कुंडली १ ल्या रीतींत सांगितल्याप्रमाणे करावी.

रीत ४ थीः-ज्योतिष्यानें कोणत्याहीं जातीचें धान्य चिमूटभर घेऊन पीठावर ठेऊन दाणे मोजून आलेल्या संख्येस ४-७-१२-१६ नीं भागून चार शकलें तयार करावी, मग १ ल्या रीतींत सांगितल्याप्रमाणें कुंडली तयार करावी.


रीत ५ वीः–२ ऱ्या रीतींत सांगितल्याप्रमाणें ४ वर्तुळें काढून प्रत्येक वर्तुळांतील बिंदूंच्या संख्येस निरनिराळे ४-७-१२-१६ नीं भागून शेषांकांत ७ मिळवून वर सांगितल्याप्रमाणें पूर्ण कुंडली तयार करावी.

रीत ६ वीः–*गहूं, बाजरी, जव, निवडलेले तांदूळ अथवा जोंधळे यांपैकीं कोणतेंही अर्ध मुष्टी, फूल एक, सुपारी एक, हळदकुंड एक आणि प्रश्नकर्त्यांच्या इच्छेप्रमाणें द्रव्य, या पांचहीं जिनसा मुठींत रात्रीचें जेंवण झाल्यावर घेऊन अंथरुणावर पूर्वेकडे तोंड करून बसून आपल्या अंगावरून ती मूठ २१-१२-७ अगर तीन वेळां उतरून एका फडक्यांत बांधून ती मोटली आपल्या उशास

*प्रश्न पाहून झाल्यावर ते दाणे व पैसे, अनाथ, जोगी, जंगम. बैरागीं वगैरे गरीबांस द्यावे अगर त्या पैशांचा खाऊ घेऊन लहान मुलांस वांटावा.

घेऊन निजावें सकाळी स्नानसंध्यादि नित्य कर्मे आटपून ज्योतिष्याच्या भेटी॰ करितां आपल्या इच्छेप्रमाणें फल, पुष्प, दक्षिणा घेऊन उशाच्या मोटलीसह ज्योतिष्याकडे जावें, मग ज्योतिष्यानें त्या मोटलीतील चिमुटभर दाणे घेऊन पीठावर ठेऊन मोजून आलेल्या संख्येस २ च्या रीतींत सांगितल्याप्रमाणें भागून कुंडली तयार करावी.

रीत ७ वी:—फाशांची कुंडलीशिवाय करून बाकीच्या ज्या ६ रीति सांगितल्या, त्यापैकीं कोणत्याही एका रीतींतील संख्येस फक्त १६ या संख्येनें भागून जो शेषांक ेईल त्यास अनुसरून जें शकल असेल तें १ ल्या स्थानीं मांडून त्या अंकापासून सातवा अंक जो होईल त्याचें शकल मांडावे. याप्रमाणें १ पासून बाकीचीं चार शकलें तयार झाल्यावर पूर्ण कुंडली १ ल्या रीतीत सांगितल्याप्रमाणें करावी.

उदाहरण:—४३ या संख्येस १६ नें भागतांच ११ शेष राहिले त्या संख्येस अनुसरलेले हे ११ वें  शकल १ ल्या स्थानीं मांडिल्यावर ११ या अंकापासून सातवा अंक मोजतां ११-१२-१३-१४-१५-१६-१७ सतरा या अंकावर ७ वा अंक स्थित झाला, १७ चें शकल या शास्त्रांत मुळींच नाहीं ह्मणून १६ होतांच १ असें मोजावें, हाच अंक याठिकाणीं स्थित झाल्यामुळें १ या अंकाचें मूळ शकल  हें दुसऱ्या स्थानीं; आणि १ या अकापासून मोजल्यानें साताचा अंक सातव्या स्थानींच स्थित झाल्यामुळें सातव्या अंकाचें हें  शकल ३ ऱ्या स्थानीं मांडावे. आणि त्या सात अंकापासून सातपर्यंत मोजल्यानें १३ व्या अंकास स्थित होतें ह्मणून  हें तेरावें शकल ४ थ्या स्थानीं मांडावें याप्रमाणें चार शकलें तयार झालीं. ह्मणजे बाकीचीं पूर्ण कुंडली १ ल्या रीतींत सांगितल्याप्रमाणें तयार करावी.

या पुस्तकाच्या १ ल्या आवृतींत १९ प्रकाराने कुंडल्या तयार करण्याच्या रीती सांगितल्या होत्या. त्या सर्वांचा शोध करतां वर सांगितलेल्या सात प्रकारच्या रीतीं विशेष उपयुक्त असल्याचें आढळून आले. व त्याच श्रीशंकर, आदम दानियल यवनाचार्य, अथेदरीस, लुकमाने, हकीम, जगाम वगैरे शोधकांनींहीं उपयोगांत आणिलेल्या आहेत, व या सात रीतींपैकीं त्यातल्यात्यांत फांसांचीं

तयार होणारी कुंडलीच उत्तम अशी ठरविली आहे. ही फाशांची कुंडली मांडतेवेळीं ज्योतिष्यानें फांसे स्वतः न टाकितां प्रश्नकर्त्याकडून टाकवावें, कारण ते फांसे सप्त धातूंच्या संयोगानें झालेले असून प्रश्नकर्त्याचा हात त्या फाशांस लागलाच पाहिजे; असें कित्येक रमलज्ञांचें म्हणणे आहे. हें त्यांचें म्हणणे रसायनशास्त्राकडे लक्ष दिलें म्हणजे खरें ठरतें.

प्रत्येक शकलांतील प्रश्न समूह.

॥ प्रश्न मूलानि प्रश्नानां गेहानिकथितानिवै ॥
॥ पूर्वैस्तानिप्रवक्ष्यामि रमलान्वहूनहम् ॥ १७ ॥

अर्थः--रमलशास्त्राच्या मूळ शोधकांनीं १६ ही शकलांत जो जो प्रश्न भाग ठेविला आहे, तो क्रमवार खाली लिहिलेला, पाठकांनीं मुखोद्गत केल्यास प्रश्न विचार सांगतांना सुलभ रीतीनें फलें सांगतां येतील.

१ ल्या स्थानांतील व शकलांतील प्रश्नसमूहः--(तनुस्थान) सर्वांगाचें वर्णन, दैव, मुखलक्षण, आयुर्मर्यादा, जन्मस्थान, सुखदुःख विचार, आराम्यता, मरण, यशापयश, लाभ व हानि, कार्याचा आरंभ, उचनीचपणा, पापपूण्य, बलाऽबल, मानापमान, क्रयविक्रय, जीवन, शांति, उपाय, मुलांचा दूरचा प्रवास, बंधूचे स्नेही, स्नेह्यांचें बधू, द्वीपांतरीं गेलेली नौका (जहाज) जाति विचार, सूक्ष्म, पदार्थ, राजनीति, राजाचा बाप आणि प्रश्न कर्त्यांची मनचिंता वगैरे यांचे हें लह्यान ⚍ शकल असून विराट पुरुषाचें मुखदर्शक आहे व प्रश्नकर्त्यासहीं याच स्थानाचा संबंध आहे.

२ ऱ्या स्थानांतील व शकलांतील प्रश्नसमूहः--(धनस्थान) धनप्राप्ति विचार, दरिद्रीपणा, ऐहिक सुख, सहायकर्ता, स्वतःचें सहांय्य, व्यापारांत लाभ, जंगममाल, क्रयविक्रय, श्रीमंती व गरीबी, धार्मिक, कृपण, आनंद व दुःख, औषध देणें, गुप्त शत्रूंचें बंधु, स्नेहांचें बाप, मुलांचा लौकिक व व्यापार, पुरुषाची कुंडली असेल तर, त्याच्या बायकोचा मृत्यु विचार आणि स्त्रियेची कुंडली असेल तर, तिच्या पतीचा मृत्यु विचार; भागिदार आणि वैऱ्यांचा मृत्यु विचार, हिस्सा, मिळकतीची वाढ, कर्ज दिलेली रक्कम, रोग्याची स्थिति आणि त्याचें जेवण, लहान बाळांची स्थिति, ठरीव गोष्ट लाभ व हानि, लग्नकार्याची जुळवण, वकीली, वकील. खाणें पीणें, कामदार, वैरत्व स्त्री विचार, नीच लोकांचें वैरत्व

वगैरे. या स्थानाचें शकल ⁘ कबजतूल् दाखील. हें विराट पुरुषाचा गळा व कंठ दर्शक असून प्रश्नकर्त्याचिंहीं तेंच स्थान जाणावें.

३ न्या स्थानांतील व शकलांतील प्रश्नसमूहः- (सहजस्थान) बंधु, बहीण, आप्तइष्ट, दूध पिणारें बाळ, मुलीच्या गांवीं जाणें, जवळचा प्रवास आणि समाचार, पत्रव्यवहार, शेजाऱ्यांचा विचार, पराक्रम, चिंता, पूजाविधि, मित्रांचा समूह, मित्रांचीं मुलें आणि मुलांचे मित्र, सेवकांचा व्यापार, दूत, स्वप्न, देवालय, राजमहाल, शाप, सावत्र आई, संरक्षण, विद्या, निद्रा, देहकंप, यज्ञहवन, स्वधर्माचरण, राजांचा रोग, बापाचा गुप्त वैरी वगैरे. याचें शकल ⁘ कबजतुल् खारीज; हें विराट पुरुषाचें व प्रश्नकर्त्याचें हात, खांदे व भुजा दर्शविणारें आहे

४ थ्या स्थानांतील व शकलांतील प्रश्नसमूहः-(सुहृद्स्थान) बाप,पित्रार्जित स्थावर मिळकत, घरदार, शेत,भेंट, भूगतधन अगर गुप्तधन आणि पदार्थ, मित्र, जनसमूह, लहान मोठीं गांवें; वन उपवन, झाडांची लागवड, मरण्याची जागा, कामाचा परिणाम; बापाची मिळकत आणि स्थिति,भिंत,दूरचा प्रवास, पशु,पायगुण, नवीन खळगा, मोठें घर, आनंद, चोरटें, पिशाच्च खरेदी, प्रवाह, विहीर खोदणें, पाणी पहाणें, सैन्य, युद्ध, गुप्तकार्य, पहिल्या भावाची अगर बहिणीची संपत्ति, मुलांचा वैरी, नवऱ्याचे आणि वैऱ्याचे व्यापार व धंदे, मित्रांचा रोग, नवऱ्याची फिर्याद,आप्तइष्टांच्या मिळकतीची उत्तम स्थिति,कैदखाना,गुप्तकार्य, मृत मनुष्याची संपत्ति, मृताकरितां खळगा खोदणें वगैरे. याचें शकल ☰ जमात असून हें विराट पुरुषाचें आणि प्रश्नकर्त्याचें हृदय आणि पोट यांचें दर्शक आहे.

५ व्या स्थानांतील व शकलांतील प्रश्नसमूहः- (सुतस्थान) संतती, आणि विशेषेंकरून प्रथम संतति विचार, सेवकाचें येणें, सर्व प्रकारच्या पैजा आणि व्यापारांतील यसापयश, इंद्रजालविद्या, कौतुक, नाटक, शिल्पिकार, गर्भाचा बरेवाईटपणा, बुद्धि विचार, चैन, संगीत, वादविद्या, दुसरा बंधु, राजाचा मृत्यु, बापाची संपत्ति, उन्माद पदार्थ, कामातुरता, ऋतुप्राप्ति, जारजारिणींचा प्रीति विचार, कन्या, वृद्ध, तरुण, मित्राचा त्याग, नूतन वार्तेचें पत्र, गुप्त पत्राचा विचार, पशु संग्रह, श्रृंगार, खाणेंपिणें, नव्या कपड्याचीं मोजदाद, कापड अंगावर वापरणें आणि फाडणें, आनंद, पापपुण्य, सत्यासत्य वगैरे. यांचें शकल ⁘ फरहा असून विराट पुरुषाचें हृदय आणि पाठदर्शक आहे.

६ व्या स्थानांतील व शकलांतील प्रश्नसमूहः– (रिपुस्थान) रोग, गमीचा बरेवाईटपणा, सेवकांची संपत्ति आणि स्थिति, खरेदी, पळून गेलेला मनुष्य, गुप्त झालेला, रखाऊ औरत, बापाची हरकत, चोरी, ज्येष्ठ अगर कनिष्ठ बंधु, राहण्याची जागा, चुलता, अत्या, १ ल्या मुलाची संपत्ति, लहान पशु, पक्षी, धनिकपणा, विषप्रयोग, मित्रांचा मृत्यु, पतीचा अथवा भार्येचा गुप्त वरी, बंधमुक्त आराधनेची एकांत जागा, हास्य, कृतघ्न, जारकर्म, पराजय, कनिष्ठ बायकोची स्थितीं, लहानांचा वृत्तांत, वैऱ्याची स्थिती, फेरबदल, कार्यांत विघ्न, चिंता, ऋणमुक्त, गणित, गुप्त वेश, पिशोच्चोपद्रव, प्रीतिपात्राची संपत्ति आणि प्रवास, व्रणादि महारोग, वेश्यांचे दर, राजाचे आणि श्रीमंतांचे प्रवास, पशूंची भिती, उंट, ह्मैस, पापकृत्य, निंदा, आनंद, दैव, गहान सोडविणें, कर्ज काढणें, चोरांची ठेव, थडग्याची जागा, जादु, मृतधन, शेतकरीं वगैरे. याचें शकल ⠿ उकला हें विराट पुरुषांचें व प्रश्नकर्त्यांचे आंतडे व पोट यांचें दर्शक आहे.

७ व्या स्थानांतील व शकलांतील प्रश्नसमूहः– (जायास्थान) भार्यासौख्य अथवा पतिसौख्य, पति पत्नीचें रूप व गुणवर्णन, प्रीति, विवाह, सती अगर अंगिकार, वैऱ्याचा उद्योग, जय, युद्ध अगर दरबारांत चालणारें न्याय, अन्यलोकांशीं चालणारा व्यवहार, हिसा, आजा, द्रव्य येणें, मैथुन, परदेशाची स्थिति, गुप्त झालेल्याची स्थिति, लग्न जुळविण्याचा विचार, आप्तइष्ट, बंधु व भगिनींचीं मुलें, ३ रा बंधु, २ रा मुलगा, बापाचें घर, प्रवास, चोराचें गुण रूप आणि शोध, चोरांचा उपद्रव; फलवृक्ष, हिरवीं व पिकलेलीं फळें, विहिरीच्या पाण्याची रुची, गाईचें दूध, औषध क्रिया; बंधन, जामीन, शेंजाऱ्याचें वैरत्व, पळून गेलेल्याचें ठिकाण, प्रिय पात्रांची वाईट स्थिती, देणें घेणें, स्त्रियेचें शुद्धाशुद्धत्व, वैधव्य, गरीबगुरीबांची संपत्ती राजांचे सन्मान वगैरे. याचें शकल ⠿ अकीश असून हें विराट पुरुषाचें आणि प्रश्नकर्त्यांचें मूत्राशय आणि कटिप्रदेश दर्शक आहे.

८ व्या स्थानांतील व शकलांतील प्रश्नसमूहः– (मृत्युस्थान) मृत्यु, मृतधन, स्त्रीधन, भागिदारांची संपत्ति, वैऱ्यांची संपत्ति, सेवकांचें बंधु, ३ ऱ्या भावाचें द्रव्य, १ ल्या भावाचा रोग, गुरूजींचे वैरी, न्यायाधीश अगर यजमानांचे मित्र, मित्रांचा व्यापार आणि कीर्ति, भय, शोक, संकट, चिंता, आलस्य, कर्ज देणें,

दुर्जनांचें येणें, नष्टधन, घरचा विचार, पर्वत, किल्ला, पाण्यांत बुडणें, जळणें, गृह प्रवेश, गुप्त मनुष्याची स्थिति, सर्व प्रकारचा अंत्यकाल, स्मरण, मूर्च्छा दुसऱ्यांची संपत्ति, चोरांचे धन, बायकांचे कर्ज, पायगुण, प्रीति पात्राची जागा, दु:खागमन, न उपजणें, अपजय, युद्धांत आणि कुस्तींत जय, तहान, भूक, मूर्ख वगैरे यांचे शकल हुमरा; हें विराट पुरुषाचे व प्रश्नकर्त्याचें गुह्यदर्शक आहे.

९ व्या स्थानांतील व शकलांतील प्रश्नसमूह:–(धर्मस्थान) भाग्योदय, दूरचा प्रवास, जलपर्यटण, स्वप्न, मान, नवरा बायकोचीं बहिण भावंडें, परदेश, विद्या, अभिष्ट देवतेची सेवा, ग्रंथ, पुस्तक, शास्त्र, शकुन, पतित श्रम, ठेव, किमिया, दास्यत्व, शक्ति, पाऊस, नातू. परवशता, तिसरे मूल, पहिल्या भावाचा वैरी, बापाचा रोग, पाहुणें, श्रीमंती, संन्यासपणा, दानादिसत्कृत्य, सांगणें, जामीन, दत्तक देणें व घेणे, देव विचार, एकपत्नीव्रत, जारत्व वगैरे. याचें शकल बयाण हें विराट पुरुषाचे आणि प्रश्नकर्त्याच्या जांघा आणि पोटऱ्या यांचे दर्शक आहे.

१० व्या स्थानांतील व शकलांतील प्रश्नसमूह:– (कर्मस्थान) कर्म, आई, राज्याधिकार, कीर्ति, अधिकार, व्यापार, उदीम, राजबल, तंत्र, मंत्र, यंत्र, संस्थानिक, सासरा, चोरानें दूर ठेवलेला माल, न्यायाधीश, राजाचे आणि न्यायाधिशाचें वैरीं, मेघ, स्वजाति विचार, वैद्य, स्वामी, राजाचा अंमल, ह्यातारपण, पुण्यधन, न्यायांत जयापराजय, शिल्पकार, विद्यागुरु, रोग मुक्ति, दैवबल, चुलत बंधु, मुलांचा रोग, लहान झाडें, फळ, नोकरी वगैरे. यांचे शकल नुस्रुतुल् खारीज. हें विराट पुरुषाचे आणि प्रश्नकर्त्याचे गुडघे दर्शक आहे.

११ व्या स्थानांतील व शकलांतील प्रश्नसमूह:– (आयस्थान) लाभ, आनंद पुण्य, मित्र, आशा, इच्छा, भाग्योदय, आईचें द्रव्य, दु:खविमोचन, राजाचा अंमल, सून, संपत्ति; जहागीर, राजाचा खजिना, सत्यासत्य व्यापारांत, लाभ, मंत्री; ५ वा बंधु, बापाचा मृत्यु, पहिल्या भाऊ बहिणींचा प्रवास, कामातुर, बुद्धि, सत्व, गुण, न्यायकर्ता; ईश्वर, सावत्र, मुलें वगैरे. यांचे शकल नुस्रुतुल् दाखील. हें विराट पुरुषाच्या आणि प्रश्नकर्त्याच्या पोटऱ्या व घोटे यांचे दर्शक आहे.

१२ व्या स्थानांतील व शकलांतील प्रश्नसमूह:– (व्ययस्थान) खर्च, ऋणमुक्ति, गुप्तशत्रु, कैदखान्यांत राहणे, चोर वगैरे नीचांचें भय, दु:ख,

विपत्ति, द्वेष, त्रास, मत्सर, छळ, आत्महत्या, राजद्रोह, कैदखाना, राजदंड, दुःख, मृगया, हिंसा, ऋणको, धनको, वैरत्व, पशूंची खरेदी आणि लक्षणें, पिशाच्च-बाधा सोडविणें, जुनाट रोग, नवऱ्याचा अगर बायकोचा रोग, मुलींचा मृत्यु, मामा अगर मावशी, आईचा प्रवास, बापाचा दूरचा प्रवास वगैरे. यांचे शकल उत्पतुल (o o o —) खारीज; हें विराट पुरुषाचे आणि प्रश्नकर्त्यांचे पाय व पायाची बोटें दर्शक आहे.

अधिक विचार.

१३ व्या स्थानांतील व शकलांतील प्रश्नसमूहः— प्रश्नकर्त्याचें रूप, गुण, वार्ता, वैऱ्याचें धन विचार वगैरे. हें स्थान १-५-९ या स्थानांशीं संबंध ठेविते. याचें शकल नकीं (o — o o)

१४ व्या स्थानांतील व शकलांतील प्रश्नसमूहः—सत्यासत्य विचार, कार्य लक्षण, सिद्धासिद्ध, स्त्रीसंग वगैरे. हें स्थान २-६-१० या स्थानांशीं संबंध ठेवितें याचें शकल उत्पतुल् दाखवील (— o o o)

१५ व्या स्थानांतील व शकलांतील प्रश्नसमूहः— प्रश्नकर्त्याची मनचिंता, पंचांचा आणि मध्यस्तांचा विचार. हे स्थान ३-७-११ स्थानांचा संबध ठेविते, या स्थानास रमलशास्त्रवेत्ते छत्रस्थान ह्मणतात याचें शकल इज्जतमा (— o o —)

१६ व्या स्थानांतील व शकलांतील प्रश्नसमूहः— चित्तवृत्ति, पुढें होणारी कार्यसिद्धि, शांति, हानि वगैरे. हे स्थान ४-८-१२ स्थानांशीं संबंध ठेविते; याचें शकल तरीख (o o o o)

मागें कुंडली निर्माण करण्याची जी रीत सांगितलीं आहे, त्याप्रमाणें कुंडली तयार झालीं ह्मणजे तींतील अर्धभाग ह्मणजे १-२-३-४-९-१०-१३-१५ हीं स्थानें प्रश्नकर्त्याच्या हितसंबधाचीं असून, बाकीचा ५-६-७-८-११-१२-१४ आणि १६ हा अर्धभाग प्रश्नकर्त्याच्या इच्छेच्या विरुद्ध आहे. या दोन्हीं भागांतील शुभाऽशुभ स्थानें व त्यांतील शकलें पाहून प्रश्नकर्त्यानें विचार करावा.

कित्येक ज्योतिषि प्रश्नकर्त्यास किती जरी बायका, मुलें व भाऊ बहीणी असले तरी फक्त एका ७ व्या, ५ व्या व ३ ऱ्या स्थानांवरूनच बाकीच्या बायकांचा, मुलांचा व भाऊ बहीणींचा विचार सांगतात, त्यायोगें फलें चुकतात,

तर तसें न करतां एकापेक्षां अधिक बायकांचा, मुलींचा, अगर भाऊबहिणींचा विचार करणे अवश्य वाटल्यास मूळ ज्या स्थानाचें प्रश्न असतें त्यास धरून तिसऱ्या स्थानांतील शकल जें असेल त्याप्रमाणें कुंडली चक्र फिरवींत तेथील शकल घेत गुणावगुण सांगावें. पुढें याबाबतचें उपकरण 'तासीर' दिलें आहे. तें पहा.


॥ एतानि प्रश्नगेहानि ज्ञात्यास्वास्थपरस्य च ॥
॥ अन्यान्यापिच गेंहानि संबंधात् ज्ञायतां पुनः ॥ १८ ॥


अर्थः–वर सांगितलेल्या स्थानांतील प्रश्नसमूहांचा आपपरसंबंध आणि यांहीपेक्षां अधिक प्रश्न आल्यास त्या त्या स्थानांचा संबंध जाणून आपल्या निर्मळ बुद्धीस विचारशक्तीचें सहाय्य देऊन देश, काल स्थिति मनांत आणून ज्योतिषानें प्रश्न फलें सांगावीं.

तत्वांचा संस्कार.

॥ वेदतत्वो परिकृतं रम्लशास्त्रं च सूरिभिः ॥
॥ तेषांभेदाः षोडशैव न्यूनाधिक्यं न जायते ॥
॥ तस्माद्रम्ले षोडशैव शकलानिकृतानिवै ॥
॥ प्रस्तारे षोडशेंचैव ग्रहाणि च तथा बुधैः ॥ १९ ॥

अर्थः– तेज, वायु, जल आणि पृथ्वी हीं चारच तत्वें या रमलशास्त्रास कारणीभूत धरिलेलीं असून त्या प्रत्येक तत्वास चार चार तत्वें असल्यानें १६ शकलास संस्कार केलेला तत्वविचार खालीं लिहिल्याप्रमाणें:–

तेजतत्वः–कुमारावस्था, पीतवर्ण, उंच, समशरीर, ज्ञानीं, क्रोधी, आनंदित, पूर्णकार्यकर्ते, पुरुषरूप, आणि पूर्वदिशाधिपति असून या तेजतत्वाचीं हीं  चार शकलें.

वायुतत्वः– तरुणावस्था, रक्तवर्ण, उंच असून कांहींसें स्थूल, चंचल आणि शांत, बहुभाषणी, मध्यमकार्यकर्ते. पुरुषरूप आणि पश्चिमदिशाधिपति असून या वायु तत्वाचीं हीं  चार शकलें.

जलतत्वः–प्रौढावस्था, गौरवर्ण (अति सुंदर), उंची मध्यम, चंचल अगर रागीट नव्हे, स्त्रीरूप, प्रसंगीं कार्यांत आड येणारे, उत्तरदिशाधिपति असून या जलतत्वाचीं हीं चार शकलें.

पृथ्वीतत्वः–वृद्धावस्था, कृष्णवर्ण, कांहीसें स्थूल शरीर, दुर्बुद्धि, कार्यनाशक वर गोड असून मनात कडू,स्त्रीरूप,हें तत्व एकटच असतें. कदाचित् बाकींच्या तत्वांसी मिळून वागण्याचा प्रसंग आला तरी तें आपला गुणच पुढें करितें, ह्मणूनच जगच्चालक प्रभूनें या तत्वास आपल्याजवळ ठेविलें नाहीं. हें दक्षिण दिशाधिपति असून या पृथ्वी तत्वाचीं हीं चार शकलें.

ग्रहांचा संस्कार.

१. रवि ग्रह आकाशाभोंवती फिरत असून ३६५ दिवस १५ घटिका ३१ पळांत पृथ्वी प्रदक्षिणा करितो, याचीं शकलें हीं कबजतुल् दाखोल आणि नुस्रतुल् खारींज असून उत्तम फल देणारीं आहेत.



२. चंद्राचीं शकलें हीं बयाज व तरीख असून उत्तम फल देणारी आहेत.

३. मंगळाची शकलें हुमरा व नक्की ही मध्यम फलें देणारीं.





४. बुधांचीं शकलें जमात व इज्जतमा हीं मध्यम असून नपूंसक फलें देणारों आहेत.



५. गुरूचीं शकलें लह्यान व नुस्रतुल् दाखील असून ही अत्युत्तम फलें देणारीं आहेत.



६. शुक्राची शकलें फरहा व उत्पतुल् दाखील असून हीं मध्यमोत्तम फलें देतात.



७. शनीची शकलें उकला व अंकीश असून हीं अति वाईट फलें देणारीं राहूचे उत्पतुल खारीज आणि केतूचें कबजतुल् खारीज शकल असून हीं दोन्हींही अति वाईट फलें देणारीं आहेव.



राशींचा संस्कार.

१. मेष राशीचा ग्रह मंगळ, याचें शकल नकी हे मध्यम, वाईट फल देते.



२. वृषभ राशीचा ग्रह शुक्र,याचें शकल उत्पतुल् दाखील हे मध्यमोत्तम फल देणारें आहे.



३. मिथुन राशीचा ग्रह बुध,याचें शकल इज्जतमा हें नपूंसक फल देणारें.



४. कर्क राशीचा ग्रह चंद्र, याचीं शकलें बयाज आणि तरीख हीं उत्तम फल देणारी आहेत.



५. सिंह राशीचा ग्रह रवि,याचीं शकलें कबजतुल् दाखोळ आणि नुस्रतुल् खारीज हीं उत्तम फल देणारीं.



६. कन्या राशीचा ग्रह बुध, याचें शकल जमात हें नपूंसक फल देणारें आहे.



७. तूळ राशीचा ग्रह शुक्र, याचें शकल फरहा हें मध्यमोत्तम फल देतें.



८. वृश्चिक राशीचा ग्रह मंगळ, याचें शकल हुमरा हें मध्यम वाईट आहे.



९. धनु राशीचा ग्रह गुरु, याचें शकल लह्यान  हें अत्युत्तम फल देतें.




१०. मकर राशींचा ग्रह शनि, याचें शकल उलका  आहे तरी तें या  उत्पतुल् खारीज शकलाचा संबंध ठेवित असून अति वाईट फल देतें.



११ कुंभ राशीचा ग्रह शनि, याचें शकल  जरी आहे तरी या  कबजतुल् खारीज शकलाचा संबंध ठेवित असून अति वाईट फल देतें.



१२. मीन राशीचा ग्रह गूरु,याचें शकल उत्पतुल् दाखील  हें अत्युत्तम फल देतें.



शकलांचा संस्कार.

१.  याचें नांव लह्यान—ब्राह्मण जातीचें, रंग गोरा, गोड अन्न खाणारें शरीर जरी उंच आहे तरी गळा लहान, काळे डोळे, लांब केस, देवालयांत राहणारें, धर्मवंत, विद्वान्, विद्यार्थी, श्रेष्ठ, सुगंधप्रिय, पिंवळे तिलक धारण करणारें, मोत्यें, माणीक आणि सोनें संग्रह करणारें.

२. याचें नांव कबजतुल दाखीलः—क्षत्रीय, रंग तांबूस, गोड बोलणारें, डोळयांत तांबडया रेषा असून काळे डोळे, शिल्पशास्त्र जाणणारें, तरुण, उंची मध्यम, लांब केश, गोल तोंड, गळा लांबट, देवालय, दुकान अथवा मार्गांत राहणारें, मानवल, उंची वस्त्रें धारण करणारें, गोड अन्न खाणारें, मोत्यें, माणिक आणि सोनें संग्रह करणारें.

३. याचे नांव कबजतुल् खारीजः—म्लेंछ, अन्यायीं, निंदक, नाक लहान, पिंगट डोळें, कर्कश स्वर, लांब नाक, काळा व पिवळा रंग, लांब दांत, लांब गळा, तिखट खाणारें, निंद्य स्थळीं राहणारें, लांब मिशा, उंची मध्यम, भरीव पोटऱ्या, लोखंड आणि दगड संग्रह करणारे.

४. याचें नांव जमातः—शूद्र, रंग तांबडा, चित्रकार, उंचीं मध्यम, गुणवान, हिंसाप्रिय, वैद्य, काळेडोळे, मोठें तोंड, सोनें खर्च करणारें, वकीलींत हुषार, मोठें दांत, गोड खाणारें, पाठशाळेंत राहणारें, आणि पाच रत्न संग्रह करणारें.

५. याचें नांव फरहाः—लेखक, मोठें शरीर, रंग गोरा, थट्टेखोर, गाण्यांत चतुर, सुंदर, विरळ भिवया, कुरळे, केश, हरिणासारखे डोळे, बारिक ओंठ, पाण्याजवळ राहणारें, गोड खाणारें, रुंद तोंड, मोत्यें आणि रुपें संग्रह करणारे.

६. याचें नांव उकलाः—हीन जात, रंग काळा, तोंडाची गोली मध्यम, ठेंगणें, मलीन, नाक लहान, मांजरासारखें झांकीव डोळें, क्लेशयुक्त, छांत्र केस, चतुर, मस्तक लहान, कारागृह, गुहा, अंधःकारवासी, निंदक, मोठें ओंठ, मोठे दांत, ठेंगणा, गळा, छाती रुंद, लांब पोटऱ्या, शिसें व काळा दगड संग्रह करणारें.

७. याचें नांव अंकीशः—दास. काळा, उच्च, कृषींकर्मांत चतुर, डोळे काळे असून मांजरासारखें, हीन वेष, प्रपच कार्यांत चतूर, घाणेरडें तोंड, दांत आणि नखें कठीण, थोडें जेवणारे आळशी, तिखट खाणारें, खोटें बोलणारें, मस्तक लहान असून लांबट, कर्कश स्वर, लोखंड आणि काळा दगड संग्रह करणारें.

८. याचें नांव हुमराः—क्षत्रिय, शूर, शस्त्रवैद्य, चोर, हिंसाप्रिय, निंदक लोहार, युद्धकला निपुण, पिंगल नेत्र, तोंडावर डाग, मोठें मस्तक, उंची मध्यम, तिखट पदार्थाची आवड, वन, पर्वत अगर गुहेंत राहणारे असून, वज्रसंग्रह करणारें

९. याचें नांव बयाज.–ब्राह्मण, रंग गोरा, चाल जलद, सुखी, देवतार्चन व धर्मकार्यात तत्पर, उंचीं मध्यम गोल तोंड, काळसर डोळें, मधुर भाषणीं, चंदन कर्पुरादि सुगंध प्रिय, मोत्यें विकणारें, झाडपाणी वगैरे पाणथळ जागीं राहणारें, उंची कपडयाचीं आवड, गोड अन्न खाणारें, आणि बिलावर मणी संग्रह करणारें.

१० याचें नांव नुस्रतुल खारीजः–क्षत्रीय, राजकार्यधुरंधर, धार्मिक, उंची मध्यम, रंग गोरा, नाक लहान, विशाल डोळे, गोल तोंड, मस्तक लहान, गळा बारीक,पाण्याजवळ राहणारें,सुवर्ण धारण करणारें, उंचीं वस्त्रें वापरणारें, काळें केस, गोड अन्नावर प्रीति, सोनें, माणिक अणि रत्न संग्रह करणारे.

११. याचें नांव नुस्त्रतुल् दाखीलः–ब्राह्मण, रंग गोरा, तापसीं, विद्यावंत उच, गोल तोंड असून त्यावर तिळाचे डाग, कंबर बारीक, पोटऱ्या बारीक, कुरळें केस, मोठे डोळे, पांढऱ्या कपडयावर प्रीति, विद्यार्थी व गुरु, सुगंध प्रिय, गोड अन्नाचो प्रीति, सोनें, रुपें आणि स्फटिकमणि संग्रह करणारें असून देवालय गुरु गृह अगर राजवाडयांत राहणारें

१२. याचें नांव उत्पतुल खारीजः–म्लेंच, उंच,कृश, कुरूप, काळा आणि पिंवळा रंग, लहान मस्तक, निर्बली काळे केस, सर्वांगावर डाग, बकऱ्यासारख डोळे; कांबळें वगैरे लोकरींची वस्त्रें धारण करणारे, दुर्गंधयुक्त. अंगावर अति केश, अरण्य अथवा किल्यात राहणारें, व दगड संग्रह करणारें.

१३. याचें नांव नकीः– क्षत्रीय, वर्ण गोरा, ठेंगणें, कृश निळया रंगाचें डोळे, शूर, गोल मस्तक, लहान तोंड, वीरध्वनी, शस्त्रास्त्र, धारक, वीराग्रगणी, विरळदांत, बालकरूप, सेवक, ओंठ मोठें, पराधीन, तांबूस केस, मद्यमांसप्रिय, बोबडे बोल, पिंवळें वस्त्र वापरणारें, पितळ आणि प्रवाळ संग्रह करणारें.

१४. याचें नांव उत्पतुल दाखीलः–सामान्यजन, दीर्घ शरीर, तांबडा रंग, तरुण, कठोर, सुंदर मुख, विरळ भिवया, लांब जांघा काळसर डोळे अंगावर तीळ, श्रेष्ठ वस्तूंचा संग्रह करणारें, झाडें अगर पाणथळजागीं राहणारें, असून नीळ संग्रह करणारें.

१५. $\begin{smallmatrix}-\\o\\o\\-\end{smallmatrix}$ याचें नांव इज्जतमा:—शूद्र, लेखक, श्रीमंत, बोटें लहान, ज्योतिषज्ञ, ज्ञानी, सुंदर डोळे, भरीव मिशा, उंच, मोठें मस्तक, लांब गळा, अनेक प्रकारच्या पदार्थावर प्रीति, पाठशाळेंत राहणारे, सूक्ष्म वस्त्रें वापरणारें, आणि सप्तधातूंचा संग्रह करणारें.

१६. $\begin{smallmatrix}o\\o\\o\\o\end{smallmatrix}$ याचें नांव तरीख:— वाणी, रंग गोरा, उंच असून सम शरीर, अशक्त, मोठें डोळे, कुरळ केश, सुंदर, बोबडें बोलणारें, लवकर वाट चालणारें दूत, चतुर, उंची पदार्थावर प्रीति, गोड अन्न खाणारें, रुपें व मोत्यें संग्रह करणारें.

वर १६ शकलांचें जें वर्णन सांगितले आहे तें प्रत्येक शकलाचें गुणरूप इत्यादि दाखविणारे असून प्रत्येक शकलाचें समग्रवर्णन, पुढील कोष्टकांत दिलें आहे तें ज्योतिषानें दररोज आपल्या रिकाम्या वेळांत स्वस्थ चित्तानें पहात असावें अगर साधल्यास पाठ करावें ह्मणजे तो ज्योतिषी बराच या शास्त्रांत निपुण होऊन प्रश्नफलें सांगण्यास केव्हांही अडणार नाहीं.

क्रमांक	शकलें	गांव	शुभाशुभ	दाखील खारीज	आगम निर्गम	स्त्रीपुरुष
१	olll	लह्यान	अतिशुभ	खारीज	निर्गम	पुरुष
२	lolo	कबजतुल दाखील	शुभ	दाखील	आगम	स्त्री
३	olol	कबजतुल् खारीज	अतिअशुभ	खारीज	निर्गम	पुरुष
४	llll	जमात	मध्यम	साबीत	स्थिर	पुरुष
५	oolo	फरहा	मध्यम शुभ	मुनकलीब	द्विस्वभाव	नपूंसक
६	ollo	उकला	अति अशुभ	मुनकलीब	द्विस्वभाव	नपूंसक-स्त्री
७	lllo	अंकीश	अति अशुभ	दाखील	आगम	नपूंसक-स्त्री
८	loll	हुमरा	मध्यम अशुभ	साबीत	स्थिर	स्त्री
९	llol	बयाज	शुभ	साबीत	स्थिर	नपूंसक-पुरुष
१०	ooll	नुस्रतुल् खारीज	शुभ	खारीज	निर्गम	नपूंसक-स्त्री
११	lloo	नुस्रतुल खारीज	अति शुभ	दाखील	आगम	पुरुष
१२	oool	उत्पतुल खारीज	अति अशुभ	खारीज	निर्गम	स्त्री
१३	oloo	नकी	मध्यम अशुभ	मुत्कलीब	द्विस्वभाव	नपूंसक
१४	looo	उत्पतुल् दाखील	मध्यम शुभ	दाखील	आगम	स्त्री
१५	lool	इज्जतमा	मध्यम	साबीत	स्थिर	नपूंसक-पुरुष
१६	oooo	तरीख	शुभ	मुत्कलीब	द्विस्वभाव	नपूंसक-स्त्री

वरील कोष्टकें पाठकांस सुलभ रितीनें समजण्याकरितां तयार

क्रमांक	स्थानरूपी प्रश्न	अवस्था.	स्वभाव.	वीर्य.	ऊच्चत्व	शरीराची उंची
१	तनुर्दंव वगैरे	अतिबली	चपल	मध्यम	ऊच्च	उंच
२	धन देणें घेणें वगैरे	वृद्ध	स्थिर	उत्तम	अतिऊच्च	मध्यम उंच
३	सहज माऊबहिण इ.	अतिवली	स्थिर	सामान्य	नीच	उंच
४	सुहृद, बाप, घरसत इ.	वृद्ध	चपल	मध्यम	नीच	कृश
५	सूत, विद्या, रंडि इ.	कुमार	चपल–स्थिर	मध्यम	नीच	कृश असून गोल
६	रिपु, रोग, दास्यत्व इ.	वृद्ध	विचार युक्त	मध्यम	नीच	स्थूल–कृश
७	जाया; चोरी इ.	वृद्ध	परवश	सामान्य	नीच	कृश असून उंच
८	मृत्यु सर्व प्रकारचे नुकसान इ.	कुमार	क्रोधि	सामान्य	नीच	मध्यम उंच
९	धर्म देवपूजा, प्रवास इ.	तरुण	चपल	स मान्य	नीच	मध्यम उंच
१०	कर्म, राजकार्य, आई वगैरे	अतिबली	स्थिर	सामान्य	अत्युच्च	उंच
११	आय, व्यापार, खरेदि इ,	तरुण	स्थिर	रोगयुक्त	ऊच्च	स्थूल असून उंच
१२	व्यय, पशु, बंदिखाना इ.	अतिबली	स्थिर	पुष्ट	नीच	उंच
१३	प्रश्नकर्त्याचे रूप गुण इत्यादि	तरुण	सत्वधीर	मध्यम	अतिनीच	उंच
१४	सत्यासत्य, कार्याचे लक्षण इ.	कुमार	चपल	मध्यम	ऊच्च	मध्यम उंच
१५	मनचिंता	कुमार	चपलधीर	सामान्य	नीच	मध्यम उंच
१६	चित्तवृत्ति वगैरे	तरुण	चपलस्थिर	मध्यम	नीच	उंच

केलेली आहेत. हीं श्लोकबद्ध दिल्यास वाकोंच्या पाठकांना समजण्यास कठीण

क्रमांक	आयुर्बल	बुद्धी	प्रकृति	दृष्टी	जात	कर्तव्य
१	चिरंजीव	चपल	पित्त	अंध	ब्राह्मण	पंडित
२	निर्जीव	चपल-मंद	वात	सूक्ष्म	क्षत्रीय	व्यापारी
३	निर्जीव	चपल	पित्त	पूर्ण	म्लेच्छ	चोरी
४	निर्जीव	मंद	पित्त	काणा	शूद्र	जोशी
५	चिरंजीव	चपल	वात	अंध	लेखक	रात्रीजित
६	निर्जीव	चपल-विस्मृति	पित्त	सूक्ष्म	हीन [illegible]ात	शिपी
७	निर्जीव	मंद-विस्मृति	पित्त	पूर्ण	दास	सोनारी
८	निर्जीव	चपल-विस्मृति	पित्त-कफ	पूर्ण	क्षत्रीय	काटक शिपायी
९	निर्जीव	चपल-प[illegible]ाधीन	वात-कफ	काणा	ब्राह्मण	भिक्षुक
१०	चिरंजीव	चपल-पराधीन	पित्त	सूक्ष्म	क्षत्रीय	शिलेदारी
११	चिरंजीव	मंद	शीत	अंध	ब्राह्मण	प्रधानगिरी
१२	चिरंजीव	चपल	पित्तोष्ण	पूर्ण	म्लेच्छ	चोरी
१३	निर्जीव	चपल-मंद	शीत-वात	मंद	क्षत्रीय	लोहारी
१४	चिरंजीव	चपल	पित्त-वात	काणा	सामान्यज	व्यापारी
१५	चिरंजीव	चपल-मंद	शीत-वात	अंध	शूद्र	व्यापारी
१६	निर्जीव	चपल स्थिर	पित्त-वात	काणा	वैश्य	दूत

पडतात. पाठकांनीं आपल्या रिकाम्या वेळांत कोष्टकांत दिलेल्या क्रमांकास

क्रमांक	शरीरवर्ण	स्थान	रोग	रोग उत्पत्ति काल	रुचि
१	पीत	मस्तक	मस्तक दुखणें, ताप	संध्याकाळानंतर	कडू
२	कृष्ण	मुख	सर्वांगशूल, ताप.	तिसऱ्या प्रहरी	कडू-आंबट
३	पीत	गळा	द्वितीयज्वर, मूर्च्छा	सांयकाळीं	कडू
४	कृष्ण	उजवी भुजा	विषमज्वर, उदर शूल, श्वास	रात्री	कडू-आंबट
५	रक्त	डावी भुजा	छाती दुखणें; रक्तस्राव, गरमी	प्रातःकाळीं	गोड
६	कृष्ण	उजवी हात	पोटदुखी, क्षय	संध्याकाळानंतर	कड-आंबट
७	कृष्ण	डावा हात	रक्तस्राव, खोकला, ताप गरमी	संध्याकाळानंतर	कड-आंबट
८	रक्त	हृदय	सूज, रक्तस्राव	संध्याकाळानंतर	गोड
९	गौर	पाठ	ताप, अर्धांग, शीत, खोकला	संध्याकाळ	खारट, गो
१०	पीत	पोट	उष्णज्वर, डोळे दुखणे,	उषःकाली	तिखट
११	गौर	काळीज	विषबाधा, पोटदुखी कंबर दुखणें	१॥ प्रहर दिवसानंतर	खारट, गो
१२	पीत	पार्श्व कुशी	ताप	पहिल्या प्रहरी	कडू
१३	गौर	उजवी जांघ	मस्तक, कान, दांत दुखणें, नजर	१॥ प्रहर दिवसानतर	खारट, गो
१४	रक्त	डावी जांघ	कंबरदुखी, ताप	सध्याकाळीं अगर प्रातःकाळीं	मधुर
१५	रक्त	उजवा पाय	पाठ, कंबर, दुखणें	प्रातःकाळीं	मधुर
१६	गौर	डावा पाय	धातुविकार	संध्याकाळीं	खारट, गो

अनुक्रमें जें जें स्थानपरत्वें वर्णन प्रत्येक सदराखालीं लिहिलें आहे ते प्रश्न

क्रमांक	सुगंधी पदार्थ	रुचि पदार्थ	राहण्याची जागा	दिशा
१	कस्तूरी, ऊद	खडीसाखर	महाल, आकाश, नगर, वन	पूर्व
२	कस्तूरी, केशर	उत्तम मिठाई	श्रृंगारिक जागा, उच्च जागा, वन, पर्वत	दक्षिण
३	मोह्वरी	खसखसीचें मूळ	निंद्यस्थल, सराफकट्टा, शहर	पूर्व
४	सुगंध	कोथिंवीर	बाजार, सराफकट्टा, शहर	दक्षिण
५	,रेशीम, सुगंध	लिंबू	वारा खेळण्याची जागा, गज-वीथिका, वेश्यागह	पश्चिम
६	दुर्गंध	लोणचें	भयाची जागा, काळोखी, शहर	दक्षिण
७	दुर्गंध	मेथीची भाजी	माळ दगडाची जागा, गोंडदेश, दुकान	दक्षिण
८	कस्तूरी, कापूर	मासवादी	निंद्य जागा, मलियाळ, हिंदुस्थान	पश्चिम
९	कस्तूरी, कापूर	दही	पाणी वाहण्याची जागा, नदी तीर, वन, शेत	उत्तर
१०	कस्तुरी, कापूर	बदाम	वन, राजमहाल, नगर	पूर्व
११	कृमिजन्य	उत्तम मिठाई	देवालय, पाठशाळा	उत्तर
१२	दुर्गंध	कडू पदार्थ	निंद्यस्थळ, नगर, वन विलायत	पूर्व
१३	रेशीम	भाजलेली सोजी	निंद्यस्थल, गुहा, गांव, वन	उत्तर
१४	सुगंध	मिठाई	पाणी वाहण्याची जागा, वन, वृक्ष	पश्चिम
१५	सुगंध	तऱ्हेतऱ्हेची मिठाई	घर, बाजार, दुकान	पश्चिम
१६	सुगंध	सुगंधी मिठाई	पाणी वाहण्याची जागा, नदी, तीर, शेत	उत्तर

सांघबांना संक्षिप्त रीतीनें बोध होण्यास सुगम आहे. ह्मणून त्याकडे लक्ष्यपूर्वक

क्रमांक	इच्छा	शकलांचे तत्व	राशी	ग्रह	शकलांतील प्रकटतत्वें
१	पोषक	तेज	धन	गुरु	तेज
२	पुष्टिक	पृथ्वी	सिंह	सूर्य	वायु, पृथ्वी
३	पोषक	तेज	कुंभ	केतु	तेज, जल
४	पुष्टिक	पृथ्वी	कन्या	बुध	याची तत्वें गुप्त
५	पुष्टिक	वायु	तुल	शुक्र	तेज, वायु, पृथ्वी
६	पुष्टिक	पृथ्वी	मकर	शनि	तेज, पृथ्वी
७	पुष्टिक	पृथ्वी	कुंभ	शनि	पृथ्वी
८	पुष्टिक	वायु	वृश्चिक	मंगळ	वायु
९	पुष्टिक	जल	कर्क	चंद्र	जल
१०	पोषक	तेज	सिंह	सूर्य	तेज, वायु
११	पुष्टिक	जल	मीन	गुरु	जल, पृथ्वी
१२	पोषक	तेज	मकर	राहु	तेज, वायु, जल
१३	पुष्टिक	जल	मेष	मंगळ	तेज, जल, पृथ्वी
१४	पुष्टिक	वायु	वृषभ	शुक्र	वायु, जल, पृथ्वी
१५	पुष्टिक	वायु	मिथुन	बुध	वाय, जल
१६	पुष्टिक	वायु	कर्क	चंद्र	तेज, वायु, जल, पृथ्वी

पहात असावें. प्रत्येक पानावरील क्रमांकच लह्यान वगैरे शकलें होत. साराश

क्रमांक	चरस्थिर	मृदु कठिण	वजन	गुरुलघु	वर्ण	मौल्यामौल्य
१	द्विस्वभाव	मृदु	हलके	लघु	पीत, रक्त	अतिमौल्य
२	द्विस्वभाव	कठिण	जड	गुरु	श्वेत, धूसर	समौल्य
३	द्विस्वभाव	कठिण	हलके	लघु	श्वेत, कृष्ण	मौल्यहीन
४	स्थिर	मृदु	जड	गुरु	श्वेत	मौल्यहीन
५	चर	मिश्र	हलके	लघु	पीत, कृष्ण, विचित्र	स्वल्पमौल्य
६	चर	मिश्र	जड	गुरु	श्वेत, शाम	समौल्य
७	द्विस्वभाव	मिश्र	जड	लघु	कृष्णकर्बुर	मौल्यहीन
८	स्थिर	कठिण	हलके	गुरु	रक्त, शाम	स्वल्पमौल्य
९	स्थिर	मृदु	जड	लघु	श्वेत	मध्यमौल्य
१०	द्विस्वभाव	कठिण	हलके	गुरु	पीत, श्वेत	अतिमौल्य
११	द्विस्वभाव	मृदु	जड	लघु	शाम, बहुवर्ण	अतिमौल्य
१२	चर	कठिण	हलके	गुरु	पीत, कृष्ण	मौल्यहीन
१३	द्विस्वभाव	कठिण	जड	लघु	चित्ररक्त	मौल्यहीन
१४	स्थिर	मृदु	हलकें	लघु	चित्रश्वेत	स्वल्पमौल्य
१५	स्थिर	मृदु	हलके	गुरु	हरित	स्वल्पमौल्य
१६	स्थिर	कठिण	जड	गुरु	हरित, शाम, श्वेत	समौल्य

त्या त्या शकलांचे तें तें वर्णन आहे असें समजावें. उदाहरणार्थः— एखाद्याने

क्रमांक	रुचि	खंडित	एकयुत	आकृति	धातु	सुवर्णादि धातु
१	तीक्ष्ण	खंडित	एक	दीर्घवर्तुळ	धातु	सोनें
२	मिष्ट	पूर्ण	युत	वर्तुलचतुरस्र	मूल	रुपें
३	तीक्ष्ण	खंडित	युत	दीर्घचतुरस्र	धातु	शीस
४	मिष्ट	पूण	युत	चतुरस्रत्रिकोण	मूल	पंच धातु
५	मिष्ट	खंडित	एक	समानवर्तुल	जीव	सोनें
६	मिष्ट	पूर्ण	युत	वर्तुलचतुरस्र	मूल	लोखड
७	तीक्ष्ण	खंडित	एक	चतुरस्रवर्तुल	मूल	लोखड
८	मिष्ट	खंडित	युत	वर्तुलत्रिकोण	जीव	तांबे
९	क्षार	खंडित	एक	दीर्घत्रिकोण	मूळ	रुपें
१०	तीक्ष्णकडु	पूर्ण	युत	दीर्घवर्तुल	धातु	कांसे
११	क्षारमिष्ट	पूर्ण	एक	विस्तीर्णचतुरस्र दीर्घ	मूल	सोनें
१२	तीक्ष्णकटु	खंडित	युत	दीर्घवर्तुल	धातु	शीस
१३	क्षार	खंडित	एक	विस्तीर्ण दीर्घ सम	मूल	पितळ
१४	मिष्ट	खंडित	युत	वर्तुल	जीव	सोनें
१५	मिष्ट	पूर्ण	एक	वर्तुलत्रिकोण	जीव	पच धातु
१६	तीक्ष्ण	खंडित	युत	विस्तीर्णदीर्घ वर्तुल	मूल	रुपें

मला रोग झाला आहे. तो साध्य कीं असाध्य? असा प्रश्न केल्यास प्रश्नकर्त्याचे

क्रमांक	रत्नें	धान्य	फल	फूल वगैरे	तेल वगैरे	दुष्ट जीव
१	पुष्कर	हरभरे	कलिंगड	फूल	मद्य	हत्ती
२	माणिक	गहूं	नारिंग	कापू	हत्तीची अगर वाघाची चरबी	वाघ
३	छाग	उडीद	वाळूक	वाळलेले पान	वाघाची चरबी	कुत्रा
४	पाच	मूग	नारिंग	वाळलेले लांकूड	काळे तिळाचे तेल	माकड
५	वज्र	जोंधळे	छुहारा	गवत	लोणी	उंट
६	नीळ	कुळीथ	अळू	सण	घुबडाची चरबी	उंदीर
७	नीळ	कुळीथ	कंद	मुळ	लिंबाचे तेल	कोल्हा
८	प्रवाळ	मसूर	काळे आळू	वाळलेली फांदी	दारु	मांजर
९	मोती	तांदूळ	तूतीचें फळ	गुग्गुळ	नारळाचे पाणी	पाणकिडा
१०	माणिक	गहूं	द्राक्ष	पान	सिंहाची चरबी	उंट
११	पुष्कर	हरभरे	आंबा	फूल	मासळीचें तेल	रेडा
१२	गोमेद	उडीद	वाळूक	चूब	वाघाची चरबी	कुत्रा
१३	प्रवाळ	मसूर	रताळे	केळी	अर्क	मांजर
१४	वज्र	जोंधळे	द्राक्ष	द्राक्ष	गाईचे तूप	तितीर
१५	पाच	मूग	डाळिंब	मिठाई	वाघाची चरबी	माकड
१६	मोती	तांदूळ	पेरु	झाड	पाणकिड्याचें तेल	मासळी

स्थान १ लें; रोगाचें स्थान ६ वें; रोग्यास मारक स्थान ८ वे असल्यानें

क्रमांक	पक्षी	पशु	दुष्ट पशु	भूत भविष्य काल	सुकाले. त्यादि	मुसलमानी महिने
१	बुलबुल	घोडा	रेडा	वर्तमान	सुकाल	मोहरम
२	शहामृग	उंट	चित्ता	आकस्मिक भूत	दुष्काल	जिल्हेज
३	कोंबडा	उंट	कुत्ता	वर्तमानभविष्य	दुष्काल	जमादिलावल
४	बुलबुल	वाघ	मकनाहत्ती	आकस्मिक वर्तमान	मध्यकाल	सवाल
५	पाणकोंबडा	घोडा	वनगाय	भविष्यभूत	दुष्काल	शावान
६	कावळा	अस्वल	मकनांहत्ती	आकस्मिकभविष्य	दुष्काल	सफर
७	चिमणी	उंट	हत्ती	आकस्मिक वर्तमान	दुष्काल	सफर
८	शिकरा	भित्रे जनावर	लांडगा	भविष्यभूत	सुकाल	जिल्काद
९	पाणकोंबडा	पाण घोडा	मांजर	भूतभविष्य	दुष्काल	जमादिलावल
१०	शिकर.	घोडा	चित्ता	वर्तमान	सुकाल	रज्जब
११	बुलबुल	घोडा	कोल्हा	भूत	दुष्काल	जमादिलाखर
१२	कोंबडा	खेचर	माकड	वर्तमानभविष्य	दुष्काल	रविलाखर
१३	शिकरा	हरिण	कुत्ता	भूतवर्तमान	दुष्काल	रविलावल
१४	पाणकोंबडा	हरिण	वनगाय	भविष्यभूत	दुष्काल	रविलाखर
१५	बुलबुल	हत्ती	वनगाय	भविष्य	दुष्काल	सवाल
१६	पाणकोंबडा	घोडा	माकड	भूतवर्तमान	दुष्काल	रमजान

पाठकांनें त्या त्या स्थानीं जीं शकलें पडली असतील तीं तीं पाहून कोष्टकांत

क्रमांक	हिंदु महिने	भोग्यकाल	प्रतिदिवसाचा निश्चित काल	शीतोष्ण	रजतम	वर्गाक्षरें
१	चैत्र	१॥ घटिका	संध्याकाळनंतर	उष्ण	रज	त वर्ग
२	फाल्गुन	१ महिना	एक प्रहर दिवस असतां	शीत	रजतम	अ वर्ग
३	श्रावण	३ वर्षे	दिवा लावण्याची वेळ	उष्ण	सत्व	प वर्ग
४	पौष्य	४ महिने	दिवा लाविल्यानंतर	शीत	रजतम	ट वर्ग
५	कार्तिक	२ महिने	प्रातःकाल	उष्ण	तम	च वर्ग
६	ज्येष्ठ	५ दिवस	सायंकालानंतर	उष्ण	रज	प वर्ग
७	वैशाख	१२॥ घटिका	सायंकालानंतर	उष्ण	तम	प वर्ग
८	पौष्य	१५ घटिका	सायंकालानंतर	उष्ण	तम	क वर्ग
९	श्रावण	२ वर्षे	दिवा लावण्याची वेळ	शीत	रजतम	य वर्ग
१०	आश्विन	२ महिने	उजाडतां	उष्ण	सत्वतम	अ वर्ग
११	भाद्रपद	५ दिवस	१॥ प्रहर दिवस चढल्यावर	शीतोष्ण	रजसत्व	त वर्ग
१२	आषाढ	६ दिवस	दिवसा पहिल्या प्रहरी	उष्ण	रजतम	प वर्ग
१३	चैत्र	८ घटिका	१॥ प्रहर दिवस चढल्यावर	शीत	रज	क वर्ग
१४	मार्गशीर्ष	६ वर्षे	संध्याकाळ-प्रातःकाल	उष्ण	रजतम	च वर्ग
१५	पौष्य	४ वर्षे	प्रातःकाल	शीत	रजतम	ट वर्ग
१६	माघ	२ वर्षे	संध्याकाल	उष्ण	सत्वतम	य वर्ग

वर्णन केलेली चिकित्सा पाहून साध्य किंवा असाध्य वेळ, रोगाचे वर्णन

क्रमांक	नियमित अक्षरें	बलाबल स्थानें	संस्कृत स्थानसंज्ञा	उमहातादि-संज्ञा	अन्यस्थान संज्ञा	स्थानतत्व
१	अ	अवताद पूर्ण बली १	केंद्र	उमहात	मातृ	अग्नि
२	क-ज	मायल मध्यम बली $\frac{1}{2}$	फणपर	उमहात	मातृ	वायु
३	ग-व	जायल बली $\frac{1}{2}$	अपोक्लीम	उमहात	मातृ	जल
४	म	अवताद बली $\frac{1}{4}$	केंद्र	उमहात	मातृ	पृथ्वी
५	त-ज	मायल $\frac{1}{8}$	फणपर	बनात	दुहितृ	अग्नि
६	ल	जायबबलहीन $\frac{1}{2}$	अपोक्लीम	बनात	दुहितृ	वायु
७	स-ब	अवताद बली $\frac{3}{4}$	केंद्र	वनात	दुहितृ	जल
८	क-ज	मध्यम मायल $\frac{1}{8}$	फणपर	वनात	दुहितृ	पृथ्वी
९	द-ह	जायल मध्यम $\frac{3}{2}$	अपोक्लीम	मुतवलिदात	दौहित्र	अग्नि
१०	व-त	अवताद पूर्ण बली १	केंद्र	मुतवलिदात	दौहित्र	वायु
११	ह-श	मायल बली $\frac{3}{4}$	फणपर	मुतवलिदात	दौहित्र	जल
१२	ह-स	जायल बली $\frac{1}{4}$	अपोक्लीम	मुतवलिदात	दौहित्र	पृथ्वी
१३	ई-ज	जायदात०	अधिक	जायदात	प्रपौत्र	अग्नि
१४	स-र	जायदात०	अधिक	जायदात	प्रपौत्र	वायु
१५	स	जायदात०	अधिक	जायदात	प्रपौत्र	जल
१६	त	जायदात०	अधिक	जायदात	प्रपौत्र	पृथ्वी

दुखण्याची जागा वगैरे सांगण्यास फारच सोपें जातें.

प्रश्नोपकरणविधि.

प्रश्नकर्त्याचें उत्तर सांगण्याकरितां कुंडली तयार करण्याची जी रीत पुढें सांगितली आहे त्याप्रमाणें कुंडली प्रथमतः तयार केल्यावर ती खरी किंवा खोटी हें ठरवावें. नंतर प्रश्नास बळकटी आणणारी साधनें (उपकरणें) खालीं वर्णन केलीं आहेत. त्यावरून उत्तर द्यावें अशीं उपकरणें ९ प्रकारचीं आहेत तीं:—

१ मरातिब, २ इमतिजाज, ३ तासीर, ४ तकरार, ५ इनकिलाब, ६ बलाबल ६ दृष्टबल, ८ प्रश्नभेद, आणि ९ रमलजिव्हां.

मरातिब उपकरणाची रीत.


या उपकरणांत ५ भेद आहेत त्यांचीं नांवें:—१ रुबाई, २ समानी, ३ सवाई ४ खुमासी आणि ५ सुदासी.


१ लें रुबाई हें नांव  या तरीख शकलास आहे.

२ रें समानी हें नांव  या जमात शकलास आहे.

हीं दोन्हीं शकलें परस्पर विरोधीं आहेत.


तरीखच्या जागीं जमात आल्यास अगर जमातच्या जागीं तरीख आल्यास तीं एकमेव त्या त्या स्थानासबंधीं कार्यीस विघ्न आणितात.

३ रे सवाई हें नाव  या चारीपैंकीं प्रत्येक शकलास दिलें आहे.

४ थ खुमासी हें नांव  या चारीपैंकीं प्रत्येक शकलास दिलें आहे.

ही आठहीं शकलें परस्पर अल्प विरोधी आहेत.

सवाईच्या जागीं खुमासी पैंकीं एखादे अगर खमासीच्या जागी सवाई पैकीं एखादें शकल कुंडलींत पडल्यास त्या स्थानासबंधी प्रश्नांचें कांहींसे नुकसान करतील.

५ वें सुदासी हें नांव  या सहा शकलापैकीं प्रत्येकाचें आहे. हीं शकलें कुंडलींत कोणत्याही स्थानीं पडली तरी त्या स्थानाचें

अगर त्या स्थानासंबंधीं प्रश्नाचें नुकसान करीत नाहींत. उदाहरणः—मला संतती होईल काय ? असा एक प्रश्न आहे या करितां कुंडली तयार केली आहे त्या कुंडलींत ५ वे स्थान मुलाचें तेथील मूळ स्थानाचें शकल ⁘ हें फरहा. उपकरणांत यास खुमासी असें नांव दिलें आहे. त्या स्थानीं सवाई शकलांतील कोणतेही शकल पडल्यास संततीस विघ्नवारण, तेथें समानी, रुवाई आणि सुदासी शकलांपैकीं कोणतेही शकल पडलें तरी विघ्नकारक नव्हें. यांचप्रमाणें शकलें व स्थानांचा संबंध जाणून उत्तर द्यावें.

२. इम्तिजाज उपकरणाची रीत.

दोन शकलांचा गुणण्यानें येणाऱ्या तिसऱ्या शकलास इम्तिजाज असें नांव दिलें आहे.

तें इम्तिजाज शकल दोन्ही शुभ शकलांच्या गुणण्यानें तिसरें शुभ शकलच उत्पन्न झाल्यास ज्या कार्याचा व स्थानाचा जो प्रश्न असेल तो आदि व अंती तत्काळ सौख्यफल देणारा.

तें शुभ आणि अशुभ या शकलांच्या गुणण्यानें तिसरें शुभ शकल आल्यास आदि सुख व अतीं दुःख होऊन सौख्यफल विलंबानें मिळणार.

तें अशुभ आणि शुभ अगर दोन्ही अशुभ शकलांच्या गुणण्यानें तिसरें शुभ शकल आल्यास आदि दुःख होऊन अंतीं सुखफल अति विलबानें मिळेल.

दोन्हीं अशुभ शकलांच्या गुणण्यानें तिसरें अशुभ शकल आल्यास चिंतिलेल्या कार्यापैकी थोडे कार्य होईल.

शुभ आणि अशुभ शकलांच्या गुणण्यानें तिसरें अशुभ शकल आल्यास मिश्रफल मिळेल.

दोन्ही अशुभ शकलांच्या गुणण्याने तिसरेंही अशुभ शकल आल्यास हानि.

तासीर उपकरणाची रीत.

कुंडली तयार केल्यानंतर त्यांतील १ ले स्थान प्रश्नकर्त्याचें तेंच लग्न अथवा उदय असें समजावे आणि त्या स्थानास अनुसरून बाकीची ११ स्थानें प्रश्नकर्त्याच्या संबंधाची. अरबस्थान वगैरे देशांतील ज्योतिषी उरलेली १३-१४-१५

१६ हीं चार स्थ नें देखील हिशेबाकरितां घेतात. हीं स्थानें घेतलीं तरी प्रत्येक स्थान १२ ही स्थानांतील तीन तीन स्थानांचा संबंध ठेवितें उदाहरण:–१३ व्या स्थानास संबंध असणारें कुंडलींतील १-५-९ हीं स्थाने. १४ व्या स्थानास २-६–१०; १५ व्या स्थानास ३–७–११ आणि १६ व्या स्थानास ४-८-१२ असें होत. याहीपेक्षां अधिक स्थानसंबंधाचा विचार करणें अवश्य वाटल्यास पुनः १ स्थानापासून कुंडलीचक्र फिरवीत स्थान संबंध ओळखावें. उदाहरण:– मी भावाजवळील पित्रार्जित धन कपटानें घेऊन माझ्या मुलास देऊन व बायकोस भूतबाधेचा विकार झाला आहे तिच्याशी प्रपंच करणें कठीण झाल्यामुळें पुण्यास जाऊन हजारों रुपये मिळवून ते सर्व स्वच्छेप्रमाणें उधळून चुलत्याची भेट घेऊन नातवाजवळ असलेल्या माझ्या आईस संरक्षण करण्यांत वेळ घालवावी, असा प्रश्न एखाद्यानें केल्यास 'मी' ह्मणजे १ लें स्थान. 'भावाचें' स्थान ३ रे त्याजवळ 'पित्रार्जित धन' स्थान ४ थें, 'कपटाचें स्थान' ५ वें, 'मुलांचे स्थान' ही ५ वें, 'बायकोचें स्थान' ७ वें, 'बाधेचे स्थान' ६ वे, 'पुण्यास जाण्याचे स्थान' ९ वें, 'रुपयें मिळविण्याचे स्थान' २ रे व ११ वे, 'उधळण्याचे स्थान' १२ वें, 'चुलत्याचे स्थान' ६ वे, 'भेटीचें स्थान' ८ वे, नातूचे व आईचे स्थान' १० वे आणि 'संरक्षण करणेचे स्थान' १ ले, याप्रमाण १ ल्या स्थानापासून सव स्थानांचा संबंध जाणून त्या त्या स्थानीं असलेल्या शकलांच्या शुभाऽशुभ फलांवरून व बाकीच्या उपकरणांच्या सहाय्यानें अगर २ ऱ्या भागांत सांगितलेल्या रीतीस अनुसरून उत्तर द्यावें.वरील उदाहरण प्रश्नकर्त्यांचे झाले. "याच रीतीनें माझा भाऊ करणार आहे" असा जर प्रसंगी प्रश्न आल्यास प्रश्नकर्त्यांच्या भावाचे स्थान ३ रें तेच पहिले स्थान अगर लग्न असे कल्पून वरील प्रमाणें कुंडलींचक्र स्थान संबंध जाणून फिरवावे ह्मणजे संशयास जागा मुळीच राहणार नाही.

तकरार उपकरणाची रीत.

कुंडलींत कोणत्याही एका स्थानीं पडलेले शकल पुनः पुनः बाकीच्या १५ स्थानांपैकी कितीही स्थानीं तेच पडेल तर त्या पडणाऱ्या शकलास 'तकरार अथवा पुनरुक्त असे ह्मणतात. तीं तकरार आठ प्रकारची आहे.

तकरार १ ली.–प्रथमत: पडलेलें शकल शुभ असून शुभ स्थानांत पडले असेल आणि बाकीच्या शुभ स्थानांत तकरार करील तर अत्युत्तम फल देतें

तकरार २ री:–तें शकल शुभ आहे व अशुभ स्थानांत पडून शुभ स्थानांत तकरार करील अगर तें शुभ असून शुभ स्थनांत पडलें आहे आणि अशुभ स्थानांत तकरार करील तर उत्तम फल देते.

तकरार ३ री:– तें शकल शुभ असून अशुभ स्थानांत पडलें आहे व अशुभ स्थानांत तकरार करील तर मध्यम फल देतें.

तकरार ४ थी:–तें शकल अशुभ असून अशुभ स्थानांत पडलें आहे आणि अशुभ स्थानांत तकरार करील तर अति कनिष्ट फल देतें.

तकरार ५ वी:–तें शकल अशभ असून अशुभ स्थानांत पडलें आहे व शुभ स्थानांत तकरार करील अथवा तें अशुभ असून शुभ स्थानांत पडलें आहे आणि अशुभ स्थानांत तकरार करील तर कनिष्ट फल देतें.

तकरार ६ वी:–तें शकल अशुभ असून शुभ स्थानांत पडलें आहे व शुभ स्थानीं तकरार करील तर (अर्ध) मध्यम कनिष्ट फल देतें.

तकरार ७ वी:–वर ज्या ६ प्रकारच्या रीति सांगितल्या त्या दोनच स्थानांत पडलेल्या शकलांच्या तकरारींचीं रूपें दाखवून फले वर्तविण्याचीं रीति सांगितली. परंतु प्रश्नकर्त्याच्या कर्माप्रमाणें प्रश्नकुंडलींत दोन स्थानांपेक्षांही अधिक स्थानांत तकरारी शकलें पडत असतात. ती शुभ अथवा अशुभ अथवा दोन्ही कमीजास्त स्थानांत पडतील त्यावेळीं स्थानांचा शुभाऽशभ संबंध जाणून वर वर्तविलेल्या फळांस कमजास्त जोर देऊन फळ सांगावें.

तकरार ८ वी:– वरील ७ ही रीतींत शुभ आणि अशुभ शकलांचा संबंध दाखविला परंतु १६ शकलांपैकीं दोन शकलें जात्या मध्यम फलाची आहेत. त्यांच्या तकरारीचें फल सांगणें आहे तर वरील सर्व रीति लक्षांत आणून जसजसा स्थानांचा शुभाऽशुभ संबंध दिसेल त्या रीतीनें त्या मध्यम शकलाचें फळ सांगावें.

इन्‌किलाब उपकरणाची रीत.

प्रश्न कुंडली तयार झाल्यावर तींतील १-२-३-४ स्थानांतील शकलांस ५-६-७-८ स्थानांतील शकलांनी क्रमवार गुणून ह्मणजे एकास पाच दोन्हींस सहा तिन्हींस सात आणि चान्हींस आठ याप्रमाणें गुणून चार शकलें तयार करून त्या चार शकलांवरून निराळी पूर्ण कुंडली तयार करावी. त्या कुंडलीतील १५* व्या स्थानीं निश्चयपणें हें ☰ जमात शकल येतें. तें १३ व १४ व्या स्थानांतील दोन्हीं शकलांच्या गुणण्याने येते.

तें जमात शकल दोन्हीं शुभ दाखील शकलांपासून उत्पन्न झालें तर आगम कार्याचें शुभफल प्राप्त होतें, अशुभ दाखील शकलांपासून उत्पन्न झाल्यास आगम कार्याचें अशुभ फल. शुभ खारिज शकलांपासून उत्पन्न झाल्यास निर्गम, कार्याचें शुभ फल. अशुभ खरिज शकलांपासून उत्पन्न झाल्यास निर्गम कार्याचें अशुभ फल. शुभ साबीत शकलांपासून उत्पन्न झाल्यास स्थिर कार्याचें शुभ फल. अशुभ साबीत शकलांपासून उत्पन्न झाल्यास स्थिर कार्याचें अशुभ फल. शुभ मुनकलीब शकलांपासून उत्पन्न झाल्यास समकार्याचे शुभ फल. आणि अशुभ मुनकलीब शकलांपासून आल्यास समकार्याचे अशुभ फल प्राप्त होतें. हें इन्‌किलाब उपकरण मुष्ठीप्रश्न, मूकप्रश्न, वर्षफल, अवधिनिर्णय आणि चोराचें नांव सागणें या प्रश्नास सोडून बाकीच्या सर्व प्रश्नांकरितां उपयोगांत आणावें.

बलाबल उपकरणाची रीत.

जीं जीं शकलें कुंडलीत स्वस्थानी पडलीं असतील तीं ती आपापल्या स्थानकार्यांस बलवत्तर असतात. तीच तकरार उपकरणाप्रमाणें २ वगर अधिक वेळ पडली असल्यास अधिक बलि होतात. तीं स्वस्थानांची नसल्यास बलहीन जाणावीं.

दृष्टीबल उपकरणाची रीत.

दृष्टींचें विभाग ५ आहेत त्यांची नांवें:– १ लें तरविया; २ रें तसदीस; ३ रें तसल्लीस; ४ थें मुकाबिला आणि ५ वें मुकारना.

---

*प्रश्न कुंडलीच्या १५ व्या स्थानीं जें शकल येतें तेंच शकल इन्‌किलाब कुंडलीच्या १३ आणि १४ व्या स्थानीं बिनचूक यतें असे असतां इन्‌किलाब कुंडली निराळीच तयार करण्याची रीत मूल शोधकानीं ग्रंथांत कां लिहिली हें कळत नाहीं. याचें कारण पाठकांनी शोधावें.

तरबियादृष्टी १ ली:— प्रश्नकर्त्याचें स्थान १ लें. या स्थानांस ३
स्थानांत असलेलें शकल पहातें. शुभ अगर अशुभ असेल तसें ४ आण फल दें

तसदीसदृष्टी २ री:- १ ल्या स्थानास ५ व्या स्थानांतील शकल पहा
शुभ अगर अशुभ आठ आणे फल देतें.

तसल्लीसदृष्टी ३ री:— १ ल्या स्थानास ४ थ्या स्थानांतील शकल पहा
तें १२ आणे शुभ अगर अशुभ फल देतें.

मुकाबिलादृष्टी ४ थी:—१ ल्या स्थानास ७ व्या स्थानांतील शकल पहा
वें पूर्णफल शुभ अगर अशुभ जसें असेल तसें देतें.

मुकारनादृष्टी ५ वी:—१ ल्या स्थानास १२ व्या स्थानांतील शकल पाह
तें शुभ अगर अशुभ मूकफल देते अर्थात् त्याचें देणें समजत नाहीं.

याप्रमाणें ज्या ज्या स्थानांचा प्रश्नसंबंध आहे त्या त्या स्थानांस सव्यापसव्य
रीतीनें वर सांगितलेली दृष्टि फलें पहावी.

या दृष्टीत गुप्त आणि प्रकट असे दोन प्रकार आहेत.

गुप्तदृष्टी:—जें शकल शकुन क्रमानें आपल्या स्वस्थानीं बसून प्रश्न स्थाना
पहातें त्यास गुप्तदृष्टि ह्मणतात हें अधिक बलवान्.

प्रकटदृष्टी:—जें शकल शकुन क्रमाने स्वस्थानीं नसून प्रश्नस्थानास पहा
त्यास प्रकटदृष्टि ह्मणतात. याचें जरी बल कमी आहे तरी फलदायक आहे
उदाहरणार्थ कुंडली तयार केली आहे. प्रश्नकर्त्याचा प्रश्न 'दैवविचाराचा' आहे
तर त्यात १ ले स्थान दैवाचें. त्या स्थानी हें शकल पडलें आहे. यास सातव्या
स्थानांतील पूर्णदृष्टि कोणती आहे हें पाहिल्यास त्यास्थानीं शकुन क्रमाचें हे
स्वस्थानाचें शकल आहे कारण याची दृष्टि गुप्त असून अधिक बलवान् जाणावे
आणि त्या स्थानांत हें शकल असल्यास प्रकटदृष्टीचें व स्वस्थानाचें नव्हे
असे जाणावें.

प्रश्नभेद उपकरणाची रीत.

१६ ही शकलांत दाखील (आगम), २ खारीज (निर्गम), ३ साबीत
(स्थिर), आणि मुनकलीब (सम) असें ४ विभाग आहेत ते:—

ज्या शकलांचें वरील भागीं रेखा आणि खाली शून्यें असतील त्यांस दाखील असें ह्मणतात; तीं हीं:—०० ———० ——०० —००० आगम फलें (येणें) देणारी.

ज्याच्या वरील भागी शून्यें आणि खालीं रेखा असतील त्यांस खारीज असें ह्मणतात; तीं ही ०——— ०—०— ००—— ०००० निर्गम (जाणें) फलें देणारीं.

ज्यांच्या वरील भागीं रेखा आणि खालीं हीं रेखा असतील त्यांस साबीत असें ह्मणतात; तीं ही ———— —००— —०—— ——०— स्थिर (विलंबाचें) फलें देणारीं.

ज्यांच्या वरील भागीं शून्यें आणि खालींही शून्यें असतील त्यांस मुनकलीब असें ह्मणतात; तीं ही ००—० ०——० ०—०० ०००० सम (समान) फलें देणारी असें जाणावें.




दाखील प्रश्नांची रीतः—दाखील (सर्व प्रकारची कार्यें हातीं येणें) प्रश्न असून कुंडलीच्या १, १४, १५ या तीन स्थ नांत दाखील शकलें असून तीं शुभ असल्यास शीघ्र आणि श्रम न पडतां कार्याची सिद्धता होते. ती अशुभ असल्यास विलंबाने कार्यसिद्धि होते. त्या स्थानांत खारीज शकलें असून शुभ असल्यास त्या कार्याकरितां केलेले श्रम व्यर्थ जातील. आणि तीं अशुभ असल्यास कार्यच होणार नाहीं. त्या स्थानांत साबीत शकलें असून शुभ असल्यास विलंबानें कार्यसिद्धि. तीं अशुभ असल्यास कार्य होणार नाहीं. मध्यम असल्यास मध्यम कार्यसिद्धि. आणि त्यावरील तिन्हीं स्थानांत मुनकलीब शकलें शुभ असोत अगर अशुभ असोत कार्य होणार नाहीं.

खारीज प्रश्नांची रीतः—खारीज (सर्व प्रकारचीं कार्यें हातांतून जाणें) हा प्रश्न आहे व कुंडलीच्या १, १४, १५ या तीन स्थानांत शुभ वा अशुभ दाखील शकलें असल्यास कितीही प्रयत्न केलें तरीं कार्य होणार नाही. त्या स्थानांत शुभ वा अशुभ साबीत शकलें असल्यास कार्य होत नाहीं. मुनकलीब शकलें असून शुभ असल्यास पूर्ण कार्य होईल. अशुभ असल्यास आलस्यानें कार्य होईल. त्या स्थानांत खारीज शकलें शुभ असल्यास निःसंशय काम होईल. अशुभ असल्यास प्रयत्नानें होईल.

साबीत प्रश्नांची रीतः—साबीत (सर्व प्रकारचीं कार्यें स्थिर राहणें) हा प्रश्न आहे आणि कुंडलींच्या १, १४, १५ स्थानांत शुभ साबीत अगर शुभ दाखील

शकलें असल्यास सुखानें कार्यसिद्धि होतें. अशुभ असल्यास कष्टाने कार्यसिद्धि खारीज अगर मुनकलीब शकले शुभ अगर अशुभ असलीं तरी कार्य होणार नाहीं.

मुनकलीब प्रश्नांची रीत:– वर खारीज प्रश्नाच्या रीतीत सांगितलेला क्रम या रीतीसहा लागू आहे ह्मणून विवेचन केलेलें नाहीं. दाखील आणि साबीत शकलें बहुतांशी एकच गुण देणारी आणि खारीज व मुनकलीब शकलें हीं एकाच प्रकारचा गुण देणारी होत.

एकमेकांविरूद्ध शकलें पडल्यास त्यांची रीत:- कुंडलीच्या १-१४-१५ या स्थानांत वरील चारही रींतीत सांगितल्याप्रमाणें शकलें न पडतां एकमेकांविरुद्ध पडल्यास त्या तिन्ही स्थानांतील शकलें एकमेकांशी गुणून एक शकल तयार करावें. तें दाखील, खारीज, साबीत व मुनकलीब आणि शुभ व अशुभ पाहून वरील चारही रीतीपैकीं कोणतें आहे तें पाहून उत्तर द्यावें. उदाहरण:– कुंडलीतील १-१४-१५ या स्थानांत क्रमानें    खारीज, दाखील आणि साबीत अशा एकमेंकांविरूद्ध शकलें पडली अ। तर ती वरील रीतीत सांगितल्याप्रमाणें १ ल्या स्थानांतील  हें व १४ व्या स्थानांतील  या शकलाशीं गुणल्याने  शकल तयार झालें, पुनः  या शकलानें तयार झालेल्या शकलास गुणतांच  हें अशुभ असून मुनकलीब शकल तयार झालें. यावरून ४ थ्या रीतींत सांगितल्याप्रमाणें कार्या कार्याचा विचार करून उत्तर द्यावें गुणण्याची रीत व कुंडली मांडण्याची रीत मागें लिहिलींच आहे.

रमलजिव्हा उपकरणाची रीत:–या उपकरणांत १ शकून, २ अ.ब. द. ह., ३ बि. ज.द. ह, ४ अ. ब. ज. द., ५ मिजाज, ६ हर्फा, ७ अस्सह, ८ हुक्म, ९ अर्ज, १० माआद, आणि ११ मुसल्लस असें ११ क्रम आहेत.

शकुनक्रम:–हा क्रम सर्व प्रकारच्या प्रश्नांकरितां उपयोगांत आणावा.

अबदहक्रम:–चोराचें रूप, गुण, संतानसंख्या आणि दिननिर्णय करण्याकरितां उपयोगांत आणावा.

अ. ब. ज. द. क्रम:–वस्तूंची नांवें, अर्कोत्पत्ति आणि पाण्याची परीक्षा करण्याकरितां उपयोग करावा.

मिजाजक्रमः– कोणत्याहीं कार्याच्या सिद्धासिद्धतेविषयी.

हर्फाक्रमः– पुष्टस्व, कार्यविधि आणि अक्षरें निर्णय करण्याकरितां.

अस्सहक्रमः– पहाण्यांत आलेल्या कोणत्याही ग्रंथांत याच्या उपरोगाची रीत लिहिलेली आढळून आली नाहीं.

हुकूमक्रमः– हुकमत (अंमल) चालविण्याकरितां.

अरजक्रमः– विनंति आणि लाभाकरितां.

माआदक्रमः– श्रम नसतां कार्यसिद्धि होण्याकरितां.

मुसल्लसक्रमः– पंच लोकांकडून अथवा दुसऱ्याकडून कार्यसिद्धि होण्याकरितां उपयोग करावा.

पहाण्याची रीतः–कुंडलींतील १ल्या स्थानीं पडलेल्या शकलास ज्या स्थानाचा प्रश्न असेल तेथील शकलानें गुणून एक शकल तयार करावें तें शकल पुढें दाखविलेल्या कोष्टकांतील ११ ही रीतीपैकी कोणत्या तरी एका रीतीनें त्या क्रमांत कोठेंही पडलें असल्यास ते शुभ असेल तर त्या स्थानासंबंधीं कार्यास फलदायक; अथवा प्रश्न कुंडलींत ११ हीं रीतीनीं तपासून पहाता कोणत्याहीं स्थानी शकलें पडली असतील तर तीं बलिष्ठ असून त्या त्या कार्यास बल देणारी होत. ती तकरार रूपाने पडली तरीं त्या त्या कामास बलदायक होत असें जाणावे या क्रमासंबंधी पुढें कोष्टक दिलेलें पहाः—

पंक्ती क्रम	पंक्तीची वि. व. संख्या	१	२	३	४	५	६	७	८	९	१०	११	१२	१३	१४	१५	१६
१	शकुन	olll	lolo	olol	llll	oolo	ollo	lllo	loll	llol	ooll	lloo	oool	oloo	looo	lool	oooo
२	अ १ ब २ द ४ ह ८	olll	olll	ooll	llol	olol	lool	oool	lllo	ollo	olol	oolo	lloo	oloo	looo	oooo	llll
३	बि २ ज. ७ द.४ हृ. ८	oolo	olll	looo	llol	oooo	olol	loll	lllo	ooll	ollo	lool	lloo	oool	oloo	lolo	llll
४	अ १ ब. २ ज. ३ द. ४	olll	loll	llol	lllo	ollo	lolo	oolo	oolo	looo	oooo	ooll	oloo	lool	oool	lloo	llll
५	मिजाज	lolo	looo	llll	llol	ollo	olll	loll	oioo	ooll	oolo	lool	oooo	lllo	lloo	olol	oool
६	हर्फा	olll	lllo	loll	llol	lloo	ooll	looo	oool	oolo	oloo	lolo	olol	llll	ollo	lool	oooo
७	अस्सह	olll	looo	oool	llll	oolo	loll	oloo	ollo	lloo	lloo	lolo	olol	llol	lllo	lool	oooo
८	हुकूम	oloo	lloo	oolo	lolo	ollo	lllo	oool	lool	olol	llol	ooll	loll	olll	llll	oooo	oooo
९	अरज	lloo	oolo	lolo	ollo	lllo	oool	lool	olol	llol	oool	loll	olll	llll	oooo	ooll	oloo
१०	माआद	oooo	oloo	lloo	oolo	lolo	oilo	lllo	oool	lool	olol	llol	ooll	loll	olll	llll	oooo
११	मुसल्लस	oolo	lool	olll	lloo	oool	loll	eloo	lllo	ooll	oo	olol	llol	oooo	lolo	ollo	llll

अबदहादि अंकविचार.

अ. ब. द. ह. पंक्तीची रीत उदाहरणार्थ दिला आहे. अचा अंक १; बचे अंक २; दचे अंक ४ आणि हचे अंक ८; याचप्रमाणें त्या त्या अक्षरास नियमित अंक घातले आहेत. ४ थें आणि १६ वें शकल शिवाय करून बाकीच्या शकलांत बिंदु आणि रेखा आहेतच. ४ थ्यांत फक्त रेखा आणि १६ व्या शकलांत फक्त बिंदु आहेत. प्रत्येक शकलाच्या माथ्यापासून खालपर्यंत ज्या रेखा व बिंदु आहेत त्यांत क्रमानें अग्नि, वायु, जल आणि पृथ्वी अशीं चार तत्वें स्वत:सिद्ध आहेत. त्या शकलांत जितकें बिंदु असतील ती सर्व प्रकट तत्वे आणि जितक्या रेखा असतील ती सर्व गुप्त तत्वें जाणून संख्याक्रम मोजतांना प्रकट तत्वांस जी संख्या दर्शविली आहे ती घेऊन मिळवून वट्ट संख्या करावी. १६ वें शकल हें चार बिंदूचे आहे. याची क्रमाने संख्या १-२-४-८. या संख्येंची मिळवणी केल्यानें १५ अंक होतात. त्यास १५ व्या स्थानी. आणि या १५ व्या शकलांचें अग्नी व पृथ्वी स्थान गुप्त तत्वाचें असल्यानें तीं सोडून राहिलेलीं वायु जाणि जल तत्वांचीं संख्या २ व ४ मिळविल्यानें ६ झालीं. त्यावरून या शकलास ६व्या स्थानीं मांडलें, या रीतीनें हा अ. ब. द. ह. क्रम आहे. उदाहरणार्थ, मुलांच्या संख्येंचा प्रश्न आल्यास पुढें प्रश्न भागांत सांगितलेल्या रीतीस अनुसरून हिशेब करतां हे शकल सिद्ध झालें. त्यांतील गुप्त तत्वाची एक रेघ सोडून बाकीच्या १–२–८ संख्याची मिळवणी केल्यानें ११ संख्या झालीं. यावरून प्रश्नकर्त्यास ११ मुलें होतील असें सांगावे. याचप्रमाणें बि. २ ज. ७ द. ४ ह. ८ आणि अ १ ब २ ज ३ द ४ पंक्तीक्रमाच्या संख्येंच्या मिळवणीनें हिशेब करावें. कांहीं ठिकाणी रेखांचें अंक द्विगुणित करून व शून्यांचें अंक कायम ठेवून संख्या करण्याची ही रीत पुढे सांगितली आहे.

तत्वांवरून बलाबल पहाणे.

तेज आणि वायु या तत्वांचे मित्रत्व; पृथ्वीं आणि आप या तत्वांचें मित्रत्व; तसेंच आप आणि तेज यांचे शत्रुत्व; पृथ्वी आणि वायु यांचें शत्रुत्व; तेज आणि पृथ्वी मध्यम मित्रत्व; आप आणि वायु यांचें मध्यम मित्रत्व आहे.

जें शकल तेज तत्वाचें आहे. ते तेज तत्वाच्या घरी बली आहे. आणि मित्र घरी असलें तरी बलीच जाणावें. जें शकल शत्रृगृहामध्यें स्थित होतें तें निर्बल, आणि मध्यम घरचें शकल मध्यम बली जाणावें. ही तत्त्वें सोळा शकलांचे ठाई आहेत ह्मणून तत्व रूपानें वर्णन केलें आहे. याच रीतीने शकलांचे शत्रुत्व आणि मित्रत्व जाणावें ज्या ज्या तत्वांची जीं जी शकलें असतील तीं तीं शकलें बलिष्ठ अशी समजावी. उदाहरण– लह्यान ⚍ हें शकल स्वतः अग्नि तत्वाचें आहे आणि कुंडलीत अग्नि तत्वांचीं स्थानें १-५-९ आणि १३हीं आहेत.करितां या स्थायात जर लह्यान ⚍ शकल पडले तर ते बलिष्ठ होय. आतां लह्यान शकलाचें अग्नि तत्व आहे आणि त्या अग्नितत्वाचे मित्रत्व वायुतत्वाशी आहे. वायुतत्वाची कुंडलींत २–६–१० आणि १४ हीं स्थानें आहेत. या स्थानांत जर लह्यान शकलपडल तर तें बलिष्ठ असें जाणावें.

कोणतेंही शकल शत्रुत्वाच्या घरीं जर दडेल तर तें निर्बल समजावें ह्मणजे लह्यान ⚍ शकलाचें अग्नितत्व आहे व अग्नितत्वाचें शत्रुत्व जलतत्व आहे. जलतत्वांची स्थानें कुंडलींत ३–७–११ आणि १५ ही आहेत. या स्थानांत जर लह्यान शकल पडलें तर तें निर्बल असें समजावें अशाच रीतीनें कोणतेही शकल मध्यम मित्रत्वाच्या स्थानीं पडेल तर, तें शकल मध्यम बलीं जाणावें. जसे लह्यान शकलाचें अग्नितत्व आहे व त्या शकलाचें मध्यम मित्रत्व पृथ्वीतत्व आहे. व पृथ्वीतत्वांची स्थानें कुंडलींत ४–८–१२ आणि १६ हीं आहेत. याकरितां लह्यान शकल या स्थानांत असेल तर मध्यम बलीं असें जाणावे. याप्रमाणें शकलांच्या विचार ज्योतिषानें फार विचारपूर्वक करावा.

तत्वांचें शत्रुत्व, मित्रत्व आणि समत्व समजणारें
पुढें दिलेलें कोष्टक पहा !

क्रमांक	सूक्ष्म साक्षीस्थाने	स्थूल साक्षीस्थाने	स्थानरूपी तत्वांचें शत्रुत्व	स्थानरूपी तत्वांचें मित्रत्व	स्थानरूपी तत्वांचें समत्व	स्थानरूपी तत्वांचें तेजत्व
१	१३–८	१३	अग्नि१ + जल ३	अग्नी१ + वा २	अ१+पृ४	अ१ + अ१
२	१४–७	१४	वा२ + पृ ४	वा २ + अ ५	वा२+ ग३	वा२ + वा२
३	५–६	१५	ज३ + अ५	ज ३ + पृ ४	ज३ + वां६	ज३ + ज३
४	१६	१६	पृ४ + वा६	पृ४ + ज७	पृ४ + अ५	पृ४ + पृ४
५	९	१३	अ५ + ज७	अ५ + वा ६	अ५ + पृ८	अ५ + अ५
६	१०	१४	वा६ + पृ८	वा६ + अ९	वा६ + ज७	वा६ + वा६
७	११	१५	ज७ + अ९	ज७ + पृ८	ज७ + वा१०	ज७ + ज७
८	१२	१६	पृ८ + वा१०	पृ८ + ज११	पृ८ + अ९	पृ८ + पृ८
९	१५	१३	अ९ + ज११	अ९+वा१०	अ९ + पृ१२	अ९ + अ९
१०	६	१४	वा१० + पृ १२	वा१०+अ१३	वा१०+ज११	वा१० + वा१०
११	७	१५	ज ११ + अ १३	ज११+पृ१२	ज११+वा१४	ज११ + ज११
१२	८	१६	पृ १२ + वा १४	पृ१२+ज१५	पृ१२ + अ१३	पृ१२ + पृ१२
१३	१	१-५-९	अ १३ + ज १५	अ१३+वा१४	अ१३ + पृ१६	अ१३ + अ१३
१४	२	२-६-१०	वा १४ + पृ १६	वा१४+ज१	वा१४+ज१५	वा१४ + वा१४
१५	९	३-७-११	ज१५ + अ१	ज१५+पृ१६	अ१५ + वा२	ज१५ + ज१५
१६	४	४-८-१२	पृ१६ + वा२	पृ१६+अ३	ग१७ + अ१	पृ१६ + पृ१६

स्थानांवरून बलाबल पहाणें.

क्रमांक	स्वग्रही निर्भय स्थान	भय स्थान	उच्च स्थान	नीच स्थान	प्रसन्न स्थान	म्लान स्थान	बल स्थान	निर्बल स्थान	दीर्घ स्थान	विस्तार स्थान
१	१	७	४	१०	११	५	९	३	७	१
२	२	८	१	७	९	३	५	११	६	६
३	३	९	३	९	६	१२	१०	४	६	४
४	४	१०	६	१२	१	७	६	१२	८	०
५	५	११	१३	६	९	३	७	१	५	७
६	६	१२	७	१	१०	४	११	५	६	५
७	७	१३	७	१	१२	६	१०	४	७	४
८	८	१४	१०	४	५	११	१	७	७	२
९	९	१५	२	८	३	९	४	४	९	७
१०	१०	१६	१	७	९	३	५	११	६	३
११	११	१	४	१०	१	७	१२	६	६	७
१२	१२	२	३	९	६	१२	१०	४	५	६
१३	१३	३	१०	४	६	१२	८	२	५	८
१४	१४	४	२	६	५	११	२	८	५	९
१५	१५	०	६	०	०	०	३	०	६	०
१६	१६	६	२	८	३	९	४	१०	४	१०

ज्योतिषानें स्वतः विचार करण्याचे प्रश्न.

ज्योतिषाने प्रातःकाली उठून स्नानसंध्यादि नित्यकर्मे धर्मांप्रमाणें आटोपून आपल्या गुरूचे स्मरण व मागें सांगितलेलें मंत्रोच्चारण करून "आज प्रश्न करण्यास किती लोक येतील" हें चिंतून कुंडली तयार करावी:—

रीत १ लीः—त्या कुंडलीतील १ ते १६ स्थानांपर्यंत रमलजिव्हा उपकरणाच्या कोष्टकांत सांगितलेल्या बि. ज. द. ह्. पंक्तीस अनुसरून कोणकोणत्या स्थानांत शकलें पडलीं असतील त्या त्या शकलांच्या बि. ज. द. ह्. संख्येंप्रमाणें लोक येंतील. वरील संख्यांची शकलें पडलीं नसल्यास लोक येणार नाहींत.

रीत २ रीः—१-१३ या स्थानातील शकलें एकमेकांस गुणून एक शकल तयार करावें, तें शकल कुंडलीत किती स्थानीं तकरार करिते व त्या तकरारी शकलावर शुभाशुभ द्रष्टि कशी आहे हे पांहून त्या शुभ द्रष्टीच्या शकलांच्या बि, ज. द. ह्. संख्येइतके लोक येतील असे जाणावें.

येऊन काय विचारतील ?

१-१३ या स्थानांतील शकलांच्या गुणण्याने येणारें शकल कुंडलीत ज्या स्थानी तकरार करितें त्या त्या स्थानासंबंधाचे प्रश्न विचारतील.

प्रश्नकर्त्यांचा स्वभाव कसा आहे ?



७-९ या स्थानांतील शकलांच्या गुणाकारने शकल अशुभ असून अशुभ स्थानांत तकरार करील तर प्रश्नकर्ते ज्योतिषाची थट्टा अगर निंदा करणारे आहेत. ही रीत कोणत्याही वेळी उपयोगास येंते.

प्रश्नकर्ते कांहीं आणतील की नाहीं ?

१-१३-११-१४ या चारीं स्थानांतील शकले परस्पर गुणून एक शकल तयार करावें. व तें येणारें शकल कुंडलीत असेल तर कांही आणतील. अथवा ते वायु अगर तेजतत्वाचें शकल असल्यासही आणतील. बाकीच्या तत्वांची शकलें असल्यास कांही आणणार नाहीत.

काय आणतील ?

१-१३-११-१४ या स्थानांतील शकलें एकमेंकाशीं गुणून यणाऱ्या शकलांत अग्नितत्वाचा बिंदु प्रकट असेल तर द्रव्य, वायुतत्वाचा बिंदू प्रकट असेल तर जीव,जलबिंदु प्रकट असेल तर फळ,आणि पृथ्वी बिंदू प्रकट असल्यास मूल पदार्थ

आणि दोनतीन तत्वांचें बिंदु प्रकट असतील तर मिश्र पदार्थ आणतील असें जाणावें. उदाहरणः—प्रश्नकुंडली तयार केल्यावर त्यांतील १-१३-११-१४ या स्थानांतील  ही शकलें घेऊन त्यांचा गुणाकार मागें सांगितल्याप्रमाणें १-१३ यांतील ही  दोन शकलें एकमेकांस गुणल्यानें  हें शकल तयार झाले. व १३-१४ या स्थानांतील ही  दोन गुणल्यानें हें  शकल तयार झालें. वरील  हें शकल व नंतरचें हें  शकल या दोन शकलांच्या गुणाकारानें  हें उत्तर सांगणारे शकल तयार झालें. यांत वायू, जल आणि पृथ्वी असे तीन प्रकट बिंदु आहेत. त्या तिन्हीं तत्वांच्या जिनसा, जीव, फल आणि मल अशा होतात. त्या जिनसा आणतील असें जाणावें.

मनचिंता समजण्यांची रीत.

१-१३ या स्थानांतील शकलें गुणून येणारें शकल, कुंडलींत ज्या ज्या स्थानीं तकरार करील त्या त्या स्थानासंबंधी प्रश्न आहेत. त्या शकलाची तकरार कुंडलींत नाहीं व तें शकलहीं कुंडलींत नसेल तर प्रश्नकर्त्याचा प्रश्न नव्हें असें जाणावें.

रीत २ रीः–कुंडलीच्या १६ ही स्थानांतील अदर्शक (–) बिंदु* सोडून बाकीचें फक्त दर्शक (०) बिंदु मोजून त्या संख्येस १६ नी सांगावें. शषांक जो राहील त्या अनुरोधाने त्या स्थानांचा प्रश्न आहे असें भागावें.


उदाहरणः–सोळाही स्थानांतील फक्त बिंदूची संख्या ५२ झाली. त्या संख्येस १६ या अंकाने भागिता शेष ४ राहिले. त्यावरून कुंडलीतील ४ स्थानाचा प्रश्न आहे असें जाणावें.

रीत ३ रीः–१५-१३-९-१ या चारी स्थानांतील पृथ्वीतत्वाच्या रेखा आणि बिंदु घेंऊन एक शकल तयार करावें. १-२-३-४ या स्थानांतील अग्नीतत्वाच्या रेखा आणि बिंदु घेऊन एक शकल तयार करावें. ५-६-७-८ या स्थानांतील जलतत्वाच्या रेखा आणि बिंदु घेऊन एक शकल तयार करावें. ८-१२ या दोन स्थानांतील वायुतत्वाच्या रेखा आणि बिंदु घेऊन अर्धे शकल तयार करावें.

*अदर्शक बिंदु म्हणजे अशी – रेखा यांत ०० असें दोन बिंदु असतात अर्थात रेखा असें जाणावें.

१४ व्या स्थानांतील जलतत्वाची रेखा असो अगर बिंदु असो ते घेऊन वरील अर्ध्या शकलाखालीं मांडून व १६व्या स्थानांतील अग्नीतत्वाची रेखा असो अगर बिंदु असो त्या पाऊण शकलाखालीं मांडून पूर्ण शकल तयार करावें. या रीतीनें चारी शकलें वर सांगितल्याप्रमाणें क्रमाने लिहून तो चारी एकमेकांस गुणून एक शकल तयार करावें. तें शकल कुंडलीत ज्या स्थानी असेंल त्या स्थानाचा प्रश्न आहे असें जाणावें. तें जर तकरार करीत असेल तर त्यांत बलिष्ठ जें असेल तेथीलच प्रश्न आहे. तें तयार केलेलें शकल कुंडलीत कोणत्याही स्थानी नसल्यास तें मूळ क्रमांकानें ज्या स्थानाचें असेल तेथीलच प्रश्न आहे असे जाणावें

उदाहरण.



बाजूस एक प्रश्न कुंडलीं मांडली आहे. तींतील १५-१३-९-१ या स्थानांतील पृथ्वीतत्वाच्या रेखा व बिंदु अंकाच्या क्रमाने ह्मणजे १५ व्या स्थानांतील पृथ्वीतत्वाचें बिंदु तेराव्या स्थानांतील पृथ्वीतत्वाचीं रेखा ९व्या स्थानांतील रेखा आणि १ल्या स्थानातील पृथ्वींतत्वाचीं रेखा क्रमवार एकामागून एक उतरत मांडल्यानें  शकल तयार झालें. १-२-३-४ या स्थानांतील अग्नींतत्वाच्या रेखा व बिंदु घेऊन तयार करणेचे त्याचप्रमाणें त्या त्या स्थानांत क्रमवार पहातां त्या चारीं ठिकाणी फक्त बिंदूच असल्यानें तेंहीं उतरत मांडिल्यानें हे  शकल तयार झालें. ५-६-७-८ या चारीं स्थानांतील जलतत्वाच्या बिंदु व रेखा घेऊन  हें शकल तयार केलें. आणि ८-१२ या स्थानांतील वायुतत्वाच्या या = दोन रेखा घेतल्या. १४ व्या स्थानांतील जलतत्वाचा बिंदु घेऊन वरील रेखांच्या खालीं मांडल्यानें हें अपुरें  शकल तयार केलें व १६व्या स्थानांतील अग्नीं-


तत्वाचें बिंदु घेऊन त्या अपुऱ्या शकलाखालीं मांडल्यानें हें पूर्ण शकल तयार झालें. वर तयार केलेलो हीं चारी शकलें एकमेकांस गुणल्यानें त्या चारीचीं हीं दोन शकलें झालीं. व हीं दोन्हीं शकलें एकमेकास गुणल्याने हें प्रश्न शकल तयार झालें. तें कुंडलीत ७ व्या स्थानी असून १६ व्या स्थानी त्याची तकरार आहें ह्मणून ७ व्या स्थानाचा प्रश्न असे जाणावें. मागील २० ते २४ पानांमध्यें १६ स्थानांत प्रश्न समूह वर्णन केलेला आहे त्याकडे अवश्य लक्ष्य पुरवावें.

रीत ४ थीः– कुंडलीत १५ व्या स्थानी दोन बिंदूंचें शकल येणारच. त्या शकलांतील वरील बिंदु मनोभिप्रायाचा, आणि खालील बिंदु सिद्धासिद्ध दाखविणारा त्या दोन्ही बिंदूस एकामागून एक चालवून कुंडलीत कोणकोणत्या जागी स्थित होतात त्यावरून मनोभिप्राय आणि सिद्धासिद्ध सांगावें. क्वचित् प्रसंगी १५ व्या स्थानीं हें जमात नामक शकल येत असतें तेव्हां प्रश्न पाहूं नये. नाइलाजपक्षीं तीच कुंडली पहाण्याची अत्यावश्यता आहे तर, त्या कुंडलींतील १–१३; ४–१४; ७–१५; १०–१६ या आठही स्थानांतील शकलें एकमेकांस गुणून ४ शकलें तयार करून पूर्ण कुंडली मांडावी. त्या कुंडलीतही पुनः १५ व्या स्थानीं या दोन शकलांतील एखादें शकल आल्यास मनोभिप्रायाचा विचारच करूं नयें. आणि प्रश्नकर्त्यास पुनः भेटण्याची विनंती करावी. ने दोन्ही बिंदु एकामागून एक जसजसी त्या बिंदूंची उत्पत्ति झाली त्याच रीतीनें १५ व्या स्थानांपासून उलट चढवीत जावें. दोन्हीं बिंदु त्या कुंडलींत १-२-३-४-५-६-७-८ या आठ स्थानांपैकीं कोणत्या तरीं दोन स्थानांतील शकलांत अगर एका स्थानांतील शकलांतच स्थित होतात; त्यापुढें जाण्यास मार्ग नाहीं दोन स्थानांत स्थित होतील तर १लें बिंदु ज्या स्थानांत स्थित होतें तेथील शकल आणि त्या स्थानाचें मूल शकल, त्या दोन्हींचा कसा काय संबंध आहे हें पाहून उपकरणाचीं साधनें सर्व पुराव्यास घेऊन मनोभिप्राय ठरवावा. आणि २ बिंदु कोणत्या स्थानीं स्थित होतो त्याचाही स्थान संबंध व शकल संबंध पाहून तें कार्य होतें की नाहीं हें ठरवावें. आणि ते दोन्हीं बिंदु एकाच स्थानांत स्थित होतील तर, तेकोणकोणत्या प्रकटतत्वाच्या स्थानी स्थित होतात आणि त्यांतील १ ल्या बिंदूंच्या तत्वावरून मनचिंता आणि २ ऱ्या बिंदूवरून कार्य होतें की नाहीं हें ठरवावें यातूनहीं

ज्योतिष्यास शंका उत्पन्न होत असेल तर प्रथमतः ते दोन्हीं बिंदु एका स्थानांत व एका शकलांत स्थित होतात. नें जाणून ज्या शकलांत स्थित होतात तें शकल मन चिंतेचे, आणि ज्या स्थानांत स्थित होतात तेथील मूल क्रमांकाचें स्थान शकल कार्याची सिद्धता दाखविणें एवढ्यावरूनही मनाचें समाधान होतच नाहीं असें वाटल्यास ते दोन्हीं बिंदु ज्या शकलांत स्थित होतात अथवा निरनिराळया स्थानीं स्थित झाल्यास दोन्हीं शकलांस गुणून एक शकल तयार करावें. तें शकल शकुन क्रमानें कोणत्या स्थानाचें आहे हें पहावें, व त्या स्थानाकडे लक्ष्य पोचवावें. मग तें शकल कोठपर्यंत कुंडलींत फिरते व अखेर कोणत्या स्थानीं तें पुनरुक्त न होतां स्थिर राहते. तेथील स्थान शकलावरून व स्थित झालेल्या शकलावरून मनचिंता आणि कार्याची सिद्धता ठरवावी.

बिंदु चालविणेची रीत.

कुडलीच्या १५व्या स्थानांत असलेला वरील बिंदु ज्या तत्वानें प्रकट असेल त्याच तत्वाच्या जागी १३ अगर १४व्या स्थानांतील शकलांत स्थित होतो, तेथून पुनः त्या बिंदूस वर घेऊन गेल्याने ९-१०-११-१२ या स्थानांपैकीं कोणत्याही एका स्थानांतील शकलाच्या त्याच प्रकटतत्वाच्या जागी जाऊन स्थित होतो. तेथून पुनः त्याच क्रमानें चालविल्यास १ ते ८ स्थानांपर्यंतच्या कोणत्याही दोन स्थानांतील शकलांत स्थित होतो. आणि त्याच रीतीने खालील बिंदू ज्या तत्वाचा असेल त्याच प्रकट तत्वाच्या रीतीनें वरपर्यंत चालवावें, तोहीं ८ स्थानांपैकीं एका शकलांत स्थित होतो, अगर दोन्ही बिंदु एकाच शकलांत स्थित होतात. आणि एक बिंदु कुंडलींतील उजव्या अर्ध भागाकडे, व दुसरा डाव्या अर्ध भागाकडे अथवा दोन्ही एकाच भागाकडे एकाच शकलांतून सह चढतात. त्याविषयी शंका घेणेचे कारण नाहीं. उदाहरणः—



या कुंडलीतील १५ व्या स्थानांत ⁞ हें शकल आहे. यांत तेज आणि वायु या तत्वांचें दोन बिंदु प्रकट आहेत. पैंकीं वरील तेज तत्वाचें बिंदु मनचिंता जाणण्याचें आणि खालील वायु तत्वांचें बिंदु कार्याची सिद्धता दाखविण्याचें

यांतील मनचिंतेचें तेजतत्वाचें बिंदु नियमाप्रमाणें वर चालविलें, अर्थात् तो बिंदु कोणत्या स्थानांतून कोणत्या रेषेच्या व बिंदुच्या संयोगानें झाला हें पहातां १३ व्या स्थानांत हें शकल आहे. यांतील वरील भागाचा हा ० बिंदु आणि १४व्या स्थानांत हें शकल आहे. यांतील वरील भागाची ह्मणजें अग्नीतत्वाची रेखा, या दोन्हींच्या संयोगानें ० हा बिंदु झाला आहे. ह्मणून १३ व्या स्थानांतील अग्नीतत्वाच्या जागी स्थित झाला. पुनः तो बिंदु कोठून व कसा झाला याकडे लक्ष्य पुरविल्यास १० व्या स्थानांत असलेल्या या शकलांतील तेजतत्वाच्या जागीं बिंदु आहे तो ९ व्या स्थानांतील या शकलांतील तेजतत्वाच्या जागीं असलेल्या रेखेच्या संयोगानें झाला. पुनः तो बिंदु कोठून व कसा झाला याकडे पाहिले असतां ती तेजतत्वाचा बिंदु व ३ ऱ्या स्थानातील या शकलामधील तेजतत्वाचा बिंदु आणि ४ थ्या स्थानांतील या शकलांतील तेंचतत्वाची रेखा, यांच्या संगोगानें झाला, अर्थात् १५ व्या स्थानातील वरील भागाचा ह्मणजे तेजतत्वाचा प्रकट बिंदु १३–१० आणि अखेरीस या ३ ऱ्या स्थानांपर्यंत पोंचून त्या ३ स्थानींच स्थित झाल्यामुळें तेथे हे मनोभिप्रायाचें शकल आहे, त्यावरून मनचिंता ठरवावी. तशीच तो मनचिंता साध्य आहे की असाध्य आहे हें पहाण्याकरितां त्या खालचा वायुतत्वाचा २ बिंदु वरील नियमाप्रमाणें चालवीत नेल्यानें कुंडलीच्या डावेकडील अर्ध भागांतील १४–११–५ या स्थानांतील शकलांच्या वायुतत्वाच्या जागीं जात जात ५व्या स्थानीच स्थित झाल्यामुळें तेथें हें शकल आहे यावरून कार्याची सिद्धता ठरवावी. आतां यातील फळ सांगताना ज्योतिषी चुकला अगर ज्योतिष्यास स्वतःच हा मनोभिप्राय खरा किंवा खोटा याचीं शंका आली तर, शकल चालन विधींप्रमाणें मनोभिप्रायाचें हें आणि सिद्धासिद्धतेंचें हें. हीं दोन्हीं शकलें गुणल्यानें हें शकल कुंडलींत शकुन क्रमाने २ ऱ्या स्थानाचें आहे व कुंडलीत त्या दुसऱ्या स्थानीं हें शकल आहे, हें शकुन क्रमानें १ ल्या स्थानाचें असल्यानें, त्या स्थानांत पहातां हें शकल पडलें आहे. हें शकुन क्रमानें मूल ३ ऱ्या स्थानाचें आहे, त्या ३ स्थानीं पहातां तेथें हें शकल आहे. तें कुंडलींत शकुन क्रमानें मूल १३ व्या स्थानाचें ह्मणून १३ स्थानीं पहातां तेथें

मूलस्थानाचेच -○ ○ हें शकल असल्यामुळें पुढें शकल चालत नाहीं ह्मणून प्रथमतः जें ३ ऱ्या स्थानांत -○ ○ ○ हें शकल आहे व याची जी चिंता उपकरणांच्या साहित्यानें ठरतें तीच खरी जाणावी. याप्रमाणें ही शकल चालविणेंची रीत व बिंदु चालविण्याची रीत झाली.

स्थित बिंदूंचें अगर शकलांचें फळ.

अग्नीतत्वाचा बिंदु अग्नी शकलांत स्थित होईल तर, घर, देवालय, द्रव्य लाभ वगैरे शुभ कार्याची चिंता.

अग्नीतत्वाचा बिंदु वायु शकलांमध्यें स्थित होईल तर, लाभ, शरीरचिंता, शुभ कार्य वगैरेची चिंता.

अग्नीतत्वाचा बिंदु जल शकलामध्यें स्थित होईल तर, गमनागमन, लग्न, भागीदारी वगैरे.

अग्नीतत्वाचा बिंदु पृथ्वी शकलांत स्थित होईल तर, रोग, जीव आणि बापाच्या मिळकतीचा विचार वगैरे.

वायु बिंदु अग्नी शकलात स्थित होईल तर, मित्रत्व, द्रव्यलाभ वगैरे.

वायु बिंदु वायु शकलांत स्थित होईल तर, रोग गुप्तधनाची चिंता वगैरे.

वायु बिंदु जल शकलांत स्थित होईल तर, गमन, विद्या, मित्रत्वाचा विचार वगैरे.

वायु बिंदु पृथ्वी शकलांत स्थित होईल तर, वैरी आणि मित्राविषयी विचार वगैरे.

जल बिंदु अग्नीं शकलांत स्थित होईल तर प्रवास आणि कार्यारंभ वगैरे.

जल बिंदु वायु शकलांत स्थित होईल तर द्रव्य, रोग पळून जाण्याची हकीकत, पदार्थ पाठविणें वगैरे.

जल बिंदु जल शकलांत स्थित होईल तर विवाह, विषय वासना वगैरे.

जल बिंदु पृथ्वी शकलांत स्थित होईल तर, देश प्रवास, नोकरांचा विचार वगैरे.

पृथ्वी बिंदु अग्नीं शकलांत स्थित होईल तर, भूमिलाभ धनाशा आणि वैरत्वाचा विचार वगैरे.

पृथ्वी बिंदु वायु शकलांत स्थित होईल तर, प्रवास हृद्रोग नष्टवस्तूंचा विचार वगैरे.

पृथ्वी बिंदु जल शकलांत स्थित होईल तर, शेत विवाह रोग वगैरे.

पृथ्वी बिंदु पृथ्वी शकलांत स्थित होईल तर, धनाशा आणि प्रवास विचार वगैरे.

वरील रीतीस अनुसरून मनचिंतेचा विचार सांगतानां स्थानतत्व व त्या स्थानांत वास करणाऱ्या मूळ शकलांचें तत्व त्या शकलांतील प्रकट तत्व व प्रश्न कुंडलीप्रमाणें पडणाऱ्या शकलाचे तत्व, त्यांतील प्रकट तत्व या सर्व तत्व विभागांतील मित्रत्वाचा व वैरत्वाचा संबंध पाहून उत्तर द्यावे. याच रीतीनें शकलें जेथें जेथें स्थित होतील तेथल्या स्थानशकलादि साधनांवरुन पहावें.

रीत ५ वी:—९—१०—११=१२ या स्थानांत असलेल्या शकलांमधील अग्नी-विभागी असलेल्या रेखा व बिंदु घेऊन, एकामागून एक क्रमवार उतरत मांडून एक शकल तयार करावें. तें शकल कुंडलींत ज्या स्थानीं असेल तेथें त्या प्रश्नकर्त्याची मनीषा आहे असें जाणावें.

रीत ६ वी:—१ल्या स्थानांत पडलेलें शकल कुंडलींत तकरार करीत असेल तर, जितके वेळां तें शकल स्थानरूपाने तकरार करील व त्या तकरारींत जी स्थानें बलिष्ट असतील त्या त्या स्थानांचा प्रश्न आहे असें जाणावे.

रीत ७ वी:—१ च्या स्थानांत शुभ दाखील शकल असेल तर द्रव्य, भूमि, नष्टवस्तु, भेंट वगैरेचा विचार.

अशुभ दाखील शकल असेल तर, पराधीनता, दुःखागमन, रोगाचा विचार.

शुभ खारीज शकल असेल तर, दूरचे द्रव्य, बंध मोक्षाचा विचार.

अशुभ खारीज शकल असेल तर, दुःख मतिभ्रंश वगैरेचा विचार.

शुभ साबीत शकल असेल तर, स्थिरस्थावर पदार्थांचा विचार.

अशुभ साबीत असेल तर, वैऱ्याचे भय, बंधन वगैरेचा विचार.

शुभ मुनकलीब असेल तर, समानत्वाची, संततीची शुभ चिंता वगैरे.

अशुभ मुनकलीब असेल तर चोरीची व रोगाची चिंता जाणावी.

रीत ८ वी:– १ ल्या स्थानांत अग्नी शकल असेल तर, धातुचिंता, वायु शकल असेल तर जीव चिंता, जल शकल असेल तर, कृषिकर्म, जल वृक्षादि चिंता आणि पृथ्वी शकल असेल तर घर गांव वगैरेची चिंता जाणावी.

रीत ९ वी:– १-२-३-४ या स्थानांत असलेल्या शकलांतील अग्नी विभागाच्या रेखा व बिंदु घेंऊन एक शकल तयार करावें. ५-६-७-८ या स्थानांत असलेल्या शकलांतील पृथ्वी विभागाच्या रेखा व बिंदु घेऊन एक शकल तयार करावें. त्या दोन तयार केलेल्या शकलांत परस्पर गुणून एक शकल तयार करावे, तें कुंडलींत ज्या स्थानीं असेल त्या स्थानाचा प्रश्न आहे असें जाणावें.

रीत १० वी:– १ ल्या स्थानांत असलेल्या शकलांतील अग्नी विभागांतील रेखा अगर बिंदु, २ ऱ्या स्थानांतील वायु विभागाची रेखा अथवा बिंदु ३ ऱ्या स्थानांतील जल विभागाचीं रेखा अथवा बिंदू आणि ४थ्या स्थानांतील पृथ्वी विभागाची रेखा अथवा बिंदु वरून खालीं उतरत असतील तसें घेऊन क्रमवार एक शकल तयार करावें.

५-६-७-८ या स्थानांतील विपरीत क्रमानें पृथ्वी, जल, वायु आणि अग्नि विभागच्या रेखा व बिंदु जशा असतील तशा घेंऊन विपरीत क्रमानें एक शकल तयार करावें.

नतर दोन्ही शकलें गुणून एक शकल तयार करावें. तें शकल कुंडलीत ज्या स्थानीं असेल त्या स्थानाचा प्रश्न आहे असें जाणावें.


रीत ११ वी:– मनोभिप्राय, कारण, प्रश्नभेद आणि सिद्धासिद्ध हें समजून उत्तर द्यावयाचें आहे तर प्रश्नकुंडलीच्या १३–१४–१५–१६ या स्थानांतील शकलांस शकून क्रमाच्या १–४–७–१० या मूळ शकलांनीं गुणून एकमेकांस चार निराळीं शकलें तयार करून एकाकड मांडावी.

प्रश्न कुंडलीच्या १–४–७–१० या स्थानांतील शकलांस ५–८–११–१४ या चारी स्थानांतील शकलांनीं एकमेकांस गुणून चार शकलें तयार करून एकोकडें मांडावी.

प्रथमतः तयार केलेल्या चारी शकलांस नंतर तयार केलेल्या चारी शकलांनीं पुनः गुणून चार शकलें तयार करा. व त्यांतील १ लें शकल मनोभिप्रायाचें व

दुसरें शकल कारणाचें, तिसरें शकल प्रश्नभेदाचें आणि चौथें शकल सिद्धासिद्धतेचें जाणावें. या शकलांवरून मनोभिप्राय वगैरेचें वर्णन सर्व उपकरणांच्या साधनाने करावें. उदाहरणः—

मनोभिप्राय समजणारे शकल तयार करण्याची रीत:– १३ व्या स्थानांत हें शकल आहे. यांस शकुन क्रमाचें हें मूळ शकल घेऊन गुणल्यानें नें तयार झालें. १ल्या स्थानांतील या शकलास ५ व्या स्थानांतील या शकलानें गुणून हें तयार केलें. पूर्वी तयार केलेल्या या शकलास नंतरच्या या शकलानें गुणतां हे शकल तयार झालें. कुंडलीत हें कोठेंही शकल पडलें नसल्यामुळें मूळ ते ५ व्या स्थानाचें आहे; कारण प्रश्नकर्ता संततींविषयीं विचार करीत आहे असें कल्पिलें ह्मणून प्रश्नकर्त्याचा मनोभिप्राय संततीचा आहे असें ठरलें.



कारण समजण्याचें शकल.

१४ व्या स्थानांतील या शकलास शकुन क्रमाच्या ४ थ्या ह्मणजे या शकलानें गुणितां हें शकल तयार झालें.

तसेंच ४ स्थानांतील या शकलास त्या स्थानांतील या शकलानें गुणून हें तयार केलें.

वरील या शकलास नंतरच्या या शकलानें गुणून हें शकल तयार केले. यावरून कारण शोधिता हें शकल अशुभ असून मंगळ ग्रहाचें आहे. व तें रोगदायक आहे. आणि कुंडलींत १३ व १६व्या स्थानीं तकरार करितें. १३व्या स्थानाचा प्रश्नसबंध साक्षीरूपानें घेतां त्या स्थानाची साक्षीभूत कुंडलीत

१-५-९ हीं स्थानें होत त्या स्थानांतील १ ल्या स्थानांत हें, ५ व्या स्थानांत हें आणि ९ व्या स्थानांत हें; अशीं भिन्न भिन्न शकलें पडलीं आहेत ह्मणून १ ल्या स्थानाकडे वळतां मूळ स्थानाचेंच शकल पडल्यामुळें सदोदित त्या प्रश्नकर्त्यांचे मन मुलाविषयीं गढलें असून विचार चांगलें आहेत, तरी तें शुभ असून खारीज ह्मणजे निर्गम शकल असल्यामुळे,मुलें झालीं तरी कांही दिवसांनी नाहींशी होतील. अगर १ लें स्थान दैवविचाराचें आहे ह्मणून त्याच्या दैवी मुलांचा सुयोग नाहीं. त्याला दैव कारण झालें, तसेंच ५ व्या स्थानांत हे अशुभ शकल असल्यामुळें तें रोगी शकल शनी ग्रहाचें आहे व तें मुनकलीब आहे. मुलें झालीं तरी रोगानें नाहींशीं होतील. हे एक कारण झाले. तसेंच ९व्या स्थानांतील हे शकल साक्षीचे पहातां अशुभ असून खारीज आहे. त्याचीही साक्ष चांगली नाही व त्याचा ग्रह केतूचा असून मारक आहे. तें ९ वें स्थान देवपूजा इत्यादिकांचें जरी आहे तरी संततीस अपायकारक जाणावें.

प्रश्नभेदाचें शकल.

१५ व्या स्थानांतील या शकलास शकुन क्रमाच्या ७ व्या या शकलानें गुणून हे तयार केलें.

७ व्या स्थानांतील या शकलास ११ व्या स्थानांतील या शकलानें गुणून हे तयार केलें.

वरील या शकलास नंतरच्या या शकलानें गुणून हे शकल प्रश्न-भेदाचे तयार केले.

तें नपुंसक शकल असून कुंडलींत २ ऱ्या व १२ व्या स्थानीं आहे. दुसरें स्थान धनाचें आणि १२ वें स्थान खर्चाचें. पैसे खर्च करून रोग बरा करून घ्यावा ह्मणजे कांहीं तरी लाभ होईल.

सिद्धासिद्ध समजण्याचें शकल.

१६ व्या स्थानांतील या शकलास शकुन क्रमाच्या या १० व्या शक-लानें गुणून हे तयार केलें.

१० स्थानांतील या शकलास १४ व्या स्थानांतील या शकलानें गुणू हें तयार केलें.

वरील या शकलास नंतरच्या या शकलानें गुणल्यानें हें सिद्धासिद्धतेचें शकल तयार झालें.

हे शकल अशुभ असून खारीज ह्मणजे गमनाचें आहे. कारण संततीचीं सिद्धता होणारच नाहीं; अर्थात् संतती होणार नाहीं. झाली तरी वाचणार नाहीं. आतां तें शकल कुंडलींत १० व्या स्थानीं पडलें आहे; १० वें स्थान वायु तत्वाचे आहे आणि हें शकल जल तत्वाच्या स्थानाचें. वायूचे व जळाचे जरी वैरच नसले तरी समत्व असल्यामुळे होऊन मरतील असें जाणावें. फक्त हा विचार स्थान-तत्वाच्या शकलांचा केला.

वरील सर्व मनोभिप्रायाच्या रीतो दाखविल्या आहेत व या सर्वांची सिद्धासिद्धता सर्व उपकरणांची साधनें न जोडून दाखविल्यामुळें पाठकांस काहीं ठिकाणीं संशय येऊन फलें सिद्ध करण्यास अडथळा येईल व पुढील सर्व प्रश्नभागाचें उत्तर प्रश्न समुदायांत दाखविल्याप्रमाणें एकदम दिल्यास उत्तरें खोटी ठरल्यास ज्योतिषी दोषास कारण होऊं नये ह्मणून वरील कुंडली सर्व उपकरणांच्या साधनांनी उदाहरणासह वर्तविलीं आहे. प्रश्न कर्त्यानें 'माझ्या मुलास मुलें होतील काय' असा प्रश्न केला आहे असें समजा.

पहिलें मरातिब उपकरणः— हें या शास्त्रास जरूरींचे आहे; तरी प्रश्नकर्त्यानें आपल्या मुलास मुलें होतील काय असें विचारल्यास, तासीर उपकरणाच्या रीतीनें मुलाचें स्थान ५ वें. नातु होण्याचें स्थान त्या ५ व्या स्थानापासून ५ वें ह्मणजे ९ वें; या स्थानांत असलेल्या शकलावरून सर्व वर्णन करणें जरूरीचें आहे. एवढ्यापुरतेंच तासीर उपकरण दाखविलेले आहे. व त्या ९ व्या स्थानांत हें शकल पडलें आहे. या मरातिब उपकरणांत ५ पोटविभाग आहेत. त्यापैकी या रुबाई अगर समानी या शकलांपैकीं कोणतेंच नसून तेथील मूळ शकल शकुन क्रमानें नें असणेचें व यास रुबाई समानीची हेहीं शकलें ताडून पाहतां त्यांचा संबंध नाहीं ह्मणून सबाई विभागाकडे पाहतां तेथील या चारी सबाई शकलांतील चौथें शकल मात्र स्थानसंबंधाचें आहे आणि त्या

९ व्या स्थानीं [शकल] [शकल] [शकल] [शकल] या खुमासी शकलांतील २रें शकल पडल्यामुळें स्थान शकल सवाई आणि पडलेलें शकल खुमासी आहे. या दोन्हीचें अल्प वैरत्व आहे तरी, हट्टी शकलें असल्यानें नातू होण्यास एक प्रकारचें विघ्न आहे. यात रुबाई समानो आणि सुदासी शकलांचा कांहींच संबंध राहिला नाहीं. ह्मणून ते तिन्हीं पोटविभाग गाळण्यांत आलें.

दुसरे इमतिजाज उपकरण.— या वरून ९ व्या स्थानातील [शकल] हें शकल उत्पन्न होण्यास १ ल्या व २ ऱ्या स्थानांतीलही [शकल] [शकल] दोन शकलें कारण झाली. पैकीं १ लें [शकल] हें शकल शुभ आहे आणि २ रें [शकल] हें मध्यम शकल आहे. ही दोन्ही गुणल्या कारणाने हें [शकल] अशुभ शकल तयार झालें आहे.

इमतिजाज उपकरणाच्या रीतीअन्वयें शुभ आणि मध्यम शकलांच्या गुणण्यानें अशुभ शकल तयार झालें. प्रथमचें शकल शुभ आहे म्हणून गर्भ राहील. पुढेंचें मध्यम शकल असल्याने गर्भ उत्तम स्थितींत न राहतां अखेंर अशुभ फल आल्यानें गर्भपात होईल. या प्रकारें इमतिजाज उपकरण झाल्यावर:—

तिसरें तासीर उपकरण—या उपकरणाची रीत वरील मरातीब उपकरणांतच थोडीशीं सांगितली. त्याचे कारण प्रश्नकर्त्यांचा प्रश्न स्वतःचा नसून मुलास मुलें होण्याचा असल्यामुळें, कुंडलींत नियमाप्रमाणें ९ वें स्थान शोधण्यास घेतलें. कुडलींत जीं १६ स्थानें आहेत तीं सर्व प्रत्येक प्रश्नास बांधली गेलीं आहेत, मागें सांगितलेल्या सोळाही शकलांतील प्रश्नसमूह लक्षांत ठेविला म्हणजें सहज पाठकांच्या ध्यानांत येईल, या तासीर उपकरणाचे सहाय्य ज्योतिष्यास वेळो-वेळीं लागतें, म्हणूनच प्रश्नकर्त्यांचा प्रश्न आपल्या १ ल्या 'मुलास मूल होईल का' असें आ‹. तर, प्रश्नकर्त्याचे स्थान १ लें; १ ल्या मुलाचें स्थान ५ वें व मुलाच्या मुलाचें स्थान ९ वे (१ ल्या भागातील तासीर उपकरण पहा.) या प्रमाणें प्रश्नकर्त्याच्या प्रश्नावरून तासीर उपकरणाच्या आधारें नातवाचे स्थान ९ वें सिद्ध केलेंआहे.

चौथें तकरार उपकरण पहातां [शकल] हें शकल अशुभ असून त्या ९ व्या शुभ-स्थानीं पडले आहे; शिवाय ११ व्या शुभस्थानीं तकरार करीत आहे म्हणून कनि फलांत अर्धे चांगले फल देतें.कारण गर्भास बहुतांशी धक्का पोचणार नाहीं.

इनकिलाब—उपकरणानें पहातां १-२-३-४ व ५-६-७-८ या स्थानांतील शकलांस परस्पर गुणून येणाऱ्या चारी शकलांवरून इनकिलाब कुंडली तयार करावी व त्यांतील १५ वें स्थान कोणकोणत्या शकलांवरून उत्पन्न झालें आहे हें पहावयाचें तर, त्या प्रश्नकुंडलीतून शकलें घेऊन निराळीं कुंडली तयार करण्यासापेक्षां त्या कुंडलींतील १५ व्या स्थानीं जें शकल येतें तेंच इनकिलाव कुंडलीच्या १३ व १४ व्या स्थानीं येणारच! १५ व्या स्थानांत हें 8o शुभ खारीज शकल असून प्रश्न आगम म्हणजें दाखीलचा आहे. शकल खारींजचें पडल्यामुळें गर्भ राहिला तरी भीतींचाच आहे.

बलाबल—उपकरणाकडें पहातां 8o हे ९ व्या स्थानीं पडलेलें शकल मूळ शकुन क्रमानें १२व्या स्थानांचें आहे. तें त्या १२ व्या स्थानीं पडून जर तकरार करीत असतें तर बलिष्ठ झालें असतें परंतु तें आपल्या स्थानीं न पडतां अन्य स्थानीं पडलें आहे म्हणून निर्बली झाले आहे. अर्थात गर्भधारण झालें तरी निर्बली समजावें.

दृष्टीबल—उपकरणाकड पहातां १ल्या भागांत दृष्टींचे जें पांच प्रकार आहेत त्यावरून कुंडलीत ९ व्या स्थानी 8o हे शकल आहे, या शकलास सव्य विभागानें तरविया नामक दृष्टीनें ९ तें ३ रें स्थान म्हणजें ११ वे स्थानी पुनः 8o हें शकल असून तें ९ व्या स्थानांतील शकलांस पहातें; तें अशुभ असून ९व्या स्थानांतील शकलही अशुभ असल्याने दोन्हीं शकलांची एक दृष्टी झाली याचे फळ एक-चतुर्थांश वाईट तसेंच अपसव्य रीतीने पहाता ९व्या स्थानाच्या मागील तिसरें स्थान ७ वें, त्या स्थानीं o8 हे शकल आहे; तें शुभ असून दाखल आहे. तें 8o या शकलाच्या मरातिब उपकरणाच्या रीतीनें एकमेकांचें वैरत्व करीत नाहीं म्हणून एक-चतुर्थांश शुभ फळ देते.

तसदीस—दृष्टी ९ व्या स्थानापासून पाचवें म्हणजे १३ व्या स्थानीं o8 हे अशुभ शकल आहे; तें 8o या शकलास मरातिब उपकरणांतील सवाई आणि खमासीं विभागानें अल्प वैरत्वाचें असून अशुभ आहे; कारण एक-द्वितियांश दृष्टी वाईट फळाचीं, तीच अपसव्य रीतीनें ५ वें म्हणजे कुंडलींतील ५ व्या स्थानीं o8 हे शकल अशुभ असून सुदासीचें आहे; परंतु तें शकल 8o या शकलास

कोणत्याही रीतीनें वंरत्वाचें नाहीं ह्मणून त्याचें अर्धे फळ जरीं चांगलें आहे तरी, तें शकल अशुभ आहे याकडे ज्योतिष्यांनी लक्ष्य पुरवावें.

तसल्लीस दृष्टीनें पहातां ९ व्या स्थानांपासून ४ थ्या ह्मणजें १२ व्या स्थानीं ⁘ हें शकल आहे, तेंही सुदासीचें असल्यानें ⁘ या शकलास वंर करींत नाहीं. आतां तें मध्यम असून नपुंसक आहे. याचें फळ ३/४ मध्यम; अपसव्य रीतीनें ४ थें स्थान ह्मणजें कुडलीतील ६ व्या स्थानीं ⁘ हें शकल आहे. यांचा व ९ व्या स्थानांतील शकलाचा विरोध नसून एकाच वर्गातली ⁘ ⁘ हीं दोन्हो शकलें आहेत; व अपसव्य रीतीनें ⁘ हें शकल शभ असल्यामुळें ३/४ फळ चांगलें

आतां मुकाबिला नामक पूर्ण फळ देणाऱ्या ७ व्या स्थानांत, सव्य रीतीनें पहाता तेथें १५ व्या स्थानीं हें ⁘ शुभ खारीज शकल पहाते तें शत्रु घरचें सुदासी शकलाचें आहे; हें पूर्ण रीतीनें चांगलें फळ देते. आतां त्या ९ व्या अपसव्य रीतीनें पहातां ७ वे स्थान म्हणजे कुंडलीचें ३ रें स्थानीं ⁘ हे शकल आहे, हेंही खुमसींतील असून शुभ आहे तथापि विरोध करणारें नव्हे, कारण ही दृष्टि सव्यापसव्य भागाने चांगली आहे.

आतां मुकारना दृष्टोनें पहातां, सव्य रीतीनें ९ व्या स्थानापासून १२ वें स्थान मोजल्यानें ४ थें स्थान ठरते. त्या स्थानी ⁘ हें शकल पडलें आहे, स्थान-संबंधानें ते शकल वंर स्थानाचें आहे. परंतु ९ व्या स्थानी ⁘ पडलेंल्या शकलाचा व त्याचा कांहींच संबंध नाहीं वैरही नाही व ते शकल अशुभ आहे म्हणून चांगले फळ देईल, अपसव्य रीतीनें १२वें स्थान मोजल्याने कुंडलीचें १४वें स्थान ठरते, तेथें ⁘ हें शकल आह व तें सवाईचें असून अल्प विरोधी आहे पण शुभ आह एवढ्याने त्याचें पूर्ण फल मिळत नाहीं. ही मूकदृष्टी असल्याने हिचा कांहीं उपयोग नाहीं, या रीतीनें दृष्टा विभाग शोधतां कांहीं चांगल्या व कांही अशीं वाईट दृष्टचा, एक मुकाबिला सोडून ठरविल्या, पण त्यांत मुकाबिला नामक दृष्टि पूर्ण फळ देणारी शुभ असल्यानें बाकोच्या दृष्टी तिला चांगलें फल देण्याकरितां मदत करितात. मुख्यतः मुकाबिला दृष्टि जर अशभ असती तर मात्र सर्व दृष्टींचा अंश भाग घेऊन बरें वाईट अगर मध्यम ठरविलें असते. यावरून नातु होण्यास कांहीं हरकत दिसत नाहीं.

प्रश्नभेद उपकरणानें पहातां, प्रश्नकर्त्याचें विचारणें दाखील म्हणजे आगम यावरून प्रश्नभेदामध्ये दाखीलाचा अर्थ कोणतेंही काम अ टोक्यांत यणें असे आहे म्हणून १-१४-१५ स्थानांत दाखील शकलें नसून ⁞ ⁞ ⁞ हीं सर्व त्या स्थानांत खारीज शकलेंच पडलीं आहेत, प्रश्नास व तेथाल शकलांस पहातां नातु होणार नाहीं असें सिद्ध होतें.

रमलजिव्हा नामक उपकरणानें पहातां त्यां ११ प्रकार आहेत. प्रश्न संततींचा असल्याने त्यांतील अ. ब. द. ह. रीतीत संतान संख्या वर्णन करण्याचें आहे. आतां ठरल्याप्रमाणें प्रश्नकर्त्याचें स्थान १ लें व प्रश्नाचे स्थान ९वें. त्या दोन्ही स्थानांतील ⁞ ⁞ ही दोन्हीं शकलें गुणून ⁞ हें शकल आलें. तें अ. ब. द. ह. क्रमानें कुंडलीच्या ६ व्या स्थानीं जर पडतें तर बलिष्ठ होत होते. व संख्येचाही निर्णय केला असतां, त्यावरून अ. ब. द. ह. पंक्ती सोडून बाकीच्या मुसल्लस क्रमांत ⁞ हे शकल कुंडलीच्या २ ऱ्या स्थानीं पडलें आहे,तें मध्यम गुणाचे आहे तर संतती होण्यास अन्य कोणते तरी उपाय योजिलें पाहिजेंत.

अशा सर्व उपकरणांच्या साधनांनीं पाठकांस चांगले ज्ञान व्हावें म्हणून हें उदाहरण एथें संततीं न होण्याबद्दलचेंच मुद्दाम दाखविले आहे तारक गोष्टी तीव्र ध्यानांत येतात. परंतु मारक गोष्टी पुराव्याने सिद्ध करणें फारच कठिण असतें. या उदाहरणास प्रथमपासून येथपर्यंतची सर्व उपकरणें साधक नसून बाधकच आहेत. एखाद दुसरें उपकरणाचे सहाय्य चांगलें असले तर तेवढ्यावरून अमुकच होईल असें ठरविणें योग्य होणार नाहीं. आतां प्रश्न कथन प्रकार पुढें आहे.त्यांत कित्येक रीतीनें प्रश्न सोडविलें आहेत. तें पाठक आपल्या समोर घेऊन तो तो प्रश्न सोडवून उपकरणाचे सहाय्य घेतील तर, त्यांचीं पूर्ण खात्री होईल व ते संतती होईल कीं नाहीं हें खास ठरवितील. पाठकांनीं हें उदाहरण सर्व प्रकारे लक्षांत घेऊन पुढील प्रश्न कथन प्रकार या रीतीनें वर्तवितील तर केव्हांही कसलाहीं प्रश्न आला तरी डगमगणार नाहीत.

रीत १२ वी:-प्रश्न कुंडलीच्या २३ आणि २४ व्या स्थानातील शकलांच्या गुणण्यानें जें १५ वें स्थानीं शकल येतें त्यावरून स्थूल रीतीने मनचिंता वर्तविली आहे. या रीतींसदेखील उपकरणाचें सहाय्य घेऊन कुंडली पाठकांनी वर्तविली तरच अमुक एक चिंता आहे असें खास ठरवितील आणि यांतील चुका

दिसून येतील. पहाण्याची रीत:—वरील कुंडलींत १३ व्या स्थानीं ०≡ हें शकल व १४ व्या स्थानीं ०≡ हें शकल असून या दोन्हींच्या गुणण्यानें १५ व्या स्थानीं ००= हें शकल आहे तर, कोष्टकांतील अनुक्रम नंबर ६७ च्या पुढें उलट क्रमानें व स्थान क्रमानें ०≡ —०= अशीं शकलें आहेत तेथें "द्रव्य, संतती, बलाबल, गुप्तकार्य इत्यादि" मनचिंता वर्णन केलीं आहे. त्याचप्रमाणें बाकींच्या प्रश्नांचा विचार करावा.

नंबर.	स्थाने १४	१५	१३	मनचिंता
१	lllo	olol	oool	भेट, मित्राचा लाभ, शुभवार्ता इत्यादि.
२	llol	,,	lolo	द्रव्याच्या लाभाकरितां दुष्ट विचार.
३	oool	,,	lllo	विवाहकार्य, आप्तांचा प्रसास इ.
४	olol	,,	llll	स्नेहविचार, कपट उपद्रव, मित्रकार्य इ
५	looo	,,	olol	व्यापार, विवाहविचार, चोरी इ.
६	loll	,,	oolo	द्रव्यलाभ, सुहृद, गमन विचार वगैरे.
७	olo	,,	oooo	वैर, कलह, चोरीचे विचार, धनाशा इ.
८	ollo	,,	lllo	गुप्तधन, सख्यविचार (स्त्री) वगैरे.
९	llo	,,	ollo	औषध, द्रव्यसहाय्य, रोग इ.
१०	llol	,,	olll	विवाह, राजाची भेट, चौर्य वगैरे
११	ooll	,,	lool	धनलाभ, वीरत्व, हिस्सेदार इ.
१२	lool	,,	ooll	रोग, विवाह, सुत, धनलाभ इ.
१३	lolo	,,	oooo	मित्रत्व, संरक्षण, नष्टवस्तु इ.
१४	oooo	,,	lolo	चोरीची चिंता, प्रवाशाची चिंता वगैरे.
१५	ollo	,,	lloo	नोकरी, अम्मल, राजकार्य इ
१६	oolo	,,	lllo	द्रव्यलाभ, शरीरचिंता, सुत-बंधु चिंता इ.
१७	loll	lolo	lllo	संरक्षण, प्रवास, रोग विचार इ.
१८	olol	,,	oooo	स्वकर्मांत भय, शरीरचिंता वगैरे.
१९	lllo	,,	ooll	आरंभिलेल्या कार्यांत लाभ, गोप्य राजकार्य.
२०	oooo	,,	olol	धनलाभ, मित्रकार्यांची चिंता वगैरे.
२१	llo	llo	llll	राजकार्य, भूमि, विदेश, विचार वगैरे.
२२	oool	,,	oloo	आप्तत्व, बंधन, सुतलाभ वगैरे.

नंबर.	स्थाने १४	१५	१३	मनचिंता
२३	oolo	lolo	olll	गुप्तांगना विवाह वगैरे.
२४	oloo	,,	looo	धनाशा; सखीचीं भेट, मार्ग विचार इ.
२५	ooll	,,	ollo	रोगमुक्ती, नूतन कार्य, विवाह वगैरे.
२६	olll	,,	oolo	अपयश, गतवस्तु कलंक वगैरे.
२७	ollo	,,	ooll	गुप्तवार्ता, गमन, उद्यम वगैरे
२८	lloo	,,	lool	आनंद, कार्यारंभ, भेट वगैरे.
२९	lool	,,	ooll	उपजीविका, दुर्घटकार्य, संघविचार.
३०	oool	,,	loll	नष्टवस्तु, रिपुभय वगैरे.
३१	llol	,,	oool	वाद, खर्च, रोगविचार इ.
३२	llll	,,	olol	न्याय, गतवस्तु, सहाय्य वगैरे.
३३	olol	llll	olol	नष्टविचार, व्यापार, भवितव्य चिंता वगैरे.
३४	ollo	,,	ollo	रोग, राजद्वार प्रवेश, भेट वगैरे.
३५	oloo	,,	oloo	सुत, धन, मित्र, औषध विचार वगैरे.
३६	loll	,,	llol	नष्टवस्तु, युद्धांत जय, विवाह वगैरे.
३७	ooll	,,	ooll	महाराजाची मैत्री, विद्या, अधिकार, चिंता वगैरे.
३८	lllo	,,	lllo	विवाह, प्रवास, मित्रसहाय्य वगैरे.
३९	llol	,,	llol	विवाह, गतधन, मित्रसहाय्य, प्रवास वगैरे.
४०	oool	,,	oool	गुप्तवैर, मित्र चिंता, रोगविचार वगैरे.
४१	ooll	,,	ooll	अधिकार, विचार, मित्रचिंता वगैरे.
४२	looo	,,	looo	मित्र, रोग, आपसांत तंटा मिटविणें, भूमिविचार वगैरे.
४३	lool	,,	lool	रोग, ऋक्षभूमि, भेट वगैरे.

नंबर	स्थाने १४	१५	१३	मनचिंता
४४	oIII	IIII	oIII	श्रीमंती, गुप्तकार्य, राजभेट वगैरे.
४५	oIoo	”	oIoo	स्वशरीरसुख, चोरी, यश इ.
४६	IoIo	”	IoIo	प्रेमकार्य, भीति, गमन, धनलाभ वगैरे.
४७	oooo	”	oooo	महोत्सव, प्रयाण वगैरे
४८	IIII	”	IIII	भूमिविचार, प्रियमित्र, विवाह इ.
४९	oIII	oIIo	oIII	विवाह, विदेशगमन, रोग, व्याकुलता इ.
५०	ooII	”	IoIo	राजकार्य, द्रव्यलाभ, भागीदारीचा व्यापार इ.
५१	IIIo	”	oIII	विषयवासना, इच्छितप्राप्ति, रोगविचार इ.
५२	IoIo	”	ooII	स्वार्थोदय, राजकार्य, परीक्षा, गुप्तचिंता इ.
५३	ooII	”	IoIo	द्रव्यलाभ, सर्वांगभीति, दुसऱ्याची पीडा इ.
५४	IIII	”	oIIo	वध, बंध, गतवस्तु, भूमिविचार इ.
५५	IoIo	”	ooII	सुतविवाह, द्रव्यलाभ वगैरे.
५६	IoII	”	oIoo	सुतचिंता, रोग, थोरपणा इ.
५७	oIIo	”	IIII	महोत्सव, विदेशगमन, भविष्य इ.
५८	ooIo	”	IIoI	कलह, परापवाद, भय.
५९	oIoo	”	IIoI	गताधिकारप्राप्ति, विवाहचिंता वगैरे.
६०	Iooo	”	Iooo	गेलेल्या वस्तूंची प्राप्ती वगैरे.
६१	IoII	”	oIoo	चोरी, दुःख, गमन वगैरे.
६२	oooo	”	oIoo	मनःशांति, शुद्धाशुद्ध, मार्गप्रतीक्षा इ
६३	IooI	”	oooo	गुप्तव्याधी, गुप्तविलोकन इ.
६४	Iooo	”	Iooo	स्त्री, स्त्रीपासून धनलाभ, महोत्सव इ.

नंबर.	स्थाने १४	१५	१३	मनचिंता
६५	lol	ooll	olll	कार्यागम, गुप्तविचार इ.
६६	lolo	„	ollo	इष्टसंग, शुद्धमार्ग, राजविचार इ.
६७	loll	„	loll	द्रव्यचिंता, संततिविचार, बलाबल, गुप्तकार्य इ.
६८	lool	„	olol	गतवस्तु, गुप्तशोध इ.
६९	ollo	„	lolo	धनधान्य विचार, मित्रकार्य इ.
७०	olol	„	lool	नष्टवस्तु, गुप्तजनांचा विचार.
७१	ooll	„	llll	वध, बंधन, मित्रविचार.
७२	oolo	„	lllo	स्त्रीचिंता, गुप्तसंवाद, पत्रागमन इ.
७३	llll	„	ooll	प्रियागम, द्रव्यलाभ, राजकार्य इ.
७४	looo	„	loll	गुप्तमैत्री, भूमिविचार इ.
७५	lllo	„	oolo	विवाह, नूतनकार्य, कुशल, रोगीविचार.
७६	loll	„	oool	धनलाभ, मित्रचिंता वगैरे.
७७	oooo	„	ooll	अमात्यांची भेट, वैरत्व, राजकार्य वगैरे,
७८	oloo	„	oool	न्यायभय, गतशोध, वगैरे.
७९	ooll	„	oooo	वैरत्व, हृद्रोग, वगैरे.
८०	oool	„	oloo	नष्टशोध, द्यूत, जलचिंता वगैरे.
८१	oolo	ollo	loll	शरीरशांति, जाया, सुतचिंता इ.
८२	llo	„	oolo	महोत्सव, गुप्तनिरीक्षण वगैरे.
८३	lool	„	lolo	धनसंचय, वैभव, भेट इ.
८४	olol	„	ollo	विषयवासना, द्रव्यलाभ इ.
८५	lolo	„	lool	विवाह, द्रव्यलाभ, राजकीय विचार.
८६	looo	„	oolo	महोत्सव, कुशलवर्तमान इ.

नंबर	स्थानें १४	१५	१३	मनचिंता
८७	0110	1100	1001	गतविचार, सेवा, क्लिष्ट विचार.
८८	0010	"	1000	दास्यत्व, रोग, कार्यारंभ इ.
८९	1101	"	1110	व्यापार, देवताराधन, बंधमोक्ष इ.
९०	1100	"	0000	सुतचिंता, रोगशांति, स्वार्थ इ.
९१	1110	"	1101	भय, मित्रविचार.
९२	1101	"	1000	अर्थलाभ, विवाह, देशांतर विचार.
९३	0000	"	1100	प्रयाण, अधिकार इ
९४	1000	"	1101	गतवस्तु, विदेश गमन, खात्री इ.
९५	1111	"	1100	राजकार्य, मित्र प्रयाण, रोग इ.
९६	1100	"	1111	गतवस्तु, रोग, गुप्तविचार.
९७	1110	1001	000	पतनवस्तु चिंता, भेट इ.
९८	1100	"	1010	सतिचिंता, धनविचार, नृपसहाय्य.
९९	1000	"	1110	अमात्य, मित्रप्रकाश, शत्रुविचार.
१००	1010	"	1100	धनलाभ. मित्रविचार वगैरे.
१०१	1100	"	1010	मित्रविरोध, व्यापारविचार, भेट इ.
१०२	1111	"	1001	रोग, व्यापार, मित्ररोष इ.
१०३	1010	"	1100	राजकार्य, प्रवास, गुप्तपीडा इ.
१०४	1101	"	1101	श्रीमंती, शरीरचिंता, भेट इ,
१०५	1001	"	1111	रोग, गुप्तगोष्ट, भेट.
१०६	1101	"	0000	रोगचिंता इ.
१०७	0000	"	1101	मार्ग गमन, रोग, मित्र, कार्याचा लाभ.
१०८	0010	"	0010	बंधमोक्ष. सुतविचार, समेट इ.

नंबर	स्थाने १४	१५	१३	मनचिंता
१०९	0010	0010	0010	बंधमोक्ष, द्रव्यलाभ, मित्रत्व इत्यादि.
११०	1110	,,	103	विवाह, फेरबदल, कन्येचा विचार.
१११	1000	,,	0110	द्रव्यलाभाकरितां गमन, स्त्री विचार,
११२	1011	,,	1011	मार्गगामी, जीव चिंता.
११३	1000	0000	0111	स्त्री विचार, द्रव्य चिंता, शरीर चिंता.
११४	1110	,,	1000	राचकार्य, रोग, भविष्य चिंता इ.
११५	1010	,,	1010	गतवस्तु, संरक्षण विचार.
११६	1101	,,	0010	मित्रचिंता, बंधमोक्ष.
११७	0101	,,	0101	गतवस्तु, भेट, लाभ.
११८	0000	,,	1111	भविष्य, द्रव्यलाभ, रोग विचार.
११९	1111	,,	0000	मार्ग गमन, संरक्षण, मित्रत्व इ.
१२०	0110	,,	1001	नष्टवस्तु, रोग, वाईट पदार्थ इ.
१२१	0010	,,	1011	मार्गक्रमण, विवाह, कुशल वृत्तांत, वस्त्र इ.
१२२	001	,,	0110	वस्त्रलाभ, धैर्य, विवाह इ.
१२३	0100	,,	1011	युद्ध, सैन्य, वादविवाद इ.
१२४	1011	,,	010	सावत्र आई, समेट, लाभ इ.
१२५	0001	,,	0110	वैरत्व, वैद्य, संरक्षण इ.
१२६	1110	,,	0001	कठिण कार्य, वेष, जीवभय.
१२७	0011	,,	1100	जोर, अखत्यार, लाभ, कपट इ.
१२८	1100	,,	0011	लक्ष्मी, गमन, लाभ, चंचल इ.

वर सांगितलेली मनचिंता सांगतांना मागील उपकरणांचे सहाय्य अवश्य घ्यावें.

मूकप्रश्ने प्रतिज्ञावै नैवकार्यात्तवहिचित् ॥ यदि कुर्यात् प्रमादेन तदा धर्मं बहिष्कृतं ॥ १८ ॥ भवेत्तस्माद्वदेदेवं जानाति परमेश्वरः नाहं किंतु शास्त्ररीत्या यत्किंचित्प्रवदाम्यहं ॥ १९ ॥

अर्थः—मनचिंता, गुप्तवृत्तांत, चोराचें अगर कोणाचेंही नांव, भूगतधन असलेल्या जागीं जाणें, अशीं कामें ज्योतिष्यानें सांगूं नयें. व त्या जागी जाऊं नये प्रश्नकर्त्यांनें प्रमादानें विचारले तरी त्याच्या विचारण्याकडे दुर्लक्ष्य करून प्रश्नकर्त्याच्या मुखांतून थोडासा तरी प्रश्नसार येऊं द्यावा; मग मात्र ज्योतिष्याने यथामति वर्णन करावे. याविषयीं संस्कृत आणि यवन ग्रंथांत जगच्चालक प्रभूच्या करणीत मानवांना हात घालणें अयोग्य असें लिहिल्यावरून देश, काल स्थितीचा विचार करून चालावें.

कालनिर्णय.

ज्यावेळीं प्रश्न कुंडली तयार करावयाची त्या वेळेचे चार भाग करून कुंडलींतील उमहात पंक्तीच्या आधारे आकस्मिक काल; आणि उमहात पंक्तींच्या अग्रभागाच्या ह्मणजे विनहात पंक्तीच्या आधारें भूतकाल आणि पूर्वोक्त पंक्तीच्या अग्रभागाच्या ह्मणजे मुतबलिदाप्त पंक्तीत वर्तमानकाल आणि त्या पंक्तीच्या खालीं स्वगृहाच्या ह्मणजें जायदातच्या आधारे भविष्यकाल,याप्रमाणें विभाग करून कालाचा निर्णय करावा. ज्या स्थानात शुभ शकल असेल त्या शकलाच्या कालीं कार्यसिद्धि होईल.

रीत २ रीः—१ ल्या स्थानांतील शकलास ४ थ्या स्थानातील शकलानें गुणून येणारें शकल भूतकाल दर्शक ७ व्या स्थानांतील शकलास १० व्या स्थानातील शकलानें गुणून येणारें शकल भविष्यकालदर्शक आणि वरील शकलास खालच्या शकलानें गुणून येणारे शकल वर्तमानकालाचें दर्शक जाणावें.

रीत ३ रीः—१ ५-९-१३ हीं स्थानें वर्तमानकाल दाखविणारीं २-६-१०-१४ हीं स्थानें भविष्यकाल दाखविणारीं, ३-७-११-१५ हीं स्थानें भूतकाल दाखविणारी आणि ४-८-१२-१६ ही स्थानें आकस्मिक काळ दाखविणारीं होत.

रीत ४ थीः— १-२-३-४ हीं स्थानें घटिका व दिन, ५-६-७-८ हीं स्थानें दिवस व सप्तक, ९-१०-११-१२ हीं स्थानें सप्तक व महिने आणि १३-१४-१५-१६ हीं स्थानें महिने आणि वर्ष दर्शक आहेत.

रीत ५ वी:–अग्नितत्व वर्तमान, वायुतत्व भविष्य, जलतत्व भूतकाल आणि पृथ्वीतत्व आकस्मिक काल बोधक जाणावे.

जो प्रश्न असेल तो बि. ज. द. ह. क्रमानें स्वस्थानीं स्थित असेल तर त्याचा भूत भविष्याचा विचार करून पुढें लिहिलेल्या कोष्टकांच्या आधारें घटिका, दिन, मास आणि वर्षाचा विचार करून सांगावें. तें शकल पुनरुक्त होऊन निर्गम (खारीज अथवा मुनकलीब) असेल तर, संख्या कमी करावी आणि आगम (दाखील अथवा साबीत) असेल तर पुनरुक्त शकलांची संख्या मिळविली असतां स्पष्ट अवधि कालाचा निश्चय होतो. तीं शकलें पुष्कळ वेळां पुनरुक्त झाली असली तरी पूर्वीप्रमाणें विचार करावा. प्रश्न शकल बि. ज. द. ह. पंक्तीच्या स्वस्थानीं नसेल तर बि. ज. द. ह. कोष्टकांत ऊर्ध्वाधर आणि तिर्यक् रीतीने पाहून तेथील कालाचा निर्णय करून स्थानतुल्य अंक सांगावें. तें शकल उमहातमध्ये पुनरुक्त होईल तर दिवस, बिनहातमध्यें पुनरुक्त होईल तर सप्तक मुतवलीदातमध्यें पुनरुक्त होईल तर, मास आणि जायदातमध्यें पुनरुक्त होईल तर ते अंक वर्षात्मक जाणावें.

रीत २ री:–१ ल्या स्थानांतील शकलास प्रश्न स्थानांतील शकलानें गुणून येणारें शकल त्या कुंडलींत ज्या स्थानीं आहे तें स्थान व तें शकल कोणते याबरून कोष्टकांत पाहून अंक सांगावे.

रीत ३ री:– १ ल्या स्थानीं अथवा ज्या ज्या स्थानीं त्या प्रश्नाचा संबंध असेल त्याचा योग पुढें सांगितलेला आहे. त्याचें उत्तर देणें आहे. तर, तकरार इत्यादि सर्व उपकरणांच्या आधारें सांगावें. तीं शकलें उमहातमध्यें तकरार करतील तर, घटिका अथवा दिवस, बिनहातमध्यें तकरार करतील तर, दिवस अथवा वार, मुतवलिदातमध्यें तकरार करतील तर, वार अथवा महिने आणि जवायदातमध्यें तकरार करीत असतील तर महिने अगर वर्ष जाणावें.

अन्य मतें:–तें तकरार करणारें शकल साबीत असेल तर, वर्ष, दाखील असेल तर महिना, खारीज असेल तर सप्तक आणि मुनकलीब असेल तर, दिवस असें जाणावें.

वाराचा निर्णय.

कुंडलीच्या प्रश्न स्थानांतील शकल मूल ज्या स्थानाचें असेल त्याच स्थानास अनुसरून मिजाज पंक्तीस असेल तर, त्या शकलाचा जो ग्रह आहे त्या वारी कार्य

होईल. अथवा कुंडलींतील प्रश्न शकलाशिवाय दुसरें कोणतेंही शकल मिजाज-पंक्तीस अनसरून स्वस्थानाचें असेल तर, त्या शकलाचा जो ग्रह असेल त्या वारीं कार्य होईल. २-३ वेळा तकरार करींत असेल तर, त्यांत जें बलिष्ठ आहे त्या वारीं कार्य होईल असें जाणावें.

१ रविवारचा दिवस आणि गुरुवारची रात्र दाखविणारी ही ०।०। ।।०० दोन शकलें.

२ सोमवारचा दिवस आणि बुधवारची रात्र दाखविणारी हीं ।।।० ०००० दोन शकलें.

३ मंगळवारचा दिवस आणि शुक्रवारची रात्र दाखविणारी हीं ।।।। ।००। दोन शकलें.

४ बुधवारचा दिवस आणि रविवारची रात्र दाखविणारीं ही ।।।। ।००। दोन शकलें.

५ गुरुवारचा दिवस आणि सोमवारची रात्र दाखविणारी ही ।।।० ।००। दोन शकलें,

६ शुक्रवारचा दिवस आणि मंगळवारची रात्र दाखविणारी हीं ०।०० ०।०। दोन शकलें.

७ शनिवारचा दिवस आणि शनिवारची रात्र दाखविणाहीं ०।।० ०।।। ०।०। ०००। हीं चार शकलें.

बि. ज. द. ह. क्रमानें कालनिर्णय करणारें कोष्टक

१ ल्या स्थानांतील शकलास प्रश्न स्थानाच्या शकलानें गुणून तयार होणारें शकल कुंडलीत ज्या स्थानीं असेल तें स्थान आणि तेथें कोणतें शकल आहे तें कोष्टकांत पहावें. तेथील संख्या काल निर्णय करणारी होय. उदाहरणः-१ल्या स्थानांतील शकलास प्रश्नस्थान ५ वें स्थान कल्पून तेथील शकलानें गुणून ०।। तें शकल तयार झालें असें समजा. तें कुंडलींत ८ व्या स्थानीं आहे तर, कोष्टकांत ऊर्ध्वाधर ८ चा अक आणि हेडिंगातील ०।।० या शकलाखालीं पहातां तेथें ३८ चा अंक आहे. तो अवधि दाखविणारा अंक समजावा. याच रीतीनें संख्या निश्चय करावी. पुढच्या पानांवरील कोष्टक पहा.

स्थानांक	oloo	lllo	oool	loll	oooo	lolo	loll	olll	lloo	ollo	lool	ooll	looo	oolo	olol	llll
१	१	२	३	४	५	६	७	८	९	१०	११	१२	१३	१४	१५	१६
२	२	३	४	५	६	७	८	९	१०	११	१२	१३	१४	१५	१६	१७
३	४	५	६	७	८	९	१०	११	१२	१३	१४	१५	१६	१७	१८	१९
४	७	८	९	१०	११	१२	१३	१४	१५	१६	१७	१८	१९	२०	२१	२२
५	११	१२	१३	१४	१५	१६	१७	१८	१९	२०	२१	२२	२३	२४	२५	२६
६	१६	१७	१८	१९	२०	२१	२२	२३	२४	२५	२६	२७	२८	२९	३०	३१
७	२२	२३	२४	२५	२६	२७	२८	२९	३०	३१	३२	३३	३४	३५	३६	३७
८	२९	३०	३१	३२	३३	३४	३५	३६	३७	३८	३९	४०	४१	४२	४३	४४
९	३७	३८	३९	४०	४१	४२	४३	४४	४५	४६	४७	४८	४९	५०	५१	५२
१०	४६	४७	४८	४९	५०	५१	५२	५३	५४	५५	५६	५७	५८	५९	६०	६१
११	५६	५७	५८	५९	६०	६१	६२	६३	६४	६५	६६	६७	६८	६९	७०	७१
१२	६७	६८	६९	७०	७१	७२	७३	७४	७५	७६	७७	७८	७९	८०	८१	८२
१३	७९	८०	८१	८२	८३	८४	८५	८६	८७	८८	८९	९०	९१	९२	९३	९४
१४	९२	९३	९४	९५	९६	९७	९८	९९	१००	१०१	१०२	१०३	१०४	१०५	१०६	१०७
१५	१०६	१०७	१०८	१०९	११०	१११	११२	११३	११४	११५	११६	११७	११८	११९	१२०	१२१
१६	१२१	१२२	१२३	१२४	१२५	१२६	१२७	१२८	१२९	१३०	१३१	१३२	१३३	१३४	१३५	१३६

हर्फा क्रमानें अवधि दाखविणारें कोष्टक.

बि. ज. द. ह. क्रमांत सांगितल्याप्रमाणें गुणून येणारें शकल खालीं दाखविलेल्या १६ शकलांवरून प्रत्येक कोष्टकाच्या वरील भागीं स्थानदर्शक अंक घालून त्यापुढें हर्फा पंक्तीची शकलें घातलीं आहेत व त्याखालील प्रत्येक कोष्टकाच्या १ ल्या सदरांत स्थानांक घातलें असून त्याखालीं दिवस, महिने व वर्ष ही सदरें घालून त्या त्या सदरापुढें अंक घातलें आहेत, त्यावरून अवधीचा निश्चय करावा. तें गुणून आलेलें शकल बरेच वेळा तकरार करीत असेल तर, त्यांत बलिष्ठ कोणते तें सिद्ध करून त्यावरून दिवस, महिने वगैरे ठरवावें. बलिष्ठ ठरविण्याचें संशयात्मक दिसल्यास किती स्थानांत तकरार करतें त्या त्या स्थानांचे दिवस, महिने व वर्ष एकत्र करून तकरारीच्या स्थानांकांनी त्या संख्येस भागून कालावधि निश्चय करावा. ही रीत मिसर देशामध्ये उपयोगांत आणितात.

१ लहचान.

स्थान	१	२	३	४	५	६	७	८	९	१०	११	१२	१३	१४	१५	१६
दिवस	१	२	३	४	२	०	१०	१०	०	१०	२०	०	१०	२०	०	१०
महिने	०	०	०	१	१	२	२	२	३	३	३	४	४	४	५	५
वर्ष	०	०	०	०	०	०	०	०	०	०	०	०	०	०	०	०

२ अंकीश.

स्थान	२	३	४	५	६	७	८	९	१०	११	१२	१३	१४	१५	१६	१
दिवस	२	३	४	५	०	०	२०	०	१०	०	१०	२१	०	०	१०	२०
महिने	०	०	०	०	२	२	२	३	३	४	४	६	६	५	५	५
वर्ष	०	०	०	०	०	०	०	०	०	०	०	०	०	०	०	०

३ ॥०। हुमरा.

स्थान	३	४	५	६	७	८	९	१०	११	१२	१३	१४	१५	१६	१	२
दिवस	३	४	५	७	१०	२०	०	१०	०	२०	२१	०	१०	१०	१०	०
महिने	०	०	०	२	२	२	३	३	४	४	६	६	७	७	७	२
वर्ष	०	०	०	०	०	०	०	०	०	०	०	०	०	०	०	०

४ ०॥ बयाज.

स्थान	४	५	६	७	८	९	१०	११	१२	१३	१४	१५	१६	१	२	३
दिवस	४	५	६	७	२०	०	१०	२०	२०	१०	०	२०	०	०	०	०
महिने	०	०	०	०	२	३	२	३	४	५	६	६	७	४	१०	२
वर्ष	०	०	०	०	०	०	०	०	०	०	०	०	१	१	१	२

५ ० नुस्त्रुल्दाखील.

स्थान	५	६	७	८	९	१०	११	१२	१३	१४	१५	१६	१	२	३	४
दिवस	५	६	७	८	९	१०	२०	०	२४	०	०	०	०	०	०	०
महिने	०	०	०	३	४	४	५	९	१	४	१	१	१	४	७	१
वर्ष	०	०	०	०	०	०	०	०	०	१	१	१	२	२	३	४

६ ॥० नुस्तुल्खारीज.

स्थान	६	७	८	९	१०	११	१२	१३	१४	१५	१६	१	२	३	४	५
दिवस	६	७	८	९	०	०	०	०	१०	२०	०	०	०	०	०	०
महिने	०	०	०	०	४	५	११	२	३	३	४	१	३	५	५	६
वर्ष	०	०	०	०	१	०	१	१	०	०	०	१	३	४	५	६

७ ००० उत्पतुल्दाखील.

स्थान	७	८	९	१०	११	१२	१३	१४	१५	१६	१	२	३	४	५	६
दिवस	७	८	९	१०	२०	०	२०	७	७	२०	२०	२०	७	१०	१०	२०
महिने	०	०	०	०	४	४	४	४	४	०	२	९	०	०	०	३
वर्षं	०	०	०	०	०	०	०	०	१	२	२	२	७	६	७	३

८ ००० उत्पतुल्खारीज.

स्थान	८	९	१०	११	१२	१३	१४	१५	१६	१	२	३	४	५	६	७
दिवस	८	९	१०	११	०	८	१८	२०	२५	०	५	१०	०	०	०	०
महिने	०	०	०	०	४	४	४	४	९	६	३	३	४	५	५	१
वर्षं	०	०	०	०	०	०	०	०	०	१	३	३	४	५	५	६

९ ००० फरहा.

स्थान	९	१०	११	१२	१३	१४	१५	१६	१	२	३	४	५	६	७	८
दिवस	९	१०	११	१२	७	३	७	०	०	०	०	०	०	०	०	०
महिने	०	०	०	०	६	१	७	१०	८	३	९	४	५	९	०	०
वर्षं	०	०	०	०	०	१	१	१	२	३	३	४	५	९	१	६

१० ००० नकी.

स्थान	१०	११	१२	१३	१४	१५	१६	१	२	३	४	५	६	७	८	९
दिवस	१०	११	१२	१३	०	०	०	६	७	०	७	०	०	७	०	३
महिने	०	७	०	०	१	४	०	२	६	५	२	२	८	७	२	९
वर्षं	०	७	०	०	१	१	१	२	२	५	८	२	१३	१६	१९	२२

११ ☷ कबजतुल् दाखील.

स्थान	११	१२	१३	१४	१५	१६	१	२	३	६	५	६	७	८	९	१०
दिवस	११	१२	१३	१४	०	०	०	०	०	०	०	०	०	०	०	०
महिने	०	०	०	०	४	८	१०	५	६	९	१	४	१	०	०	०
वर्षं	०	०	०	०	१	१	१	२	२	२	१३	१६	१९	२१	२४	४०

१२ ☷ कबजतुल्खारीज.

स्थान	१२	१३	१४	१५	१६	१	२	३	४	५	६	७	८	९	१०	११
दिवस	१२	१३	१४	१५	७	११	०	०	०	०	०	०	०	०	०	०
महिने	०	०	०	०	०	०	२	८	२	८	०	०	९	९	११	०
वर्षं	०	०	०	०	१	१	२	२	२	१३	१६	१९	११	२४	४	२०

१३ ☰ जमात.

स्थान	१३	१४	१५	१६	१	२	३	४	५	६	७	८	९	१०	११	१२
दिवस	१३	१४	१५	१६	८	८	२५	०	०	०	०	०	०	०	०	०
महिने	०	०	०	०	०	३	६	९	१	४	८	२	२	५	९	४
वर्षं	०	०	०	०	०	०	०	१	१	१	१	२	२	२	३	४

१४ ☷ उकला.


स्थान	१४	१५	१६	१	२	३	४	५	६	७	८	९	१०	११	१२	१३
दिवस	१४	१५	१६	१७	२५	०	०	०	०	०	०	०	०	०	०	०
महिने	०	०	०	०	६	९	१	७	१०	२	५	८	३	४	६	९
वर्षं	०	०	०	०	६	९	१	७	१०	२	५	८	३	४	६	९

१५ ०॰।।। इज्जतमा.

स्थान	१५	१६	१	२	३	४	५	६	७	८	९	१०	११	१२	१३	१४
दिवस	१५	१६	१७	१८	०	०	०	०	०	०	०	०	०	०	०	०
महिनें	०	०	०	०	६	१	४	१०	२	५	८	५	०	२	९	९
वर्ष	०	०	०	०	३	१	१	१	२	२	१२	६	५	७	८	९

१६ ०००० तरीख

स्थान	१६	१	२	३	४	५	६	७	८	९	१०	११	१२	१३	१४	१५
दिवस	१६	१७	१८	१९	१९	०	०	०	०	०	०	०	०	०	०	०
महिने	०	०	०	०	१	४	७	२	३	६	४	४	४	३	२	४
वर्ष	०	०	०	०	७	७	७	७	३	३	४	५	६	७	८	१३



उदाहरण:– 'मी गांवास जाणार आहे, किती दिवसांत जाणें होईल?' असा प्रश्न आहे. यांत १ लें स्थान प्रश्नकर्त्याचें आणि ९ वे स्थान प्रवासाचें; तेथील दोन्ही शकलें गुणल्यानें ०।।। हें शकल आले. ते कुडलींत २-४-८ या तीन स्थानांत तकरार करितें; परंतु तें कुडलीत ३ ऱ्या स्थानींच पडलें आहे असें कल्पिले तर, मागच्या ०।।। या लह्यान कोष्टकाखालीं ३ ऱ्या स्थानांत पहातां दिवस या सदरापुढें ३ चा अंक आहे त्यावरून ३ दिवसांत जाणें होईल असें समजावे. परंतु तें कुंडलींत २-४-८ या तीन स्थातांत तकरार करीत असून त्यांत बलिष्ठ स्थान रमलजिव्हा उपकरणास अनुसरून २ ऱ्या स्थानीं बली ठरतें यावरून त्या लह्यान कोष्टकाच्या २ ऱ्या स्थानीं दिवस या सदरापुढें २ अंक असून महिने व वर्ष या सदरापुढे ० आहे. त्या वरून २ दिवसांत जाणें होईल असें समजावें. आतां तें शकल बली नाहीं असें समजून चालतां कुंडलीत तीन ठिकाणी तकरार करीत आहे ह्मणून २ ऱ्या

स्थानाच्या सदराखालील फक्त २ दिवस, ४ थ्या स्थानाच्या सदराखालील ४ दिवस १ महिना आणि ८ व्या स्थानाच्या सदराखालील १० दिवस २ महिनें या तीन्हींची बेरीज ३ महिनें १६ दिवस होते. त्या संख्येस ३ स्थानांत तकरार करीत आहे ह्मणून ३ नें भागिल्यानें १ महिना १५ दिवस ४ तासांनीं जाणें होईल असें निश्चय करून संख्या सांगावीं.

अ. ब. द. ह. क्रमाची संख्या.

खालीं दाखविलेल्या संख्यांची उत्पत्तिः-प्रत्येक शकलांत ऊर्ध्वाधर रीतीनें १ २ ४ ८ या रीतीनें अंक स्थित आहेत.

शकलें	0|||	|0||	00||	||0|	0|0|	|00|	000|	|||0	0||0	|0|0	00|0	||00	0|00	|000	0000	||||
संख्या	२९	२८	२७	२६	२५	२४	२३	२२	२१	२०	१९	१८	१७	१६	१५	३०

त्यांतील प्रत्येक शकलांतील शून्यास शकलास सांगितलेली जी संख्या असतें तीच कायम धरावी व रेखच्या स्थानची संख्या दुप्पट करावी ; ह्मणजे वरील कोष्टकांतील प्रत्येक शकलांखालील संख्या स्पष्ट होतें. उदाहरणः- 00\|\| हें शकल प्राप्त झालें आहे. यांतील वरील दोन शून्यांचा संख्या १-२ यांची बरीज ३ आणि दोन रेखांची संख्या ४-८ याचे दुप्पट ह्मणजे चारीचे ८ आणि ८ चे १६ वरील ३ आणि खालचे ८-१६ याची मिळवणी २७ झाली. कोष्टकांत वरील शकलाखालचा अंक २७ आहे. यावरून बाकीच्या शकलांची संख्या सहज कळेल.

बि. ज. द. ह. क्रमाची संख्या.

खाली कोष्टकांत दाखविलेल्या संख्यांचा उत्पत्तिः-प्रत्येक शकलांत ऊर्ध्वाधर १ २ ४ ८ या रीतीचें अंक स्थित आहेत. त्या त्या शकलांतील शून्यांची संख्या जितकी

शकलें	0|00	|0||	|000	||0|	0000	|00|	000|	|||0	0||0	|0|0	00|0	||00	0|00	|000	0000	||||
संख्या	१७	२	१९	४	२१	६	७	८	९	१०	११	१२	१३	१४	१५	०

होईल तेवढीच मिळवून संख्या करावी ह्मणजे संख्या स्पष्ट होतें. उदाहरणः- 000 हें शकल संख्येकरितां ठरलें आहे. यांत १ २ ४ ८ संख्या स्थित आहे; नियमाप्रमाणें

यांतील रेखेची संख्या ७ गाळल्याने २–४–८ राहिले यांची मिळवणी १४ झाली ती त्या शकलाखालीं मांडिली आहे.

अ. ब. ज. द. क्रमाची संख्या.

खालीं कोष्टकांत दाखविलेल्या संख्यांची उत्पत्ति:– प्रत्येक शकलात १ २ ३ ही संख्या आहे. खालील कोष्टकांतील प्रत्येक शकलाखालीं जी संख्या आहे, ती फक्त शून्यासच लागू आहे. रेखास संख्या नाहं. उदाहरण:– |ooo हें शकल

शकलें	o|||	|o||	||o|	|||o	o||o	|o|o	oo|o	o|oo	|ooo	oooo	oo||	o|o|	|oo|	ooo|	||oo	||||
संख्या	१	२	३	४	५	६	७	८	९	१०	३	४	५	६	७	०

झालें आहे त्यांतील रेखेंची संख्या सोडून बाकींच्या तीन शून्यांची ३ ही संख्या मिळविल्यानें ९ झाली; ती त्या शकलाखाली मांडली आहे.

तत्वानुसारें बहुसंख्या क्रम.

तत्वें	तेज. १				वायु १०				जल. १००				पृथ्वी १०००			
	ते.	वा.	ज.	पृ.	ते.	वा.	ज.	पृ.	ते,	वा.	ज.	पृ.	ते.	वा.	ज.	पृ.
तेज. १	१	३	६	८	११०००	२	६	८	१३३३२	१६६६५	३३३३३	९	२	३५५५२	४४४४०	८
वायु. १०	११	३३	६६	८८	१०	२२	६६	८८	१३	१६	३३	९९	२४	३५	४०	८८
जल. १००	१११	३३३	६६६	८८८	११०	३२०	६६०	८८०	१३२	१६५	३३३	९९९	२५४	३५२	४४०	८८
पृथ्वी. १०००	११११	३३३३	६६६६	८८८८	११००	२२००	६६६०	८८००	१३३२	१६६५	३३३३	९९९९	२२५४	३५५२	४४४०	८८८८

वरील कोष्टकावरून कोणतीही एखादी संख्या निर्णयात्मक करणेची आहे. तप, ०, कवड्या, रेस. दाम, पैसा, आणे, चवल्या, पावल्या, अधेल्या, रुपये वगैरेची संख्या ठरवितांना प्रश्नकर्त्याचें शकल तेंज अथवा वायु असून

इच्छित शकल जल अथवा पृथ्वीचें असल्यास त्या दोन्ही संख्यांची वजाबाकी करावी आणि इनकर्त्याचें शकल जल अथवा पृथ्वीचें असून इच्छित शकल तेज अथवा वायूचें असल्यास संख्या मिळवावी. अन्योन्य विरोधी असल्यास त्या त्या सख्येने गुणून संख्या ठरवावी व ती संख्या गुणतांना अथवा मिळवितांना त्या शकलांतील प्रकट तत्वें कोणकोणती आहेत तीं पाहूनही त्या त्या सख्यांची मिळवणी वगैरे करावी. वरील कोष्टकांत जी तत्वें दाखल केली आहेत त्या प्रत्येक तत्वाच्या खाली आणि बाजूस एकेका तत्वांत चार चार तत्वें आहेत तीं प्रकटतत्वांचीं असून शकलांतील शून्यांची संख्या मात्र घ्यावी.

आयुष्य दाखविणारें कोष्टक.

ग्रहक्रमानें शकलें	रवि 1010 1100	सोम. 1101 0000	मंगळ. 1011 0100	बुध. 1111 1001	गुरु. 0111 1100	शुक्र. 0010 1000	शनि. 0110 1110	रा.के. 0101 0001
पूर्णायुष्य	१२०	८४	९६	८७	७९	८२	६७	६६
मध्यम आयुष्य	४५	३९	४९	२९	४४	२१	४९	४०
अल्पायुष्य	७	३१	७	२०	१२	१९	१५	१५

आयुष्याचा निर्णय करतांना सर्व उपकरणांच्या साधनानें पूर्णायुषी किंवा मध्यमायुषी हें ठरवून त्याप्रमाणें वरील शकलांखालीं दर्शविलेलीं संख्या निश्चय करावी. उदाहरण:—कुंडलींतील आयुष्य विचाराने 0 0 1 हें शकल उत्पन्न झालें असून तें उपकरणांच्या साधनानें निर्बली ठरल्यामुळे अल्पायुषी ठरतें. ह्मणून त्याखालील संख्या १५ वर्षे, महिने अगर दिवस ठरवावें.

विनोपकरणं ज्ञात्वा कुर्यात्प्रश्नं तु यो बुधः ॥
वृथा वाणी भवेत्तस्य, वाच्यतां याति च ध्रुवम् ॥२०॥

अर्थ:—मागें जीं जीं उपकरणांचीं साधनें सांगितली त्यांचें पूर्णपणें ज्ञान झाल्याशिवाय ज्योतिष्यानें प्रश्नफले कधींच सांगू नयेत. हें ज्ञान न होता जर ज्योतिषी फलें सांगेल तर तो अपकीर्तीस कारण होऊन या ग्रंथासही दोष देण्यास जगांत जागा ठेवील.

एवं सामान्यतः प्रोक्तं सर्वं गेहेषु निश्चितम् ॥
यद्यद्गृहे विशेषं च तत्तद्गेहेऽधुना ब्रुवे ॥२१॥

अर्थः— याप्रमाणें या शास्त्रास अवश्य लागणाऱ्या सर्व रीती सांगितल्या आहेत. प्रश्न सांगण्यास ज्या ज्या स्थानीं प्रश्नसमूह आहे तो पुढें २ ऱ्या भागांत क्रमवार सांगितला आहे.

पाठकांस विनंतीः— हा १ ला भाग चांगला समजल्याशिवाय २ ऱ्या भागांत मन घालूं नये.

भाग पहिला समाप्त.

भाग २ रा

—: ० :—


प्रश्न समुदाय

पूर्वोक्त प्रश्नस्य विधिं वक्ष्ये शिष्य हिताय च ।। लोकानां रंजनार्थं च लिख्यतेऽपि चमत्कृतं ।। २२ ।। तत्प्रश्नस्य विधिं वक्ष्ये साधकानां सुखाय च ।। सर्वेषां प्रश्नजालानां प्रकारं च बहुविधं ।। २३ ।।

अर्थः—प्रश्न सांगण्याकरितां लागणारी सर्व साधनें १ ल्या भागांत लिहून या भागांत पाठकांस सुलभ रीतीनें समजण्याजोगा अवश्य लागणारा प्रश्नसमुदाय अनेक प्रकारच्या उदाहरणासह लिहिला आहे.

१ ल्या स्थानापासून प्रश्न सांगणें.

तनोश्चावयवस्यापि सुखस्याऽप्यऽसुखस्यच ।। जीवनस्यायुषश्चापि जन्मस्थानभवंतथा ॥ २४ ॥ बलस्यकार्यारंभस्य प्रयत्नस्य सुखस्य च ।। नृपनीतेश्च शांतेश्च ज्ञेयानि प्रथमगृहात् ।।२५।।

माझें अंगलक्षण कसें आहे ?— १ ल्या स्थानांत  हें शकल असेल तर, ऊर्णादि रुधिर विकाराची क्षते मस्तकावर आहेत; परंतु दुःखदायक नव्हे.  हें असेल तर, उंच जागेवरून अगर एखादा दुसरा मार डाव्या हातास लागल्याचे क्षत आहे.  हें असेल तर, क्रूर पशूनें चावलेलें अथवा शस्त्राचे क्षत छातीवर आहे.  हें असेल तर, शीत—कफादि रोग अथवा जलचर भक्षणाची क्षते पाठीवर आहेत.  हें असेल तर, मारामारींत उजव्या जांघेस मार लागला आहे.  हे असेल तर, तीक्ष्ण शस्त्राचा मार डाव्या भुजेस लागलेले क्षत आहे.  हें असेल तर, बरची अगर बाणाचा मार कुशींत लागलेलें क्षत आहे.  हें असेल तर, चिमट्यासारख्या शस्त्राचा मार डाव्या जांघेस लागलेंले क्षत आहे. बाकीच्या शकलांनीं व्रण अगर क्षत शरीरास नाही. अधिक लक्षणें १ ल्या भागांत सांगितलेल्या १६ ही शकलांच्या गुणरूपावरून जाणावें.

रीत २ रीः– १२ व्या स्थानांत दाखील शकल असेल तर, मागील काळीं देह पुष्ट होते, हल्ली नाहीं. २ ऱ्या स्थानांत दाखील शकल असेल तर पुढें देह पुष्ट होईल. १ ल्या स्थानांत असेल तर, हल्ली पु ट आहे. वरील स्थानांत अशुभ खारोज शकलें असतील तर, सदोदित क्षीण आणि साबीत मुनकलीब शकलें असतील तर, सम शरीराचा असें जाणावें.

माझा ग्रह कोणता ?— १६ हीं स्थानांतील फक्त रेखा मोजून त्या संख्येस ७ नें भागावें. १ राहिल्यास शनि, २ राहतील तर गुरू, ३ मंगळ, ४ सूर्य, ५ शुक्र, ६ बुध आणि ७ शेष राहतील तर, चंद्राचा असें जाणावें.



मीं पूर्णायुषी कीं काय ?– १ ल्या स्थानांत यातील कोणतेही शकल असल्यास पूर्णायुषी; यांतील असल्यास मध्यमायुषी आणि यातील असल्यास अल्पायुषी असें जाणावें.

रीत २ रीः– ४थ्या स्थानांतील शकल १-४-७-१०-१३ यांतील कोणत्याहीं स्थानी तकरार करीत असल्यास पूर्णायुषी, २-५-८-११-१४ यांतील कोणत्याही स्थानांत तकरार असल्यास मध्यमायुषी आणि ३-६-९-१२-१५ या स्थानांत तकरार असल्यास अल्पायुषी, कोठेंच तकरार नसल्यास ४ थ्या स्थानांत जें शकल पडलें आहे, त्यावरून १ ल्या भागांत सांगितलेल्या आयुष्यदर्शक कोष्टकाच्या आधारें सांगावें.

रीत ३ रीः– ४ थ्या स्थानांतील शकल उमहातमध्यें तकरार करील तर पूर्णायुषी, बिनहात आणि मुतवलिदातमध्यें तकरार करील तर मध्यमायुषी आणि ज़वाथदातमध्यें तकरार करील तर अल्पायुषी जाणावें.

रीत ४ थीः– १–४ या स्थानांतील शकलें गुणून येणारे शकल शुभदाखील असेल तर दीर्घायुषी, शुभसाबीत असल्यास मध्यमायुषी, शुभ मुनकलीब असल्यास अल्पायुषी आणि अशुभ खारीज असल्यास आयुष्यहीन असें जाणावें.



माझें आयुष्य सुखानें जाईल काय ?— १ ल्या स्थानांत शुभ शकल असल्यास सुखी, अशुभ असल्यास दुःखी आणि चिंता तत्पर. त्या स्थानांत यांतील एखादे असून १० अथवा ५ व्या स्थानांत तकरार


असल्यास बलवान व भाग्यवान.  यांतील एखादे असून २-१०-१५ या स्थानांपैकी एखादे स्थानांत तकरार असल्यास दरिद्र व दु:खी आणि  यापैकी एखादे असून २–१०–१५ या स्थानांतील एखादे स्थानांत तकरार असल्यास मध्यमावस्थेंत दिवस जातील.


रीत २ रीः– १ ल्या स्थानीं शुभ शकल असेल तर, तेजवंत व निरोगी. ते शकल ४ थ्या स्थानांत तकरार केल्यास राजाकडून अगर बापाच्या मिळकती-वरून सुखानें क्रमेल ३-११ या स्थानांत तकरार असल्यास मित्राकडून लाभ होईल. ५व्या स्थानांत तकरार असल्यास मुलाकडून लाभ होईल. ६व्या स्थानांत तकरार असल्यास प्रकृतींत विपर्यास, ७ व्या स्थानांत तकरार असल्यास विवाद आणि कलहदायक जरी आहे तरी स्त्रियांकडून लाभ होईल, ८ व्या स्थानांत तकरार असेल तर देहास कष्ट होतील, ९ व्या स्थानांत तकरार असल्यास प्रवासांत लाभ होईल, १२ व्या स्थानांत असल्यास दुःख आणि संकटानें २ आणि १०त असल्यास स्वत: सुखी, १ल्या स्थानांत अशुभ शकल असून वरील स्थानांत तकरारीं असल्यास दु:खी असें जाणावें.

रीत ३ रीः–१ ल्या स्थानांत शुभ शकल असून २-५-८-११ स्थानांत कोठेंही तकरार असल्यास सुखानें अतकालपर्यंत काळ कठल अशुभ असल्यास दु:खानें १-४-७-१० स्थानांपकी एका स्थानीं शुभ शकल असल्यास मध्यमावस्थेंपर्यंत सुखानें आणि ३-६-९-१२ या स्थानांपैकी कोणत्याही स्थानीं शुभ शकलें तकरार करतील तर कांही दिवस सुखानें होईल, अशुभ असल्यास दु:खानें कालहरण होईल.

रीत ४ थीः– १-४ या स्थानांतील शकलांच्या गुणण्यानें येणारें शकल शुभ असल्यास सुखानें, अशुभ असल्यास दु:खानें मध्यम असल्यास मध्यम रीतीने काळ कठेल

माझं दैव कसें आहे?— १–१०–४–१४ स्थानांत  यांतील शकलें असल्यास दरिद्री, २ऱ्या स्थानांत  यांतील शकल असल्यास

वृश्चिक आणि  यांतील असल्यास मध्यम तऱ्हेचे आहे.

रीत २ रीः-  यांतील शकल १ ल्या स्थानांत असून ४-१०-११-१४-१५ या स्थानांत कोठेंहीं तकरार आणि त्या शकलांचे साक्षी. स्थान बलिष्ठ असल्यास सुदैवी, ६-७-८-९-१२-१३ या स्थानांत असल्यास मध्यम. बाकीच्या शकलांनी दरिद्री.

रीत ३ रीः- १ ल्या स्थानांत शुभ शकल असून शुभ स्थानांत तकरार असल्यास सुदैवी. १ ल्या स्थानांत अशुभ शकल असून ६-८-१२-१४-१५ या स्थानांत अशुभ शकलें असतील तर दुर्दैवी, त्या स्थानांत  हें असून १४-१५ १६ त तकरार असल्यास कष्टानें सुखी.

रीत ४ थीः- १ ल्या स्थानांत  हें शकल असल्यास सुदैवी, निरोगी, आनंदयुक्त, स्वत: मिळविणारा, प्रत्येक कार्यांत जय पावणारा, निष्कपटी आणि स्वच्छंदी होईल. याप्रमाणें बाकीच्या शकलांचें गुणावगुण १ ल्या भागांतील कोष्टकांच्या आधारें सांगावे.

रीत ५ वीः- १ ल्या स्थानांत अशुभ शकल असल्यास त्याची सर्व कर्तव्यें अशुभ. १ लें स्थान प्रश्नकर्त्यांचें असून त्या स्थानाचें साक्षीस्थान १३ वे आहे. या दोन्ही स्थानांत शुभाशुभ जशीं शकलें असतील त्या मानानें गुण सांगण्यास 'खाजेनलरुद्दीन' नामक पंडिताचे ह्मणणें आहे.


मी किती वर्षे जगेन ?- १-४ या स्थानांतील शकलांच्या गुणण्यानें येणारे शकल दाखील अथवा साबीत असेल तर हल्ली मरणार नाहीं, खारीज अथवा मुनकलीब असेल तर मरण जवळ आलें. ते शकल बि. ज. द. ह. क्रमानें किती अंकांचे आणि किती स्थानांत तकरार करते तीं सर्व संख्या एकत्र करून उपकरणांच्या सहाय्यानें उत्तर द्यावे. कुंडलींतःतें शकल नसल्यास बि. ज. द. ह. क्रमानें होणारी संख्या शेषायुष्य असें सांगावे.



मला किती वर्षे झाली ?- १-८ व १-४ या स्थानांतील शकलें परस्पर गुणून दोन शकलें तयार करावी आणि त्या दोन्ही शकलांची बि. ज द. ह.

क्रमानें संख्या करून त्या दोन्हीं संख्या एकमेकांस गुणून येंणारी संख्या गत आयुष्याची.

रीत २ रीः- कुंडलींतील सर्व शून्यें मोजून आलेल्या संख्येस १६ नें भागावें व शेषांकास अनुसरलेलें शकल १-४-७-१० या स्थानांत तकरार करीत असेल तर वर्ष. २-५-८-११ स्थानांत तकरार करील तर महिने, ३-९-१२ त तक्रार करील तर दिवस आणि १३-१४-१५-१६ या स्थानांत तक्रार करील तर तास जाणावें.

मरणकाळ कसा प्राप्त होईल ?— १ ल्या स्थानांतील शकल २ ऱ्या स्थानांत तकरार करील तर रोगोत्पत्ति, द्रव्यक्षयाची व्यथा आणि देवक्षोभानें ३ या देवमार्गांत सहोदरांच्या योगें विपत्ति प्राप्त होऊन, ४ थ्यांत संपत्तिनाशाच्या योगें मर्मभेदक ताडण्यानें, ५-६त रोगोत्पत्तोनें, ७व्यांत सीमंतिनीच्या जघनतेनें ८ व्यांत धनापहरणानें, ९ व्यांत परदेशांत विद्याभ्यासाकरिता जाण्यानें. १० व्यांत राजा अथवा अधिकारी यांच्या वैरत्वानें. ११ व्यांत प्रीतिपात्राच्या वियोगानें. १२व्यांत चोर, वैरी अथवा पशूच्या उपद्रवाने आणि १३-१४-१५-१६ या स्थानांत तकरार करील तर ह्यातारपणानें मरण येईल. वरील, फलें १-८ या स्थानांतील शकलांच्या गुणण्यानें येणाऱ्या शकलाच्या तकरारीवरूनही सांगतां येतात. १ ल्या स्थानांतील शकल कोठेंही तक्रार करीत नसेल तर ईशेच्छनें असें जाणावें.

आतां मी कोणत्या स्थितीत आहे ?— १ ल्या स्थानांत  यांतील शकल असल्यास, मागील काळ श्रीमंतीचा, ३ ऱ्या स्थानांत असल्यास, येणारा काल श्रीमंतीचा, २ ऱ्या स्थानांत असून १-५-९-१०-११-१४-१६ या स्थानांत तकरार असल्यास चालू काल श्रीमंतीचा, वरील स्थानांत साबित शकलें असल्यास कांहीं कालानंतर उत्तम स्थिति येईल. मुनकलीब असल्यास, कांहींशी स्थिति सुधारण्याचा संभव आहे आणि खारिज शकलें असल्यास, उधळेपणाची असें जाणावें.

कष्टाचीं वर्षें कोणती ?— १ ल्या स्थानांत  यातील शकल असल्यास ८-१२--१६-२४-३२ आणि ४२ वें वर्ष कष्टाचें.  यांतील असल्यास १२-१६--२४-२८--३२ आणि ४२ वें वर्ष, 

यांतील असल्यास, ६-१४-१८-२०-२२-२७-३४ आणि ३९ वें वर्ष. यांतील असल्यास, १२-२०-२३-२७-३६ आणि ४५ वें वर्ष, हें असल्यास १४-१६ १८-२०-२२-२७-३४ आणि ३९ वें वर्ष हें असल्यास ६-१४-१८-२०-२२-२७-३४ आणि ३९ वें वर्ष, वृद्धावस्थेंत येणारें कष्ट बि. ज. द. हु. क्रमाच्या हिशेबानें सांगावें.

अपमृत्यूचीं वर्षें कोणतीं ?—१ ल्या स्थानांत यांतील शकल असेल तर, १० व्या वर्षी भय, १९ व्या वर्षी पतन भय आणि २७ व्या वर्षी शत्रु भय, यांतील असेल तर, ११ व्या वर्षी जल भय, २२ व्या वर्षी पतन भय, ३२ वें वर्षी शत्रु भय, ३८ वें वर्षी चोर आणि अग्नी भय, यांतील असेल तर, १२वे वर्षी पतन भय, १६वें वर्षी लुप्त पिंड विकार २७व्या वर्षी शत्र भय, ३८वें वर्षी व्रणोपद्रव व ४०व्या वर्षी महापीडा विकार. यांतील असेल तर, ११वे वर्षी जलभय. १६वें वर्षी भूत बाधा, २२ वे वर्षी किंचित उपक्रम आणि ३२ वे वर्षी शत्रु भय. यांतील असेल तर, २४ व्या वर्षी पतन भय, ३४ वे वर्षी शस्त्र भय. ३८ वे वर्षी व्रण भय. यांतील असेल तर, ९ वे वर्षी जलोपद्रव, १७ वे वर्षी पतन भय. २५ वे वर्षी औषध भय, २७ वे वर्षी विष भय आणि ४०वें वर्षी मरणांतक कष्ट, यांतील असेल तर, ९ वे वर्षी जल भय, १४ वे वर्षी पतन भय, १६वे वर्षी कुटुंबवंशात महाकष्ट. यांतील असेल तर, ९ व्या वर्षी जल भय. १६ वे वाहन पतन भय, २२ वे वर्षी जलोपद्रव, ३२ वे वर्षी महत् कष्ट असें जाणावे.


माझे इच्छित कार्य होईल काय ?— १ ल्या स्थानांतील शकल ११ व्या स्थानांत तकरार करील तर तीव्र कार्य होईल. १४-१५-१६ यांत कोठेंही तकरार असेल तर आनंदानें कार्य होईल. वरील स्थानांत अशुभ शकल असल्यास कार्य न होता उलट दुःख होईल. अथवा १–११ स्थानांतील शकलें गुणून येणाऱ्या शकलावरून वरीलप्रमाणें फळ सांगावें.

२ ऱ्या स्थानापासून प्रश्न सांगणें.





धनस्य तत्सहायस्यपार्श्वस्य मनुजस्य च ॥ जीविकायाः सहायस्याप्याऽऽगमस्योद्यमस्य च ॥२६॥ क्रयविक्रय

ग्रोर्वापि प्रश्नमाढ्य वराकयोः ॥ दातृकृपणयोश्चापि
प्रश्नो वाच्यो धनालयात् ॥ २७ ॥

मला द्रव्य मिळेल काय ?— २-४ या स्थानांतील शकलें गुणून येणारे शकल शुभ दाखवित असेल तर, मिळेल. शुभ साबीत असेल तर, विलंबानें मिळेल. खारीज असून शुभ अगर अशुभ असलें तरी मिळणार नाहीं. आणि मुनकलीब शकल शुभ अगर अशुभ असलें तर संशय असें जाणावें.

रीत २ रीः— १-२ या स्थानांत दाखील शकलें असून १३-१४ या स्थानांत तकरार असल्यास मिळेल. त्या स्थानांत  ही शकले व १५ व्या स्थानी तकरार असेल तर विलंबाने मिळेल आणि १-२-१३-१४-१५ या स्थानांत   ही शकलें असल्यास मिळणार नाहीं.

रीत ३ रीः— १ ल्या स्थानापासून १५ स्थानापर्यंत असलेल्या शकलांतील रेघा मोजून त्या संख्येस २ नें भागावें. शेष १ राहिल्यास मिळेल. ० राहिल्यास मिळणार नाहीं.

रीत ४ थीः— २ ऱ्या स्थानांत  यांतील शकल असून १-१३-१४ या स्थानांत कोठेंहीं तकरार असल्यास एकदम मिळेल. २ ऱ्या स्थानांत  असल्यास कष्टानें मिळेल.  यांतील असून वरील स्थानांत तकरार असल्यास मिळेल. पण लवकरच खर्च होईल.  यांतील असून वरील स्थानांत तकरार केल्यास विलंबानें धन लाभ होईल.  यांतील शकल असून वरील स्थानांत तकरार असल्यास मिळणार नाहीं.

रीत ५ वीः— १-१४ स्थानांतील शकलांच्या गुणण्यानें येणारें शकल दाखील अथवा साबीत असल्यास मिळेल आणि खारीज अथवा मुनकलीब असल्यास मिळणार नाहीं.

रीत ६ वीः— कुंडलीतील सर्व बिंदु मोजून त्या संख्येस २ नें भागावें. १ शेष राहिल्यास मिळेल. ० राहिल्यास मिळणार नाहीं.

रीत ७ वीः— २ ११ स्थानांतील शकलें गुणून येणारें शकल दाखील असेल तर मिळेल. खारीज असल्यास मिळणार नाहीं.

द्रव्यलाभ केव्हां होईल?—१ ल्या स्थानांत यांतील शकल असल्यास मागे द्रव्यलाभ झाला होता पण तू स्वतः खर्च केलास यांतील असल्यास मागील काळी सुमार्गानें द्रव्य संचय झाला आहे. हें असल्यास दुष्ट कृतीने द्रव्य संचय झाला आहे, खर्च होणार नाही. यांतील असल्यास स्वेच्छा धनसंचय झाले आहे आणि यांतील असल्यास दुष्कृतीनें दुसऱ्याकडून धन लाभ झाला आहे. फळ भूतकाळाचें.

३ ऱ्या स्थानांत यांतील असेल तर काहीं दिवसांनी उत्तम व्यवसायाने धनसंग्रह होईल. हें असल्यास कष्टानें धनसंग्रह होईल. यांतील असल्यास द्रव्यलाभ झाला तरी क्षयास कारण यांतील असल्यास धन सचय होईल व तें स्थिर राहील. हें असल्यास यांतील असल्यास कष्टानें धन संचय होईल. भविष्यकाळाचे फळ.

२ ऱ्या स्थानांत यांतील असेल तर, सर्व पदार्थांची वृद्धि, कोशगृहाचीं वृद्धि आणि खरेदी विक्रीमध्यें लाभ. हें असल्यास कष्टानें लाभ. यांतील असेल तर कोशगृहात स्थिरतेचे द्रव्य राहील. हें असल्यास द्रव्य क्षय होते. यांतील असल्यास लाभ झाला तरी खर्च होईल. कोशगृहांतील धन खर्च होते. यांतील असेल तर लाभ होतें, पण स्वतः करितां खर्च होते. यांतील असेल तर अति कष्टानें द्रव्य संचय होते परंतु खर्च होते. याप्रमाणें वर्तमान काळाचे फळ जाणावें.

कोणत्या मार्गानें द्रव्य लाभ होईल?— २ ऱ्या स्थानांत यांतील शकल आठव्या स्थानांत यांतील एखादे असून १४ व्या स्थानांत तकरार व १५व्या स्थानांत हें शकल असल्यास, गुप्त रीतीनें द्रव्यलाभ २ऱ्या स्थानांत यांतील असेल तर, स्वतःच्या प्रयत्नानें मिळल व चांगल्या कामी खर्च होईल. २ स्थानांत यांतील असेल तर मिळणार नाहीं आणि हें असेल तर स्वतःच्या कष्टानें विलंबानें मिळेल.

रीत २ रीः- कुंडलींतील सर्व रेखा मोजून ७ ने भागावे. शेष १ आल्यास राजा, संस्थानिक अगर श्रीमंतांकडून; २ मित्र अथवा परोपकारी मनुष्याकडून ३ स्वतः विद्येच्या जोरावर अथवा प्रवासानें; ४ बापाच्या मिळकतीवरून अथवा शेतकीनें; ५ मुलगा, मित्र अथवा प्रियपात्रांकडून; ६ व्यापार, वैद्यकी अथवा सेवकपणानें आणि ० राहिल्यास स्त्रीयांकडून अगर वकीली करून मिळेल

द्रव्याचा व्यय कसा होईल ?— १-२-११-१३ स्थानांत, कोठेंही यांतील असल्यास प्रायश्चित्त, न्याय आणि रोगाकरितां खर्च; बाकीच्या शकलांनीं व्यय होणार नाही. झाला तरी योग्य कामास होईल. ४-१३ यांत यांतील असल्यास, स्वतःकरितां खर्च होईल यांतील असल्यास, दुसऱ्याच्या स्वामित्वानें यांतील असल्यास स्वतः व मुलांकरितां खर्च. यांतील असल्यास सर्व द्रव्य अनिष्ट कार्यांत खर्च होईल.

रीत २ रीः- २ ऱ्या स्थानांतील शकलें १ ल्या स्थानांत तक्रार केल्यास स्वतः खर्च करील ३ ऱ्यांत तक्रार करील तर आकस्मिक कारणानें अथवा आप्तइष्टांकरितां ४ थ्यांत वडिलोपार्जित मिळकतीकरितां अथवा शेतकी कामांत ५ व्यांत संतती, प्रियपात्र, जुगार अथवा नवीन वस्त्र खरेदीच्या कामांत. ६ व्यांत दास, दासी, रोग अथवा चुलत्याकरितां. ७ व्यांत वकीली, कर्जदारी, चोरी अथवा स्त्रियांकरितां. ८ व्यांत कठिण प्रसंगानें अथवा मृतधनाच्या अपहारानें. ९ व्यांत प्रवास अथवा विद्येंत. १०व्यांत राजकार्य अथवा व्यापारानें. ११ व्यांत मित्राच्या संगतीने व सत्पुरुषाच्या आदरातिथ्याने आणि १२ व्यांत असेल तर, वैऱ्यांच्या त्रासाकरितां व पशु खरेदी वगैरे करितां खर्च होईल असें जाणावें.

मागितलेलें द्रव्य मिळेल काय ?- २ ऱ्या स्थानांत यांतील शकल असून ८ व्या स्थानांत यांतील असेल तर मिळेल. हे शकल असल्यास व्याजी देईल.

रीत २ रीः- हे शकल २-४-६-८-१०-१२-१४-१५ या स्थानांत कोठेंहीं असल्यास तीव्र देईल. वरील शकल कोठेंही नसून या दोन्हीं

पैकीं एखादे शकल कुंडलीत ज्या स्थानी असेल त्या स्थानापासून सव्यापसव्य ३-९-५-७-११ स्थानात शुभ दृष्टी व तेथे दाखील शकलें असतील तर देईल.

खरेदी विक्रीचा विचार:—विक्रीचें स्थान १ ले त्याचे लाभ स्थान २ रें आणि खरेदी स्थान ७ वे आणि लाभ स्थान ८ वे. या स्थानांत शुभाशुभ शकलें पाहून उत्तर द्यावे. अगर त्या स्थानांत असलेलीं शकलें गुणून येणाऱ्या शकलाच्या शुभ शुभ गुणावरून उत्तर द्यावे.

खरेदी केल्यास कसें ?— २-११-१४ स्थानांत शुभ शकल असल्यास लाभ होईल. ७-११ स्थानांतील शकलांच्या गुणण्यानें येणारे शकल यांतील असून १-४-७-१० अथवा २-५-८-११ या स्थानांत तकरार करील तर लाभ होईल. हें शकल येऊन ३-६-९-१२ या स्थानांत तकरार करील तर लाभ होणार नाहीं.

रीत २ री:— २-५ स्थानांत शुभ शकलें असून अथवा त्या स्थानांतील शकलांच्या गुणण्याने येणारे शकल यांतील असल्यास लाभ होईल. बाकीच्या शकलांनी हानिकारक असें जाणावें.

रीत ३ री:— २ ऱ्या स्थानांत यांतील असून ८ व्या स्थानांत यांतील शकल असेल तर, खरेदी केल्यास लाभ होईल. वरील शकलांच्या विरुद्ध असल्यास विक्री करणें लाभाचें होईल.

धातु व्यापारांत लाभ होईल काय ?— २-१० स्थानांतील शकलांच्या गुणण्याने येणारे शकल यांतील असल्यास खरेदी लाभाची. हें शकल येईल तर हानी. यांतील शकल येईल तर विक्री लाभाची. यांतील असेल तर विक्रीत हानी. या शकलाने विलंबानें लाभ. हें शकल येईल तर, लवकर विक्रीं करावी. यांतील आले तर लवकर खरेदी करावी. विक्री करूं नये. यांतील असेल तर हानी. ही रीत मृत पाषाणादि सुवर्णापर्यंत लागू आहे.

रीत २ री:—२-११ स्थानांतील शकलांच्या गुणण्यानें येणारे शकल यांतील असेल तर ताम्र धातूची विक्री केल्याने लाभ होईल.

रीत ३ रीः—२-११-१४ त हें शकल असून ७-११ स्थानांतील शकलांच्या गुणण्याने येणारें शकल यांतील असावें व १-४ ७-१० किंवा २-५-८-११ स्थानांत तकरार असल्यास विक्रींत बराच फायदा होईल. यांतील असून ३-६-९-१२ त तकरार असल्यास विक्री करणें हानीचें. एकमेकाविरुद्ध असतील तर, मध्यम फल जाणावें.

रीत ४ थीः— २-५ स्थानांतील शकलांच्या यांतील शकल येईल तर लाभ यांतील असेल तर हानी. हें असेल तर, विलंबानें लाभ. यांतील असेल तर किंचित् लाभ. यांतील असेल तर, लाभ झाले तरी हानी होईल.

परदेशांत विक्रीस पाठविल्यास कसें ?— १-११ स्थानांत यांतील शकलें असून बाकीच्या स्थानांत तकरार असेल तर, लाभ होईल. हीं असतील तर, लाभ होणार नाहीं. यांतील शकलें असल्यास स्वल्प लाभ. यांतील शकलें असल्यास राजापासून अगर चोरापासून हानी होईल.

जीव व्यापारांत लाभ होईल काय ?—१ ल्या स्थानांत यांतील शकल असल्यास खरेदी करणें लाभाचें. ६-१२ स्थानांत वरील शकलापैकीं एखादे शकल असल्यास विक्री करणें लाभाचे होईल.

रीत २ रीः— १-६ स्थानांतील शकलांच्या गुणण्यानें यणारें शकल यांतील असेल तर; अतिशय लाभ होईल. यांतील असेल तर खरेदी केलेली वस्तु लवकर विकेल. यांतील असेल तर मरतील यांतील असेल तर चोरीस जातील. या शकलानें रोगी होतील. बाकींच्या शकलांनीं खरेदी केली तरी व्यर्थ. ही रीत पिप्पिलिकादि हस्तिव्याघ्रेत्यादि जीवजंतुपर्यंत उपयोगांत आणावी.

मूल व्यापारात लाभ होईल काय ?— २-४ स्थानातील शकलांच्या गुणण्यानें येणारें शकल यांतील असेल तर, खरेदी केल्यानें होईल.

यांतील असेल तर. विक्री केल्यानें लाभ. हें असल्यास खरेदीं करावें, पुढें लाभ होईल. यांतील असेल तर, खरेदी अगर विक्री करू नये. ही रीत तृणापासून बृहत्काष्ठापर्यंत उपयोगांत आणावी.

धान्य व्यापारांत लाभ होईल काय ?— १-२-६-१० या स्थानांत यांतील शकलें असतील तर लाभ. यांतील असतील तर हानि, कुंडलींत साबीत आणि खारिज शकले बरीच असून अशुभ असतील तर हानिकारक असें जाणावें.

धन लाभार्थ हें कार्य केल्यास कसें ?— २-१४ या स्थानांतील शकलांच्या गुणण्यानें येणारे शकल ज्या स्थानीं तकरार करील त्या स्थानाच्या आधारे विशेष लाभ होईल. तें शकल कुंडलीत नसेल तर शकुन क्रमानें ज्या स्थानांचे असेल त्या योगें लाभ होईल परंतु १ ल्या स्थानीं शुभ शकल असून ११ व्या स्थानीं शुभ दाखील शकल असेल तर, तीव्र द्रव्यलाभ होईल. याच रीतीने २-४-६ या स्थानांत दाखील शकलें असली तरी त्या कार्यी द्रव्यलाभ होईल.

तो श्रीमंत आहे काय ?— २-४ या स्थानांत यांतील शकलें असून यांतील असतील तर, श्रीमंत, असून सुखी आहे. २-४ यांत हें असल्यास मध्यम स्थितींत आहे. २-४ यांत यांतील असल्यास मागील काळीं श्रीमंत होता. बाकीच्या शकलांनीं श्रीमंतीचा अभाव आहे.

रीत २ रीः— २-११-१३-१४ स्थानांत यांतील शकलें असल्यास श्रीमंत आहे. बाकीच्या शकलांनीं नाहीं असे जाणावें.

तो उदार आहे कीं काय ?— १-२ या स्थानांत यांतील शकलें असतील तर, दातृत्व गुणाचा यांतील असतील तर, कृपण. बाकीच्या शकलांनीं निष्फळ.

आह्मां दोघांत अधिक द्रव्य कोणाकडे आहे ?— २ ऱ्या स्थानांत यांतील असेल तर, १ ल्या जवळ आहे ३ अथवा ४ थ्या स्थानांत वरील शकलें असल्यास २ ऱ्या जवळ आहे. दोन्ही स्थानांत समान शकलें असल्यास दोघांजवळ समान द्रव्य आहे. २- ३ स्थानांत ही शकलें असल्यास दोघांजवळही थोडे द्रव्य आहे हीं शकलें असल्यास दोघाजवळ कांहींच नाही. हीं शकलें असल्यास अति थोडें द्रव्य आहे.

किती द्रव्य आहे ?— बि. ज. द. ह. क्रमानें जी जी शकलें असतील त्या संख्यांच्या गुणण्यानें संख्या सांगावी. तीं शकलें तकरार करतील तर त्या त्या शकलांच्या बि. ज. द. ह. क्रमानें एकमेकांस गुणून अथवा मागे तत्त्वानुसार बहुसंख्य क्रमाचीं रीत सांगितली आहे त्यावरून सांगावे.

रीत २ रीः– २–१४ स्थानांतील शकलें गुणून येणाऱ्या शकलाच्या संख्येवरून सागावें.

यांच्याशीं स्नेह ठेवला तर कसें ?— कुडलींतील सर्व बिंदु मोजून त्या संख्येस ४ नी भागावें शेष १ राहिल्यास वैरत्व, २ मित्रत्व, ३ कृत्रिम स्नेह आणि ० आल्यास अतर्यांमा कपट असल्यानें स्नेह करू नयें.

रीत २ रीः– २ ऱ्या स्थानांत साबीत असेल तर, स्नेह बरेंच दिवस राहील. दाखील असेल तर, प्रेम अधिक वाढेल. मनकलींब असेंल तर, संशयी स्नेह, खाराज असेल तर, स्नह राहणार नाहीं. वरील शकलें शुभ असल्यास अतरंग चांगला आणि अशुभ असल्यास अतरंग चांगलें नव्हे.

घ.लेलें द्रव्य ऋणको देईल कां ?— २ ऱ्या स्थानांत दाखील शकल असून ८ व्या स्थानांत खारीज असेल तर तीव्र देईल. तीं शुभ असल्यास कष्ट नसतां आणि अशुभ असल्यास कष्टानें देईल.

मी ऋणमुक्त होईन कां ?— १ ल्या स्थानांत हें असून २ ऱ्या स्थानांत हें शकल ८ व्या स्थानांत तकरार तर, लवकर मुक्त

होईल. २ऱ्या स्थानांत खारीज आणि ८ व्या स्थानांत कोणतेहीं शुभ शकल असेल तर, विलंबानें मुक्त होईल. १-२-३ या स्थानांत क्रमानें हीं शकलें असतील तर, ऋण न फिटतां अधिक वाढेल.

तेथील जेवण कसें आहे?—२ऱ्या स्थानांत दाखील किंवा खारीज असल्यास नानाप्रकारचें अन्न आहे, मुनकलीब असल्यास तीन प्रकारचें अन्न आहे. वरील शकलें शुभ असल्यास रुचिकर आणि अशुभ असल्यास रुचिहीन १ल्या भागांतील ३३ ते ४४ पानांतील कोष्टकें पाहून पडलेल्या शकलांवरून गहूं, हरभरे, दूध वगैरेचें वितरण करावें.

रीत २ रीः— २ऱ्या स्थानांत चंद्राचें शकल असेल तर, अति तिखट, खारट दूध आणि मत्स्यादि पदार्थ. गुरूचे शकल असल्यास तिखट थोडेसें अर्धे कच्चे असून बाकींची रुचिकर, सूर्याचें असल्यास घृतयुक्त मिष्ट पदार्थ असून भोजन समयीं अति भाषण होईल, बुधाचें असल्यास, आंबट, मधुर आणि मत्स्य मांस. मंगळाचें असल्यास, रुचिकर अन्न नसल्यानें जाऊं नये शनीचें असल्यास जावू नये, कलह होईल. शुक्राचे असेल तर, आंबट, तिखट, पोळी, मद्य-मांसादि अन्न आहे. राहू अगर केतूचें असेल तर, मध्यम प्रकारचें अन्न आहे, आणि वरील शकलें ज्या ज्या स्थानी तकरार करतील त्या स्थानासंबंधानें पदार्थ मागील कोष्टकांच्या आधारे जाणून त्या त्या पदार्थाचे मिश्रण करावे.

रीत ३ रीः— १ ल्या स्थानांत अग्नी तत्व प्रकट असेल तर, उष्ण पदार्थ असून रुचि तिखट आहे. वायुतत्व प्रकट असेल तर, उष्ण पदार्थ असून मधुर. जलतत्व प्रकट असल्यास, शीत पदार्थ असून खारट, पृथ्वीतत्व प्रकट असल्यास आंबट, कडु व पित्तकारक पदार्थ आहेत असे जाणावें.

पत्राचें उत्तर केव्हां येईल ?— २-५ स्थानांतील शकलांच्या गुणण्यानें यांतील शकल आल्यास, चांगल्या वार्तेचें उत्तर येईल. ते शकल १-२-३-४-५-९ या स्थानांत कोठेंही तकरार करील तर, पत्र मार्गात आहे. ५ व्यांत खारीज आणि २ ऱ्या दाखील असेल तर, तात्काल उत्तर येईल. या विरुद्ध असेल तर आळस्यानें. २-५ स्थानांतील शकलांच्या गुणण्यानें येणारें शकल १-२-३-४ या स्थानांत तकरार असेल तर, एका

दिवसात, ५-६-७-८ स्थानांत तकरार असल्यास, ७ दिवसांत, ९-१०-११-१२ स्थानांत तकरार असल्यास या महिन्यांत, आणि १३-१४-१५-१६ त तकरार असल्यास, आतांच पत्र येत नाहीं असें जाणावें.

कोणास पत्र लिहिल्यानें लाभ होइल?– २-४ स्थानांतील शकलांच्या गुणण्यानें यांतील शकल असेल तर, बापास लिहावें. २-१० च्या गुणण्यानें येणारे शकल वरील शकलांपैकीं आल्यास, आईस. २-३ च्या गुणण्यानें येणारे शकल वरील शकलांपैकीं आल्यास, पुत्रास, २-१५ च्या गुणण्यानें येणारे शकल वरील शकलांपैकीं असल्यास पाहिजे त्यास लिहावे. वर दाखविलेली शुभ दाखील हीं शकलें उत्तम, अशुभ दाखील हें आल्यास क्रमाने शुभ, शुभ मुनकलीब हीं मध्यम हीं अशुभ मुनकलीब, श्रम केले, तरी व्यर्थ हीं विलंबानें शुभ फल देणारी, हें कार्यास विघ्नकारक या शुभाशुभ खारीज शकलांपासून उत्तरच येणार नाहीं.

माझ्या मुलाचें नांव काय ठेवावें?–२च्या स्थानांत अथवा ५ व्या स्थानांत जें शकल असतें त्या शकलाच्या अक्षरावरून ठेवावें.

लाभाचा दिवस कोणता?– २-११ च्या गुणण्यानें शुभ शकल आल्यास तें शकल ज्या ग्रहाचे असेल त्या दिवशीं लाभ होईल. अशुभ असल्यास त्या दिवशीं हानि. अथवा २-११ स्थानांतील शकलांच्या ग्रहांवरून वार सांगितलें तरी चालतें; परंतु तेथें शुभ शकलें मात्र असलीं पाहिजेत.

ही वकिली पत्करल्यास कसें? २ ऱ्या स्थानांत यांतील शकल असून १० व्या स्थानांत यांतील शकल असावें.व १-४-७ अथवा २-५-११-१६ यांत तकरार असल्यास वकीलींत इच्छेप्रमाणें अवश्य जय मिळेल. या विरुद्ध असल्यास जय मिळणार नाहीं. एकमेंकांविरुद्ध शकलें असल्यास कांहीं अंशीं जय मिळेल.

रीत ३ रीः– २--१० स्थानांतील शकलें गुणून येणारें शकल यांतील असून १-४-७-१०-१६ यापैकीं कोणत्याही स्थानी तकरार असल्यास

अवश्य जय मिळेल. शुभ साबीत अगर मध्यम साबीत शकलें असल्यास विलंबानें जय मिळेल.

हा वकील कसा आहे ?— २ ऱ्या स्थानात   यांतील शकल असून त्या शकलावर   या शकलांपैकीं कोणत्याहीं एका शकलाची पूर्ण दृष्टी असल्यास वकील शहाणा, वक्ता व धैर्यवान आहे.   या दोन शकलांची दृष्टी असल्यास वकील शहाणा पण मुखदुर्बल आहे. ३-६-१२ या शकलांची पूर्ण दृष्टी असल्यास त्याच्या हातून काम होणार नाहीं. बाकीच्या शकलांनी मध्यम जाणावें.

३ ऱ्या स्थानापासून प्रश्न सांगणें.

सहोदराणां बंधूनां भगिन्यः स्वप्न विद्ययोः ।। समीप गमनस्या पिधात्रीशयनयोरपि ॥२८॥ देव कंपे धृतेश्चापि स्वधर्माचरणस्य च ।। देवालयादिकानां च सवाच्योसहजालय ॥२९॥

मला बंधु व बहिणी आहेत काय ?— हें शकल ३ ऱ्या स्थानांत असून शुभ स्थानांत अथवा दाखील स्थानांत तकरार केल्यास आहेत.


किती आहेत ?— ३ ऱ्या स्थानांतील शकल पुरुषसंज्ञक असून ते किती स्थानांत तकरार करते तितके भाऊ आहेत. ते स्त्रीसंज्ञक असून किती स्थानांत तकरार करते तितक्या बहिणी आहेत असे जाणावें.




रील २ रीः– कुंडलींतील प्रकट तत्वांची संख्या निरनिराळी मोजून एकीकडे मांडावी. तेज आणि वायु तत्वांच्या प्रकट बिंदूंची संख्या अधिक झाल्यास बंधु अधिक. आणि जल व पृथ्वी तत्वांच्या बिंदूंची संख्या अधिक झाल्यास बहिणी अधिक जाणावें.




भाऊ व बहिणी जिवंत आहेत काय ?— ३–५ या स्थानांत तेज व वायु तत्वांचें बिंदु प्रकट असतील तर जिवंत आहेत. पृथ्वी तत्वाचे प्रकट असतील तर मेले आहेत. अथवा ९ व्या स्थानांत तेज आजि तत्वाचे बिंदु प्रकट असल्यास जिवंत आहेत. पृथ्वी तत्वाचे प्रकट असल्यास मेलें आहेत.

मजवर त्यांचें प्रेम आहे काय ?– १–३ या स्थानांत शुभ शकलें असल्यास प्रेम आहे, अशुभ असल्यास प्रेम नाहीं.



रीत २ रीः– ३ ऱ्या स्थानांत दाखील असल्यास प्रेम आहे. ते शकल ३ ऱ्या अथवा कोणत्याही स्थानांत तकरार केल्यास आप्त इष्ट भाऊ बहिणींची प्रीति आहे. १ ल्या स्थानांत  हें अथवा ३ ऱ्या स्थानांत कोणतेही खारीज शकल असल्यास आप्त इष्ट कोणी नाहींत असें जाणावें. संशय आल्यास १-३ अथवा ३-४ स्थानांतील शकलें गुणून आलेल्या शकलावरून बलाबल आणून सांगावे.

त्यांच्यापासून सुख होईल काय ?– ३ ऱ्या स्थानांत  यांतील शकल असून शुभ स्थानांत तकरार केल्यास सुख होऊन लाभ होईल.

रीत २ रीः– ३ ऱ्या स्थानांत  यांतील शकल असल्यास बंधूंचें सुख अधिक, बहिणींचें सुख साधारण.  यांतील असल्यास बंधूंचे सुख मध्यम, प्रकृति वैर, बहिणीचें सुख श्रेष्ठ.  यांतील असेल तर, बंधूंचें सुख अर्ध आणि बहिणीचे सुख.  यांतील असेल तर, भाऊ बहिणींचें सुख सामान्य असें जाणावें.

ते गांवीं आहेत काय ?– ३ ऱ्या स्थानांत  यांतील असल्यास आनंदांत गांवी आहेत.  हें शकल असल्यास गांवांतच आहेत.  यांतील असल्यास गांवांत नसतां दुःखांत आहेत.  यांतील असल्यास गांवीं आहेत.

माझ्या भावाचा शेजार कसा आहे ?– ३ ऱ्या स्थानांपासून ३ रें ह्मणजे ५ व्या स्थानांत शुभ शकल असल्यास उत्तम. आणि अशुभ असल्यास हानिकारक शेजार आहे.

समीपच्या प्रवासांत फायदा होईल कां ?– १–३ स्थानांतील शकलांच्या गुणण्याने येणारें शकल  यांतील असून बलिष्ठ स्थानांत तकरार असल्यास लाभ होईल.  यांतील असल्यास हानि. बाकीच्या शकलांचें फल मध्यम असे जाणावे.

रीत २ रीः- ३-४-६-१०-११ या स्थानांत कोठेंहीं हें शकल असून या वरील स्थानांसमोरील स्थानीं शुभ शकल असल्यास प्रवासांत लाभ नाहीं. दूरच्या प्रवासांत लाभ होईल आणि अशुभ शकल असल्यास हानिदायक असें जाणावें.

रीत ३ रीः- हें शकल स्वस्थानीं असून याची तकरार नसल्यास लाभते ४ थ्या स्थानी असल्यास लाभ होऊन मित्राची भेट होईल. ६ व्यांत असल्यास, तीव्र प्रवास, ७ व्यांत असल्यास, प्रवासांत हानि होऊन वैरत्व वाढेल. ८ व्यांत चोरांचे भय. ९ व्यांत लाभ. १० व्यांत प्रवासांत राजाकडून लाभ. ११ व्यांत लाभ होऊन लवकर परत येईल. १२ व्यांत प्रवासच करू नये. १३ व्यांत प्रवास चांगला होईल. १४-१४-१५-१६ स्थानांत प्रवासांतून परतण्यास बरीच अवधी लागून लाभ मध्यम होईल.

या स्वप्नाचें फल काय?— ३ ऱ्या स्थानांतील शकलास या शकलानें गुणून येणारे शकल शुभ येईल तर उत्तम, मध्यम आलें तर मध्यम आणि अशुभ येईल तर, वाईट असे जाणावे.

रीत २ रीः- हें शकल २-३-५-६-७-८-९-११ या स्थानांत कोठेही असल्यास उत्तम. १-१० मध्यें असल्यास मध्यम. ४-६-८-१२ त कोठेंही असल्यास हानि.

रीत ३ रीः- ३ ऱ्या स्थानांत शुभ शकल असल्यास उत्तम. मध्यम असल्यास मध्यम. अशुभ असल्यास वाईट.

मला कोणत्या वर्षी यश आहे?— ३ ऱ्या स्थानांत यांतील असल्यास ३० वर्षानंतर. हें असल्यास २८ वर्षानंतर. उत्तरावस्थेंत. जन्मादारभ्य अंत्यकालपर्यंत स्वतःचे पराक्रमानें. यांतील असल्यास जन्मापासून सामान्य यश आणि यांतील असल्यास जन्मापासून अर्थ यश हें असल्यास १८ वर्षानंतर यश येईल.

क्षेत्राणां च गृहाणां च स्थितेश्चापि पितुस्तथा ॥ भूगतस्य कृषेश्चापि तथा जन्मपदस्य च ॥३०॥ वृक्षादीनांरोपणस्य मृतकस्यस्थळस्य च ॥ कार्याणां परिणामस्य प्रश्नोवाच्यः सुहृद्गृहात् ॥ ३१ ॥

माझा बाप सुखानें आहे काय ?— ४-३-१ या स्थानांत कोठेंही दाखील अथवा साबीत शकल असल्यास सुखानें आहे. आणि खारीज अथवा मुनकलीब शकल असल्यास दुःखांत आहे.


माझा बाप गावांत आहे काय ?— ४ थ्या स्थानांत खारीज अथवा मुनकलीब शकल असल्यास नाहीं. आणि दाखील अथवा साबीत शकल असल्यास आहे.







बापाचें प्रेम मजवर आहे काय ?— ४ थ्या स्थानांत शुभ शकल असल्यास आहे. आणि अशुभ असल्यास नाहीं.

रीत २ रीः— ४–५ या स्थानांतील शकलांच्या गुणण्यानें येणारे शकल दाखील अथवा साबीत असल्यास प्रेम आहे. खारीज अथवा मुनकलीब असल्यास नाहीं.

बाप मला मिळकत देईल कां ?— ४ थ्या स्थानांतील शकल ५–९ या स्थानांत तकरार केल्यास देईल. ७–१० या स्थानांत तकरार केल्यास मिळकत देणार नाहीं.

रीत ३ री.— ४ थ्या स्थानांत दाखील अथवा साबीत शकल असल्यास देईल. बाकींच्या शकलांनी देणार नाहीं.

हें घर घेतले तर कसें ?— ४–८ स्थानांतील शकलांच्या गुणण्यानें येणारें शकल  यांतील असल्यास चांगलें होईल. खारीज अथवा मुनकलीब असल्यास घेऊं नये. बाकींच्या शकलांनीं मध्यम.

रीत २ रीः— १-३-१० या स्थानांत  यांतील शकल असल्यास त्या जागेत वाळू फार असून पाणी नाही.  यांतील असल्यास, फलद्रूप वृक्षांनीं युक्त असून उत्तम आहे. ४ थ्या स्थानांत  यांतील असल्यास उत्तम.  यांतील असल्यास घरीं संततीची वाढ.   यांतील असल्यास तें घर वाईट, कधींच घेऊं नये. ४ थ्या स्थानांत

शुभ शकल असून १-७-१० त तकरार करील तर, त्या जागीं फळांचीं झाडें उत्तम येतील; कारण उत्तम. ३-६-९-१२ त तकरार केल्यास, त्या घराजवळ जुनी झाडे आहेत, तें मध्यम. २-५-११ त तकरार केल्यास, त्या घरी मंगल कार्ये होतील. ८ त तकरार केल्यास अशुभ.

तें घर मिळेल काय ?— ४ थ्या स्थानांत यांतील असल्यास मिळणार नाही. हे असल्यास दुःखकारक. ६-३ स्थानांत हें असल्यास वाईट असून मिळणार नाहीं.

रीत २ रीः- १-४-७-१० स्थानांत यांतील शकलें असल्यास घर मिळेल व ते स्थिर राहील. यांतील शकलें असल्यास वाईट आहे. मिळाले तरी स्थिर राहणार नाहीं. यांतील असल्यास ते घर पडेल. यांतील असल्यास वाईट नसले तरी स्थिर राहणार नाहीं.

हें घर बांधले तर कसें ?— ४-६-८ या स्थानांत शुभ शकलें असल्यास बांधावें. अशुभ शकलें असल्यास बांधू नये.

रीत २ रीः- ४ थ्या स्थानांत यांतील शकल असल्यास उत्तम. बाकींच्या शकलांनीं वाईट होइल; बांधू नये.

वास्तु करावें काय ?— ४ थ्या स्थानांत यांतील असल्यास हितकारक, यांतील असल्यास वाईट. १-४-७-१० स्थानांत दाखील शकल असल्यास प्रवेश केला तरी तेथें न राहतां परतेल. ३ ऱ्या स्थानांत यांतील असल्यास वास्तु करावें.

रीत २ रीः- ४ थ्या स्थानांत यांतील असल्यास दुसऱ्या लोकांस संगे घेऊन वास्तु प्रवेश करावा. बाकींच्या शकलांनी करू नये.

या घरीं राहिल्यास कसें ?— १-४-२-१० स्थानांतील शकलांच्या

गणाकारानें यणारे शकल शुभ असून, वरील स्थानांतच तकरार केल्यास घरी राहिल्यानें उत्तम फळ मिळल.

ही जमीन घतल्यास कसें ?– ३–४ स्थानांत दाखील अथवा साबोत शकले असल्यास लाभकारक ४ थ्या स्थानांत शुभ दाखील असल्यास त्यावर उपजोविका चालेल हें असल्यास महत् कष्टाने उपर्जीविका चालेल हीं असल्यास घेतली तरी परत विकली जाईल. हें असल्यास वाईट घेऊ नये. या शकलानें त्रिलवें उपजीविका चालेल. यांतील असल्यास त्यावर भारली उपर्जीविका चालणार नाहीं. यांतील असल्यास वाईट.

या जमिनींत झाडें लावल्यास कसें ?– १० व्या स्थानांत शुभ शकल असल्यास अमृतासारखीं फळें लागणारीं झाडें होतील अशुभ असल्यास नाही. १० व्या स्थानांतील शकल बलिष्ठ असून त्यावर शभ शकलाची दृष्टी असेल तर ती झाडें मजबूत व पुष्ट होत ल. निर्बली असल्यास वाळतील.

या जमीनींतील झाडें केव्हांची आहेत ?— १० व्यांत शुभ शकल असून १–४–७ मध्यें तकरार असल्यास नूतन झाडें आहेत २–५–८–११त तकरार असल्यास कांहीं दिवसापूर्वीची झाडें आहेत. आणि ३–६–९–१२ त तकरार केल्यास जुनी आहेत.

या जमीनींत गवत व पाणी आहे काय ?– ४ थ्या स्थानांत यांतील शकल असल्यास पाणी गवत आणि झाडें विपुल आहेत. असल्यास सुखदायक परंतु पाणी मध्यम. यांतील असल्यास पाणी आणि झाडें कमी. यांतील असल्यास निर्जल असून वाळू व काटे आहेत

रीत २ रीः– ७ व्या स्थानांत शुभ शकल असल्यास गवत, पाणी विपुल असून उत्तम. शुभ शकल शुभ स्थानांत तकरार केल्यास पाणी व गवत चांगलें

असून पाणी रोगहारकतेंचे व अन्न पाचकतेचे आहे. अशुभ शकल असून अशुभ स्थानांत तकरार केल्यास पाणी खारट असून त्यांत किडे आहेत व गवत रसहीन आहे.

या विहिरीस पाणी लागेल काय ?— ४ थ्या स्थानांत शुभ शकल आणि ६ व्या स्थानांत दाखील अथवा साबेत शकल शुभ असल्यास पाणी जवळ लागून गोड लागेल. अथवा १-४ स्थानांतील शकलांच्या गुणण्यानें ≡o oooo यांतील शकल असल्यास जवळ पाणी लागेल. olol ≡o =o ooo olo यांतील आल्यास पाणी लागलें तरी पुरणार नाहीं. बाकीच्या शकलांनी लागणार नाही.

रीत २ री:– ४–६ स्थानांत =o olo ≡ lol lol =oo olo ooo oooo यांतील शकलें असल्यास पाणी जवळ असून गोड आहे. olol ooo olo ol= ool= oo looo यांतील असल्यास बऱ्याच अंतरावर पाणी लागेल पण खारट.

कोणत्या दिशेस लागेल ?— ४–६ च्या गुणाकारानें येणारे शकल =o lolo oo= looo यांतील आल्यास पूर्वेस. ooo olo lol oo यांतील आल्यास पश्चिमेस. lol olol ooo oooo यांतील आल्यास उत्तरेस; आणि olo ≡ o= lo यांतील आल्यास दक्षिणेस लागेल.

हें शेत घेतल्यास कसें ?— ४ थ्या स्थानांत दाखील शकल असून १-२-३-९-७-१० या स्थानांत कोठेंही तकरार केल्यास उत्तम. त्या स्थानी lo हें शकल असेल तर, उत्तम आहे. पण बऱ्याच दिवसांनी फायदेशीर होईल. खारीज मुनकलीब शकलांनी चांगलें नव्हे.

रीत २ री:– ४ थ्या स्थानांत olo ≡ olo o= lol =o oo lo यांतील शकल असल्यास ते शेत उत्तम जाणावे olo oolo oooo यांपैकीं असल्यास मध्यम. =o lolo lo lo= olo यांपैकीं असल्यास वाईट.

पीक कसें होईल ?– १–३–१० या स्थानांत जलतत्वांचीं शकलें असल्यास पाणी विपुल असल्यानें उत्तम. तेजतत्वाची शकले असल्यास उन्हाच्या

तापानें पीक वाळेल. ४ थ्या स्थानांत शुक्र अथवा चंद्राचे शकल असल्यास गारा अगर विजेने पिकाची खराबी होईल यांतील असल्यास उत्तम पिकेल. या शकलानें उंदीर पुष्कळ होतील. या शकलांनीं किडे उत्पन्न होतील. या शकलानी साधारण पीक येईल.

त्याची भेट होईल काय ?- ४ थ्या स्थानांत शुभ शकल असेल तरहोईल. अशुभ असल्यास होणार नाहीं. बुधाचे शकल असल्यास गांवास जाणार आहे. कारण लवकर भटावें. १०-१३ त शुभ दाखील शकलें असल्यास गेल्याबरोबर भटेल शुभ खारीज शकल असल्यास बाहेर जाण्यास तयार झाला आहे भेट होणार नाही. बाकींच्या शकलांनीं भेटणार नाहीं.

या गांवांत फायदा होईल काय ?- ४ थ्या स्थानांत शुभ शकल असेलतर फायदा होईल. मध्यम अगर अशुभ असल्यास त्याप्रमाणें फायदा होईल.

रीत २ रीः- हें शकल शुभ स्थानांत असेल तर लाभ. अशुभ स्थानांत असेल तर हानि. १-३-५-९-१०-१३-१६ या स्थानांत कोठेंहीं शुभ शकल असल्यास लाभ कारक. २-४-१४-१५ त असल्यास अखेर हानी. हें कुडलींत असेल तर, ४-११ स्थानांतील शकलांच्या गुणाकारानें येणारे शकल शुभ असल्यास फायदा. अशुभ असल्यास नाहीं.

रीत ३ रीः- ४-७-१० यांत कोठेंही हें शकल असल्यास लाभ होईल व आदर सत्कार बराच होईल; परंतु १-२-४-१५-१६ या स्थानांत कोठें तरी शुभ शकल असलें पाहिजे. अथवा त्या स्थानांत हीं शकलें असलीं तरी उत्तम. बाकींची शकलें वाईट.

हा नोकर कसा आहे ?- ४ थ्या स्थानांतील शकल ७ व्या स्थानांत तकरार केल्यास बेभरंवशाचा. ९ व्यांत तकरार केल्यास विश्वासुक. ६-८-१२-१३-१५ या स्थानांत कोठेंही तकरार केल्यास घातकी. ५-१०-११-१४-१६ त कोठेही तकरार केल्यास चांगला आहे.

रीत २ रीः- २-६ स्थानांतील शकलांच्या गुणण्यानें ◌ ◌ ◌ ◌ यांतील शकल आल्यास त्यास पाहिजें तीं नोकरीं दिली तरी करील व संपत्ती वाढवील. ◌ ◌ यांतील असल्यास उत्तम पण पळून जाईल. ५ व्या स्थानांत ◌ हें शकल असल्यास दगाबाज, ◌ हें असल्यास पळून गेला तरी परत येईल. बाकींच्या शकलाचे फळ सामान्य.

गांवास पोहोंचलें असतील काय ?- ४ थ्या स्थानांत शुभ दाखील असल्यास पोंचले. साबीत शकल शुभ असो अशुभ असो विलंबाने पोंचतील. खारीज शकल शुभ असो अथवा अशुभ असो अद्याप पोचले नाहींत. मुनकलीब शकल शुभ अगर अशुभ असो पोंहोंचणें संशयाचें जाणावे.

मीं दुसरें लग्न केल्यास कसें ?- १-४ स्थानांतील शकलांच्या गुणण्यानें शुभ शकल असून बलिष्ठ असल्यास दुसरे लग्न करूं नये. १-१० या स्थानांतील शकलांच्या गुणाकारानें येणारें शकल शुभ असून बलिष्ठ असल्यास २ रे लग्न करणें उत्तम. कदाचित् दोन्हीं शकलें शुभ व बलिष्ठ असतील तर शकुनक्रमानें जें पहिले शकल असेल तेच उत्तम. ही रीत फक्त स्त्रीयांच्या प्रश्नासाठींच आहे.

बापाचें सुख किती वर्षें पर्यंत ?- ४ थ्या स्थानांत ◌ हें असल्यास ३३ वर्षें ३ महिने, ◌ हें असल्यास १४ महिने. ◌ हें असल्यास १६ वर्षें ३ महिने. ◌ २७ वर्षें ७ महिने, ◌ ३ वर्षें ३ महिने, ◌ असल्यास ४१ वर्षेंपर्यंत, ◌ जन्मापासून मरेपर्यंत, ◌ २१ अथवा २६ वर्षेंपर्यंत, ◌ १४ अथवा २२ वर्षेंपर्यंत, ◌ २८ अथवा ३८ वर्षेंपर्यंत, ◌ ३४ अथवा ४४ वर्षेंपर्यंत, ◌ २१ अथवा ३५ वर्षेंपर्यंत ◌ २१ वर्षें, ◌ ४६ अथवा ४८ वर्षें; ◌ ३ महिने ◌ हें शकल असल्यास जन्मापासून सुख नाहीं. या रीतींत कांहीं संशय आल्यास दि. ज. द. तु. क्रमानें हिशेब करून दिवस महिने व वर्षांचा निश्चय करावा.

यात्रा किती योजनांची घडेल ?- ४-१४ स्थानांतील शकलांच्या गुणण्यानें ◌ हें शकल आल्यास २१ ते ५७ योजनेंपर्यंत ◌ हें आल्यास २१ ते ४३ पर्यंत;

१० ते १२, १२ ते ८६, १२ ते ८२, २८ ते ८६, १२ ते ८४, १३ ते ८१, १३ ते ६६, २० ते ४४, ८ ते ४२, २० ते ८३, १२ ते ८२, ५ ते ८३ आणि हें शकल असल्यास १८ ते ८४ योजनांची यात्रा घडल. याप्रमाणें यात्रा व महायात्रेचा विचार सांगावा. तकरार असल्यास बि. ज. द. ह. क्रमानें दाखीलच्या योगें मिळवणीनें अगर खारीजच्या योगें उणें करून सांगावें.

माझा अंतकाल कसा आहे ?—१-४-६-८ स्थानांतील शकलांच्या गुणण्यानें येणारे शकल शुभ खारीज असेल तर मरण वेळा जवळ आलो परंतु कष्ट न होता मरेल. अशुभ खारीज असल्यास उंच जागेवरून पडून मरेल. शुभ दाखील असल्यास दुःख कांहींच न होतां मरेल. अशुभ दाखील असेल तर दुःखानें मरेल. शुभ मुनकलीब असेल तर, रोगाने मरेल. अशुभ मुनकलीब असेल तर फारच कष्टानें मरेल. शुभ साबीत असेल तर, क्षयानें मरेल आणि अशुभ साबीत असेल तर प्राणांत कष्ट असें जाणावें.

पुरलेलें धन असेल काय ?—४ थ्या स्थानांत दाखील अथवा साबीत शकल असल्यास आहे. खारीज अगर मुनकलीब शकल असेल तर नाहीं.

भूधन मला मिळेल काय ?— ४-१०-२ स्थानांतील शकलांच्या गुणाकारानें येणारे शकल शुभ दाखील असेल तर, लवकर मिळेल. साबीत खारीज आणि मुनकलीब असेल तर, मिळणार नाही.

या स्थळीं भूधन आहे काय ?— ४ थ्या स्थानांत दाखील अगर साबीत शकल असेल तर आहे. खारीज अथवा मुनकलीब शकल असेल तर नाहीं.

रीत २ री:— ४-६ स्थानांतील शकलांच्या गुणण्यानें येणारे शकल दाखील अथवा साबीत असेल तर आहे. मुनकलीब असल्यास थोडें आहे आणि खारीज असल्यास नाही असें जाणावें.

रीत ३ री:— ४-६ स्थानांत दाखील अथवा साबीत शकलें शुभ असल्यास द्रव्य पुष्कळ आहे. अशुभ असल्यास कमी आहे.

रीत ४ थीः– १-४-२-५ स्थानांतील शकलांच्या गुणाकारानें येणारें शकल दाखील असल्यास आहे; खारीज असल्यास नाहीं.

रीत ५ वीः– ४ थ्या स्थानांत यांतील शकल असून १० व्या स्थानांत तकरार असल्यास श्रीमंतांचें द्रव्य आहे.

रीत ६ वीः– २-३-४-५-१० स्थानांत कोठेंही यांतील शकलें असल्यास अति धन आहे. हें असल्यास धन नाही.


रीत ७ वीः– २ ऱ्या स्थानांत यांतील शकल असल्यास आहे. कुंडलीतील १६ हीं स्थानांत कोठेंही हें शकल नसल्यास तें द्रव्य काढण्यास अशक्य आहे असें जाणावें.

भूधन समीप आहे कीं कसें?— ४–१ स्थानांतील शकलें गुणून येणारे शकल चंद्राचे असेल तर, समीप आहे. बाकीच्या ग्रहांनीं दूर आहे

कोणत्या दिशस आहे?— २–४–१–१० स्थानांत कोठेंही तेज शकलें असल्यास पूर्वेस. वायुतत्वाचीं शकलें असल्यास पश्चिमेस. जलतत्वाची असल्यास उत्तरेस. आणि पृथ्वीतत्वाचीं असल्यास दक्षिणेस आहे.

रीत २ रीः– ४ थ्या स्थानांतील अथवा १५ व्या स्थानांतील शकलांची दिशा पाहून सांगावे.

जागेचे निर्णयः— भूधन जवळ अगर दूर आहे असें ठरविल्यानंतर ते स्थळ



बाजूस दाखविलेल्या नकाशाप्रमाणें चतुष्कोनाकृती मापून त्या स्थळाच्या दिशा मांडून त्या चतुष्कोनाकृतीत फांसे टाकून कुंडली तयार करून त्या कुंडलीच्या १५ व्या स्थानांत जें शकल असेल त्याची दिशा ओळखून त्या चतुष्कोनामध्ये दाखविलेल्या आकृतीप्रमाणें मध्यभागी लांब व आडवी अशा दोन रेखा मांडाव्या ह्मणजे त्याचे चार भाग होतात. त्या चार भागापैकी कोणत्या भागांत अगर दिशेंत ते शकल बसते, त्या भागाचा पुनः विभाग


पाडण्याकरितां फांसे टाकून तयार करावी व १५ व्या स्थानीं जें शकल असेल त्याची दिशा समजून त्या विभागाची दिशा ठरवावी. याप्रमाणें पुनः पुनः भाग पाडीत एक वीतभर जागा उरेल असें झाल्यावर त्या स्थानीं खोदण्यास आरंभ करावें. मागील आकृती लक्ष्यपूर्वक पाहावी.

उदाहरणार्थः— मागील आकृतीत दिशा ठरविण्याकरितां तीन वार फांसे टाकिले व अखरीस अग्नेय दिशा ठरल्याकारणानें त्या आग्नेय दिशेच्या चतुष्कोनामध्यें एक बिंदू दिला, त्या स्थळीं द्रव्य आहे असें ठरवावें.

किती खोलवर आहे?— कुडलींतील १६ हीं शकलांतील वरील भागीं तेजतत्व आहे. त्या भागातील शून्यें व रेखा घऊन रेखेस दोन शून्यें धरून रेखा शून्यांची बरीज करून त्या संख्येस १६ नीं भागून जो अंक शेष राहील त्या अंकास अनुसरून कुंडलीच्या प्रथम स्थानापासून तो अंक सरेपर्यंत एक दोन असें मोजावें. ज्या स्थानावर शेषांक पूर्ण होईल, तेथील शकलेवरून खालील कोष्टकाच्या आधारे लांबीची संख्या घ्यावी. वरील रीतीप्रमाणें वायु विभागातील शून्यें व रेखा घऊन मिळवून १६ नीं भागावे. राहिलेल्या अंकास अनुसरून कुडलीत १-२ असें मोजून ज्या स्थानीं शेषांक संपेल तेथील शकलावरून खालील कोष्टकांतील रुंदीची संख्या घ्यावीं, आणि जल विभागांतील शून्यें व रेखांचा वरील रीतीप्रमाणें मिळवणी करून १६ नीं भागून शेषांकास अनुसरून मोजावे व त्या स्थानांतील शकलावरून खालील कोष्टकांत पाहून खोली ठरवावी. या रीतीनें पाण्याची जागाही शोधितां येते.

शकुन क्रमानें लांबी रुंदीचें कोष्टक.

शकलें.	lllo	olol	lolo	llll	oloo	ollo	olll	llol	loll	lloo	ooll	looo	oolo	oool	lool	oooo
लांबी हात	२	२४	१८	२४	२८	५०	१४	४	१२	१०	१०	२२	१८	१०	८	१०
रुंदी हात	१४	१४	१८	१२	१४	२८	४	६	१२	२२	६	२६	१०	१६	२	८
खोली हात	४	२	२	२	४	२	२	२	२	२	२	१८	४	२	२	४



उदाहरणः- बाजूच्या कुंडलीतील १६ ही स्थानांतील प्रत्येक शकलाच्या तेज विभागांतील शून्यें ९ आणि रेखा ७ झाल्या. शून्यें कायम ठेविली व रेखेंत दोन शून्ये स्थित आहेत ती वरील रीतींत सांगितल्याप्रमाणें दुप्पट केली ती १४ व शून्यें ९ मिळून २३ संख्या झाली, त्या संख्येस १६ चा भाग दिला ७ बाकी राहिलें. तों सातवा अंक कुंडलीच्या ७ व्या स्थानीं स्थिरावला. त्या स्थानीं हें शकल लांबीचें आहे तें वरील कोष्टकांत लांबी हात सदरापुढें या शकलाखालीं पहातां २२ हात लांबीची संख्या आहे ती कायम करावी.

वायु विभागाचे बिंदु ७ आणि त्या विभागांतील रेखा ९ याचे दुप्पट १८. वरील ७ अठरांत मिळविल्यानें २५ संख्या झाली. त्या संख्येस १६ नो भागिता ९ बाकी राहिले. कुडलींत तो अंक ९ व्या स्थानीं स्थिरावतो. तेथील हें शकल कोष्टकांत पहातां त्या शकला खालीं रुंदी हाताच्या सदरापुढील भागी १४ हात रुंदीचीं संख्या आहे तीं कायम करावी.

जल विभागाचे बिंदु १० व त्या विभागांतील रेखा ६ याचे दुप्पट करितां १२ झालें. १० व १२ ची मिळवणीं २२ झाली. रीतीत सांगितल्याप्रमाणें १६ नीं भागितां ६ शेष राहिलें. कुंडलीतील ६ व्या स्थानीं हें शकल आहे; कारण मागील कोष्टकांत त्या शकलाखाली खोली हात सदरासमोर पहातां २ हात खोलीचा अंक आहे, ती संख्या कायम धरावी. यावरून पाहतां २२हात लांब १४ हात रुंद २ हात खोलीच्या जागेत द्रव्य आहे असें सिद्ध करावे व यांत लांबी रुंदीची जागा फारच विस्तीर्ण ठरल्याकरणाने जाग्याचा माप घेऊन निश्चित ठरयिण्याची जी आकृती दाखविली आहे तीवरून फांसे टाकीत जाग्याचा शोध करावें. याच रीतीनें जी संख्या होते ती पुढील कोष्टकावरून शेषांकाचें शकल आडव्या क्रमाने व शेषांक उभ्या रीतीनें घेंऊन त्या अंकावरून लांबी रुंदी व खोलीचा विचार करावा. पुढच्या पेजवरील कोष्टक पहा.




बि. ज. द. ह. क्रमानें लांबी रुंदीचें कोष्टक.


स्थानांक	0100	1110	0001	1011	0000	1010	1101	0111	1100	0110	1001	0011	1000	0010	0101	1111
१	१	५	१	११	२	३	१	११	४	१५	६	७	८	९	१०	११
२	३१	१२	१६	३०	११	९	१२	११	११	१२	७	१२	१३	१३	१४	१५
३	१२	२	३	१२	४	५	९	६	३	७	८	९	१०	११	२३	१३
४	११	९	२८	१०	१५	१२	३	१	७	९	१३	२	१०	१२	१३	१४
५	९	१३	१	३	२	:	५	१८	७	९	३	९	१०	११	१२	१३
६	७	२८	१४	७	१४	१५	१८	७	९	१०	११	१४	३	३०	२०	८
७	१	७	३०	७	४	३	५	४	१७	५	७	६	७	८	४	९
८	२७	११	४	१८	२८	१	४	८	९	११	१६	१३	५	४	५	७
९	२	१	३	१२	१८	५	११	१६	१२	५	६	७	५	११	१२	९
१०	२	२८	२८	१२	१०	१७	१३	४	१४	७	७	९	९	७	८	१०
११	७	९	५	९	१	९	१६	६	१०	१८	१२	१३	८	४	४	१७
१२	१५	१	१२	२०	१२	१२	१३	१४	१५	५	१९	१६	७	१८	११	१०
१३	२	३	४	७	५	१२	१५	६	७	१८	७	८	८	९	८	१०
१४	१४	४	३	११	२	११	२२	१६	९	९	५	१८	१२	५	६	११
१५	१२	६	७	५	४	८	१०	७	९	१०	१९	१९	५	९	६	९
१६	१	२	३	४	५	६	७	८	९	१०	११	१२	१३	१४	१५	१६


५ व्या स्थानापासून प्रश्न सांगणें.

पुत्राणां च मुदोद्भूत प्रेषितस्यागमस्य च ॥ स्नेहस्य क्षेमपत्रस्यो दतस्य वासस्तथा ॥ ३२ ॥ मांगल्यस्य प्रसन्नस्य धौंति कौतुकयोस्तथा ॥ शुभाऽशुभं च गर्भस्य शिल्पस्य सुहृदस्तथा ॥ ३३ ॥ बुद्धेःशुभाशुभ वापि पितृवित्तस्य चापियत् वस्तुनोन्मादकस्यापि प्रश्नोवाच्यः सुतालयात् ॥ ३४ ॥

इला ऋतु प्राप्त होईल काय ?— कुंडलीतील १५ व्या स्थानांतील फक्त रेखा मोजून येणाऱ्या संख्येस २ नी भागावे. १ शेष राहील तर लवकर प्राप्त होईल. ० राहिल्यास विलंबानें अथवा औषध नें होईल.

कोणत्या वस्त्रावर ऋतु प्राप्त होईल?—५व्या स्थानांत  यांतील शकल असेल तर आपोआप उत्तम वस्त्र वर; याचें फळ उत्तम.  हे असल्यास एक दोन वार धुतलेल्या उंची वस्त्रावर येईल उत्तम  यांतील असल्यास अति जीर्ण व वाईट अशा कपड्यावर याचें फळ वाईट.  यांतील असल्यास मिश्र वर्णाच्या चांगल्या कपड्यावर, याचे फळही चांगले. आणि  यांतील असल्यास मिश्र वर्णाच्या नव्या कपड्यावर याचें फळहीं चांगले.

मला मुलें होतील कां ?— ५ व्या स्थानांत  यांतील शकल असल्यास होतील. बाकींचीं शकलें संशयाची.

रीत २ रीः—१-५-६-७ स्थानांतील शकलांतील गुणण्यानें येणारे शकल शुभ दाखील होईल तर होतील.  यांतील शकल येईल तर कांहीं दिवसांनीं होतील.  यांतील शकल येईल तर गर्भपात होईल. बाकीच्या शकलांनी होणार नाहीं.

रीत ३ रीः— ५-१-११-१४-१५ या स्थानांत दाखील अथवा मुनकलीब शकलें असल्यास होतील.

रीत ४ थी:– १-७-२ स्थानांतील शकलांच्या गुणण्यानें येणारे शकल यांतील शकल आल्यास होतील. बाकीच्या शकलांनीं होण्याचा संशय आहे.

रीत ५ वी:– ५ व्या स्थानांत शुभ शकल असून १-१०-११-१४-१५ त कोठेंही तक्रार असल्यास होतील.

रीत ६ वी.– १६ ही स्थानांतील बिंदू व रेखांची संख्या करून त्या संख्येस ३ नीं भागावें १ शेषांक आल्यास कन्यास कन्या. २ आल्यास, पुत्र आणि ० आल्यास होणार नाहींत अथवा झालीं तर मरण पावतील.

कोणत्या वर्षी व किती होतील ?— १-७ स्थानांतील शकलांच्या गुणण्यानें येणारे शकल सूर्याचे असेल तर ४; चंद्राचे असल्यास ५ पेक्षां अधिक मंगळाचे असेल तर ४; बुधाचे असेल तर दोन; गुरूचें असेल तर ३; शुक्राचे असेल तर ६पेक्षां अधिक ; शनीचें असेल तर १ आणि राहू केतूचें असेल तर गर्भपात होईल.

रीत २ री:–५ व्या स्थानांत हें शकल असेल तर, ४० वर्षांनंतर १ मूल होईल. हें असल्यास मध्यमावस्थेंत 'प्रथम कन्या' उत्पत्ती १३ चिरंजीव ७ हें असल्यास दोष असल्यामुळें संतती होणार नाहीं कारण दुसरी बायको करावी म्हणजे संततीसुख मिळेल. हें असल्यास प्रथम गर्भपात.उत्पत्ती ३. चिरंजीव ३ हें असल्यास स्त्रियेस बाधा असल्यानें कन्या जन्म. तरी उत्तरावस्थेंत सुख मिळेल. यांतील असल्यास संतानसुख नाहीं, हें असल्यास दोष आहे. प्रथम गर्भपात झाल्यावर ८ उत्पत्ती पण १ चिरंजीव हें असल्यास कन्या सुख विशेष पुत्र सुख नाहीं. हें असल्यास उत्पत्ती ११ चिरंजीव ४ मध्यमावस्थेंत सुख. हें असल्यास मुलें होऊन मरतील परंतु १ पुत्र चिरंजीव. हें असल्यास बाधा आहे कारण मुले होऊन मरतील. तरी एक वार भरंवसा. हें असल्यास वंध्या दोष आहे कारण पुत्र सुख नाहीं. हें असल्यास प्रथम कन्या जन्म अथवा गर्भपात उत्पत्ती ९ चिरंजीव उत्तरावस्थेंत. हें शकल असल्यास उत्तरावस्थेंत

संतान सुख आणि (०, ०, ०, ०) हें शकल असल्यास बहुकन्या सुख. संख्येंसंबंधानें संशय वाटल्यास अ. ब. द. ह. पंक्तीवरून संख्येचा निर्णय करावा.

रीत ३ रीः– ५–६–११ स्थानांत असलेल्या शकलांतील रेखा सोडून फक्त शून्यांचीच संख्या करावी. तींत तेज आणि वायूची जितकी शून्यें असतील तितकीं मुलें आणि जल व पृथ्वीचीं जितकीं शून्यें असतील तितक्या मुली असे जाणावें.


रीत ४ थीः– ५–७ स्थानांतील शकलांच्या गुणाकारानें येणारे शकल तेज अथवा वायु तत्वाचें असून त्यांतील शून्यें व रेखा द्विगुणित करून जीं शून्यें होतील ती पूर्वीच्या शून्यांत मिळविल्यानें जी संख्या होईल तितके पुत्र होतील व जल अथवा पृथ्वीतत्वाचें तें शकल असेल तर, त्यांतील शून्यांची व रेखांची संख्या केल्यानें जितके अंक होतील तितक्या मुली होतील असें जाणावें.

कोणत्या उपायानें मुलें होतील ?– ५ व्या स्थानांतील शकल ९ व्या स्थानीं तकरार करील तर, ईशास्तवन केल्यानें. १० व्या स्थानीं तकरार करील तर, औषधोपायाने. ७ व्या स्थानी तकरार करील तर साधुसंतांच्या सेवनाने होतील असें जाणावें.

माझी बायको गरोदर होईल कां ?– १-१५ स्थानांतील फक्त शून्यांची जीं संख्या होतें त्या संख्येस २ नो भागावे. शेष १ राहिल्यास गरोदर होईल. ० राहिल्यास गर्भधारणाचा संशय आहे.

हल्लीं ती गरोदर आहे काय ?– ५-७ स्थानांतील शकलांच्या गुणण्यानें येणारे शकल दाखील अगर साबीत झाल्यास आहे. खारीज अथवा मुनकलीब झाल्यास नाही असें जाणावें. अथवा १-६ स्थानांतील शकलांच्या गुणण्यानेंही येणाऱ्या शकलावरून वरीलप्रमाणें फळ सांगावें.






रीत २ रीः– १-५ स्थानांत (०, —, ०, —) (—, —, —, ०) (—, ०, —, —) (०, ०, ०, —) (—, ०, ०, —) (०, ०, ०, ०) यांतील असल्यास गर्भवती आहे. (०, —, —, —) (—, —, —, —) (०, ०, —, —) यांतील असल्यास नाहीं, बाकींच्या शकलांनीं संशय आहे असें जाणावें.

रीत ३ रीः– १-५-६ या स्थानांत कोठेंही  यांतील शकल असल्यास आहे.  यांतील असल्यास संशय.


रीत ४ थीः– कुंडलीच्या सर्व स्थानांतील रेखा मोजून द्विगुणित करावे व सर्व स्थानांतील शून्यें मोजून वरील संख्येंत मिळवावे. त्या मिळविलेल्या संख्येस २ नीं भागावें. १ शेष राहिल्यास गर्भ आहे. ० राहिल्यास नाहीं.

रीत ५ वीः– १-७स्थानांतील शकलांच्या गुणाण्याने दाखील अथवा साबीत शकल असल्यास आहे. खारीज अथवा मुनकलीब आल्यास नाहीं.

गर्भ किती महिन्यांचा आहे ?– १-५-६-७ स्थानांतील शकलांच्या गुणण्यानें येणारे शकल रवींचे असल्यास १ महिना, शुक्राचे असल्यास २ महिने, बुधाचे असल्यास ३ महिने, चंद्राचे असल्यास ४ महिने, शनीचें असल्यास ५ महिने, गुरूचें असल्यास ६ महिने, मंगळाचें असल्यास ७ महिनें, राहूचें असल्यास ८ महिने आणि केतूचें असल्यास ९ महिने असे जाणावे.

सुखरूप बाळंत होईल काय ?– १-६ स्थानांत  यांतील शकलें असल्यास सुखाने.  यांतील असल्यास अति कष्टानें.  यांतील असल्यास कष्टानें.  यांतील असल्यास मरणांत कष्ट  यांतील असल्यास निर्फळ असें सांगावे.

रीत २ रीः– दुसऱ्या स्थानांतील शकल १-१० स्थानांत तकरार करील तर, तीव्र बाळंत होईल. ७ व्यांत तकरार करील तर, विलंबानें. ७-४ स्थानांतील शकलांच्या गुणण्यानें येणारे शकल २-५-८-११ त तकरार केल्यास अति विलंबानें बाळंत होईल.

मूल जिवंत उपजेल काय ?—११ स्थानांत  यांतील शकल असल्यास जिवंत उपजण्याचा बराच संशय आहे. बाकीच्या शकलांनीं जिवंत उपजेल.

रीत २ रीः– १२ व्या स्थानांत शुभ शकल असल्यास जिवंत उपजेल अशुभ असल्यास जिवंत उपजणार नाहीं

कोणत्या दिवशीं बाळंत होईल ?— १ ल्या स्थानांतील शकलावरून वार जाणावें. तें शकल दिवाबली असल्यास दिवसा आणि रात्रीबली असल्यास रात्री बाळंत होईल असे जाणावे.

रीत २ री:- वरील शकल पुरुष संज्ञक असेल तर दिवसा, रात्री संज्ञक असेल तर रात्री बाळंत होईल. काहीं रमलज्ञ ५ व्या स्थानांतील शकलावरूनही वरीलप्रमाणें फळ सांगतात.

किती वाजतां होईल ?—  हें शकल ज्या स्थानीं कुंडलींत असेल त्या स्थान संख्येच्या आधारें तास सांगणें. अथवा रमल जिव्हेच्या आधाराने कालनिर्णय करावा.




रीत २ री:- १ ल्या स्थानीं असलेलें शकल ज्या स्थानांत तकरार करील तेवढे तास. १ ल्या स्थानातील शकल कोठेंही तकरार न करील तर ५ व्या स्थानांतील शकलावरून तासांचा निर्णय करावा. हे तास निर्णय १२ व्या स्थानापुढें पाहूं नये. पुढील स्थानें साक्षीच्या कामीं उपयोगांत आणावी.

मुलाचा जन्म कोणत्या राशीवर होईल ?- ९ व्या स्थानांतील शकलाच्या राशीवरून जाणावें.

मुलगा होईल कीं मुलगी ?- १-७-५- स्थानांतील शकलांच्या गुणाकारानें येणारे शकल पुरुष संज्ञक असेल तर मुलगी. १-७-५ स्थानांतील शकलें नपुंसक संज्ञक असून कुंडलींत पृथ्वीतत्वाचीं शकलें तकरार करतील तर नपुंसक होईल.

रीत २ री:- स्थानांतील शकलांच्या गुणाकारानें येणारे शकल पुरुष संज्ञक असेल तर मुलगा, स्त्रीसंज्ञक असेल तर मुलगी असें जाणावें.

रीत ३ री:- ५ व्या स्थानांत अग्नी अथवा वायुतत्वाचें शकल असेल तर मुलगा. जल अगर पृथ्वीतत्वाचें असेल तर मुलगीं होईल.

रीत ४ थी:- ९-७-५-११ स्थानांतील शकलांच्या गुणाकारानें   यांतील शकल येईल तर मुलगा  यांतील शकल आले तर

मुलगी. यांतील असून पुष्कळ स्थानांत तकरार असेल तर, उपजलेल्या मुलास भय; अगर जुळें होईल. हें शकल असून पुष्कळ ठिकाणीं तकरार असेल तर, नपुंसक होईल.

रीत ५ वी:–कुंडलींत दाखील शकलें पुष्कळ असल्यास मुलगा आणि खारीज शकलें पुष्कळ असतील तर मुलगी होईल.

उपजलेंल्या मुलाची स्थिती कशी आहे ?– १–५ स्थानांत यांतील शकलें असल्यास कांहींशीं व्यंग प्रकृती आहे. हें शकल असून ६-७-८ या स्थानांत तकरार असेल तर नपुंसक. यांतील असेल तर सुदृढ आहे.

हें मूल जारज कीं कसें ?– ५ व्या स्थानांत मंगळाचें शकल असून १-३-८-१०-११-१२ या स्थानांत कोठेंही तकरार असेल तर जारज. त्याच स्थानांत कोठेंही तकरार असेल तर पितृजार संमिश्रज. बाकींच्या शकलांनीं शुद्ध बीजोत्पन्न जाणावे.

रीत २ री:– १-२-३-४ या चारी स्थानांतील तेज विभागांतील रेखा आणि बिंदु जसें असतील तसें घेऊन एक शकल तयार करावें. तसेंच ५-६-७-८ स्थानांतील तेज विभागांतील रेखा व बिंदु घेऊन एक शकल तयार करावें. ती दोन्हीं शकलें १ ल्या भागांत शकलांची जी गुणवर्णनांची व्याख्या दिली आहे या सव गुणांपैकीं कोणत्याहीं एका गुणानें दोन्हीं शकलें समान होतील तर शुद्ध जात त्या सर्व गुणांपैकीं एका गुणाचा मेळ न पडेल तर नव्हें.

रीत ३ री:– १-४-५-७-१० स्थानांत शुभ शकलें असतील तर शुद्ध जात अशुभ असतील तर जारज. शुभाऽशुभ असतील तर बला–बलावरून सांगावें.

या मुलाचें आयुष्य कसें आहे ?–५ व्या स्थानांत शुभ शकल असून १-११त तकरार असेल तर चिरायुषी, ६–८–१२ त असेल तर अल्पायुषी.

रीत २ री:– यांपैकीं शकल ५ व्या स्थानांत असून १-४-७-

१०-१५ स्थानांत तकरार असेल तर दीर्घायुषी, यांतील असून वरील स्थानांत तकरार असल्यास मध्यमायुषी. बाकीच्या शकलांनीं अल्पायुषी असें जाणावें.

रीत ३ रीः— १-५-९-११ तील शकलांच्या गुणाकारानें यांतील शकल येऊन ५-८-११-१५स्थानांत तकरार असेल तर मध्यमायुषी. यांतील शकल असेल तर अल्पायुषी.






रीत ४ थीः— १ ल्या स्थानापासून १२ व्या स्थानापर्यंत एक वेळा पहलेली शकलें पुनः पुनः तकरार करतील व जी तकरारींचीं स्थानें असतील त्या त्या शकलांतील रेखा द्विगुणित करून शून्यें जितकीं असतील ती मिळवून आलेली संख्या १ ल्या स्थानापासून मोजावी. ती संख्या १-२-३-४ या स्थानात स्थित होईल तर वर्ष. ५-६-७-८ या स्थानांत स्थित होईल तर महिने. ९-१०-११-१२ या स्थानांत स्थित होईल तर वार आणि १३-१४-१५-१६ मध्यें स्थित होईल तर दिवस असे जाणावें.

रीत ५ वीः— ५-७ स्थानांतील शकलांच्या गुणाकारानें येणारे शकल शुभ असून शुभ स्थानांत तकरार केल्यास पुर्णायुषी. अशुभ असून अशुभ स्थानांत तकरार केल्यास अल्पायुषी. आणि मध्यम स्थानांत तकरार केल्यास मध्यमायुषी असें जाणावें.




रीत ६ वीः— ८-१२ स्थानांत यांतील कोणतीही शकलें असल्यास पूर्णायुषी. यांतील कोणतीही शकलें असल्यास मध्यमायुषी. यांतील कोणतेही शकल असल्यास अल्पायुषी असें जाणावें.

रीत ७ वीः— १-१५-१०-१३ स्थानांतील शकलांच्या गुणाकारानें येणारे शकल शुभ असेल तर पूर्णायुषीं. मध्यम असेल तर मध्यमायुषी. आणि अशुभ असेल तर अल्पायुषी असें जाणावे. मागील भागातील आयुष्यदर्शक कोष्टक पह.

या मुलांचें दैव कसे आहे ?— ५-८-१५ स्थानांतील शकलांच्या गुणाकारानें येणारे शकल शुभ असून शुभस्थानांत तकरार करील तर सुदैवी आणि धनाढ्य. मध्यम असल्यास मध्यम. आणि अशुभ आल्यास दरिद्री.

रीत २ रीः— १-५-२-११ स्थानांतील शकलांच्या गुणाकाराने येणारे शकल  यांतील असून १-२ ५-११-१४-१६ स्थानांत कोठेंही तकरार असल्यास धनाढ्य व सुखी होइल.  यांतील असून वरील स्थानांत तकरार असेल तर धनाढ्य झाला तरी लुच्चा होईल.  यांतील असून वरील स्थानांत तकरार करील तर श्रीमान्, पुण्यवान् आणि चांगल्या कार्याकरितां प्रवास करणारे होईल.  यांतील असून वरील स्थानांत तकरार करील तर मध्यम  यांतील असून वरील स्थानांत तकरार करील तर चोर, विश्वासघातकी व निंद्य होईल.

रीत ३ रीः— ५ व्या स्थानांत शुभ शकल असून १-४-७-१० मध्यें तकरार करील तर भाग्यवंत. २-८-११ मध्य तकरार करील तर मध्यम. आणि ३-६-९ १२ मध्यें तकरार करील तर दुर्दैवी आणि दरिद्री होईल.

रीत ४ थीः— १-५-२-१० च्या गुणाकाराने येणारे शकल  यांतील असून १-२-५-११-१४ स्थानांत पुनरुक्त होईल तर उदार, दानशील, मिळविलेलें द्रव्य चांगल्या कामी खर्च करणारे होईल  यांतील असून वरील स्थानांत तकरार करील तर कृपण असून दुसऱ्यांच्या दुःखाकडे न पाहणारे असें होईल.  यांतील असून वरील स्थानांत तकरार करील तर अभागी, दुर्गुणी, संकटांत ( फटिंग व फुटक्या;  चोर व जुवेबाज;  दगलबाज व निंदक;  चोर, हिंसक आणि सेवक) पडणारे होईल.

रीत ५ वीः— ५ व्या स्थानांतील शकल ४ थ्या स्थानांत तकरार करील तर बाप आणि भाऊबंदासी मिळून मिसळून वागणारा व धनोपयोगी होईल ६ व्यांत तकरार करील तर, आप्तांत मिळून राहिला तरी वैऱ्यांचा स्नेह करील. ७ व्यांत तकरार करील तर, कांहींसे स्त्रीविलासीत होईल. ८ व्यांत स्वतः मिळविणारा. संपत्तीमान आणि स्नेह योग्य. ९ व्यांत विद्यावंत, धनिक व

सदाचारी. १० व्यांत वडील मा' सांचा मित्रत्व करणारा व राजकार्यविलासी ११ व्यांत सर्व लोकांस मान देणारा आणि १२ व्यांत तकरार असेल तर ते मूल पित्यास वैरी होईल.

माझ्याशी मूल कसें वागेल ?— ५ व्या स्थानांतील शकल कुंडलींत पुनः कोणत्या स्थानी तकरार करील, त्या स्थानापासून पांचव्या स्थानात असलेल्या शकलावर मित्र दृष्टी असेल तर, प्रमानें वागेल; आणि शत्रू दृष्टी असल्यास वैरत्वानें वागेल.

रीत २ रीः— १-५ स्थानांत शुभ शकलें असल्यास प्रेमानें मध्यम शकलें असल्यास मध्यम आणि अशुभ शकलें असल्यास वैरत्वानें वागेल.

इच्छिलेली लाभेल काय ?— १-५-४ स्थानांतील शकलांच्या गुणाकाराने येणारे शकल शुभ असून दाखील अथवा साबीत असेल तर मिळेल अशुभ असल्यास मिळणार नाहीं. खारीज अथवा मुनकलीब असल्यास अत्याग्रहानें मिळाली तरी न्याय उद्‌भवेल. अशुभ असल्यास मिळणार नाहीं तसेंच फक्त ५ व्या स्थानांतील शकलावरूनही वरीलप्रमाणें फळ सांगावें.

स्वतः लाभेल काय ?— १-४-७-१० स्थानांतील तेज विभागाच्या रेखा मोजून एकीकडे मांडा. व २-५-८-११ स्थानांतीलही तेज विभागाच्या रेखा मोजून एकीकडे मांडाव्या. पूर्वीची संख्या अधिक झाल्यास स्वतः लाभेल. दुसरी संख्या अधिक झाल्यास मध्यस्थीनें लाभेल.

रीत २ रीः— ५ व्या स्थानांतील शकल १-१४-१५-१६ स्थानांत तकरार करील तर स्वतःच्या प्रयत्नानें. २ ऱ्या स्थानांत तकरार करील तर, द्रव्य आणि मित्र सहाय्यानें. ३ ऱ्यांत तकरार करील तर बोधानें. ४-१० स्थानांत तकरार करील तर वडील माणसांकडून. ६ व्यांत सेवक अमर दासांकडून. ७ व्यांत आप्तांतील स्त्रियांकडून. ८ व्यांत रिणकोकडून. ९ व्यांत विद्याचातुर्याने ११ व्यांत श्रीमंतांकडून आणि १२-१३ त तकरार करील तर अति कष्टाने परंतु संशय.

तिचें प्रेम आहे कीं नाहीं ?— १ ल्या स्थानांतील शकल ५ व्या स्थानांत असेल तर पूर्ण प्रेम आहे. सामान्य शकलें असल्यास प्रेम यथातथाच आहे.

रीत २ रीः— ९ व्या स्थानांतील शकल ५ व्या स्थानांत तकरार करील तर प्रेम आहे.

रीत ३ रीः— १-५ स्थानांतील शकलांच्या गुणाकारानें शुभ शकल येईल तर प्रेम आहे. त्या शकलांत तेजतत्त्वाचें बिंदु प्रकट असेल तर आहोरात्र प्रेम आहे. वायुबिंदु प्रकट असेल तर वरपांगी प्रेम. जलबिंदु प्रकट असल्यास प्रत्येक कामांत आड यणारी असून प्रेम कमी. पृथ्वीबिंदु प्रकट असेल तर, वैरत्वाची असून हानिदायक असें जाणावें

ही याची कोण ?— ५ व्या स्थानांतील शकल २-७-९-१०-११ त तकरार करील तर त्याची नायको. ८ व्या स्थानांत असल्यास रखाऊ आणि ४ थ्या स्थानांत असल्यास आप्ताची स्त्री आहे.

या व्रताचा शेवट कसा होईल ?— ५ व्यांत दाखील असल्यास लाभ, खारीज असल्यास हानी. मुनकलीब असल्यास कांहींसा लाभ. आणि साबीत असल्यास विलंबानें लाभ होईल.

ही वार्ता खरी असेल काय ?— ५ व्या स्थानांतील शकल शुभ असल्यास खरीं; मध्यम असल्यास संशय आणि अशुभ असल्यास खोटी आहे.

वार्ता येईल काय ?— ५ व्यांत दाखील अथवा साबीत शुभ असेल तर येईल. अशुभ असेल तर संशय; खारीज अथवा मुनकलीब शुभ असेल तर संशय. अशुभ असल्यास येणार नाहीं.

किती दिवसांनीं येईल ?— ५ व्या स्थानांतील शकलाच्या बि. ज. द. ह. क्रमानें दिवस सांगावे.

लखोटा प्रश्नः— ५ व्यांतील शकल कुंडलीत ज्या ज्या स्थानीं तकरार करील त्या स्थानांचा मजकूर आहे. तकरार नसल्यास ५ व्या स्थानीं जें शकल असेल व ते शकुन क्रमानें ज्या स्थानाशी संबंध ठेविते तेथील वृत्तांत आहें. ते शुभ असून शुभ स्थानांत तकरार केल्यास त्यांतील मजकूर खरा असून शुभ वार्ता आहे. अशुभ असून अशुभ स्थानांत तकरार करील तर अशुभ वार्ता आहे.

तो इसम काम करून येईल काय ?– १-५-६-११ स्थानांतील शकलांच्या गुणाकारानें शुभ साबीत शकल येईल तर काम न करितां परत तसाच येईल अथवा पत्र येईल. शुभ खारीज येईल तर त्या कामाची वार्ता येईल. शुभ दाखील येईल तर कार्य करून येईल. शुभ मुनकलीब येईल तर ते कार्य होणें फारच कठीण.

रीत २ रीः– १ ल्या स्थानीं शुभ शकल असल्यास त्या स्थानीं पोंचला. पूण काम करून येणार. १ ल्या स्थानांतील शकल ५ व्या स्थानांत असेल तर संशय ११ व्यांत शुभ शकल असेल तर तें काम करून येतो. ५-१०स्थानांत शुभ शकलें असतील तर तो सुवार्ता आणील, पण खरी नव्हे. ७-९-११-१४ स्थानांत शुभ शकलें असल्यास पूर्ण कार्य करून येतो.





रीत ३ रीः– १-५-९ स्थानांत शुभ दाखील शकलें असून ४-८ १२ स्थानांत बकरार असल्यास तो खरे बोलणारा आहे. तेथें हे ○ असल्यास चांगला बोलका नाहीं. ○ हें असल्यास अनिर्वाहपक्षीं पाठवून द्यावे. परंतु व्यर्थ. ○ असल्याम ज्याकडे गेला त्याबरोबर न्याय करील. ○ खरे बोलेल; पण प्रयत्न करणें भाग पडेल. ○ त्यांच्या सावकारानें हरकत केल्यामुळें तेथें जाणार नाही. २ ऱ्या स्थानांत शुभ दाखील शकल असेल तर गेलेल्यास लाभ होईल. १ ल्या स्थानांत ○ हे असल्यास कांहीं दिवस राहून श्रमाने कार्य करून येईल. ते १-५-९स्थानांत बकरार करील तर गेलेला दुःखी आहे, श्रमानें कार्य करून येईल. ○ अर्ध मार्गाने परत येईल. पुनः जाईल व काम करून येईल. ○ मार्गांत भीती उत्पन्न होईल,अखेरीस काम करील. ○ न्याय उद्भवेल,व दुःख घडलें तरीं कार्य करील. ○ बऱ्याच दिवसांनीं कार्य करून येईल. ○ गलेला ज्ञानी आहे. कारण प्रसंगावधान पाहून उत्तम काम करून येईल. ○ सत्यवक्ता असून विश्वासुक आहे. विलंबाने काम करून येईल. ○ ज्या जागी तो गेला आहे तेथून पुढें जाऊन विलंबे परत येईल. ○ त्यास मार्गात मरणसम कष्ट आहे.

ही वार्ता कोणाकडून आली ?– १५ स्थानांतील शकलांच्यां स्त्री पुरुषादि संज्ञेवरून स्त्री अथवा पुरुष ठरवून ५-९-१३ स्थानांत कोणते ग्रह आहेत

व त्यांच्या राशी कोणत्या हें ठरवून जात सांगावी. शनीचे शकल असेल तर गुलाम (हिंदु अथवा हबसी) गुरूचे असल्यास पाटील कुलकर्णी अथवा एखाद्या सभावित गृहस्थाकडून. मंगळाचें असल्यास सिपायी, खाटीक अथवा मांग. सूर्याचें असेल तर श्रीमंताकडून. शुक्राचें असल्यास नाटयकला प्रवीण अथवा वेश्या वगैरेकडून. बुधाचें असल्यास कारकून अथवा चित्रकाराकडून आणि चंद्राचे असल्यास प्रवासी अथवा कोष्टयाकडून बातमी आली.

किती दिवस झाले ?– ५ व्या स्थानांतील शकलांच्या अ. ब. द. ह. क्रमानें दिवसांचा निर्णय करावा.

या कामाकरीतां मनुष्य पाठवूं काय ?– ५-९-१३ स्थानांत दाखील शकलें असल्यास पाठविणें उत्तम. त्या स्थानांत अशुभ शकले असल्यास पाठवूं नये.

मी काय प्यालों आहे ?— ६ व्या स्थानांत  यांतील असल्यास दारू.  यांतील असल्यास अर्क.  यांतील असल्यास गोडे पाणी.  असल्यास खारट पाणी अथवा साखर मिळविलेलें गोडे पाणी.  खारट पाणी.  अफूचा अर्क.  यांतील असल्यास कांहींच प्याला नाहीं.

ही मैत्री कशी आहे ?— १-५-११ स्थानांत शुभ दाखील शकलें असून ३-६ स्थानांत तकरार करतील तर अति मित्रत्व आहे. तेथें  असल्यास परस्पराचें दूरचे मित्रत्व आहे. बाकींच्या शकलांनीं नाहीं.

रीत २ री:– मित्रत्व आणि वैरत्वाचीं शकलें कुंडलीत नसतील तर त्यांच्या तकरारीकडे लक्ष देऊन उत्तर द्यावे. प्रसंगवशात् तकरार नसल्यास १-११ स्थानांतील शकलांच्या गुणाकारानें येणारे शकल कुंडलींत असून १ ल्या स्थानांस मित्रदृष्टींतें पहात असेल तर मैत्रीं चांगली आहे. तें वैरदृष्टीयुक्त असेल तर वैरत्व. तें शकल कुंडलीत नसल्यास १ ल्या स्थानांतील शकलाची तकरार आणि मित्रत्व पाहून उत्तर द्यावें.

या राजापासून लाभ होईल कां ?– ५ व्या स्थानांत शुभ शकल असेल तर लाभ होईल. तेथे शुभ दाखील असल्यास अगणित लाभ. शुभ खारीज असेल तर मध्यम लाभ. अशुभ खारीज अथवा मुनकलीब असेल तर कांहीच लाभ होणार नाहीं. साबीत अथवा मुनकलीब शुभ असल्यास विलंबाने होईल.

६ व्या स्थानापासून प्रश्न सांगणें.

रोगाणां दूषणानां च दासादीनां शुचस्तथा ॥ गर्भचेटकयोश्चापि पशूनामल्पदेहिनाम् ॥ ३५ ॥ ऋणया च तस्य चौर्यैराहृतस्य धनस्य च संतोषस्य च शत्रूणां प्रश्नोवाच्ये रिगेहतः ॥ ३६ ॥

पळून गेलेला गांवीं आहे कां ?– ५ व्या स्थानांत दाखील अथवा साबीत असेल तर गांवीं आहे. खारीज असेल तर नाहीं. मुनकलीब असेल तर गांवांतून लवकरच बाहेर जाणार आहे, अशुभ खारीज असेल तर मार्गांत आहे यांतील असेल तर दूर गेला.

रीत २ रीः– ४-९-१२ त कोठेंही हें असेल तर गेलेला कष्टी आहे. या शकलानें आप्त इष्टांच्या घरी आहे. यांतील असेल तर प्रयत्नानें मिळेल. या शकलानें मिळेल, परंतु कष्ट. या शकलांनीं दूर गला आहे. प्रयत्नाने मिळेल. या शकलाने मिळेल; पण पुनः पळून जाईल. या शकलाने आलस्याने मिळेल. या शकलाने लवकर सांपडेल. या शकलाने विलंबानें मिळेल. या शकलांनी मिळणार नाहीं.

रीत ३ रीः–६-४-२ अथवा ७व्या स्थानांत खारीज अथवा मुनकलीब शकलें असतील तर गांव सोडून गेला. दाखील अथवा साबीत असेल तर गांवी आहे.

कोणत्या दिशेस आहे ?– कुंडलीतील सर्व रेखा द्विगुणित करून त्या शकलांतील सर्व शून्यांची संख्या मिळवून ४ नीं भागावें १ शेष राहिला तर

पूर्व, २ उत्तर, ३ पश्चिम आणि ० दक्षिण. अथवा ९ व्या स्थानांतील शकला-वरून दिशा सांगावी.



शोधण्यास गेल्यास मिळेल काय ?– ७ व्यांत दाखील अथवा साबीत असल्यास मिळेल अन्य शकलानी मिळणार नाहीं.

रीत २ रीः– १ ल्या स्थानांतील शकल ४-७-१० त तकरार करील तर मिळेल. ३-६-९-१२ त तकरार करील तर मिळणार नाहीं.

रीत ३ रीः– १-६-५ स्थानांत खारीज अथवा मुनकलीब शकलें असतील तर एकटाच आहे मिळेल. दाखील अथवा साबीत असेल तर, त्याजबरोबर दुसरा इसम आहे मिळणे दुर्लभ.

रीत ४ थीः– ६ व्या स्थानांत हें शकल असून १-४-७-१० त तकरार असेल तर मिळेल. २-५-८-११ त तकरार असेल तर मार्गात सांपडेल. ३-६-९-१२ त असल्यास मिळणार नाहीं.

रीत ५ वीः– कुंडलीतील रेखा द्विगुणित करून शून्यांची संख्या मिळवून त्या संख्येस २ ने भागावें, १ राहिल्यास सांपडेल, ० राहिल्यास सांपडणार नाहीं.

हरवलेलें पशु मिळेल काय ?—ही   कुंडलींत असून १-२-५-८-९ स्थानांत     यांतील शकलें असल्यास चोरांनी पळविले.   अथवा ६-१२ त   हीं शकलें असल्यास आपोआप मिळेल.     यांतील असल्यास कोणो जुलुमानें घेऊन गेले आहे मिळते. १-४-७-१० त तकरार असल्यास मिळते. आणि ३-६-९-१२ तकरार असेल तर मिळणार नाहीं.

कोणत्या दिशेस गेलें ?– १२ व्या स्थानांत अग्नी शकल असून १-२-३-१३ त तकरार करील तर पूर्व दिशेस वायूचे शकल असून वरील स्थानांत तकरार असेल तर पश्चिम दिशेस. जल शकल असून वरील स्थानांत तकरार असेल तर उत्तरेस, आणि पृथ्वी शकल असून वरील स्थानांत तकरार असेल तर दक्षिण दिशेस गेले.

त्या पशूंस चिन्ह काय आहे ?– ७ व्या स्थानांतील शकलावरून १ ल्या भागांत सांगितलेल्या कोष्टकांतील शरीरस्थानास अनुसरून वर्ण वगैरे सांगावें

रीत २ रीः– ≡o ooo यांतील शकल ६ व्या स्थानांत असेल तर डोळ्यांत व कानाजवळ. oo= ooo= यातील असल्यास डागलेलें चिन्ह आहे. ≡o हें असेल तर गळ्याखाली घाय आहे. ooo हें असल्यास पायांत तांबडे चिन्ह आहे. o≡ हें असेल तर बेंबीजवळ पांढरें चिन्ह आहे.

रीत ३ रीः– १२ व्यांत तेज शकल असेल तर तांबडें, वायूचें शकल असेल तर शाम वर्णाचे आहे, जल शकल असेल तर पांढरे आणि पृथ्वीचें असेल तर काळे अगर चित्रविचित्र रंगाचें आहें.

रोग विचार– १ लें स्थान रोग्याचे, ४ थें स्थान औषधोपायाचें. कांहीं रमलज्ञ २-१० हीं स्थानें औषधोपायाकरितां घेत असतात. ६ वें स्थान रोगाचे, १० वे स्थान वैद्याचे, ११ वे स्थान रोगी बरा होण्याचे, १२ वें स्थान रोग अधिक वाढण्याचें, वरील स्थानांत शुभ शकले असल्यास शुभ. आणि अशुभ शकले असल्यास अशुभ फल जाणावें.

रोग बरा होईल कीं नाहीं ? — ६ व्या स्थानांत खारीज अथवा मुनकलीब शुभ असल्यास लवकर बरा होईल. अशुभ असल्यास विलंबानें, कष्ट साध्य. दाखील अथवा साबीत शकलें शुभ असो अशुभ असो बरा होणार नाहीं.

रीत २ रीः– १-८ स्थानांत खारीज अथवा मुनकलीब शकलें शुभ असोत अथवा अशुभ असोत लवकरच बरा होईल. दाखील अथवा साबीत शकलें शुभ वा अशुभ असली तरी होणार नाहीं

रीत ३ रीः– १६ हीं स्थानांतील तेज आणि वायु विभागांचे बिंदु मोजावें आणि जल व पृथ्वी तत्वाचें बिंदु मोजावें. वरील संख्या अधिक झाल्यास बरा होईल. खालील संख्या अधिक झाली तर बरा होणार नाहीं.

रीत ४ थीः– कुंडलीत ≡ ≡o ≡o ooo हीं शकलें अधिक असतील तर रोग्याचा अंत्यकाळ समीप आला असें जाणावे. मुख्यत्वे हें ≡ शकल तर रोग्याच्या प्रश्नाचें वेळी खास मारक आहे.

रीत ५ वी:- १ ल्या स्थानांतील शकल कुंडलींत तकरार करील अथवा १४-१६ स्थानांत हीं शकलें तकरार करतील तर, रोगी बरा होण्याचा संभव आहे. हीं शकलें कोणत्याही स्थानात असोत अथवा हेंच शकल कुंडलींत जिकडे तिकडे तकरार करील तर रोगी बरा होणार नाहीं.

रीत ६ वी.- १ ल्यांत हें असून १६ त हें असेल तर रोगी बरा होणार नाहीं. १५ व्या स्थानांत यांतील शकलें असतील तर अंत्यकाळ समीप आला. ६-८ स्थानांत यांतील शकलें असतील तरी रोग्याचा काळ समीप आला. हीं शकलें शुभ स्थानांत तकरार करतील तर रोगी बरा होणार नाहीं. ती अशुभ स्थानांत तकरार करतील तर कष्टसाध्य. त्यांतील कोणतीही दोन शकलें १-१६ त तकरार केल्यास रोगी मेला असे समजावें.

रीत ७ वी:-१-३ यांतील शकलांच्या गुणाकारानें यांपैकी शकल येईल तर रोग्यास अति कष्ट होईल.

रीत ८ वी:- १-६-८ यातील शकलें गुणून वायु अथवा तेज तत्वाचें शकल येईल तर रोग्यास सुखकारक. जल अथवा पृथ्वीतत्वाचें येईल तर रोग्यास हानी.

रीत ९ वी:- १ ल्या स्थानांत यांतील; ६-८ मध्यें हीं ९ व्या स्थानांत हे, १२ व्यांत हे, १४-१६ त हीं शकलें असल्यास रोगी बरा होणार नाहीं.

रीत १० वी:- १ल्या स्थानांत दाखील अथवा साबींत शकल असल्यास रोग साध्य. अशुभ असल्यास रोगवृद्धी शुभ खारीजनें रोग साध्य. साबीत मुनकलीब शुभ शकल असेल तर औषधाने रोग साध्य. अशुभ असल्यास सुसाध्य.

रीत ११ वी:- १-४-६-८ स्थानांतील शकलांच्या गुणाकारानें येणारे शकल १-२-३-४ स्थानांत असेल तर साध्य. तें शकल शुभ दाखील असेल तर रोगवृद्धी शुभ साबीत असेल तर विलंबाने शांती. ते शुभ दाखील शकल ८ व्यात तकरार

करील तर बरा होणार नाहीं. ८ व्यांत यांतील असून हीं शकले कुंडलींत सर्वत्र तकरार करतील तर असाध्य.

रीत १२ वीः— यांतील शकल ६ व्या स्थानीं पडेल तर मरणसूचक; परंतु त्यांची तकरार असली पाहिजे. हें शकल रोग्यास मारणारेच ! याचीं दृष्टी स्मशानाकडची असून विस्तु आणि पाण्याची तयारी करणारे. हें गोरीं खणण्याकरितां लोकास मिळविणारे. हें विलापाचें आणि खुदाईचे. हें तिरडीची तयारी करविणारे. आणि हें मढ्याची भ्रांती दाखविणारे. सारांश वरील शकले रोग्यास मारक होत.

रीत १३ वीः— ६-८ स्थानांतील शकलांच्या गुणाकाराने येणारें शकल यांतील असेल तर, रोग्यास भिती नाही. बाकीच्या शकलांनीं रोग्यास भिती आहे; परंतु ९ व्या स्थानांत तकरार असून वैरदृष्टी आहे. किंवा नाहीं हें पाहून उत्तर द्यावें.

रोग्यास काय झालें आहे ?— यांतील असेल तर ग्रह वगैरे दोष, बाकींच्या शकलांनीं अंगरोग झाला आहे.

रीत २ रीः— ४ थ्या स्थानांत यांतील असून ६-८ तकरार असल्यास जादु वगैरे बाधेची दृष्टी. ४-६-८ स्थानांत ही क्रमानें असून कुंडलींत तकरार असल्यास भूत बाधा झाली आहे.

रीत ३ रीः— ६ व्यांत तेज शकल असेल तर पित्तोपद्रवाने दाह, ताप व अमांश. वायूचें असल्यास, कफ, वात, रक्तविकार व वायु विकार. जलाचें असल्यास कफोद्भवरोग, शांतविकार, आणि पृथ्वीतत्वाचें असेल तर रक्त विकार, अस्थिभग्न आणि शूलविकार.



रीत ४ थीः— ६ व्या स्थानांत असल्यास ज्वर, गात्रभेद, मस्तकव्यथा, दोष, पित्तोद्भवरोग. ताप, गात्रशोष, कंप, अस्थिपीडा, कंठांत व्यथा, सूलव्याध, पित्त आणि वातजन्य. उदरव्यथा, नळांत गुर गुर शब्द मानसिकव्यथा, ज्वर पार्श्वव्यथा, स्वप्नभय, पित्तजन्य, विषुचिका, शोफोदर,

त्रासाशीं, मिश्र जलोदर, खोकला, नामी व जठरव्यथा, दोष, वातव्याधी. उपदंश, शिरा व पृष्ठशूल, सुतवियोग, दुःख, शिथिलगात्र, तस्करभय, वातजन्य. हृदयक्षीण, आधान बंध आनल, रक्तविकार, नाभि, कुक्षो, व कटिविकार, अंगरूक्ष, वातभ्रंश, काष्टपाष णादि घात अगर पतनाने. अंगमर्दनज, उंच स्थलावरून पडलेला त्रास, ज्वर, खोकला, शीतोपद्रव, रोग. रक्तभवन, नेत्र विकार, व्रणोपद्रव, जठरे रुधिर स्राव. रसविकृति, जडशीत प्रकोपानें उदर, गुह्यव्यथा, कफोद्भव; शीतरोग. ज्वर व दाह, रक्तस्राव, नेत्रपीडा, स्फोटक, अभिचार श्लेष्म, प्रकोपाने कफवृद्धि, कटिशूल, ज्वर, कफ आणि वातोद्भव शरीरदाह, मस्तकपीडा, श्वास, तेजहानी, बाधा. कास, श्वास, उदरव्यथा मूलव्याधी, रक्तमिश्र कफ, प्रमेह. यक्ष्मा, कटिव्यथा, रक्तस्राव, शीतज्वर, प्रमार्थ वातोद्भव. पक्षपात, श्लेष्म, रक्तविकार, सर्वांगशूल, कास, हृदयांत व पोटात दुःख. आणि हें असल्यास शीतज्वर, श्लेष्म, प्रकोप व अमांश आहे.

रीत ५ वी:— ६ व्या स्थानांतील शकल १ ल्या स्थानांत पडेल तर वपु केलेल्या कारणानें. २ ऱ्यांत असेल तर धन व्ययाच्या त्रासानें. ३ ऱ्यांत मार्गक्रमणाने व उंच आश्रयावरून पडल्यानें. ४ थ्यांत निंद्यस्थलीं गेल्या कारणानें वायु प्रकोप. ५ व्यांत सति पुत्रवियोगानें व मद्यपानानें. ६ व्यांत भीतीनें. ७ व्यांत स्त्री विरोध व चोरी. ८ व्यांत वैऱ्याच्या त्रासाने व स्वदेहज. ९ व्यांत धर्मकार्यार्थं ग्रामोल्लंघन केल्यानें. १० व्यांत म्लेच्छ सहवासानें व विषप्रयोगानें. ११ व्यांत मित्र वियोगानें, क्रोधानें द्रवणारा मार लागल्याने आणि १२ व्यांत स्त्री प्रसूत व वैरत्वाच्या त्रासानें.

रीत ६ वी:— ६ व्या स्थानांत शुभ खारीज शकल असेल तर स्वभावज रोग. अशुभ खारीजनें दोषोपद्रव रोग, अशुभ दाखीलनें योपकृती. साबीत मुनकलीबनें दोषयुक्त. आणि शुभ दाखीलने स्वभावज रोग.

जादु खरी कीं काय ?— ६ स्थानांत हें असून अन्य स्थानांत तकरार असल्यास खरे. ९ व्या स्थानांत हें असल्यास आप्तइष्टांनी केले आहे त्यायोगें त्रास होईल. यांतील असेल तर वैर साधण्याकरितां केलें.

आहे तरी लवकरच बरी होईल  यांतील असेल तर स्मृति चुकून भट-कण्याकरितां केली आहे.  यांतील असेल तर स्नेहनिमित्य केली आहे.  हें असेल तर कठिण जादु केली आहे.




रीत २ रीः– २-१२ त तेज शकलें असतील तर जादु करून जाळिली असून पुरलेंली आहे. जल अथवा वायु तत्वाचें असेल तर जादु करून पाण्यांत पाजिवली आहे. पृथ्वीचे असेल तर स्मशानांत पुरली आहे. २-१२ यांतील शकलांची मित्र आणि शत्रु दृष्टी पाहून उत्तर द्यावे त्या स्थानांत तीं शकलें शुभ असतील तर स्नेह निमित्य केली आहे.

जादु करून किती दिवस झाले ?– ९ व्या स्थानीं जमलेल्या शकलाच्या बि. ज. द. ह. क्रमाप्रमाणें घटिका, दिवस, महिनें व वर्षाचा निश्चय करावा.




रोग्यास कोणते औषध चांगलें ?— २ ऱ्या स्थानांत तेज शकल असेल तर औषध हितकारक नव्हें. वायु अथवा जल तत्वाचें असेल तर शीतोपचाराचे. पृथ्वीचे असल्यास शुष्कौषध हितकारक होईल.

वैद्योपाय केला तर कसें ?–९-४ स्थानांत शुभ शकलें असतील तर वैद्योपाय हिताचे. त्या स्थानीं शुभाऽशुभ शकलें असल्यास मध्यम हित ७ व्या स्थानांत शुभ खारीज शकल असेल तर, औषधाने-रोग बरा होईल. अशुभ खारजाने कष्टाने ;दाखीलने बरा होणार नाहीं. साबीत आणि मुनकलीबानें स्वल्प गुणकारक जाणावे.

हा वैद्य कसा आहे ?– १० व्या स्थानांत शुभ शकल असून १-२-४-७-९ स्थानांत कोठेंही शुभ शकलें असतील तर, दक्ष दयावंत आणि विलक्षण आहे.

या वैद्याचा औषधोपाय कसा आहे ?– ४ थ्या स्थानांत  यांतील असेल तर चांगला आहें.  यांतील असेल तर. उपाय बरा नाहीं;  यांतील असेल तर, औषधोपाय मध्यम आहे.

किती दिवसांत बरा होईल? ६ व्या स्थानांतील शकलांच्या त्रि. ज. द. ह. क्रमाने अथवा १-६ स्थानांतील शकलांच्या गुणाकारानें येणाऱ्या शकलावरून दिवस सांगावें. आणि रोग्याचे मरण ६-८ स्थानांतील शकलांच्या गुणाकारानें येणाऱ्या शकलावरून अ. ब. द ह अथवा बि. ज.द ह. इत्यादि क्रमानें दिनावधी मांगून, त्या शकलाचा जो ग्रह असेल त्या ग्रहाचा वार रोग्यास घातक आहे. आणि बरा होण्याबद्दल त्या ग्रहाच्या वारावरून तो ठरवावा.

कोणता दोष झाला आहे?– ६ व्या स्थानांत  असेल तर देवीदोष  म्लेच्छदोष,ग्रहपीडा आणि राक्षस दोष,  शाकिनीरूप जादुदोष,  क्षेत्रपाल दोष  ग्रहपीडादि भूतदोष  भूतबाधादि देवोदोष.  राक्षसबाधादि प्रेतदोष.  शाकिनीदोष.   देवीदोष.  गोत्रजदोष.  नाकाश देवी-दोष.  भैरव देवाहि दोष.  भूतदोष.  हे शकल असेल तर, भैरवादि शाकिनी दोष झाला आहे.

दोषांची लक्षणें—सर्वांगशूल, नेत्रपीडा, मूर्च्छा, देहकंप, रडणें, बडबडणें, दचकणें, अरुचि, हसणें, स्वरभंग, कृश ही लक्षणें जादुदोषाची व डाकिणी दोषाची जाणावी.

दाद. शूल, चेंहेरा फिकड पडणें, केस विखरणें, टाळचा वाजविणे, अंग पिवळे होणें, कृश, मूर्च्छा, भ्रम, सौभाग्य चिन्हांची इच्छा, ज्वर, मधुर पदार्थाची आवड, डोळ्यांस दाह, तळहात तळपाय जळणें, पाठिचा कणा आणि पोटऱ्या दुखणें, दांतखिळी बसणें, स्वप्नांत मार्जार भ्रांति, बालकांची भ्रांति, अति भूक लागणें, पोटांतील मूल नाहींसे होणें हीं लक्षणें शाकिन्यादि देवी दोषाची.

तोंडांतून व नाकांतून रक्तस्राव, चिताभस्माची आवड, तऱ्हतऱ्हेचीं वाईट स्वप्ने पडणें, संधीशूल, चित्तभ्रम, बलीची आवड ही क्षेत्रपाळ दोषाचीं.

स्वप्नांत त्रिशूलधारी संन्यासाचे व कुत्र्याचें दर्शन, कुटुंबांतील सर्व माणसें रोगी, क्लेशी, नाकांतुन रक्तस्राव. बकरें, कोंबडें अथवा मनुष्यवधाची, स्मशान-वासाची इच्छा; राख उधळणें, खरे बोलणे, हीं भैरव दोषाची लक्षणें.




माध्यान्हीं अथवा सायंकाळी निचेष्टित पडणें, अतिनिद्रा, शरीर वांकडें होणें, रक्त आटणें, तोंड, पाय, दांत, जीभ वांकडी होणें, स्मरणशक्ती नाहींशी होणें, ही विजासनीं दोषाचीं लक्षणें.

हात वर करणें, कृश, खोटें बोलणें, शरीरांत दुर्गंधी, अपवित्र, चंचल मन, अति खाणें, भ्रम, अति रडणें, उभे राहूनच मलमूत्र विसर्जन करणें. इच्छित वस्तु हट्टाने मागणें नेत्र आरक्त आणि सर्वांग कंप ही प्रेतादि पिशाच्च बोधचा लक्षणें.

पूर्णिमेस सर्वांग कापणे, लाळ पडणें, अति निद्रा, भयंकर डोळे, अति राग, मंद, गोतशद्यांची इच्छा (हीं लक्षणें कमी स्त्रीपुरुषांच्या परस्पर मोहानेही होतात). ही लक्षणें आमावास्येस होतील तर, गोत्रज दोषाची. अष्टमीपासून दररोज ८ दिवसपर्यंत होतील तर गंधर्वादि देव दोषाची. प्रतिपदेच्या दिवशी ही लक्षणें, झाल्यास यक्षदोष आणि त्या रात्रीं जर होतील राक्षस दोष जाणावे.

पळून जाणें, दुसऱ्यांशीं स्नेह, हात व डोळे लाल, मन उदास स्वप्नांत कुत्रा अथवा आपला मित्र दिसणें, मनमाने पाहिज तिकडे फिरणें, मधुर पदार्थाची आवड, हीं लक्षणें भैरव दोषाची जाणावीं.

नोकर मिळेल काय ?— ६ व्या स्थानांत दाखील अथवा साबीत शुभ असेल तर उत्तम नोकर मिळेल. अशुभ असेल तर, मिळाला तरी चांगला नव्हे खारीज अथवा मुनकलीब असेल तर मिळणार नाहीं.

रीत २ रीः— १-१२-२-६ यांतील शकलांच्या गुणाकाराने  यांतील असेल तर त्याचा पायगुण जरी चांगला आहे तरी तो निभणें कठिण.  यांतील असेल तर फटिंग, चोर आणि पळून जाईल.  यापासून कुशल असून दगाबाज.  यांतील असल्यास पळून जाईल अथवा मरेल.  यांतील असेल तर क्लेश चितायुक्त असें जाणावें.

रीत ३ रीः— ५-१२ च्या गुणाकारानें यणारे शकल शुभ असल्यास उत्तम घराण्याचा आणि अशुभ असल्यास वाईट घराण्याचा आहे.

चहाडी केलेली खरी काय ?— ६ व्या स्थानांत दाखील अथवा साबीत असेल तर चहाडी केलेली खोटी, मुनकलीब अथवा खारीज शकल असेल तर थट्टा केली आहे. अशुभ असेल तर मुद्दाम वैरत्वाने सांगितले आहे.

आमचा कट फुटेल काय ?— ६ व्या स्थानांत दाखील अथवा साबीत असेल तर फुटणार नाहीं. खारीज असेल तर फुटेल. आणि मुनकलीब असेल तर कांहीं दिवसांनी फुटेल.

राजवरील संशय खरा काय ?– ६ व्यांत दाखील असेल तर खरा. शुभ खारोज असल्यास संशय धरूं नय. मुनकलीस असल्यास संशयाचें कारण खरे दिसत नाहीं. साबीत असल्यास मुळींच संशय धरूं नय.

शिकार होईल कीं नाहीं ?–६-१-१०-२स्थानांतील शकलांच्या गुणाकाराने [शकल] [शकल] यांतील शकल झाले तर पुष्कळ शिकार होईल. [शकल] [शकल] [शकल] यांतील असल्यास पशूपक्षी दिसणार नाहींत. [शकल] [शकल] यांतील असल्यास शिकार मिळणार नाहीं. [शकल] [शकल] यांतील असल्यास जीवंत जनावरे मिळणार नाहींत. निशाण मारल्यांच मरतील. [शकल] हें असेल तर पळून जातील अथवा उडतील. परंतु शोध केल्यानें बरीच शिकार होईल. बाकीच्या शकलांनी जाऊ नये.

हा पक्षी बोलेल काय ?– ७-१३-१-४ यांतील शकलांच्या गुणाकारानें [शकल] हे आल्यास सुस्वर बोलेल. [शकल] [शकल] [शकल] सुस्वर असला तरी बोबडं बोलेल. [शकल] [शकल] [शकल] [शकल] स्वर चांगला नाही उडून जाईल. [शकल] [शकल] रडवा स्वर. [शकल] बराच बोलेल परंतु कर्कश स्वर आहे. बाकीच्या शकलांनीं स्वर चांगला नाहीं.

७ व्या स्थानापासून प्रश्न सांगणें.

पत्नीनांचैव भर्तॄणां स्वीकारस्य रिपोरपि ॥ युग्मोद्यमस्य चौरस्य वादस्यगमनस्य च ॥ ३७ ॥ स्थानांतर स्थितार्थस्य जयस्य मैथुनस्य च ॥ स्वकीयपरदेशस्य सवाच्यः सत्यमालयात् ॥ ३८ ॥

माझें लग्न होईल काय ?– ७-८-२-१ स्थानांत शुभ शकले असल्यास रूपसपन्न असून सद्गुणी स्त्रियेसी लग्न लागेल. ७-१ स्थानांत [शकल] [शकल] [शकल] [शकल] [शकल] [शकल] यांतील शकलें असल्यास लग्न होईल. [शकल] [शकल] यांतील असल्यास अनायासे लग्न होईल. [शकल] [शकल] [शकल] असल्यास लग्न झाले तरी व्यर्थ. १ ल्या स्थानांत शुभ दाखील असून ११ व्यांत तकरार आणि २-४-५-७-८-९ या स्थानांत कोठेंही [शकल] हें असल्यास होईल. बाकीच्या शकलांनीं होणार नाही.

रीत २ रीः– कुंडलीतील रेखा दुप्पट करून. त्या संख्येंत कुंडलीतील सर्व शून्यें मिळवावी, त्या सख्येस ३ ने भागावे. १ शेष राहिल्यास होते. २राहिल्यास संशय. ० राहिल्यास होणार नाहीं.

रीत ३ रीः– ४–५ स्थानांतील शकलांच्या गुणाकारानें यांतील आल्यास लग्नांत कलह होईल. बाकीच्या शकलांनीं कलह उत्पन्न होणार नाहीं.

कोणत्या वर्षी लग्नयोग आहे ?– ७ व्यांत हें शकल असल्यास १६ व्या वर्षी योग असून क्लेशकारक परंतु एकच स्त्री. १६ व्या वर्षी दोघां बायकांचा योग, परंतु एका स्त्रीपासूनच सुख. स्त्री सुख नाहीं. २० व्या वर्षी ४ स्त्रियांचा योग, दोघीपासून सुख. ३२ व्या वर्षी एकाच स्त्रियेचा योग तरी तो क्लेशकारक स्त्रीसुख सपूर्ण वर्षाची अवधी नाहीं. उत्तरावस्थेंत लग्न योग एकच स्त्रीं. २२ वर्षानंतर योग आहे तरी तो मध्यें खंडित. १२ वर्षी स्त्रीसुख संपूर्ण. कव्हांनी दोन स्त्रियांचा योग परंतु एकटी सुखकारक. ४० वर्षानंतर योग परंतु क्लेशकारक. २१ व्या वर्षी ४ स्त्रियांचा योग पण दोघीपासून सुख. उत्तरावस्थेंत स्त्री सुखदायक १२ व्या वर्षी स्त्री सुख संपूर्ण. संशय आलेल्या स्थळीं बि. ज. द. ह. क्रमानें उत्तर द्यावे.

या कन्येचें गुण कसें आहेंत ?– ७–१ स्थानांतील शकलांच्या गुणाकारानें यांतील आले तर शांत, हुशार, धार्मिक, चतुर असून भाग्य भोगिनी पुत्र व कन्या प्रसूती. हुषार व चतुर आहे, मुले कष्टानें होतील पण कन्या प्रसूतीः स्वतंत्रपणें प्रंपच चालवून निर्दोषानें चालेल. वरपांगी प्रेम दाखवून दुसरेंकडें लक्ष्य ठेवणारी. सदा हास्यमुखी. जारिणी असून पति आप्तइष्टांसीं चिक्कूपणानें वागून स्वतः धनसंग्रह करणारी. कुरूपी दरिद्री, जारिणी व वैरिणी वरपांगी प्रेम दाखवून आप्तइष्टांसी वैरभावानें वागणारी व वाचाळ.

रीत २ रीः– ७ व्यांत दाखील अथवा साबीत शकल शुभ असून १-२-४-५-७-८-१०-११ या स्थानांत कोठेंही तकरार असल्यास कुमारी; बाकीच्या शकलांनीं अधिक वयाची.

रीत ३ रीः– कुंडलींतील रेखा सर्व द्विगुणित करून त्या संख्येंत सर्व शून्यें मिळवावे त्या संख्येस ३ ने भागावे. १ शेष राहिल्यास पतिव्रता. २ राहिल्यास लज्जायुक्त व मध्यम गुणाची. ० राहिल्यानें व्यभिचारिणी.

रीत ४ थीः— ७ व्यांत [आकृति] [आकृति] अथवा ८ व्यांत [आकृति] [आकृति] यांतील असल्यास शुद्ध अथवा ७-८ स्थ नांतील शकलांच्या गुणाकारानें [आकृति] हे आल्यास शुद्ध [आकृति] [आकृति] [आकृति] यांतील आल्यास दुसऱ्यांच्या बलात्कारानें बिघडलेली. [आकृति] [आकृति] स्वतः बिघडली आहे [आकृति] [आकृति] [आकृति] [आकृति] [आकृति] या शकलांनी शुद्ध आहे

रीत ५ वीः— ७-४ स्थानांतील शकलांच्या गुणाकारानें शुभ शकल येईल तर उत्तम गुणाची. मध्यम आल्यास मध्यम गुणाचीं. अशुभ आल्यास वाईट गुणाची.

रीत ६ वीः— ७ व्या स्थानांत [आकृति] हें असल्यास स्वतः बिघडली आहे [आकृति] [आकृति] [आकृति] [आकृति] [आकृति] [आकृति] [आकृति] [आकृति] यांतील असेल तर बिघडली नाहीं [आकृति] शेजाऱ्यांच्या शिकवणनें बिघडली आहे [आकृति] दुर्गूणी लोकांच्या मैत्रीनें बिघडल्याचा आरोप आला आहे परंतु बिघडलीं नाही. [आकृति] बिघडावे असे मन सांगते. परंतु बिघडली नाहीं [आकृति] बिघडली आहे पण पश्चात्ताप घडला आहे. [आकृति] दुसऱ्यांच्या बलात्कारानें बिघडला आहे. [आकृति] जारिणींच्या मैत्रीने दुर्मार्ग शिकत आहें. [आकृति] विनाकारण अपकीर्ती आली आहे बिघडली नाही.

या कन्येचें गोत्र काय ?— ७ व्या स्थानांतील शकल ४ थ्या स्थानांत तकरार करील तर पितृ पक्षाच्या गोत्राची. १ ल्या स्थानांत तकरार करील तर मातृपक्षाच्या गोत्राची बाकीच्या स्थानी तकरार करील तर पर गोत्राचीं.

या कन्येचें घराण कसें आहे ?— ७-१४-११ स्थानांतील शकलांच्या गुणाकाराने [आकृति] [आकृति] यांतील आल्यास सत्कर्मीरत विद्वानापासून जन्मलेली असून घराणें उत्तम [आकृति] [आकृति] वैद्य, दैवज्ञ, कुशल अशांपासून जन्मलेली, घराणें उत्तम. [आकृति] [आकृति] वेद शूर असून दुष्कर्मी घराण्याची, [आकृति] [आकृति] श्रेष्ठ व श्रीमंत घराण्याची. [आकृति] [आकृति] वेद बाह्यज. [आकृति] [आकृति] वेदादिसत्कर्मजनित. बाकींच्या शकलांनीं मध्यम.

कन्या देतील काय ?— ७ व्यांत दाखील अथवा साबीत असल्यास विचारावे, देतील. खारीज असल्यास संशय. मुनकलीबनें वाङ्‌निश्चय घडणार नाही.

इच्छाशीं लग्न लावूं कां ?—७ व्यांत यांतील असल्यास लग्न लावावें. उत्तम, लग्न लाविल्यास क्लेश. तों स्त्र बरिष्ठ आहे. कारण विचारानें लग्न करून घ्या वे: लग्न लाविलें तरी प्रपंच करणार नाहीं.

हे जोडपें कसें वागेल ?— ७·१०-६·८ तील शकलाच्या गुणाकारानें यांतील येईल तर प्रेमाने. सदा कलह व प्रेम. प्रमानें चाललें तरी उपयोगाचें नव्हे प्रेमानें वागणार नाहीं कारण लग्न करू नये. सदा रोगी राहील

रीत २ रीः— ७·१ स्थानांतील शकलांच्या गुणाकारानें येणारे शकल शुभ स्थानांत तकरार करील तर मित्रत्वानें. अशुभ स्थानांत तकरार करील तर वैरत्वाने, कोठेंही तकरार नसल्यास १ ल्या रीतींतील फल सांगावें.

या जोडप्यापैकींपूर्वी कोण मरेल ?— कुंडलीतील फक्त शून्यें मोजून त्या सख्यस २ नें भागावे. १ राहिल्यास पूर्वी बायको मरेल. ० राहिल्यास पूर्वी पती मरेल.

या जोडप्यांची प्रीती जुळली आहे काय ?— १४ व्या स्थानांत यांतील असल्यास स्वेच्छेनें व आनंदानें जुळले आहे. नवरा कांहीं चिंतेत होता ह्मणून जुळले नाहीं. स्त्रीची इच्छा मात्र होती. जुळलें तरी उपयोग नाहीं. एकमेकांचा स्पर्श झाला. स्त्रीच्या इच्छनें जुळलें आहे.

नवऱ्याची प्रीती आहे काय ?— १-१० स्थानांतील शकलांच्या गुणाकारानें शुभ शकल असेल तर प्रेम आहे. अशुभ असेल तर नाहीं.

रीत २ रीः— १ ल्या स्थानांत यांतील असल्यास सत्कर्मी नम्र भावनें चालणारा व प्रीतिवंत आहे. आळशी, क्रोधी व दरिद्री असल्यानें

प्रेम नाही. 1110 0100 0110 0000 परदेशगामी असून फटिंग आहे. कारण प्रेम कमी आहे. 1010 0110 1000 0010 खोटें बोलणारा. दुष्ट स्त्री अभिलाषी आणि अहोरात्र त्राशिक आहे. 1111 1001 मध्यम गुणाचा आहे.

नवऱ्यानें दुसरें लग्न केल्यास कसें ?– २ ऱ्या स्थानांत 1010 1101 0011 0001 यांतील असल्यास करावे उत्तम. 1111 0111 1101 1001 यांतील असल्यास सवती मत्सर होणार ह्मणून कष्टानें स्थिती बरी. 1110 1010 0100 0011 1000 0010 0000 यांतील असेल तर परिणाम चांगला होणार नाहीं.

पुनर्विवाह केला तर कसें ?— १२ व्या स्थानांत ० हें असल्यास सुखाचा. १-२ स्थानांतील शकलांच्या गुणाकारानें शुभ शकल आले तर हल्लींचीं स्त्री उत्तम. २-८ च्या गुणाकारानें येणारें शकल शुभ असल्यास दुसरीं स्त्री उत्तम आहे, करावा,

त्या दोघी कशा चालतील ?– ७ व्या व ९ व्या स्थानांत शुभ शकलें असतील तर आनंदानें प्रपंच चालवतील. अशुभ असतील तर कलहकारक आहेत.

इचें लग्न झाल्यास कशी वागेल ?– ७-१४ स्थानांतील शकलांच्या गुणाकारानें शुभ शकल आल्यास अंत्यकालपर्यंत पतिव्रतापणाने वागेल. अशुभ आल्यास वागणार नाहीं हीच रीत नवरा मेल्यानंतरही विधवेच्या गुणाविषयीं पहावी.

गुप्त झालेला जिवंत आहे काय ?– १५ स्थानांपर्यंतच्या शकलांतील शून्यें मोजावी. ती संख्या ३२ पेक्षां अधिक झाल्यास जिवंत आहे कमी झाल्यास मेला.

रीत २ रीः– ७ व्या स्थानांत 1010 1111 0110 0111 1101 1000 0110 यांतील असून १४व्यांत अशुभ शकल असल्यास मेला. वरील शकला व्यतिरिक्त असल्यास जिवंत आहे.

रीत ३ रीः– १-४-७-८-९ स्थानांत 1010 1111 0110 0111 1101 1101 1000 यांतील शकलें असल्यास मेला.

रीत ४ थीः– कुंडलीतील तेज आणि वायु विभागाची प्रकट शून्यें मोजावी. तेजाचीं शून्यें अधिक झाल्यास जिवंत आहे. आणि वायूचीं शून्ये अधिक झाल्यास मेला.

कोणत्या स्थितींत आहे ?– ७ व्या स्थानांत यांतील असल्यास मार्गांत आनंदांत आहे. मार्गांत आहें पण दुःखी आहे. संकटांत आहे. अति दुःखांत आहे; उत्तम स्थितींत आहे.

कोणत्या दिशेस आहे ?– १ ल्या स्थानांत पडलेल्या शकलावरून दिशा सांगावी.

केव्हां येईल ?– ४ थ्या स्थानांत यांतील असल्यास तीव्र येईल. हें १-२-३-४ या स्थानांत तकरार करील तर लवकर येईल. ९-१०-११-१२ त तकरार करील तर पुढें गेला. १-२-४-५ स्थानांत दाखील ७-८-९ स्थानांत खारींज असतील तर लवकर येईल.

रीत २ रीः– हें शकल १-२-३-४ मध्यें तकरार करील तर एका वर्षानें ५-६-७-८ मध्यें तकरार केल्यास एका महिन्यानें ९-१०-११-१२ त तकरार केल्यास ७ दिवसांनी. आणि १३-१४-१५-१६ एका दिवसांत अगर सप्तकांचे आंतच येईल

रीत ३ रीः– १० व्यांत यांतील असल्यास दूर गेला यांतील असल्यास मार्गांत आहे. यांतोल असल्यास लवकरच येईल. आणि यांतील असल्यास दुःखी आहे.

कोणत्या स्थितीनें येईल ?– ७ व्यांत द्रव्य मिळवून घोड्यावर बसून आनंदांत येईल. यांतील असल्यास वाईट स्थितीने संकटांत आहें लवकरच येईल. पुष्कळ पैसा मिळवून घेऊन येईल. पाल-

खीत बसून येईल चालत येईल. बैलावर अगर उंटावर बसून येईल. हत्तीवर बसून येईल.

एकटाच आहे किंवा कसें ?— ८ व्या स्थानांत हें असेल तर त्याजबरोबर एक पुरुष आहे. यांतील असेल तर एक स्त्रीबरोबर आहे वरील शकलें. ११-१२-१३ स्थानांत तकरार करील तर स्वरूपसंपन्न अशी एक रखाऊ आहे. बाकींच्या शकलांनी एकटाच आहे.

हा माझ्याशीं वैर करील काय ?— ७ व्या स्थानांत शुभ शकल असल्यास वैरत्व करणार नाहीं. लाभकारक. अशुभ असेल तर वैरत्व करील.

मी खरा कीं वैरी खरा ?— ७ व्या अशुभ शकल असल्यास वैरी खोटा १ ल्या स्थानांत शुभ असेल तर प्रश्नकर्ता खरा आहे.


उभयतांतील न्यायाचा परिणाम कसा ?— ७ व्यांत यांतील असल्यास न्याय वाढेल. बाकीच्या शकलांनी आपसांत मिटेल.

ठेविलेलें तेथेंच असेल काय ?— १० व्यांत वायूचें शकल असल्यास पश्चिमेस उच्च स्थानांत आहे. पृथ्वीचे असल्यास दक्षिणेस भूमींत आहे. जलाचें असल्यास उत्तरेस पाण्याजवळ बाकीच्या पदार्थांसह आहे. तेजाचे असल्यास पूर्व दिशेस विस्तवाजवळ आहे.

चोरी गलेली खरी काय ?— कुंडलींत कोणत्याही स्थानांत यांतील शकले तकरार करतील तर खरीं. बाकीच्या शकलांनी खोटी आहे.

रीत २ रीः— हीं कुंडलींत तकरार करतील तर विसरला आहे. यांची तकरार असल्यात चोरी गेलेली खरी. १-२-६-७ स्थानांत यांतील असल्यास स्वतः खर्च करून विसरला आहे.


रीत ३ रीः— २-६ स्थानांत दाखील असल्यास कांहीसीं चोरी गेली आहे. २ व्यांत अशुभ खारीज ४ व्यांत शुभ दाखील अथवा ६-१०त खारीज असल्यास चोरी गेलेलीं खरी.

रीत ४ थी:–  यांतील असल्यास चोरी गेलेली खरी. बाकीच्या शकलांनीं नाहीं.

चोरी सांपडेल कीं नाहीं ?— ६-७ स्थानांतील शकलांच्या गुणाकारानें दाखील आल्यास मिळेल. अशुभ खारीज आल्यास मिळणार नाही.



रीत २ रीः– कुंडलींतील रेखा दुप्पट करून व शून्यें असतील तितकी मिळवून त्या संख्येस २ नें भागावे. १ राहिला तर मिळेल. ० राहील तर मिळणार नाही. फक्त शून्यांच्याच संख्येस २ नें भागावे. १ राहिला तर मिळणार नाही. ० राहील तर मिळेल.

रीत ३ रीः– १-२ स्थानांत दाखील अथवा साबीत असून ८ व्या स्थानांत खारीज अथवा मुनकलीब असल्यास नाहीं.

रीत ४ थी:– २-६ स्थानांत  यांतील असल्यास प्रश्नकर्त्याचें विचारणें विस्मृतीचे आहे.  यांतील असल्यास तें धन खर्च करून विसरला आहे.

रीत ५ वी:– २-११-१-१५ स्थानांतील शकलांच्या गुणाकारानें दाखील अथवा साबीत शकल असेल तर मिळेल. खारींज अथवा मुनकलीबनें मिळणार नाहीं. १५ व्या स्थानांत  हें असून २ ऱ्यांत दाखील असल्यास चोरी गेलेली सर्व मिळेल. तेथें अशुभ मुनकलीब असल्यास अर्धी मिळेल. अशुभ खारीज असल्यास कांहींच मिळणार नाही. २-८ स्थानांत अशुभ खारीज शकलें असल्यास चोर द्रव्यासह दूर गेला.

रीत ६ वी:– १-२-४-९ स्थानांत शुभ दाखील, ७-११ त तकरार, १५ व्यांत दाखील असेल तर लवकर मिळेल.

रीत ७ वी:– ७ व्यांत  यांतील असल्यास अनायासे सर्व द्रव्य मिळेल  यांतील असल्यास थोडें मिळेल.  यांतील असल्यास प्रयत्नाने मिळेल.  या शकलांनी मिळणार नाही.

रीत ८ वी:– १-१४-८ यांतील शकलांच्या गुणाकाराने शुभ दाखील येईल तर कष्ट नसतां सांपडेल. अशुभ दाखील येईल तर प्रयत्नानें मिळेल. खारीज मुनकलीबने मिळणार नाही.

कोणत्या दिशेच्या चोरांनीं केली ?– ४ थ्या स्थानांत तेज शकल असल्यास पूर्वेच्या, पृथ्वीचे असल्यास दक्षिणेच्या, वायूचे असल्यास पश्चिमेच्या आणि जलाचें असल्यास उत्तरेच्या लोकांनी केली.

द्रव्य चोरांनीं खर्चिलें असेल काय ?– २-५-१६ स्थानांत खारीज अथवा मुनकलीब असल्यास खर्चिले. दाखील अथवा साबीत असल्यास खर्चिले नाहीं. एकमेकांविरुद्ध शकले असल्यास विकणार आहेत.

चोरी झालेली वेळ कोणती ?– १ ल्यांत मेष, तूळ, धन, सिंह, कुंभ यांचें शकल असल्यास दिवसा. बाकींच्या शकलांनीं रात्रीस गेली.

चोरी कोणी केली ?– ७ व्यांत तेजाचें अथवा वायुचें शकल असल्यास पुरुषांनीं. जलाचें अथवा पृथ्वीचें असल्यास बायकांनी केली.

रीत २ री:– ८-१२-४-१५ तील शकलांच्या गुणाकारानें येणारे शकल १–२ या स्थानांत तकरार केल्यास घरच्याने. ३-४-७ स्थानांत तकरार केल्यास आपल्या जवळच्या आप्तानें. ५ व्यांत तकरार केल्यास सेवक अथवा वेश्येकडे राहणाराने. ६ व्यांत दास दासींच्या संबंधाच्या. ८ व्यांत चांडाल, घातकी, यांच्याकडच्या. ९ व्यांत प्रवाशी अथवा सन्याशाच्या मित्रानें. १० व्यांत श्रीमंत अथवा अधिकाऱ्यांच्या मदतीच्या. ११ व्यांत मित्र व आप्त लोकांशीं मिळून वागणारानें. १२ व्यांत कैदी. १३-१४-१५-१६ त असल्यास परदेशाच्या. तें कुंडलींत असल्यास शकुन क्रमानें कोणते आहे त्यावरून वरीलप्रमाणें फल सांगावे

रीत ३ री:– कुंडलींतील रेखा दुप्पट करून त्यांत सर्व शून्यें मिळवून त्या संख्येस ३ नें भागावे. १ राहिल्यास घरचा, २ राहिल्यास गांवचा, ० राहिल्यास परगांवच्याने केली.

चोराचें वय काय होईल ?— ७ व्या स्थानांतील शकल १-२-३-४ स्थानांत तकरार केल्यास त्यावरून कुमार, तरुण आणि वृद्ध जाणावे.

रीत २ रीः— कुंडलींतील रेखा सर्व द्विगुणित करून त्यांत सर्व शून्यें मिळवावी. त्या संख्येस ३ ने भागावे. १ राहिला तर तरुण. २ राहिले तर कुमार. ० राहील तर वृद्ध.

रीत ३ रीः— ७ व्यांतील शकल १-२-३-४यांत तकरार केल्यास १६ वर्षाचा ५-६-७-८ मध्यें तकरार केल्यास २४ वर्षाचा, ९-१०-११-१२ यांत तकरार केल्यास ५० वर्षाचा, आणि १३-१४-१५-१६ यांत तकरार केल्यास ५० ते ८० वर्षाचा.

कोण जातीचा आहे ?— ७ व्यांतील शकल १-२-३-४ यांत तकरार केल्यास ब्राह्मण. ५-६-७-८ यांत तकरार केल्यास क्षत्रीय. ९-१०-११-१२ यांत तकरार केल्यास वेश्य आणि १३-१४-१५-१६ यांत तकरार केल्यास शूद्र असे सांगावे

त्याचा रंग कसा आहे ?— कुंडलींतील सर्व शकलांच्या रेखा दुप्पट करून त्यांत शून्यांची संख्या मिळवावी व ३ नें भागावे. १ राहिला तर पिवळा असून काळी झांक आहे. २ राहिलें तर लोहित आणि गोरा. ० राहिल्यास पिवळा असून गोधूम रंगाची झांक मारते.

कोणत्या वस्तु चोरल्या ?— ७ व्यांत तेजाचे शकल असल्यास सोनें, मणि, मोती. वायूचें असल्यास चांदी, दागीनें व कपडे. जलाचें असल्यास तांब्याची भांडी आणि कर्बूर वस्तु. पृथ्वीचें असल्यास कमी किमतीच्या व हलक्या वस्तु.

रीत २ रीः— ६ व्यांत असल्यास रत्न, सोनें व कांसे. द्रव्य, गंधक व मनशीळ. तांबें, शीस व लोखंड. रत्न, कांचेच्या कुप्या व पाषाण. मोती, माणिक व चांदी. शीस, लोह व पाषाण. विशेष किमतीची शिळा. माणिक, रक्तपाषाण, तांबे व लोह. मोती, कंठशुक्तिका, वंग. सोनें, व हीरकमुद्रिका. सुमौक्तिकनील, चांदी व लोकरींचे कपडे. सूत्रपाटिका व लोह. तांबे व पितळ. मोती, सोनें व प्रवाळ. रुपें व बीज. रुपें पारा वगैरे.

रीत ३ री:— ७ व्या स्थानांत हे असेल तर नील वर्णांचे मणीं, सोनें, काळें जनावर, कापडाची गांठ, पशु, सीस व ताप्ता. असेल तर बायकांचे अलंकार व तांब्याची भांडी. असेल तर हत्यार आणि लोखंडी जिनसा. असल्यास पशु व धान्य. असल्यास आभरण. कागद व बायकांचें कपडे. असल्यास पशूंच्या अंगावरील जिनसा आणि अलंकार. असल्यास लोखंड, राळे, नाचणे, जोंधळे वगैरे कमी प्रतीचे धान्य. स्त्रियांचे अलंकार व रंगीत कपडे. रुपये, रुप्याचा माल ताप्ता व भांडी. सोने, द्रव्य आणि सुवर्णालंकार. पशु, धान्य व लांकडें. कापडें, कांबळें जमखाने वगैरे. धान्य, पशु, सूत व रेशीम. कमी किंमतीचे कापड. तांबे, लोखंडी भांडीं आणि धातु. रुपये आणि कग्रवान पांढरे कपडे.

चोर आपोआप सांपडेल काय ?— कुडलींतील दर्शादर्शक बिंदु मोजून २ नें भागावे. १ राहिला तर नाहीं. ० राहिलें तर सांपडेल.

चोर गांवांतच आहे काय ?— ३ ऱ्या स्थानांत खारीज शकल असेल तर जवळच आहे. ९ व्यांत स्थानांत खारीज शकल असेल तर दूर गेला. त्या दोन्हीं स्थानांत खारीज नसेल तर त्यांतील बलिष्ठ शकल पाहून सांगावे ३-९ स्थानांत खारीज आणि बलिष्ठ शकल नसेल तर गांवींच आहे.

रीत २ री:— १-४-७-१० स्थानांतील शकलांच्या गुणाकाराने येणारे शकल दाखील अगर साबीत असेल तर गांवांत आहे. खारीज मुनकलीब आल्यास गांव सोडून गेला.

रीत ३ री:— १४-१५-८-१२ स्थानांतील शकलांच्या गुणाकाराने यणारे शकल दाखील अगर साबीत असेल तर गांवीच आहे खारीज मुनकलीबने नाहीं.

रीत ४ थी:— ४-१० स्थानांत दाखील अगर साबात शकलें असतील तर गांवांत आहे. दोन्हीं स्थानांत खारीज मुनकलींब असतील तर नाहीं. अन्योन्य विरोधी शकलें असतील तर गुणून येणाऱ्या शकलावरून फल सांगावें.

रीत ५ वी:— ७ व्या स्थानांतील शकल ३-४-६-९-१२ स्थानांत तकरार करीत असेल तर याच गांवी आहें. ७ व्या स्थानांत यांतील शकल

असून ४ थ्यांत तकरार असेल तर गांव सोडून जाण्याच्या बेतांत आहे. ३ ऱ्या स्थानांत तकरार करील तर गेला.

कोणत्या दिशेस व कोठें आहे?— ७ व्या स्थानांतील शकल उमहातमध्यें तकरार करील तर अर्ध्या कोसावर. बिनहात आणि मुनवलीदात या दोन्होंमध्यें तकरार करीत असेल तर २ कोस गेला जवायदातमध्यें तकरार करील तर १ कोसावर आणि मुतवलिदातमध्येंच तकरार असेल तर दूर गेला.

रीत २ रीः— वरील शकल १ ल्या स्थानांत तकरार करील तर १०० हाता-वर. २ ऱ्या स्थानांत तकरार करील तर २०० हातावर. ३ ऱ्यांत तकरार करील तर ३०० हातावर. याप्रकारे प्रत्येक स्थानास १०० प्रमाणें १६ व्या स्थानांपर्यंत वाढवावें आणि दाखील असून तकरार असेल तर सर्व संख्येंत तकरारी संख्या वजा करून उत्तर सांगावें.

रीत ३ रीः— चोर दूर गेला कीं जवळ आहे या गोष्टीचा निर्णय वि. ज. द. ह. क्रमानें करून योजन, कोस, मैल वगैरेचा निश्चय करावा.

रीत ४ थीः— ९-५-६-७ स्थानांतील शकलांच्या अ. ब. द. ह. पंक्तीच्या क्रमानें शून्य आणि रेखांचीं संख्या करून त्या संख्येस ५ व्या स्थानांतील शक-लांच्या अ. ब. द. ह. पंक्तीच्या संख्येनें भागावे. शेषांकावरून तेवढ्या घरांचा वगैरे अंतर जाणावा.

अंतर दाखविणारे कोष्टक.

क्रमांक	१	२	३	४	५	६	७	८	९	१०	११	१२	१३	१४	१५	१६
शकलें	lllo	oool	lolo	llll	oloo	ollo	olll	llol	loll	lloo	ooll	looo	oolo	oool	lool	oooo
संख्या	३	१३६	१०५	१२०	१५३	३६	२८	१०	४५	४८	२१	१५	६	६६	९१	१९०

रीत ५ वीः—कुंडलींतील सर्व शकलांस अनुसरून वर दाखविलेल्या कोष्टका-प्रमाणें संख्या मिळवून ५–८ स्थानांतील संख्येनें भागून शेषांकांस अनुसरून तेवढ्या घरांचें अथवा गांवांचें अंतर असें जाणावें.

रीत ६ वी:- १० व्या स्थानांतील शकलाची दिशा निर्णय करावी. अथवा ७ व्या स्थानांतील शकल १-२-९-१२ व्या स्थानांत तकरार करील तर पूर्व. ३-४-१०-१५ त तकरार करील तर दक्षिण. ५-६-११-१६ त तकरार करील तर उत्तर. आणि ७-८-१३-१४ त तकरार करील तर पश्चिम दिशेस आहे असें जाणावें.

चोराच्या घराचें दार कसें आहे ?- ९ व्या स्थानांत यांतील असेल तर कोरलेलें आहे. यांतील असेल तर चुना लाविलेलें आहे. यांतील असेल तर चित्रविचित्र असून फारच सुबक आहे. यांतील असेल तर अनेक प्रकारचे रंग लाविलेलें आहे. यांतील असेल तर शेणानें सारवून स्वच्छ केलेलें आहे. यांतील असेल तर अलंकारयुक्त आहे. यांतील असेल तर एका कोन्यांत असून तेथें अंधार आहे. यांतील असेल तर त्या घरांस दरवाजाच नाही असें जाणावें.

चोर कोणास सांपडेल ?- १० व्या स्थानांत हें असेल तर प्रश्नकर्त्यास मित्र अगर सेवकास; आप्तइष्टांस; बापास अगर चुलत्यास प्रयत्नानें मिळेल; मुलास अगर प्रीतिपात्रास आपल्या नोकरास; वैरी अगर विलासिनींस; पंडितास; प्रश्नकर्त्यास; सुहृदास; दायादास; मित्र, सेवक अगर आप्तांस मिळेल.

चोरानें माल कोठें ठविला आहे ?- २-१०-१०-१२ स्थानांतील शकलांच्या गुणाकाराने यणारे शकल हें असेल तर देवालयाजवळ; भूमींत दक्षिण दिशेस; मूत्रकुंडाजवळ अगर ओसाड घरात पूर्व दिशेस; दक्षिण दिशेस भूमीत; पश्चिम दिशेस कोनाडयांत आहे; संपुटांत घालून दक्षिण दिशेस पुरलेलें आहे; उंच घराजवळील जागेंत भांडयांत घालून पुरून ठेविलेले आहे; ओसाड भूमींत अगर विस्तव असणाऱ्या छपराजवळ; रमणीय स्थळ अथवा ओल्या गवतांत; चुलीजवळ अथवा चोर स्वत: बसण्याच्या जागेजवळ अगर दोन्ही घरच्या बोळांत; भूमींत असून राजमार्गाच्या उत्तरेस; चुलीजवळ अगर अन्नशाळेंत; उत्तर दिशेस ओलसर भूमीजवळ;

महालाजवळ अगर बागेजवळ दक्षिण दिशेंस; पश्चिम दिशेस उकिरड्या-जवळ, स्मशानांत, मसजिदीं दरवाज्याजवळ; मार्गात श्रेष्ठ स्थानाजवळ पुरलेलें आहे.

रीत २ रीः— १०-८-६-१२ स्थानांतील शकलांच्या गुणाकारानें येणाऱ्या शकलावरूनही वरील फल सांगावे.

चोराचें कपडे कसें आहेत ?— १२ व्या स्थानांत यांतील शकल असल्यास पांढरे असून पिवळे मिश्र आहे. अस्मानी रंगाचें असून दरिद्रपणाचें आहेत. पांढरे आणि काळे मिश्रित. तांबडे आणि पांढरे मिश्रित कपडे. तांवडे, काळे मिश्रीत असून कांबळें वगैरे आहे. काळे कापड आहे. तांबडी बनात वगैरे. पांढरे, सूक्ष्म, अधिक किमतीचें. पिवळे आणि पांढरे मिश्र. मौल्यवान असून सूक्ष्म आहेत. काळे असून भिकार. नील वर्ण व तांबडे मिश्र. मिश्र रंगाचें. काळे आणि पांढरे मिश्र. अनेक रंगाचें असून पांढरे आहेत.

चोराचें स्वरूप वर्णन ?— ७ व्या स्थानांतील शकल अ. ब. द ह. पंक्तीत ज्या स्थानाचें असेल त्या स्थानास अनुसरून कुंडलींत जें शकल असेल त्या शकलाचे गुणरूप वर्णन, १ ल्या भागांत सांगितलेलें आहे त्यावरून सांगावे.

चोराचें नांव काय ?— १ पासून १५ स्थानांपर्यंत वायु आणि जल तत्व विभागांतील दर्शक आणि अदर्शक बिंदु मोजून त्या संख्येस ९ने भागावे. शेषांकावरून खालचीं अक्षरे घ्यावी. आणि तोच शेषांक पहिल्या स्थानापासून मोजून ज्या स्थानी स्थिर होईल. तेंथील शकलावरून अ. ब. द. ह. क्रमाने सख्या करून त्या संख्येस ९ नें भागावे शेषांकावरून खालोल अक्षरे घ्यावीं. याप्रमाणें पूर्ण नांव तयार करावें.

अक्षरें— १ अ. य. क. ग.; २ व. क.; ३ ज. ल. श.; ४ र. म. त.; ५ ह. न. त्स.; ६ व. स. ष.; ७ ह.; ८ फ. त. ल. स. ज. ण.; ० काना, मात्रा

अनुस्वार वगैरे. अ आल्यास अं अः पर्यंत एकच उपयोग. आणि ब. प. फ. भ. हीं एकच स्वरूपाची आहेत.


रीत २ रीः— कुंडलींतील तेज विभागांतील दर्शादर्शक बिंदूंची संख्या करून त्या सख्येसे ९ ने भागावे शेषांकावरून वायु विभागांतील दर्शादर्शक बिंदु मोजून ११ ने भागावे. त्या शषांकावरून जल विभागांतील दर्शादर्शक बिंदु मोजून १४ नें भागावे आणि त्या शषांकांवरून पृथ्वी विभागांतील दर्शादर्शक बिंदु मोजून त्या संख्येस १६ नें भागावे. तो शेषांक १ ल्या घरापासून मोजत कोणत्या स्थानीं स्थिर राहाल तेथील शकलाचें अक्षरच प्रथमाक्षरच जाणावें.

रीत ३ रीः— फांसे टाकून कुंडली तयार करून त्यांत ooo हें शकल ज्या स्थानीं पडलें असेल तें पाहून नामोत्पादक कोष्टकांत सांगितल्याप्रमाणें अक्षरे काढावीत. ooo हें शकल १ ल्या स्थानांत असेल तर ७ अक्षरांचे,२ र्‍यांत २ अक्षराचें,३ऱ्यांत ३ अक्षराचें, ४ थ्यांत ४ अक्षराचें, ५ व्यांत ५ अक्षरांचे, ६ व्यांत ६ अक्षरांचें, ७ व्यांत ७ अक्षरांचें, ८ व्यांत ६ अक्षरांचें, ९ व्यांत ५ अक्षरांचें, १० व्यांत ४ अक्षरांचें, ११ व्यांत ३ अक्षराचें, १२ व्यांत ७ अक्षरांचें, १३ व्या स्थानांत असेल तर प्रश्न कुंडलींतील २ ऱ्या स्थानांतील शकलांच्या अ. ब. ज. द. संख्ये- इतकी अक्षरे. १४–१६ त ooo हे शकल असेल तर ४ अक्षरांचें नांव असें जाणावें. आतां तें शकल तकरार करीत असेल तर बलाबलतेचा विचार करून सांगावें. फरहा शकल कुंडलींत नसेल तर १ ल्या स्थानांतील शकलाच्या अ. ब. ज. द. संख्येस अनुसरून अक्षर मालिका निर्णय करावी, पुढील बि. ज. द. ह. क्रमाने नामोत्पादक कोष्टक पहा.

बि. ज. द. ह. क्रमेण नामोत्पादक कोष्टक.

संख्या	१	२	३	४	५	६	७	८	९	१०	११	१२	१३	१४	१५	१६
बिजदह	o|oo	|||o	ooo|	|o||	oooo	|o|o	||o|	o|||	||oo	o|o	|oo|	oo||	|ooo	oo|o	o|o|	||||
१	अ	ब	ज	द	ह	व	ज	ह	त	य	क	ल	म	न	स	अ
२	ब	ज	द	ह	ब	ज	ह	त	य	क	ल	न	स	अ	फ	स
३	ज	द	ह	ब	ज	ह	त	य	क	ल	म	न	स	अ	फ	स
४	द	ह	ब	ज	ह	त	य	क	ल	म	न	स	अ	फ	स	क
५	ह	ब	ज	ह	त	य	क	ल	म	न	स	अ	फ	स	क	र
६	ब	ज	ह	त	य	क	ल	म	न	स	अ	फ	स	क	र	श
७	ज	ह	त	य	क	ल	म	न	स	अ	फ	स	क	र	श	त
८	ह	त	य	क	ल	म	न	स	अ	फ	स	क	र	श	त	स
९	त	य	क	ल	म	न	स	अ	फ	स	क	र	श	त	स	ख
१०	य	क	ल	म	न	स	अ	फ	स	क	र	श	त	स	ख	य
११	क	ल	म	न	स	अ	फ	स	क	र	श	त	स	ख	य	ज
१२	ल	म	न	स	अ	फ	स	क	र	श	त	स	ख	य	ज	ज्य
१३	म	न	स	अ	फ	स	क	र	श	त	स	ख	य	ज्य	ज	ग
१४	न	स	अ	फ	स	क	र	श	त	स	ख	य	ज	ज्य	ग	अ
१५	स	अ	फ	स	क	र	श	त	स	ख	य	ज	ज्य	ग	अ	व
१६	अ	फ	स	क	र	श	त	स	ख	य	ज	ज्य	ग	अ	व	ज

१-१३ स्थानांतील शकलांच्या गुणाकाराने येणारे शकल कुंडलींत ज्या स्थानी असेल ती संख्या मागील कोष्टकांत ऊर्ध्वाधर पाहून त्या संख्येस थांबावे, आणि ते शकल तिर्यक क्रमानें ऊर्ध्व भागीं कोठें आहे ते पाहून त्याखालीं तसेंच उतरून वरील स्थानास थांबून तेथील प्रथमाक्षर काढावे. आणि ४-१४ स्थानांतील शकलांच्या गुणाकाराने वरीलप्रमाणें द्वितीयाक्षर. ७-१५ स्थानातील शकलांच्या गुणाकाराने त्रितीयाक्षर. १०-१६स्थानांतील शकलांच्या गुणाकारानें चतुर्थाक्षर. १-३-५-७-९-११-१३-१५ स्थानांतील दर्शक बिंदूंच्या संख्येस १६ ने भागून आलेल्या शेषांकास अनुसरून वरील प्रमाणें ५ वे अक्षर. १-४-७-१० स्थानांतील दर्शादर्शक बिंदु मोजून त्या संख्येस १६ नें भागून आलेल्या शेषांकास अनुसरून वरील प्रमाणें ६ वे अक्षर. आणि १३-१४-१५-१६ स्थानांतील दर्शक बिंदूंच्या संख्येस १६ ने भागून आलेल्या शेषांकास अनुसरून ७ वें अक्षर काढून सर्व अक्षरे जुळवून नांव तयार करावे.



उदाहरण कुंडली:- कुंडलीतील १-१६ स्थानांतील शकले गुणल्यामुळें (०००) हें शकल तयार झाले. तें शकल कुंडलींत ५ व्या स्थानी आहे ह्मणून मागील अक्षर साधन कोष्टकांतील तिर्यक क्रमानें १० व्या स्थानांत आहे. आणि ऊर्ध्वाधर रीतीनें ५ वें स्थान धरून काटकोनानें 'स' अक्षर आहे हेंच प्रथमाक्षर. ४-१४ स्थानांतील शकलांच्या गुणाकारानें (०००) हें शकल तयार झालें. तें ६ व्या स्थानी आहे. अक्षर साधन कोष्टकांत तें ५ व्या स्थानी आहे. ऊर्ध्वाधो भाग आणि तिर्यक क्रमानें काटकोनांत पहातां "य" अक्षर आहे. हें द्वितीयाक्षर. ७-१५ स्थानांतील गुणाकाराने (००) हें शकल तयार झाले तें १४ व्या स्थानांत कुंडलीत आहे. आणि तिर्यक क्रमाने १४ व्या स्थानांत आहे. काटकोनांत तेथें "ज्व" अक्षर आहे. हें तृतीयाक्षर. १०-१६ स्थानांतील शकलाच्या गुणाकारानें (०००) हें शकल तयार झाले. तें कुंडलीत नाहीं ह्मणून त्या शकलांचो बि. ज. द. ह. संख्या १९ झाली त्या संख्येस १६ नीं भागिले असतां ३ शेष राहीलें. ऊर्ध्वाधोभागानें आणि तिर्यक क्रमानें काटकोनांत "ह" अक्षर आहे, हें चतुर्थाक्षर. तें शकल कुंडलीत नसेल तर वरीलप्रमाणेंच बि. ज. द. ह.

संख्येनें पुनः अक्षर तयार करावें. १-३-५-७-९-११-१३-१५ स्थानांतील दर्शक बिंदूची संख्या १३ झाली. त्या संख्येस १६ ने भागावे तर भाग जात नाहीं ह्मणून १३ च शेषांक धरावे १३ व्या स्थानांत ☷ हें शकल आहे. ऊर्ध्वाधो भाग आणि तिर्यक क्रमानें काटकोनांत 'अ' अक्षर आहे. ते पंचमाक्षर. १-४-७-१० स्थानांतील दर्शादर्श बिंदूंची संख्या २७ झाली. १६ चा भाग दिल्याने ११ शेष राहिलें ११ व्या स्थानी ☷ हें शकल आहे. ऊर्ध्वाधो भागाने आणि तिर्यक क्रमाने तें ११ व्या स्थानी आहें ह्मणून काटकोनांत "र" अक्षर आहे. तें षष्ठाक्षर. १३-१४-१५-१६ स्थानांतील दर्शक बिंदूंची संख्या ९झाली आहे. १६ ने भाग जात नाहीं ह्मणून ९ शेषांक धरून पाहतां कुंडलीत ९ व्या स्थानीं ☷ हें शकल आहे. ऊर्ध्वाधो भागानें आणि तिर्यक क्रमानें 'य' अक्षर आहे. ते सप्तमाक्षर. याप्रमाणें अक्षरें तयार करावी.

वर दाखविलेल्या रीतीप्रमाणें अनुक्रमानें "सयज्वल अरय" अक्षरें तयार झाली. यवन लोक आपल्या ग्रंथांत जेर. जबर. पेष. (ए. अ. औ.) याप्रमाणें स्वराक्षरें जोडून पूर्णोच्चार करितात.

जमावांतील चोरास प्रत्यक्ष धरणे ?— कुंडलींत दाखील अथवा साबीत शकलें असली तर या मंडळीत चोर आहे. खारीज अगर मुनकलीब असतील तर नाही. याप्रमाणें प्रथम निश्चय करून त्या मंडळीचे दोन भाग करून प्रत्येक भागासाठीं निरनिराळी कुंडली मांडावीं आणि वरीलप्रमाणें दाखील साबीत पहावें. याचप्रमाणें एक मनुष्य राहीपर्यंत तयार करून हाच चोर आहे असें जाणावे.

रीत २ रीः— ६ व्या स्थानांत ☷ हें, २ अगर ९ व्या स्थानांत ☷ हें, १ अगर ४ व्या स्थानांत ☷ हें शकल असल्यास प्रश्नकर्ता चोर असें जाणावे.

रीत ३ रीः— ☷ ☷ ही शकलें कुंडलींत असतील तर या समाजांत चोर आहे. ती शकलें नसल्यास नाहीं असे जाणावें. या दोन्हींतील एखादे शकल असून, बलिष्ठ असेल तर चोर आहे, निर्बल असेल तर नाहीं. चोर आहे असें ठरल्यानंतर १ ल्या भागांत सांगितल्याप्रमाणें विभाग करून चोरास धरावें.

रीत ४ थीः– चोर आहे असा संशय आलेल्या मंडळीस आपल्यापुढें क्रमानें उभे करुन फांसे टाकून कुंडली तयार करुन ५-६-७ स्थानांतील शकलांच्या अ. ब. ज. द. पंक्तीस अनुसरून संख्या तयार करून उभारलेल्या मंडळींत उजव्या भागानें ती संख्या मोजून ज्यावर ती समाप्त होईल तोच चोर जाणावें लोका-पेक्षां संख्या अधिक झाल्यास पुनः जजवीकडून मोजावें. ज्याच्यावर समाप्त होईल तोच चोर असे जाणावें.

रीत ५ वीः– १-४-७-१० स्थानांतील शकलास १-२-३-४ स्थानांतील शक-लांनी क्रमवार गुणून आलेल्या ४ शकलांवरून नवीन कुंडली तयार करावी. इनकिलाब कुंडलींतील ४ थ्या स्थानांत खारीज अथवा मुनकलीब शकल असेल तर मंडळींत चोर नाहीं. दाखील अथवा साबीत शकल असल्यास चोर आहे असें जाणावें. याचप्रमाणें चोरास प्रत्यक्ष धरण्याची रीत आहे.

तेथें संकटीं पडावें लागेल काय ?—७ व्या स्थानांत यांतील असेल तर मिळेल पण संकटीं न पडतां पार पडल. अतिशय न मिळतां थोडसें मिळाल्या कारणानें संकटांत पडून बऱ्याच कष्टाने पार पडून येईल. अतिशय द्रव्य मिळेल परंतु रस्त्यांत सरकारीं लोक गांठतील त्या योगें गमावून घेणें भाग पडेल व मोठ्या मिनतवारीनें परतावें लागेल. गेलेल्या ठिकाणी अतिशय भय उत्पन्न होईल. माल मिळणार नाही. यांतील असेल तर फारच बंदोबस्त आहे. ह्मणून तेथेंच अडकून पडावे लागेल.

प्रवास तीव्र होईल काय ?– ७ व्या स्थानांत यांतील असेल तर बऱ्याच वर्षापर्यंत प्रवास होईल. यांतील असेलतर आळसाने प्रवास घडेल. यांतील असेल तर प्रवास केला तरी उपयोगाचा नाहीं. कांहीं कारणानें परतून येईल. कांहीं कारणानें येऊन परत जाईल.

जाण्याचें स्थळ कसें आहे ?– ७ व्या स्थानांत हें शकल असेल तर देवादिकांचे स्थान असून धनधान्यांची समृद्धी आहे. गेल्या ठिकाणीं

महत्कीर्ती होऊन धन, धान्य, शेंलकीची वृद्धी. तेथील ब्राह्मणेत्यादि लोक अतिशय प्रीती करतील. कुत्सित, निंदक, ग्रामशून्य, दुर्भिक्ष, कंटकवत लोक असल्याकारणानें लाभ नाहीं. ज्योतिषी, कारागीर, कवी, लोक बरेच आहेत लोक सुखी असून, उच्च कार्यकर्ते, वनभूमी सुपीक, गीतादि कलेत निमग्न असून आनंदित आहेत. चंडाल, म्लेंच्छ, मंत्रयंत्रादि क्रियेंत निपुण, भयाची जागा. नीच, महामूर्ख, वाईट रीतीनें द्रव्य मिळविणारे. भयानक स्थल. तांबे वगैरे धातूंच्या योगें उपजीविका चालविणारे, यवन असून भयानक आहेत. धार्मिक, निर्मल, स्मृती श्रुतींत निपुण असून धनधान्य वगैरेनी समृद्धी पावलेलें. महाजन कुलवंत, न्यायवंत, जगदीशाविषयीं विश्वासुक, धनधान्यसमृद्धिक असून कांहीं रोगी. प्रसिद्ध लोक, मोठें नगर, यवन असून मित्रोत्साहक आहेत. नीच, भयानक, उद्वेगी, व्यर्थ कार्याकरितां खर्च करणारे वंचक. परदास्यत्व, पामर, असत्यवादी, अन्यायपथसेवक, भयग्रस्त शिल्पिकार. सुखकारक, रम्यस्थान, मित्रोत्सुक, धनधान्यसमृद्धी असणारे. ब्राह्मण बरेच असून ज्योतिषीं, शुभकार्यकर्ते. धार्मिक, सुखदायक, ईशसेवक, झाडें, भूमी, द्रव्यानें समृद्धी असून सात्वीक आहेत. याप्रमाणें स्थान वर्णन जाणावें.

हें कार्य होईल काय?— ७-११ स्थानांतील शकलांच्या गुणाकारानें तयार होणारे शकल शुभ असून अशुभ स्थानांत तकरार असेल तर सुगम मार्गानें कार्य होईल. अशुभ स्थानांत तकरार असेल तर कष्टानें कार्यसिद्धी होते. तकरार नसेल तर होत नाही.

रीत २ रीः— ७-२-५-१० या स्थानांत कोठेंहीं शुभ शकल असल्यास शुभ. अशुभ असल्यास अशुभ.

तेथें किती दिवस राहणें घडेल?— १-१५ स्थानांतील शकलांच्या गुणाकारानें येणारें शकल उमहातमध्यें पुनरुक्त होईल तर वर्ष. बिनहातमध्यें पुनरुक्त होईल तर महिना, मुतवलिदातमध्यें पुनरुक्त होईल तर वार आणि जवायदातमध्यें पुनरुक्त होईल तर दोन तीन दिवसांत परत येणें घडेल.


गांवीं गेलेला कोणत्या स्थितींत आहे?— ७ वें स्थान प्रवाशाची अवस्था १०-९-१ हीं स्थाने चलन वलन स्थितीचीं आहेत. ९ वें स्थान प्रवासी

येण्याचे. १०-११ हीं स्थाने आनंदाची. ४ थें स्थान मृत्यु आणि जीवनाचे ५ वें स्थान सत्यासत्य जाणण्याचे. वरील स्थानांत शुभ शकले असल्यास शुभ आणि अशुभ असल्यास अशुभ असे जाणावें.

रीत २ रीः— ७ व्या स्थानांत शुभ शकल असल्यास प्रवासी सुखाने आहे. अशुभ असल्यास कष्टी आहे.

रीत ३ रीः— १-१३-९-११ स्थानांतील शकलांच्या गुणाकारानें साबोत अथवा दाखील शकल आल्यास प्रवासी सुखानें आहे. अशुभ मुनकलीब असल्यास द्विविध चित्त आहे. खारीज असल्यास अजुनी पुढें जाण्याचा विचार आहे.

रीत ४ थीः- कुंडलीतील दर्शादर्श बिंदु मोजून आलेल्या संख्येस ८ नें भागावें. शेषांक जो येईल त्या स्थानांतील शकलाच्या शुभाऽशुभावरून फळ सांगावे

रीत ५ वीः- ८ व्या स्थानांत  यांतील असेल तर दुःखांत असून पुढें पुढें गमन करण्याची इच्छा आहे.  आलस्यानें येईल.  लवकर येणार.  उल्हासाने येणार.  मार्गांत दुःखी आहें.  सुखी आहे. येण्याची इच्छा नाहीं.

रीत ६ वीः—  हें ६ व्या स्थानी असेल तर दुःखी. ८ व्यांत असेल तर मरण सदृश दुःखी. १—४ मध्यें दृढ बंधन बद्ध आहे.

प्रवाशानें गांव सोडिलें कीं नाहीं?— ८ व्या स्थानांत खारीज असेल तर सोडिलें. १३ व्यांत  असेल तर परत गेला. ७ व्यांत दाखील असेल तर गांव सोडले नाही. ५ व्यांत खारीज असेल तर सोडण्याच्या बेतांत आहे. १५-१६ त दाखील असले तर तीव्र येईल. १-९-१२ त खारीज असेल तर आलस्यानें येईल.

कोणत्या दिशेस आहे?—७—४ स्थानांतील शकलांच्या गुणाकारानें येणाऱ्या शकलावरून दिशा सांगावी. अथवा कुंडलीतील दर्शादर्श बिंदु मोजलेल्या संख्येस ४ नें भागिले असतां १ शेष पूर्व, २ पश्चिम, ३ उत्तर आणि ४ दक्षिणेस आहे.

रीत २ रीः– ९–८स्थानांतील शकलांच्या गुणाकारानें येणारे शकल ७–१२ स्थानांत पुनरुक्त होईल तर पूर्व, १०–११ त पुनरुक्त होईल तर पश्चिम, ६–८ स्थानांत पुनरुक्त होईल तर उत्तर आणि ४ त पुनरुक्त होईल तर दक्षिणेस आहे.

८ व्या स्थानापासून प्रश्न सांगणें.

भयस्यमृत्योःशोकस्य चिंतायाः दुःस्थितेरपि ॥ ऋणदानस्यक्लेशस्य दुर्नयस्यागमस्तथा ॥ ३९ ॥ निराशश्चतथानष्ट धनस्य गिरिकोटयोः ॥ बद्धकोष्टप्रवृत्तेश्चाप्यालयस्याष्टमाद्गृहात् ॥ ४० ॥

वैऱ्याचा मला त्रास होईल काय?— ८ व्या स्थानांत शुभ शकल असेल तर वैऱ्याचा कांहीं त्रास होणार नाहीं. अशुभ शकल असेल तर भय आहे.

मी या संकटांतून पार पडेन काय?– ८ व्या स्थानांत यांतील शकल असेल तर संकटांतून पार पडेल. यांतील असेल तर पार पडणार नाही.

माझ्यावर संकट येईल काय?– ८–१ स्थानांत यांतील असेल तर येईल. यांतील असेल तर कांहींसे संकट. हें असल्यास अधिकाधिक संकट येईल. ४ थ्या स्थानांत हें शकल असून १-८ स्थानांत अशुभ शकलें असल्यास अधिकाधिक संकट येईल. ४ थ्यांत असून ६–८–१२ स्थानांत तकरार असल्यास पूर्ण संकट येईल. ४–९–१२ स्थानांत कोठेंहीं शुभ शकल असून ८ व्या स्थानांत अशुभ असल्यास येणारे संकट आपोआप निवारण होईल. ४-७-८-१० स्थानांत शुभ शकलें असल्यास संकटाचे भय बाळगू नये. ४-७-८-१ स्थानांत ही शकलें असून कुंडलीत तकरार असल्यास खरोखर संकट येईल असें जाणावे.

माझ्या शरीराच्या कोणत्या भागी भय आहे?– ८ व्या स्थानांत हें असल्यास डोक्यास, असल्यास खांदे अगर गळ्यास. डाव्या डोळ्यास, मांडीस, उजव्या डोळ्यास अगर छातीं अथवा पोटऱ्यास, पाठ अगर

नाभीस, कंबरेस, डाव्या खांद्यास, नाभीस, जीभ अगर काळजास; पाठीस, डाव्या कानास, डाव्या कुशीखाली, उजव्या कानास, उजव्या कुशीखाली, आणि हें असल्यास सर्व शरीरास भय आहे.

माझा मरणकाळ सुखाचा कीं कसें ?— ६-४-५ स्थानांतील शकलांच्या गुणाकारानें येणारे शकल यांतील असून ८ व्या स्थानांत तकरार केल्यास कोणास त्रास न होता सर्व संकटांतून पार पडून आपोआप प्राणोत्क्रमण होईल. हें असल्यास अति कष्टानें, डोळ जावून, वीष खावून अगर अन्य तऱ्हेच्या त्रासांनी मरण येईल. यांतील असल्यास धनधान्यांची समृद्धी असतांही दु:खाने मरेल. हें असल्यास कारागृहांत अगर चिंतेने कृश होऊन मरेल. यांतील असल्यास प्रवासांत मरेल. प्रवासात अगर बंधनांत क्रूर पशूंच्या चावण्याने मरेल. यांतील असेल तर रोगानें मरेल, परंतु ८ व्या स्थानांत तकरार असली पहिजे. आणि १ ल्या स्थानांत तकरार केल्यास अतिशय हानी झाल्यामुळ भयग्रस्त होऊन मरेल.

मी ऋणमुक्त होईन कीं नाहीं ?- १-२ स्थानांत ही शकले क्रमानें असून ८ व्या स्थानांत तकरार असल्यास तीव्र मुक्त होईल. २ ऱ्या स्थानांत खारीज शकल आणि ८ व्यांत कोणतेही शुभ शकल असल्यास विलंबाने ऋणमुक्त होईल. १-२-३ स्थानांत क्रमानें ही शकले असल्यास ऋण-मुक्त होणार नाहीं.




९ व्या स्थानापासून प्रश्न सांगणें.





धर्मस्य व्यभिचारस्यातिदूर गमनस्य च ॥ भाग्योदयस्य दानस्य तथा च स्वप्न विद्ययोः ॥४१॥ स्वाभाष्टदेव सेवायाः पतितस्य श्रमस्य च ॥ स्थापितस्य धनस्यापि सवाच्योनवमाद्गृहात् ॥४२॥




आराध्य देवता प्रसन्न होईल काय ?- ९ स्थानांत यांतील असून १५-१६ स्थानांत पुनरुक्त होईल तर प्रसन्न होईल. बाकीच्या शकलांनी होणार नाही.



रीत २ री:- ९-१ स्थानांत शुभ दाखील असून ११ ध्यांत पुनरुक्त होईल तर प्रसन्न होईल. याचप्रमाणें आपणांस कोणाही ऋषीने अगर साधूने दिलेल्या आशिर्वादाचे फल आणि तीर्थं, गुरु, देव दर्शनाचे फल जाणावें.

विद्या लाभ माझ्या दैवी आहे काय ?- ९ व्या स्थानांत शुभ साबीत अगर शुभ दाखील शकलें असल्यास विद्या प्राप्त होईल. बाकींच्या शकलांनीं होणार नाही.

रीत २ री:- १-९-३-११ स्थानांतील गुणून येणारे शकल   यांतील असेल तर अति विद्या आहे.  यांतील असेल तर मध्यम विद्या येईल.  यांतील असल्यास विद्या येणार नाहीं. ही रीत परीक्षा पास होण्यास वगैरेसही लागू आहे.

कोणत्या विद्येंत निपुण होईन ?- ९-३ स्थानांतील शकलांच्या गुणाकारानें येणारे शकल  यांतील असल्यास धर्मशास्त्रादि विद्यत.  यांतील असल्यास वैद्य शास्त्रात.  यांतील असल्यास संगीत विद्येंत.  ज्योतिष शास्त्रांत.  कृषिकर्मांत.  नीच विद्येत.  प्रधानेत्यादि राजकीय विद्येंत.  मल्ल विद्येंत.  कोकशास्त्रांत प्रवीण होईल.

या शास्त्राचा अभ्यास केला तर कसें ?- ९ व्या अगर १ ल्या स्थानांत  यांतील असेल तर अभ्यासाने फल मिळेल.  यांतील असेल तर अभ्यास करूं नये.  स्वल्प लाभ.  अभ्यास करावा परंतु अति धन हानी होईल. वरील शकले शुभ स्थानांत तकरार करतील तर अनायासे शास्त्राभ्यास होईल. अशुभ असल्यास कष्टकारक जाणावे.


या शास्त्रवादांत उभयापैकीं कोण जिंकेल ?— १-३ स्थानांतील शकलांच्या गुणाकाराने  यांतील आल्यास प्रश्नकर्त्यास जय. ७-९ स्थानांतील शकलांच्या गुणांकाराने  यांतील आल्यास वैऱ्यास जय. मध्यम शकलें आल्यास समान.



मला पडलेलें स्वप्न कसें आहे ?– ९ व्या स्थानांत शुभ शकल असल्यास उत्तम. अशुभ असल्यास वाईट जाणावे.

माझे गांव लाभाचें कीं दुसरें ?– १-४ स्थानांत शुभ शकलें असून ७ व्या स्थानांत अशुभ असल्यास आपल्या गांवींच लाभ. १-४ स्थानांत अशुभ असून ७ व्यांत शुभ असल्यास परदेशांत लाभ जाणावे.

हा दूरचा प्रवास कसा होईल ?– १ लें स्थान प्रश्नकर्त्याचे; ३ रे स्थान बळाचे, ४ थें स्थान पोचण्याचें, ५ वें स्थान इच्छचे, ६ वे स्थान वैरत्वाचे, ७ वे स्थान यात्रा गमनाचे, ८ वें स्थान धनाचे, ९ वे स्थान मार्गाचें, १०वें स्थान परत येण्याचें, या स्थानात शुभ शकले असल्यास शुभ. अशुभ शकलें असल्यास अशुभ असें जाणावे.

रीत २ रीः– ९ व्या स्थानांत खारीज असल्यास प्रवास होईल. दाखील असल्यास होणार नाही. साबींत असल्यास विलंबाने होईल. मुनकलीद असल्यास मार्गातून परत येईल.

रीत ३ रीः– ९ व्या स्थानांत  यांतील असून ४ थ्या स्थानांत तकरार असेल तर गेला तरी परत येईल. २-३-४-९ स्थानांत  यांतील शकलें असल्यास जाणें होणार नाही. ९ व्या स्थानांत  असल्यास मार्ग निर्फळ. १-९-१३-१५-१६ स्थानांत खारीज शकलें असल्यास प्रवास निश्चयाने होईल. १–१५ स्थानांत  असल्यास जावून परत येईल. १–१५ स्थानांत शुभ खारीज असल्यास प्रवास होईल.  हें ९ व्या स्थानांत असल्यास जलपर्यटण होईल.

रीत ४ थीः– १-३-४-९ स्थानांत  असल्यास प्रवास हितकारक होईल. ३-५-८ स्थानांत शुभ दाखील असल्यास जाण्याच्या स्थली अति लाभ आहें. ८ व्या स्थानांत  यांतील असल्यास प्रवाशास भय आहे. जाऊं नये.

रीत ५ वी:- ९ व्या स्थानांत [०/—/—/—] असल्यास सर्व प्रकारे लाभ. [—/—/०/०] द्रव्य-संचय बराच. [०/०/—] वैरत्व. [—/—/—] भू आणि धनलाभ. [—/०/०] आपल्या प्रिय पात्रास रस्त्यांत संकट उद्‌भवेल. [—/०/०] मोठ्या कामाची आशा परंतु अस्थिर [—/—/—/०] सौख्य. [०/—/—] दुःख. [—/०/—] वस्त्रालंकार आणि शस्त्र लाभ. [०/०/—/—] विद्यालाभ. [—/—/०/०] मोठ्या लोकांचे मित्रत्व घडेल, अपूर्व वस्तूंचा लाभ शरीरास अति सुख. [०/०/०/—] बंधनकारक. [०/—/०/०] शस्त्राचे भय. [—/०/०/०] राजापासून लाभ. [—/०/—] धातु लाभ. [०/०/०/०] यात्रेत स्थैर्यता आहे.

रीत ६ वी:- १-४-७-१० स्थानांत अशुभ शकलें असल्यास प्रवासांत बरेच दिवस गमावणे. भाग पडल. १ -१४-१५-१६ स्थानांत अशुभ खारीज शकलें असल्यास द्रव्यक्षय.३-९स्थानांत निर्बली शकलें असल्यास उद्विग्नता १-४-७.१० स्थानांत [०/—/०/—] [—/०/—] [०/०/०/—] [०/—/०/०] असल्यास रोग आणि नींच लोकांचा सहवास. १-९-१५-१६ त [०/—/—/—] [०/०/—/—] शकलें असल्यास प्रवासात लाभ व सुख. ३-९ स्थानातील शकलें असल्यास बलकारक. ६-८-१२ स्थानांत शुभ शकलें असल्यास शुभ फल जाणावे.

रीत ७ वी:- २-१३ स्थानांतील शकलांच्या गुणाकाराने येणारे शकल शुभ आल्यास शुभ. अशुभ आल्यास अशुभ.

रीत ८ वी:- १-९ स्थानांत [०/—/—/—] [०/०/—/०] [०/०/—/—] [०/०/०/०] यांतील असून ५-८ स्थानांत [—/०/—/०] [—/—/०/०] [—/०/०/०] यांतील असल्यास प्रवासांत सुख, धनलाभ होईल. ५-८ स्थानांत [०/—/—/—] [०/०/—/—] हीं शकलें असल्यास ज्या कामाकरितां जातो ते काम होत नाही.


रीत ९ वी:- ९ व्या स्थानांत [०/०/—/०] [०/०/०/०] यांतील असल्यास स्वेच्छेनें. [०/—/—/०] [०/०/—/०] असल्यास दुसऱ्यांच्या इच्छेनें दुःखाचा प्रवास होईल.



कोणत्या दिशेस जाणें होईल?— ९-५ स्थानांतील शकलांच्या गुणाकाराने येणारे शकल तेजतत्वाचें असल्यास पूर्वेस, जलतत्वाचे असल्यास उत्तरेस, वायुतत्वाचे असल्यास पश्चिमेस,आणि पृथ्वीतत्वाचे असल्यास दक्षिणेस






असें जाणावे. अथवा ९ स्थानीं असलेल्या शकलावरूनही वरीलप्रमाणें फल वर्णन करावे.

रीत २ री:— ७-९-१ स्थानांतील शकलांच्या गुणाकारानें येणाऱ्या शकला-वरूनही वरीलप्रमाणें फल सांगावें.

मार्गात भय आहे काय ?— कुंडलीतील दर्शादर्शक बिंदु मोजून आलेल्या संख्येस ३ ने भागावे. शेषांक १ असल्यास, निर्भय, २ सुख, ० चोराचे भय आहे.

रीत २ री:— १-४-९ स्थानांत  यांतील शकले असल्यास दुःख व चोरांचे भय आहे. ८-१५ स्थानांत  असल्यास रोग भय.

रीत ३ री:— १-६-७ स्थानांत शुभ शकलें असल्यास अति सुख. १ ल्यांत शुभ शकल असून २-४-६-८-१२-१४-१६ या स्थानांपैकीं कोणत्याही स्थानांत तकरार असेल तर मार्गात क्लेश. बाकीच्या स्थानांत तकरार असल्यास शुभ. १ ल्या स्थानांत  यातील असून ६-८ स्थानांत तकरार असल्यास मार्गात मरणसम कष्ट होतील.  असून ६ व्या स्थानांत तकरार असल्यास मार्गात रोग भय आहे.

कोणाबरोबर प्रवास घडेल ?— ९ व्या स्थानीं  यांतील असल्यास सत्ताधीश आणि श्रीमंताबरोबर.  यांतील असल्यास वस्त्रोत्पत्ती करणारे, पाणके अगर भिल्ल लोकांबरोबर.  हिंसक, घातकी आणि नोकरांबरोबर.  लेखक, वैद्य, राजकीय विचाराचे लोकांबरोबर.  न्यायान्याय विचारी. सदाचारी, भिक्षुकाबरोबर.  सुगंध व्यवसायी, नर्तकी, उपाध्ये लोकां-बरोबर.  अंध, दुष्ट, कुग्रामवासी दरिद्री लोकांबरोबर घडेल.

रीत २ री:— ९-१० स्थानांतील शकलांच्या गुणाकाराने येणाऱ्या शकलां-वरूनही वरीलप्रमाणें फल सांगावे.

समुद्र पर्यटणानें लाभ होईल काय ?— १-६-७-८-११ स्थानांत कोठेही  ही शकले असल्यास शुभ. अथवा ८ व्यांत शुभ शकल असलें

तरी शुभ. १-४-६-८-९ स्थानांत कोठंहीं शुभ शकले असल्यास शुभ. [शकल] [शकल] [शकल] [शकल] [शकल] यांतील असल्यास अशुभ फळ सांगावे.

हें जहाज चांगलें चालेल कां ?– १ ल्या स्थानांत [शकल] [शकल] [शकल] यांतील असून ९-१० स्थानांत तकरार असल्यास चांगले चालेल. [शकल] [शकल] [शकल] यांतील असून६-८ १२ स्थानांत तकरार असल्यास वारा झोसाटयाचा वाहल्यानें तुफान होईल. १.४-७-१० स्थानांत अशुभ शकले असल्यास जहाज बुडेल. शुभाशुभ दोन्ही शकलें असल्यास बुडून पुनः तरेल. १ ल्या स्थानांत [शकल] [शकल] [शकल] यांतील असून बलिष्ठ स्थानांत तकरार आणि १-४-७-१० त अशुभ शकले असल्यास बुडेल अगर अडून उभे राहील. १ ल्यांत [शकल] [शकल] [शकल] यांतील असून ७-११-१३ त तकरार चांगुलपणाने आपल्या ठिकाणी पोंचून परतेल.

प्रवासी कोणत्या स्थितींत आहे ?– १ ल्या स्थानापासून १४ व्या स्थानां-पर्यंत दर्शादर्शक बिंदु मोजावे. ते बिंदु ३२ झाल्यास संकटांत आहे परंतु अखेर सुख आहे. १ ल्या स्थानांत शुभ शकल असेल तर शुभ. अशुभ अगर मध्यम शकल असेल तर दुःखी आहे.

प्रवासी केव्हां व कोणत्या स्थितीनें येईल ?– कुंडलींतील दर्शादर्शक बिंदु सर्व मोजून त्या संख्येस ४नें भागावे. १शेष राहिल्यात तीव्र येईल, २ आलस्यानें, ३ पुढे जाऊन परतेल, ४ येण्याचे संशय.

रीत २ रीः– १–९ स्थानांतील शकलांच्या गुणाकारानें येणारे शकल [शकल] हें झाल्यास विलंबानें येईल. [शकल] शीघ्र येईल. [शकल] दुःखाने येईल. [शकल] अलभ्य लाभानें येईल. [शकल] धनधान्यासह येईल. [शकल] रोगी होऊन येईल. [शकल] शोक व चिंतेनें तीव्र येईल. [शकल] विलंबाने येईल. [शकल] पित्तादि उपद्रवानें दुःखी होऊन येईल. [शकल] मार्गांत आहे. [शकल] निर्धनी आणि वैमनस्यत्वानें येईल. [शकल] मार्गांत संकटांत आहे. [शकल] संसार कार्यात मग्न झाला आहे. विलंबानें येईल. [शकल] मार्गांत आहे.

रीत ३ रीः– ५ व्या स्थानांत शुभ शकल असून शुभ स्थानांत तकरार असल्यास सुखानें आहे. अशुभ स्थानांत अशुभ शकलांची तकरार असल्यास दुःखीं आहे.

रीत ४ थी:-९व्या स्थानांत यांतील असल्यास आनंदांत. संन्यासी अगर कपटवेष धारण करून. निर्धनी होऊन. रिक्त हस्तानें तीव्र येईल. भयग्रस्त होऊन विलंबाने येईल. द्रव्य मिळवून विलंबानें येईल. स्वार होऊन येईल. पादचारी पण मध्यम धनवान्. महत्कार्यंवंत होऊन. शीघ्र येणार परंतु व्यथित.

प्रवासी तेथेंच आहे काय?- यांतील शकल १-२-३-४ या स्थानी असल्यास तेथेंच आहे. बाकीच्या शकलांनी नाही.

सांगितलेलें काम करून येईल कां?- ९ व्या स्थानांत यांतील असल्यास पूर्ण कार्य करून येईल. असल्यास त्याला तेथेंच ठेऊन घेतले आहें. कष्टाने काम करून येईल. चिंतेत आहे परंतु अल्प कार्य करून येईल. यांतील असल्यास करून येणार नाही.

माझें लग्न झालें आहे कां?- ९ व्या स्थानांत यांतील असल्यास झालें आहे. बाकींच्या शकलांनीं नाहीं. त्या स्थानीं बाकींचो शकले असून या शकलांची मित्रदृष्टी असलीं तरी झाले आहे.

वादी खरा कीं प्रतिवादी खरा?- १-९-३ स्थानांतील शकलांच्या गुणाकाराने यणारे शकल शुभ असल्यास वादी खरा. अशुभ असल्यास प्रतिवादी खरा आहे.

माझ्या मुठींत काय आहे?- कुंडलीत ही शकलें असल्यास वस्तु आहे. त्या दोन्हींतून कोणतेही शकल नसल्यास वस्तु नाही. अथवा वरील शकले तक्रार केल्यास बऱ्याच वस्तु आहेत.

रीत २ री:-४-६स्थानांत दाखील अगर साबीत असल्यास मुठीत वस्तु आहे.

रीत ३ री:- १-१३ स्थानांतील शकलांच्या गुणाकाराने येणारे शकल कुंडलीत असल्यास वस्तु आहे.

या मंडळींत कोणाच्या हातीं आहे ?— मंडळीचे दोन भाग करावे, प्रत्येक भागाकरितां निरनिराळच्या कुंडल्या मांडून ९ व्या स्थानांत असलेल्या शकलाची अ.ब.ज.द. संख्या करून ते शकल दाखील अथवा साबीत असल्यास मंडळीच्या उजवीकडून मोजावे. ती संख्या ज्या मनुष्यावर स्थिर होईल त्याच्या मुठीत वस्तु आहे असें जाणावें. आणि ते शकल खारींज अथवा मुनकलीब असल्यास डावीकडून मोजून वरीलप्रमाणे सांगावे.

कोणत्या हातीं आहे ?— ९-६-५ स्थानांत दाखील अथवा साबीत शकलें असल्यास उजव्या हातांत, खारीज अगर मुनकलीब शकलें असल्यास डाव्या हातांत, आणि तीं शकळें परस्पर विरोधी असल्यास जे शकल बलिष्ठ असेल ते पाहून सांगावें.

रीत २ रीः— ५-६ स्थानांतील शकलांच्या गुणाकारानें येणारे शकल दाखील अथवा साबीत असल्यास उजव्या हातांत. खारीज अथवा मुनकलीब असल्यास डाव्या हातांत आहे.

रीत ३ रीः— १३-१२-११-१५ स्थानांतील शकलांच्या गुणाकारानें येणारे शकल कुंडलीच्या उजव्या भागांत असेल तर उजव्या हातांत. डाव्या भागांत असेल तर डाव्या हातांत आहे.

ती वस्तु कोणती आहे ?— प्रथमतः ज्योतिष्यानें असा निश्चय करावा कीं, मुठीत धातु, मूळ, जीव याशिवाय दुसरी वस्तूच असत नाही. आतां त्याचा पोटविभाग समजावा तर अनुभव आणि अभ्यासानेच जाणावा. १ ल्या स्थानांतील शकलानें मृदु, कठिण, २ ऱ्या स्थानानें वर्ण, ३ ऱ्या स्थानाचे आकृती व शोभा, ४ थ्या स्थानाने वजन, वास, किंमत, ५ व्या स्थानाने गुण, ६ व्या स्थानाने उत्पत्ति, ७ व्या स्थानाने त्या पदार्थाचे संबंधीक ८ व्या स्थानाने एक अथवा अनेक, ९ व्या स्थानाने रुची, १० व्या स्थानानें पूर्ण किंवा अर्ध, ११ व्या स्थानाने उत्पत्ति स्थळ, १२ व्या स्थानानें धातुमूलक जाणणें.

रीत २ रीः— १-४-२-७ स्थानांतील शकलांच्या गुणाकारानें येणारे शकल तेजतत्वाचे आल्यास धातु असून पिवळे, वायु आल्यास जीव असून तांबडे, जलाचे आल्यास मूळ असून पांढरें आणि पृथ्वीचे आल्यास न समजणारे व काळे.

रीत ३ रीः– १६ व्या स्थानांत यांतील असल्यास जीव. यांतील असल्यास मूळ. यांतील असल्यास धातु. यांतील असल्यास संशय जाणावे.

रीत ४ थीः– हें १ ल्या स्थानांत असल्यास घट्ट. २-३-४-७ या स्थानांत असल्यास काळे. ५ व्यांत हिरवे. ८-१० व्यांत तांबडे ७-१४ त असल्यास पांढऱ्या वर्णाचे आहे.

रीत ५ वीः– १-५-९ स्थानांतील शकलांच्या गुणाकाराने येणारे शकल यांतील असल्यास अष्टपैलु. यांतील असल्यास गोल आणि यांतील असल्यास पोकळ.

रीत ६ वीः– १ ल्या स्थानांत असल्यास शुभ्र पीत मिश्र; सोनें, चांदी, गोल, छिद्र असलेले, हरभरे, रुचिदायक, तेजयुक्त. असल्यास जळलेले, पांढरें गोल, आंगठीसारखें, गंधयुक्त. तांबडे काळें मिश्र, तांब्रादि धातु, लांब, दुर्गंध, कडवड. हरित, नील, मिश्रवर्ण, चतुष्कोन, जळलेले हाड अगर चर्म, कीटक दुर्गंधयुक्त. पांढरे व पिवळें मिश्र, सोने, झाडातुन उत्पत्ती, सुगंध, कागदासारखे निर्भार, पंखासारखें. पातळ, छिद्रयुक्त, तांबें, लोखंड वगैरे धातु, उत्तम फल, कपडयासारखे. काळें, लोखंड सळयीसारखे गोल, दुर्गंध. लाल, लांबट, सोन्याच्या आभरणांतले. पांढरे, गोल, सुगंध, पिवळे असून विस्तवाच्या योगे तयार झालेलें. पिवळे मिश्र पांढरे, गोल, तेजयुक्त, सुगंध. पिवळे व काळे मिश्र, लांब, सुईसारखे, दुर्गंध व आंबट. तांबडे, बंकिमती, दुर्गंध कडवट आणि खारट. हिरवे असून लिहिण्यास योग्य. चतुष्कोन असून भाजलेले. पांढरे असून लांबट आहे.

रीत ७ वीः– १-७ स्थानांतील शकलांच्या गुणाकाराने येणाऱ्या शकलावरून अथवा ७ व्या स्थानांतील शकलावरून मुष्ठिगत पदार्थ सांगावा.

रीत ८ वीः– १ ल्या स्थानांत वायुतत्व असेल तर घट्ट पदार्थ. जलतत्वाचे असेल तर कापूस अगर चेंडू वगैरे. २ ऱ्या स्थानांत तेज शकल असेल तर

कांतियुक्त. ३ ऱ्या स्थानांत ≡o असल्यास लवकरच नाहीसा होणारा पदार्थ ३ऱ्या अगर ९या स्थानांत oooo हें असल्यास ती वस्तु छिद्रसंयुक्त अथवा उत्कीर्ण-चित्रसंयुक्त सूक्ष्म चिन्हे असलेली. १-३ स्थानांत o≡ असल्यास कापडाने गुंडाळलेली वस्तु ९ व्या स्थानांत वायुतत्वाचे शकल असल्यास केशमिश्रित जमलेलें. १४ व्यांत o=o असल्यास अग्निदग्ध पदार्थ. वरील रीतीस अनुसरून १ ल्या भागांतील कोष्टकांचा उपयोग करावा.

रीत ९ वीः– १-५-१-४ स्थानांतील शकलांच्या गुणाकाराने येणारे शकला-वरून गुणवर्णन सांगावें.

रीत १० वीः– १५ व्या स्थानांत शुभ शकल असल्यास अतिशय किमतीचा पदार्थ आहे.

रीत ११ वीः–८-१२ स्थानांतील शकलांच्या गुणाकाराने धातु वगैरे सांगावे.

रीत १२ वीः–४-१२-८-११ स्थानांतील शकलांच्या गुणाकाराने येणाऱ्या शकलावरून १ ल्या रीतींत सांगितल्याप्रमाणे त्या त्या स्थानांस गुणून एकेक शकल तयार करून त्यावरुन रूप, धातु वगैरे सांगावे.

रीत १३ वीः– कुंडलींतील तेज आणि वायु तत्वाच्या बिंदूंची संख्या करून ७ नें भागावे. शेषांक विषम आल्यास लघु, सम आल्यास गुरू असें जाणावे.

रीत १४ वीः– कुंडलीतील दर्शक बिंदूंची संख्या करून त्या संख्येस ५ नें भागावे. शेष १ आल्यास काळे, २ तांबडे, ३ पांढरे, ४ पिंवळे, ० मिश्रित वर्ण.

रीत १५ वीः– कुंडलीतील तेज बिंदूंची संख्या अधिक झाल्यास धातु, वायुबिंदु अधिक झाल्यास जीव, जलबिंदु अधिक झाल्यास मूळ, आणि भूमिबिंदु अधिक झाल्यास धात्वादि मिश्र पदार्थ आहे.

रीत १६ वीः– कुंडलीतील दर्शक बिंदु मोजून त्या संख्येस ३ नें भागावें १ शेष राहिल्यास धातु, २ शेष राहिल्यास मूळ, ० राहिल्यास जीव.

रीत १७ वीः– १-९-१-१० स्थानांतील शकलांच्या गुणाकारानें येणाऱ्या शकलावरून धातुमूळ वगैरेचे वर्णन करावे.

मला पशूंचें सुख आहे काय ?– १–९ स्थानांतील शकलांच्या गुणाकाराने येणारे शकल यांतील असून ९ व्या स्थानांत तकरार असल्यास पशूंचे सुख सामान्य आहे. यांतील असल्यास मध्यम. यांतील असल्यास गाय, म्हैस, घोडा वगैरे श्रेष्ठ पशूंचे सुख आहे.



मला किती यात्रा घडतील ?– १–९ स्थानांतील गुणाकाराने येणारे शकल यांतील असून ५ व्या स्थानांत तकरार असल्यास एक यांतील असल्यास तीन. यांतील असल्यास ४ यात्रा. असल्यास बहू यात्रा. असल्यास यात्रा नाहीत परंतु ९ व्या स्थानांत तकरार असली पाहिजे.

माझ्या उपजीविकेचे साधन कोणते ?– ९ व्या स्थानांत हें असल्यास नयदी व्यापारांत लाभ. व्यापारांत सुख मध्यम परंतु धान्य व्यापारांत लाभ. व्यापारांत सुख श्रेष्ठ असून पांढरे आणि हिरव्या पदार्थांच्या व्यापारांत विशेष लाभ आहे. रत्न प्रवाळांत विशेष लाभ. सर्व प्रकारच्या व्यापारांत लाभ आहे.




रीत २ रीः– ९–१–९–४ स्थानांतील शकलांच्या गुणाकाराने येणारे शकल अथवा ९ व्या स्थानांत हें असल्यास कृषी सामान्य परंतु क्षत्रीय वृत्तीने. कृषीकर्मांने. कृषीकर्म आणि व्यापार. कृषीकर्म सामान्य परंतु उच्च जनाश्रयाने. कृषी सामान्य, वैश्यवृत्ताने. कृषी मध्यम, महत् श्रमाने, कृषी सामान्य; क्षत्रीय-वृत्तीने. कृषीकर्माने. कृषी सामान्य शूद्रवृत्तीने. कृषीकर्मांत संपूर्ण सुख व्यापार आणि कृषीकर्माने. कृषी सामान्य; उच्च जनाश्रयाने. कृषीकर्मांत श्रेष्ठ सुख असून राजद्वाराने देखील चालेल. कृषी सामान्य, वैश्यवृत्तीने चालेल. वैश्य वृत्तीनेंच लाभ. कृषी मध्यम; महत् श्रमानें उपजीविका चालेल.

१० व्या स्थानापासून प्रश्न सांगणें.

राज्याधिकारयो:कीर्तेः श्रेष्ठत्वस्यनृपस्य च ॥ बलतंत्रोद्यमस्यापि चौषधस्यगुरोरपि ॥ ४३ ॥ जनन्याश्चापिसेवाया मेघानांमंत्र यंत्रयोः ॥ स्वज्ञातेःस्वामिनश्चापि वैद्यानांदशमाद्वदेत् ॥ ४४ ॥

हें राज्य कोणत्या स्थितींत चालेल ?— १-१० त  यांतील शकलें असल्यास राज्य बरेच दिवस चालून सक्तीचा अम्मल राहील.  या शकलाने राज्य चालत असतां अथवा अंती खराब होईल.  राज्यांत सौदेगिरी व विश्वासघात बराच चालला तरी राज्यकारभार शांतपणे चालेल.  प्रथमतः शांततेने चालून अंतीं वाईट अम्मल सुरू होईल.  राज्याची स्थिती चांगली चालणार नाही. दुसरा राजा हें राज्य हरण करील. राजा प्रवासांतच राहील त्याचा बंधु राज्य चालवील.  दुसऱ्या राजाच्या दूतागमनानें राजास भिती वाटेल.  कांही दिवस राज्य चालून अखेर वाईट स्थिती होईल.  यापासून शांतता नांदेल. याचप्रमाणे एखाद्या अधिकाराच्या स्थितीचेही वर्णन करावे.

सीत २ रीः– १-४-१० हीं स्थानें राज्याची. २ रे स्थान रयतेचे. ११ वे स्थान प्रधान सैन्य आणि कोशगृहाचें. ६-१२ हीं स्थाने वैरी आणि नोकरांची. वरील स्थानांत शुभ शकले असून बलिष्ठ असल्यास राजा बलवान आहे, राज्य बरे चालवील.

हा राजा कसा आहे ?— १-४-७-१० त शुभ दाखील शकले असल्यास राजा उत्तम असून रयतेस सुख देणारा आहे.  रयतेस दुःखदायक असून बरेच दिवस राज्य चालविणारा आहे. १ त्यांत  यांतील असल्यास रयतेस सुखदायक. ४ थ्यांत  यांतील असून १० व्यांत तकरार असल्यास रयतेस लाभदायक आहे.१० व्यांतयांतील असल्यास कायदे कडक चालवून रयतेस दुष्टपणाने वागविणारा आहे. १-१० त दाखील शकले असून शुभ स्थानांत तकरार असेल तर रयतेस आनंदाने वागविणारा. अशुभ स्थानांत तकरार असेल तर रयत स्वतः राजावर अप्रीती करील. वरील

स्थानांत खारीज व साबीत शकले असून अशुभ स्थानांत तकरार शिवाय २-४ स्थानांतही तकरार असल्यास रय्यत आपसांत वैरत्वाने वागेल. यांतील शकले १-१० त असून साबीत स्थानांत तकरार असल्यास राजा संकटांत पडेल. १-१० त असून अशुभ स्थानांत तकरार असल्यास त्या नगरांतच राजाचा अम्मल चालेल. १० व्यांत दाखील असून १-४ त तकरार असल्यास राजाचा अंमल स्थिर राहील. १-१० त हीं शकले असल्यास सर्व देशांत अम्मल चालेल.

रीत २ रीः- १०-१५ त यांतील शकले असल्यास बलवंत शरीराने सुखी असून समचित्त, प्रजा पालक, पराक्रमी, सुप्रसन्न आहे. यांतील असल्यास युक्तीवंत, प्रजा पालक, समर्थ, सौम्य आणि न्यायाने कोशवृद्धी करणारा. यांतील असल्यास बलाबल कमी आणि पराभवित. यांतील शकले असल्यास क्षीन आहें असें जाणावे.

रीत ३ रीः- १ ल्यांत यांतील शकल असून ४-११ त ही शकलें असल्यास राजा प्रथमतः आपले तेज दाखवून अखेर सुख देईल. यांतील असून ११-१४ त तकरार असल्यास आपले राज्य गमावील. असल्यास कष्टकारक आहे.

मला राज्यपद मिळेल कां ?- १-१०-१६ त यांतील शकले असल्यास राज्याधिकार मिळेल. या शकलांनीं उपायाने मिळेल परंतु शत्रु वश होईल. या शकलांनी मिळेल पण विलंबाने. बाकीच्या शकलांनीं मिळणार नाहीं.

मला कोणती नोकरी मिळेल ?- १० व्यांत असल्यास मंदिरावरची, दौलतीची, पत्रे वाटण्याची, फौजदारी अगर वैद्यकीची, वेश्येजवळ राहणची, कैदखाना अगर किल्यावरची, वकीली अगर राजमानाची, कोतवाली, पोलीसी अगर किताबखान्यावरची, समुद्रावरची,

[figure] सुभेदारी अगर फोजदारी, [figure] प्रधान, पंडित अगर हितोपदेशकाची, [figure] वैद्यकीची, [figure] स्वंयपाकी लोकांवर मुख्याची, [figure] तख्तखान्यावरील (सिंहासनालय) मुख्याची, [figure] लिहिण्याची, [figure] किल्लेदारी अगर सेवकपणाची.

रीत २ रीः— १ त्यांत लह्यान असून १० व्यांत तकरार असल्यास लेखक अमात्य अगर कोशग्रहात्वर मुख्याचीं, [figure] गृहाधिकार अगर धनाधिकाराची, [figure] सर्व जनसम्मतीनं ग्रामरक्षकाचो, [figure] सत्कृत्याची, [figure] नृत्य, गीत, कलाधिप अगर पंडितगिरीं, [figure] यंत्रादि रक्षक, बंधनकार्यं, [figure] नगर अगर गृहरक्षकाची, [figure] वध आणि बंधनकार्याची, [figure] रत्नमणी, मौक्तिकादि रक्षक, समुद्रपर्यटण, गोवाहनादि रक्षक, [figure] अभ्रक रक्षणाची, [figure] स्वस्वामी कार्याकरितां धन वस्तु संग्रह करण्याची, [figure] वस्तुक्रय करणे व बंधनाची, [figure] उद्‌गाह, कुशलकार्यं; [figure] ज्योतिषकलाभिज्ञ, शिल्पज्ञ, दक्षजनाग्रणी, [figure] भूमीवरील अध्यक्षाची, [figure] नागरिकांवरील अधिकारी वगैरेची.

याच्या सेवेनें लाभ होईल कां?— १–१० त शुभ शकले असल्यास लाभ होईल. अशुभ शकले ५–११ त तकरार केल्यास वस्त्र वगैरेंचा लाभ होईल. १–१० स्थानांत शुभ दाखील शकले असल्यास प्रतिष्ठा वाढेल.

राजाची भेट होईल कां?— १० व्यांत शुभ दाखील असल्यास भेट होऊन लाभ घडेल व सुखदायक होईल. शुभ खारीजने भेट झाली तरी लाभ थोडा होईल. बाकीच्या शकलांनी भेट आणि लाभ होणार नाही.

रीत २ रीः— २–११ स्थानांत शुभ खारीज असेल तर भेट होऊन लाभ होईल. अशुभ खारीज असल्यास भेट झाली तरी निष्फळ. कष्ट अधिक होईल.

या सेवेंतून मुक्त होईन कां?— १० व्यांत शुभ खारीज असल्यास मुक्त होईल. साबीत असल्यास विलंबाने. अशुभ खारीज असल्यात अति दुःखानें मुक्त होईल.

या राजकीय कामांत लाभ आहे काय?— १० व्यांत शुभ दाखील असल्यास नृपकार्यांत किर्ती प्राप्त होईल, अशुभ दाखील असल्यास

विलंबाने यश, आणि किर्ती प्राप्ती. शुभ खारीज असल्यास नृपकार्यांत बल अधिक परंतु स्वल्प फल. अशुभ खारीजनें अपकिर्ती शुभ साबीतने आलस्यानें अवश्य लाभ होईल. अशुभ साबीतन भूपतीचे भय आहे. शुभाऽशुभ मुनकलीबनें सर्व प्रकारचें मध्यम फल जाणावें.

मी केव्हां धनाढ्य होईन?— १-१० स्थानांतील शकलांच्या गुणाकारानें ०।।। ।०।० ०।०। ००।० ०००० यांतील असून उम्हातमध्यें तकरार केल्यास तारुण्यावस्थेत. बिनहातमध्ये तकरार केल्यास मध्यमावस्थेत. मुतवलीदातमध्ये तकरार केल्यास वृद्धावस्थेत धनाढ्य होईल असे जाणावे

हा महिना लाभाचा कीं कसा?— १० व्यांत शुभ खारीज असून १ ल्यांत शुभ दाखील असल्यास हा महिना लाभाचा अशुभ शकल असल्यास हानीकारक.

हल्ली करीत असलेलें काम लाभाचें कीं काय?— १० व्यांत शुभ शकल असल्यास चाललेले कामच चांगले, आणि ४ थ्यांत शुभ शकल असल्यास अपेक्षित काम उत्तम, दोन्ही स्थानांत शुभ असल्यास बलाबल पाहून उत्तर सांगावे.

रीत २ रीः— १-१० तील शकलांच्या गुणाकाराने शुभ शकल आल्यास हल्लीचे कार्यच उत्तम, अशुभ आल्यास इच्छित कार्य उत्तम.



भाग्योदय कोणत्या वर्षी आहे?— १० व्यांत ०।।। असल्यास १७ वर्षापर्यंत सामान्य, २४ वर्षापर्यंत मध्यम, ३२ व्या वर्षी संपूर्ण, ४२ व्या वर्षी राजवशात. ।०।० २४ वर्षें सामान्य, २८ व्या वर्षी मध्यम, ३६ व्या वर्षी संपूर्ण, ४९ वर्षेंपर्यंत स्त्रीवशात्. ०।०। १८ व्या वर्षी सामान्य, ३२ व्या वर्षी मध्यम, ४० पासून ५० पर्यंत शूद्र असून श्रेष्ठ अशा राजवशात् ।।।। जन्मपर्यंत भाग्योदय सामान्य. ००।० २२ वर्षे सामान्य, २७ वर्षे मध्यम, ३६ वर्षे संपूण, ४२ वर्षेंपर्यंत व्यापारांत सेवक धर्मानें. ०।०० १८ वर्षे सामान्य, २५ वर्षे मध्यम, ४२ व्या वर्षी संपूर्ण ५२ वर्षेपर्यंत राजाश्रयाने. ०।।। भाग्योदय मध्यम, उत्तरावस्थेंत संपूर्ण. ।।०। भाग्योदय सामान्य, सेवक धर्मानें प्राप्ती. ०।।। १६ वर्षे सामान्य,

२४ वर्षे मध्यम, ३२ व्या वर्षीं संपूर्ण, ४२ वर्षेपर्यंत राजवशात. २४ वर्षे सामान्य, २८ वर्षे मध्यम, ३६ व्या वर्षीं संपूर्ण, ४० वर्षापर्यंत स्त्रीवशात. १८ वर्षे सामान्य. ३२ वर्षे मध्यय, ४० वर्षे संपूर्ण, ५० वर्षेपर्यंत नीच-जनाश्रयानें. अखेरपर्यंत भाग्यबळ सामान्य. २२ वर्षे सामान्य. २७ वर्षे मध्यम, ३६ वर्षे संपूर्ण. ४२ वर्षेपर्यंत व्यापारांत सेवक धर्माने. १८ वर्षे सामान्य,२५वर्षे मध्यम,४२व्या वर्षी सपूर्ण,५२वर्षेपर्यंत राजवशात. भाग्यबल मध्यम, उत्तरावस्थेत भाग्योदय. भाग्यबळ सामान्य, सेवा-वृत्तीने प्राप्ती होईल. संशय आल्यास बि. ज. द. ह. क्रमानें अवधीचा निश्चय करावा.



मला मातृसुख किती दिवसपर्यंत ?— १० व्यांत असल्यास जन्मापासून १५ वर्षे अगर २४ वर्षेपर्यंत. १८ अगर २१ वर्षेपर्यंत. २१ अगर ३० वर्षेपर्यंत. ४ वर्षेपर्यंत. जन्मदारभ्य मातृसुख नाहीं. ४२ अगर ५२ वर्षेपर्यंत. १४ अगर २८ वर्षेपर्यंत. २७ अगर ३८ वर्षे-पर्यंत. १२ अगर ३० वर्षेपर्यंत. २५ अगर ४० वर्षेपर्यंत. १४ अगर २८ वर्षेपर्यंत- जन्मापासून मातृसुख नाही. १ वर्षापर्यंत. जन्मदारभ्य मातृसुख नाही. मातृसुख नाहीं, मातृसुख सपूर्ण आहे.

मी हें न्याय जिंकेन कां ?— १-९-३-१० तील शकलांच्या गुणाकाराने येणारे शकल बलिष्ठ असून बलिष्ठ स्थानांत तकरार केल्यास फिर्यादी जिंकेल. ते शकल १-१५ स्थानांत तकरार केल्यास न्यायाधीश फिर्यादीच्या पक्षास वळेल. ते शकल १५ व्यांत असून मुतवलिदातमध्यें पुनरुक्त झाल्यास न्यायाधीश कोणाकडेही न वळतां योग्य न्याय करील.




रीत २ रीः— १ ल्यांत यांतील असून ४-११ त ही शकले असल्यास राजा पूर्वी अनिष्ट दाखवून अखेर वादींप्रमाणे करील. १ल्यांत यांतील असून १०-१४ स्थानांत पुनरुक्त झाल्यास राजा जय देणार

नाही.  यांतीस १ ल्यात असल्यास कष्टकारक.  यांतील असल्यास जय नाहीं असें जाणावे.

रीत ३ री:– १–१० तील शकलांच्या गुणाकाराने येणारे शकस शुभ असल्यास वादी जिंकेल. अशुभ असल्यास प्रतिवादी जिंकेल. दोन्ही शकले शुभ अगर अशुभ असल्यास समेट होईल. अथवा वरील कृतीत ज्याचे बलिष्ट शकल असेल तो जिंकेल. १ ल्या स्थानांत शुभ शकल असल्यास वादी जिंकेल. ७ व्या स्थानां। शुभ शकल असल्यास प्रतिवादी जिंकेल. आणि तो दोन्ही शकले समान असल्यास समेट होईल. जे शकल पापी अगर निर्बली असेल तो हरेल.

रीत ४ थी:– १-९-७-१० यांतील शकलांच्या गुणाकाराने येणारें शकल शुभ असून अवतादमध्यं तकरार केल्यास प्रश्नकर्ता जिंकेल. १-७ तील शकल १५ व्या स्थानांत पुनरुक्त झाल्यास न्यायाधीश प्रश्नकर्त्याकडे वळेल. १५ व्या स्थानांतील शकल मुतवळिदातमध्ये पुनरुक्त झाल्यास वैऱ्याकडे वळेल. १-३ तील शकलांच्या गुणाकाराने येणारे शकल प्रश्नकर्त्याचे. ७·१० तील गुणाकाराने येणारे शकल वैऱ्याचे.  यांतील असल्यास प्रश्नकर्ता जिंकेल.  यांतील असल्यास वैरी जिंकेल. बाकीच्या शकलांनी समेट होईल.

या वादांत कांहीं प्राप्ती होईल काय?— १० व्यांत पाखील असून ६–८–१२ त तकरार असल्यास कांहींशी प्राप्ती आहे. १५ व्यांत  हे असल्यास अर्ध फल प्राप्ती. खारीज असल्यास कांहीच प्राप्ती नाही. बाकीच्या शकलांनी लाभ आहे असें जाणावे.

या दोघां वादींत कोण खरा?— ९–१० तील शकलांच्या गुणाकाराने येणारे शकल प्रश्नकर्त्याचे. ७–१२ तील शकलांच्या गुणाकारानें येणारे शकल प्रतिवादीचे.  यांतील आल्यास वादी खरा.  यांतील आल्यास प्रतिवादी खरा.  यांतील आल्यास दोन्ही पक्षांचा कांही सत्यांश आहें असें जाणावे.

साक्षीदार खरें आहेत कां ?— १-४-७-१० तील शकलांच्या गुणाकाराने येणाऱ्या शकलास १५ व्या स्थानांतील शकलानें गुणून येणारे शकल यांतील असल्यास खरे आहेत. यांतील असल्यास त्यांपैकीं कांहीं खरे व कांही खोटे आहेत. यांतील असल्यास सर्वच खोटें आहेत.

मी जेवलों आहे कां ?— २-६ त शुभ दाखील शकले असल्यास जेवण झालें आहे, खारीज असल्यास नाही. २ ऱ्यांत दाखील ६ व्यांत खारीज असल्यास अल्प जेवण झाले आहे अजूनी जेवणाची इच्छा आहे. या विरुद्ध असल्यास कांहींच जेवण झाले नाही. ६ व्या स्थानांत अशुभ मुनकलीब, २ ऱ्यांत शुभ दाखील अगर मुनकलीब असल्यास जेवण झाले होते परंतु ओकारी झाली. तेथील शकले शुभ असल्यास चांगले अन्न, अशुभ असल्यास कदान्न. सर्व शकलें वृद्ध असल्यास शिळे अन्न ह्मणून सांगावें.

रीत २ रीः— १० व्या स्थानांत पाची शकल असून ते वैर स्थानाचे असल्यास जेवण झाले नाही. याशिवाय अन्य शकले असल्यास जेवण झाले नाहीं.

काय जेवलों आहे ?— १० व्यांत तेजतत्वाचे शकल असून तेज तत्वांच्या स्थानी तकरार असल्यास मिष्ट पदार्थांचे सेवन केले आहे. वायु तत्वांच्या स्थानीं तकरार असल्यास साखर, दही, दूध, तूप वगैरे मिष्टान्न भक्षण केले आहे. तें शकल पृथ्वीतत्वांच्या स्थानी तकरार केल्यास शुष्क चूर्ण, मालपुवा, भाकर वगैरे खाल्ले आहे. जलतत्वांच्या स्थानीं तकरार केल्यास फळादिक मिष्ट पदार्थ सेवन केले आहे.

रीत २ रीः— १० व्यांत हें शकल असल्यास सर्व रसन्वित भोजन ह्मणजे चित्रविचित्र तांदूळ, कडू आणि तिळ मिश्र. सीठ मिश्रीत तांदूळ. तांदूळ, हरभरे, गंहूमिश्रीत. मूग,कुळित्थ वगैरे अनेक पदार्थ मिश्रीत. गंहू, तांदूळ, हरभरे मिश्रीत मिष्टान्न. आंबट मिश्र झालेले सातु वगैरेचे पदार्थ. काढा, सार, उडीद. मांस, दारू वगैरे पदार्थ असे जाणावे.

११ व्या स्थानापासून प्रश्न सांगणें.

मित्रस्य च मनीषायां मंत्रिणः कारिकस्य च ॥ स्वाभिष्टलाभ सिद्धेस्यात्तायामाभ्योदयस्य च ॥ ४५ ॥ अमात्यस्यन्यायकर्तृ-रीश्वरस्यस्तुलेऽपि ॥ सत्यात्मस्यस्यः प्रश्नोवाच्यश्चैकादशाल यात् ॥ ४६ ॥

मनीषा पूर्ण होईल कां ?— १-११-१-१२ तील शकलांच्या गुणाकाराने येणारे शकल कुंडलींत असल्यास पूर्ण होईल ते शकल ज्या स्थानीं असेल त्या स्थानाची इच्छा जाणून उत्तर द्यावें

रीत २ रीः— ११ व्यांत यांतील असल्यास पूर्ण होईल. स्वल्प कार्य होईल. होणार नाही. आलस्यान होईल. होण्याचा संशय असें जाणावें

मी कोणती नोकरी केल्यास बरें ?— १-११ तील शकलांच्या गुणाकारानें येणारे शकल पंडितगिरी. अम्मलदारी अगर व्यापार टपाल शिपायी. ज्योतिषी अगर सोनारी. लोहारी अगर अत्तरे विकण्याची. घरे बांधण्याची. ज्योतिषविद्या, लोहारी अथवा निशाण मारण्याची. समुद्रावरील. प्रधानगिरी अथवा पंडापणाची. घोडा, गाडी अगर वस्त्रशालेवरील. गायनादि कलेची पुराणकर्मी, वैद्यकी अगर नृत्यकला. सेवकाची अगर अनिष्ट कृतीची.

यानें मित्रत्व केलेलें खरें काय ?— ११-५ तील शकलांच्या गुणाकारानें येणारे शकल यांतील असल्यास खरा मित्र असून सर्व कार्यें होतील हें असल्यास कपटपणाचे. द्रव्यार्थी बाकीच्या शकलानीं सामान्य.

रीत २ रीः— ११-१४-१५ त यांतील असल्यास खरे मित्रत्व आहे. बाकीच्या शकलांनी नाही.

रीत ३ रीः— १–३ तील शकलांच्या गुणाकाराने यांतील असल्यास मित्रत्व खरे असून लाभदायक. मित्रत्व जुळून रोग आणि स्त्रियांच्या निमित्तानें तुटेल. या शकलानें वैरत्वाचे. किंचित लाभकारक. अनिष्टकारक. मित्रत्व खरे नव्हें.

रीत ४ थीः— ११ व्यांत यांतील असून १-३-५-६ त पुनरुक्त होईल तर मित्रत्व अखेरपर्यंत चालेल. यांतील असून १-४-७-१० अथवा २-५-८ स्थानात तकरार असेल तर मित्रत्व चालेल परंतु केव्हां केव्हां व्याय येईल. मित्रत्व पूर्ण नव्हे. मित्रत्वाने चिंता उत्पन्न होईल. कपटाचे मित्रत्व असे जाणावे.

रीत ५ वीः— १–११ त शुभ शकले असल्यास मित्रत्व चांगले चालेल. अशुभ असल्यास चालणार नाही.

रीत ६ वीः— ४ थ्यांत शुभ दाखील असून शुभ स्थानांत तकरार असल्यास मित्रत्व चालून लाभ होईल. अशुभ स्थानांत तकरार असल्यास वाईट. खोटे मित्रत्व.

मी श्रीमंत होईन काय ?— १-११ त शुभ दाखील शकले असून ३-५-९ स्थानांत पुनरुक्त झाल्यास अति द्रव्यवंत होऊन श्रीमंती स्थिर राहील.

रीत २ रीः— १-१०-११ तील शकलांच्या गुणाकाराने येणारे शकल शुभ असल्यास अति संपत्तियुक्त होऊन ते द्रव्य स्थिर राहील आणि अशुभ असल्यास निर्धनी.

यास अधिकाऱ्यांची सम्मती मिळेल कां ?— ११ व्यांत यांतील असून १०–१३–१४ त पुनरुक्त झाल्यास चांगलीच सम्मतीं मिळेल. याच्या विरुद्ध असल्यास मिळणार नाही.

हिश्यानें व्यापार केला तर कसे ?— ११–१०–३–१ तील शकलांच्या गुणाकारानें येणारे शकल यांतील असून १-४-७-१० त अथवा २-५-८-११ त तकरार केल्यास व्यापारांत बराच फायदा होईल.

यांतील असून वरील स्थानांत तकरार असल्यास सावकाश व्यापार चालून स्वल्प लाभ होईल. यांतील असून १-४-७-१० त तकरार असल्यास अर्धा माल विकला जाईल. यांतील असून ३-६-९-१२ त तकरार असल्यास सर्व माल लूट होवून नुकसानी होईल.

मी व्यापाराकरितां माल घेऊन गेलो तर कसें ?— ११-१ त शुभ शकले असल्यास माल विकला जाईल व लाभ होईल. तेथें अशुभ असल्यास माल न विकता नुकसानी होईल.

१२ व्या स्थानापासून प्रश्न सांगणें.

वृषाद्युन्नतदेहानां पशूनांबंधनस्य च ॥ शत्रोकारागृहस्यापि ऋण-
मोचनकस्य च ॥ ४७ ॥ बंधनस्थपुंसोपि मुक्तेश्चापि विषयस्य च ॥
बाधायामोचनस्यापि सवाच्यौद्वादशालयात् ॥ ४८ ॥

या पशची खरेदी केल्यास कसें ?— १२ व्यांत दाखील असून ५-११ शुभ शकले आणि अन्य स्थानांत तकरार असल्यास लाभ होईल. शुभ मुनकलीब असल्यास चांगलें आहे. परंतु घरांत राहणार नाही. शुभ खारीज असून शुभ स्थानांत तकरार असल्यास लवकरच त्या पशूची विक्री होऊन बराच लाभ होईल. या शकलाने राजी होईल. १२ व्यांत असून ६ व्यांत तकरार असल्यास लाभ होईल. यांतील असून अशुभ स्थानांत तकरार असल्यास चालण्यास मंद. यांतील असून शुभ स्थानांत तकरार असल्यास चालण्यांत तेजवंत आहे. असून २-५-९-११ त तकरार असल्यास अति वेगाने चालेल.

या घोड्याचे लक्षण कसें आहे ?— १२ व्यांत अशुभ शकल असल्यास डोक्यांत वाईट लक्षण आहे. कपाळावर वाईट लक्षण. १३ व्यांत असल्यास कांहींसें वाईट लक्षणाचे आहे. १४ व्यांत असल्यास पायांत वाईट लक्षण आहे. १४ असल्यास चांगल्या चालीचे आहे. असल्यास मंद चालीचें असून स्वाधीन न राहतां दोन्हीं पायावर उभा राहील.

[शकल] असल्यास चाल चांगली नाहीं. १२ व्यांत [शकल] तकरार असल्यास मोतद्दारास चावेल. ७-१५ त [शकल] [शकल] असल्यास घोडा पळून जाणारा आहे ७ व्यांत [शकल] असल्यास नाईट आहे. १ ल्यांत [शकल] [शकल] [शकल] यांतील असल्यास सैन्यांत घेऊन गेल्यास त्याला रोग होईल. बाकीच्या शकलांनी घोडा चांगला असे जाणावे.

कैद्याची सुटका होईल काय?— १२ व्यांत [शकल] [शकल] [शकल] [शकल] यांतील असल्यास सुटेल. [शकल] [शकल] असल्यास सुटका होणार नाही. [शकल] [शकल] [शकल] यांतील असल्यास बऱ्याच दिवसानंतर भयग्रस्त होऊन सुटका होईल [शकल] [शकल] [शकल] यांतील असल्यास सुटका होऊन पुनः कैद होईल.

रीत २ रीः— १२-४ त खारीज शकल असून १५ व्यांत [शकल] हें शकल असल्यास कैद्याची सुटका होणार नाहीं. याप्रमाणें कैद्याचे राहणे अथवा अन्य स्थळीं जाणें अथवा मृत्यू वगैरे त्या त्या शकलांवरून सांगावे.

आह्मां उभयतांत कोण हरेल?— १-२-३-४-९-१०-१३-१५ हीं स्थानें प्रश्नकर्त्याचीं. ५-६-७-८-११-१२-१४-१६ हीं स्थानें वैऱ्याचीं. या वरील स्थानांत ज्या भागास बलिष्ठ शकलें असतील तो जिंकेल. १५ व्यांत [शकल] [शकल] यांतील असल्यास दोघांत समेट होईल. अथवा प्रश्नकर्त्याचे आणि वैऱ्याच्या स्थानांचे दर्शक बिंदूंची संख्या निरनिराळी करावी. ज्याची अधिक होईल तो जिंकेल. अथवा ज्याकडे शुभ शकलें असतील तो जिंकेल.

रीत २ रीः— १-४-९-११ हीं स्थानें प्रश्नकर्त्याची २-६-१२-१४ हीं स्थानें वैऱ्याचीं. या स्थानांत ज्याकडे शुभ शकलें असतील तो जिंकेल. दोन्ही बाजूस शुभ असल्यास समान होईल. [शकल] हे शकल ज्याकडे अधिक तकरार करील तो जिंकेल. परंतु फारच निकाराने लढावे. दोन्ही बाजूस असल्यास समेट होईल. १५ व्यांत [शकल] [शकल] [शकल] यांतील १ ल्यांत [शकल] [शकल] यांतील असून ८ व्यांत तकरार असल्यास प्रश्नकर्ता हरेल. ६ व्यांत तकरार असल्यास प्रश्नकर्त्याचा वकील जखमी होईल. २ ऱ्यांत [शकल] [शकल] यांतील असून ८ व्यांत तकरार असल्यास प्रश्नकर्त्याकडील सर्व लोक मरतील. १ ल्यांत शुभ शकल असून १० व्यांत

तकरार असल्यास प्रश्नकर्ता जिंकेल ७ व्यांत शुभ शकल असून ४थ्यांत तकरार असल्यास वैरी जिंकेल.

रीत ३ रीः— १ ल्यांत यांतील असून १२ व्यांत पुनरुक्त झाल्यास प्रश्नकर्ता हरेल. ७ व्यांत पुनरुक्त झाल्यास वैरी जिंकेल २ऱ्यांत शुभ शकल असून १-४-७-१० त तकरार केल्यास प्रश्नकर्त्याचे सैन्य कमी आहे. ८ व्यांत अशुभ असल्यास वैऱ्याचे सैन्य जखमीं होईल, १ ले स्थान हत्ती, ऊंट, घोडा वगैरेचे असून यशापयशाचे २ रे स्थान सैन्याचे. ३ रे स्थान निशाण मारणाऱ्याचे ४ थें स्थान युद्ध स्थलाचे. ५ वे स्थान बहादुरीचे. ६ वे स्थान पायदळाचे. ७–१२ ही स्थाने वैऱ्याच्या यशापयशाची. या स्थानांच्या शुभाशुभावरून जयापजय जाणावे.

वैरी बलाढच आहे काय ?— १२–१ तील शकलांच्या गुणाकाराने येणारे शकल पृच्छकाचे. १२-१५ तील शकलांच्या गुणाकाराने येणारे शकल वैऱ्याचे. या स्थानांत शुभ असलेलेच बलाढ्य.

वैऱ्याचे मन कसें आहे ?— ६ व्यांत दाखील शकल असल्यास अनेक तऱ्हेने त्रास देईल. खारीज असल्यास क्रोधी आहे. साबीत असल्यास वैरत्व करणार नाही; परंतु क्वचित् प्रसंगी वैरत्व करील. मुनकलीब असल्यास चित्तवृत्ती दुष्ट आहे १२ व्यांत शुभ शकल असल्यास निष्कारण त्रास देईल. त्यापासून लाभही नाही नुकसानही नाही.

रीत २ रीः— १२ व्यांत शकले असल्यास वैऱ्याचे भय नाही. असल्यास संशयास्पद भय यांतील असल्यास गुप्त वैरत्व त्यापासून भय नाही. यापासून कदाचित् भय आहे. थोडे भय आहे परंतु त्रास होणार नाहीं. यापासून कदाचित् भय उत्पन्न होईल.

रीत ३ रीः— १३–१४–१५–१६ त कोठेही शुभ दाखील असल्यास दुष्ट भाव आहे; परंतु क्लेशकारक नाही. अशुभ दाखील असल्यास दुष्टत्व करतो त्यापासून क्लेश उत्पन्न होईल. शुभ खारीज शकले असल्यास दुष्टपणा खरोखर करतो, अशुभ खारीज असल्यास वैरीं पराधीन होईल. शुभ साबीत असल्यास

दुष्ट विचार नाहीं. अशुभ साबीत असल्यास निर्भय; परंतु कांही प्रसंगी घात होईल मुनकलीब शकलानें विश्वास धरू नये. कोणत्या वेळी घात होईल समजत नाही.

वैऱ्याचे सैन्य मजवर चाल करील काय ?— १-४-५-६-७-९-११-१२-१३ स्थानात यांतील असल्यास सैन्य चाल करून येईल. १-४-७-१० स्थानांत अशुभ शकले असल्यास सैन्य जुलूम करील आणि लूट होईल. १-४-५ स्थानांत यांतील असल्यास सैन्य चाल करील परंतु जुलूम होणार नाहीं. ४-५-११-१५ स्थानांत शुभ शकले असल्यास सैन्य येऊन परत जाईल. ७-८-१३-१४ स्थानांत अशुभ शकले असल्यास सैन्य पळून जाईल. १-१३ स्थानांत अशुभ शकले असून १६ व्या स्थानांत यांतील असल्यास पळून गेलेलें सैन्य परत चाल करून येईल.

वैरत्वाचा परिणाम काय होईल ?— १ ले स्थान प्रश्नकर्त्यांचे आणि १२ वे स्थान वैऱ्याचे त्या स्थानांत अशुभ शकले असल्यास वैरत्व करील परंतु अशा वैरत्वाने संकट येणार नाही. १-१२ त अशुभ शकले असून उमहातमध्ये तकरार केल्यास वैरत्व करणार नाही. १ ल्यांत असून १० व्यांत तकरार करील तर प्रश्नकर्त्याकडील अम्मलदार चांगले नाहीत. १५व्यांत अशुभ शकले असल्यास प्रश्नकर्त्याच्या भावाकडून वाईट परिणाम होईल. १ ल्यांत असून १५ व्यांत तकरार आणि १३ त अशुभ शकल नसून १-४-७-१०त तकरार असल्यास प्रश्नकर्त्यांचा उजवा हात तुटेल. २-५-८-११त तकरार असल्यास कान, नाक, बोटे कापली जातील. १ ल्यांत यांतील असून ८-१२ स्थानांत तकरात आणि १५ व्या स्थानांत अशुभ शकल असल्यास वैरी प्रश्नकर्त्याच्या प्राणघाताच्या हेंतूनें रक्तपात करील. १ ल्यांत कोणतेही अशुभ शकल असून १२ व्यांत तकरार असल्यास वैरी आपणात बंधात ठेवील. नाही तर खून करील. त्याच स्थानांत असल्यास चाबकानें मारील. ही असल्यास जाळील अगर डाग देईल. ही असल्यास फांसी देईल नाहीं तर पाण्यांत बुडवून मारील.

१ ल्या स्थानांत असून १२ व्यांत पुनरुक्त होऊन २-५ स्थानांत अशुभ शकलें असल्यास कैदेत ठेवील.


याला कर्ज दिल्यास कसें ?— १२ व्यांत शुभ शकल असल्यास द्यावे. ऋणमुक्त होईल. अशुभ असल्यास ऋणमुक्त होणार नाही, देऊं नये.

भूतबाधपासून मुक्त होईल कां ?— १२ व्यांत यांतील असल्यास देवता व गुरूच्या सेवेने लवकरच मुक्त होईल. यांतील असल्यास नीच मांत्रिकाकडून मुक्त होईल. यांतील असल्यास नवग्रहांच्या आराधनेने मुक्त होईल. यांतील असल्यास लवकरच मुक्त होईल पण पुनः अगांत संचारेल. यांतील असल्यास मुक्त होणे असाध्य पण ४-६-८ त वरील शकलांची तकरार आणि उपकरणांच्या साहित्यावरून सांगावे.

या वर्षी पाऊसपाणी कसें आहे ?— कुंडलीच्या अग्नी, वायु, जल, पृथ्वी स्थानांतील निरनिराळे दर्शक बिंदूंची संख्या मांडावी. त्यांत तेजतत्वाचे बिंदु अधिक झाल्यास पाऊस पडणार नाही. वायुतत्वाचे अधिक झाल्यास वारा फार सुटेल. जलतत्वाचे अधिक झाल्यास पाऊस फार पडेल. आणि पृथ्वीतत्वाचे अधिक झाल्यास दुष्काळ पडेल.

रीत २ रीः- १०-४ तील शकलांच्या गुणाकारानें येणारे शकल शुभ आल्यास सुकाळ आहे. अशुभ आल्यास दुष्काळ आहे. १६ व्यांत जल अगर पृथ्वीतत्वाचे शकल असल्यास पाऊस पडून सुकाळ होईल. अग्नी अगर वायु तत्वाचे शकल असल्यास पाऊस कमी पडेल.

रीत ३ रीः- ९ व्यांत असल्यास पाऊस कमी पडेल पण पीक चांगले येईल, थंडी अधिक पडेल व वारा फार. अखेर पाऊस पडेल परंतु पीक कमी. पावसाचें चिन्ह अधिक नाही दुष्काळ पडेल ऊष्ण अधिक, पीक मध्यम. ऊष्ण अधिक, पाऊस कमी, परंतु अखेर पाऊस पडेल. पाऊस कमी पण घात होण्याचा वारा सुटेल. पीक व पाऊस अधिक परंतु पावसाच्या योगाने पीक खराब होईल. पाऊस कमी झाला तरी पीक येईल. वेळोवेळी पाऊस पडुन पीक अधिक येईल. पाऊस


नसल्या कारणाने पीक वाळून दुष्काळ पडेल  पाऊस कमी, मेघाचे चिन्ह अखेरीस दिसून थोडासा सुकाळ होईल.  पाऊस अतिशय होऊन पीक चांगले येईल.  पाऊस आणि वारा अधिक होईल  पाऊस अधिक होऊन पीक उत्तम येईल.

आजचा दिवस कसा आहे ?— १४-१५-१६ त दाखोल शकले असून शुभ असल्यास उत्तम आहे लाभ होईल. कोणत्याहीं कामाचीं सुरवात केल्यास जय मिळेल. अशुभ असल्यास वाईट आहे. खारीज अगर मुनकलोब शकल अशुभ असल्यास लाभ नुकसान कांहीं नाहो. तीं शुभ शकले असल्यास लाभ झाला तरी खर्च होईल. साबीत शकले असल्यास विलवाने खर्च होईल.

रीत २ रीः— कुंडलीतील १-२-३-४-९-१०-१३-१५ ही स्थाने दिवसा बारा तासांची अणि ५-६-७-८-११-१२-१४-१६ हीं स्थानें रात्रीच्या बारा तासांची; वरील ८ स्थाने १॥ तासास एक प्रमाणे वांटून घ्यावीत. तसेच रात्रीची ८ स्थाने १॥ तासास एक प्रमाणे वांटून देऊन त्या प्रत्येक स्थानांतील शकलाच्या तत्वविभागाने विचार करून ती प्रत्येक वेळा वाईट किंवा बरी हें ठरवावें. तसेच त्या प्रत्येक शकलांत तेज, वायु, जल आणि पृथ्वी ही तत्वें स्थित आहेतच त्यांतील प्रकटतत्व उदाहरणाकरितां घेऊन फळ सांगावे. उदाहरण—कुंडलींतील १ लें स्थान सूर्योदयापासून १॥ तासाचे; त्या स्थानी  हें शकल पडले आहे तर ती १॥ तासाची वेळ चारी तत्वे गुप्त असल्याकारणाने ती वेळा प्रश्नकर्त्याच्या कोणत्याही कामास उपयोगाची नसून उलट नुकसान करणारीं आहे. आतां त्या ठिकाणी  हें शकल पडले आहे असे समजा तर हे शकल शुभ असून तेज, वायु आणि पृथ्वी या तिन्ही तत्वांनी प्रकट आहे. तेज, वायु आणि पृथ्वी वगैरे सर्व तत्वांचा गुणविभाग मागें सांगितलेल्या कोष्टकांच्या आधारे आणि उपकरणादि साहित्यावरून फल सांगावे.

अ. ब. ज. द. ध्रुवांक प्रश्न ?— कुंडली तयार केल्यानंतर प्रश्नकर्त्याचा प्रश्न कोणत्या स्थानांत आहे ते पुढील ध्रुवांक कोष्टकांत ऊर्ध्व भागांत पहावे त्या खालीं प्रश्न आहेत. त्याच्या सन्मुखांतील ध्रुवांक घेऊन मनोभिप्राय स्थानांतील शकलास प्रथम ध्रुवांकास अनुसरून असलेल्या स्थानांतील शकलाने गुणून एक शकल तयार करावे. नंतर द्वितीय ध्रुवांकास अनुसरून असलेल्या स्थानांतील

शकलाने १ ल्या शकलास गुणावे. नंतर गुणलेल्या शकलाच्या अ ब ज द. क्रमाप्रमाणें संख्या करून ती संख्या एकीकडे मांडून, तृतीय ध्रुवांकास अनुसरलेल्या शकलाच्या अ ब ज. द. क्रमानं संख्या करून दोन्ही संख्या मिळवून मनोभिप्राय स्थानांपासून १-२ प्रमाणें ती संख्या पूर्ण होईपर्यंत मोजावे. ज्या शकलावर ती संख्या पूर्ण होईल त्या शकलाच्या शुभाऽशुभ गुणावरून कार्याचा परिणाम सांगावा. उदाहरण-एका गृहस्थाने 'आपणांस मित्राची भेट होईल काय" असा प्रश्न केला आहे हा प्रश्न ध्रुवांक कोष्टकात १ल्या स्थानाच्या प्रश्नसमूहात ४था आहे तेथे लिहिलेल्या 'मित्राची भेट' या वाक्याच्या पुढे ध्रुवांक ५-९-१४ आहेत.



त्यांतील प्रथम अंक ५ आहे. मनोभिप्राय स्थान १ ले त्यापासून ५व्या स्थानांत हें शकल आहे, यास मनोभिप्राय स्थान १ले तेथील या शकलास ध्रुवांक शकलाने गुणल्यावर हे शकल तयार झाले. या शकलास द्वितीय ध्रुवांक ९ आहे मनोभिप्राय स्थानापासून ९ व्या स्थानांत हे शकल आहे, वरील या शकलास या शकलाने गुणल्यामुळे हे शकल तयार झाले याचो अ. ब. ज द क्रमानें ३ संख्या आहे (रेषा सोडून शून्यांची संख्या धरावी वगैरे १ ल्या भागांत सांगितलेले पहा.) आतां तिसरे ध्रुवांक १४ आहे मनोभिप्रायाच्या १ ल्या स्थानांपासून १४ व्या स्थानांत हे शकल आहे; याची अ.ब.ज द.संख्या क्रमाप्रमाणें ७ झाली वरील ३-७ मिळविल्यानें १० संख्या झाली. आतां ती संख्या वरील रीतीत सांगितल्याप्रमाणें मनोभिप्रायाच्या १ ल्या स्थानापासून मोजल्याने १० व्या स्थानावर पूर्ण झाली; त्या स्थानी हे शकल आहे. ते शुभ खारीज असल्यामुळें अत्यानंदानें भेट होऊन, व्यापार, नहीम, राजकार्य, आईचे कुशल वगैरेचे भाषण होईल खारीज आल्याकारणाने लवकरच परतावे लागेल. याप्रमाणें त्या शकलास उपकरणादि साहित्यें सर्व जुळवून त्या त्या आधारे ज्योतिष्यानी या ध्रुवांकांचा प्रश्नसमूह सांगावा.

१ ल्या स्थानांतील प्रश्नसमूह	ध्रुवांक		
	प्र	द्वि	त्रि
भविष्यकाल विचार.	२	५	२
भूतकाल विचार	२	४	१६
वय आणि अवस्था.	३	१३	४
मित्राची भेट	५	९	१४
शुभाशुभ योग	५	७	११
कार्यारंभ	१	७	९
विश्रामपरिश्रम	११	३	५
अभिप्राय	११	३	६
प्रतिष्ठा अथवा निंदा	७	५	१३
शोक. मंगल.	५	६	११
स्थिरचर.	३	६	१४
वचन.	९	१३	५
गुप्तकार्य.	६	५	९
स्वभोग.	३	१४	१
आयुर्दाय.	३	१३	१४
सुख, दुःख.	४	१४	४

२ ऱ्या स्थानांतील प्रश्नसमूह	ध्रुवांक		
	प्र	द्वि	त्रि
भविष्यकाल.	३	५	१३
भूतकाल.	१	३	२
मातृ, भ्रातृविचार.	५	१०	५
मानापमान, भोग.	११	५	२
मित्रसहाय्य, दान.	३	७	१४
कृपण स्वयोग.	१०	१२	१०
बायकांचे प्रमाण	७	२	७
प्रवास, आगम.	१०	७	११
विवाद, भय.	५	१०	८
कर्ज काढणें.	८	६	२
कर्ज देणें	८	७	१०
येण्याची इच्छा.	१४	१३	१०
द्रव्यागम.	१४	८	१४
दुसऱ्यांची हकीकत.	११	५	१४
आय, व्यय.	५	४	२
द्रव्यदानादि.	८	१४	२

३ ऱ्या स्थानांतील प्रश्नसमूह	ध्रुवांक		
	प्र	द्वि	त्रि
भविष्यकाल.	५	१	५
भूतकाल.	३	१	५
कृषीकर्म,	१	७	३
अक्षरारंभ	१	५	१३
व्रत, गमन,	१	४	१३
घर, गांव, देश प्रवेश	४	१	३
मानलेला आप्त	१	६	१३
सहवासाचे सुख दुःख.	१	४	१३
शास्त्रारंभ.	९	१२	५
स्वगोत्राचे कुशल.	१	७	३
मूर्खपणा.	१२	१	६
विद्येत जय.	९	३	१
प्रवास, आरंभ.	१	४	३
स्वप्न.	५	९	९
समीप गमन.	९	५	१३
भाऊ बहीण.	२	२	१३

४ थ्या स्थानांतील प्रश्नसमूह	ध्रुवांक		
	प्र	द्वि	त्रि
भविष्यकाल	५	[illegible]	५
भूतकाल	१	२	३
घर शेत विकणें.	३	१	४
पितृ द्रव्य लाभ	१	३	६
मळा, उपवन.	६	२	४
मित्राऽमित्र	७	५	३
भू. गृह, देवालय,	८	५	२
स्वआयुः परिणाम.	३	१०	४
भूगतधन.	७	१	४
भावाजवळील द्रव्य.	८	३	५
घर, भूमी वार्धिक्य	५	४	५
वृक्षादिरोपण	२	६	२
गृह, भूमी विक्रय	२	१	१
भय निर्भय.	६	८	४
परिणाम.	५	८	१२
पित्त अवस्था	११	१०	४

५ व्या स्थानांतील प्रश्नसमूह	ध्रुवांक		
	प्र	द्वि	त्रि
भविष्यकाल.	७	३	२
भूतकाल.	४	१	५
मुलांचे रोग	१०	४	५
स्वदु:ख विमोचन	११	४	१
आनायास लाभ	२	४	५
प्रसन्नेच्छा	२	८	२
दु:ख विमोचन काल.	११	६	२
अन्य स्त्री गमन.	२	३	९
प्रेषित वस्तु ग्रहण.	२	८	६
मित्र प्रीति	३	१	३
मित्र अवस्था.	७	९	५
मुलांचे जनन मरण.	११	१२	६
मित्र आहे कीं नाहीं.	११	६	१५
गर्भ आहे काय.	१०	३	६
पुरुष कीं स्त्री	६	५	७
संतानोत्पत्ति.	३	१	५

६ व्या स्थानांतील प्रश्नसमूह	ध्रुवांक		
	प्र	द्वि	त्रि
भविष्यकाल	७	३	२
भूतकाल.	२	५	२
भ्रातृ अवस्था.	५	३	५
पितृव्य.	१	७	३
सेवकांची खरेदी विक्री.	३	२	६
भ्रातृग्रह, भूमी.	२	९	७
पित्याचा सहवासी.	६	९	७
पक्षी क्रय विक्रय.	४	७	१
भूमी आणि कीटक.	५	१	५
मुलांची स्थिती	१	५	६
पशूंची स्थिती.	५	२	६
भेद आणि गुप्त	२	१०	६
दासदासींची विक्री.	११	१३	६
शुभलाभ विचार	११	७	४
रोगमुक्तीकारक	९	२	६
रोगाची स्थिती.	४	२	६

७ व्या स्थानांतील प्रश्नसमूह	ध्रुवांक		
	प्र	द्वि	त्रि
भविष्यकाल.	९	९	४
भूतकाल.	६	२	६
प्रवाशाचे येणें.	२	७	९
विजय प्राप्ती	२	१	७
दुर्जनांची स्थिती.	२	६	२
प्रवास करणेची निश्चित वेळ	९	५	२
प्रवासी आला काय	११	७	५
प्रवाशाचे जीवन मरण.	१०	१५	१४
गमविलेल्याचे येणें.	१६	७	६
गमविलेल्याची स्थिती	१६	३	१६
चोराचे स्वरूप.	८	८	७
प्रवाशाची स्थिती.	९	७	५
भागीदारी	१	८	२
स्त्रियेची जात व स्वभाव	१	११	७
स्त्रियेचे रूप वर्णन.	११	६	७
सतिपतीचा प्रपंच.	१	६	७

८ व्या स्थानांतील प्रश्नसमूह	ध्रुवांक		
	प्र	द्वि	त्रि
भविष्यकाल	९	११	९
भूतकाल.	७	२	५
भ्रातृ व दास विचार.	३	७	३
दासी आणि दास	३	९	६
स्वमित्र, पितृविचार.	४	२	९
पित्याची योषिता	७	४	४
भार्येचे द्रव्य	२	७	६
भ्रातृरोग.	३	६	८
रोग्याचे मृत्यु.	६	१४	८
मित्राचे घर.	४	२	८
चोराने धन खर्च केले कां?	६	१४	५
मुलाची स्थिती.	५	१६	५
स्वतः मिळविणें	२	१४	८
मृत्यु:	४	२	८
भय, त्रास.	५	७	६
अपवाद भक्ति.	१	८	११

९ व्या स्थानांतील प्रश्नसमूह	ध्रुवांक		
	प्र	द्वि	त्रि
भविष्यकाल	१०	३	१०
भूतकाल.	३	२	१
भावाचा सहवासी.	३	१	११
संतान, मित्र, स्त्री विचार.	११	९	५
भ्रातृ व भार्या.	११	२	९
पौत्र विचार	७	५	२
कार्यारंभ	१	३	८
कार्याचा खरेपणा	२	३	९
दुसऱ्यांचा रोग	३	४	८
स्वधर्म विचार.	५	१	३
या कार्याची इच्छा.	३	५	१
विद्याभ्यास.	३	११	५
स्वप्नाचे फळ.	३	३	७
प्रवाशाचे परत येणे.	११	३	९
मार्गांत भय.	५	३	९
दूरचा प्रवास.	३	५	१

१० व्या स्थानांतील प्रश्नसमूह	ध्रुवांक		
	प्र	द्वि	त्रि
भविष्यकाल.	३	१	१
भतकाल	३	१	१
मुलांच्या सेवकाचा विचार.	७	९	९
भार्येचा परिणाम.	५	७	९
भार्येचे गांव आणि भूमी.	५	४	७
बंधूचे मरण.	४	७	७
बापाचे सहवासी.	३	६	१०
मुलांचा रोग.	७	२	९
आईचा विचार.	४	३	१०
बापाची नवीन बायको.	५	१६	९
व्यवहाराचें फल.	३	७	३
व्यापाराकरितां जाणें,	२	७	२
इंद्रजाल आणि न्याय.	२	५	१०
अधिकार.	३	४	१
लक्ष्मीचे स्थिरत्व.	१३	२	१
राजाची स्थिता.	२	७	१०

११ व्या स्थानांतील प्रश्नसमूह	ध्रुवांक		
	प्र	द्वि	त्रि
भविष्यकाल.	४	७	१२
भूतकाल.	१०	२	१०
राजाचा बंधु.	४	७	७
मुलगा आणि सून.	१६	११	६
मृत्युचें कारण.	४	२	१४
भावाचा प्रवास.	३	३	३
भार्या, मित्र.	४	९	५
मुलाचे मरण.	१३	९	११
हितकरी मित्र.	१	७	११
मुलांचें लग्न.	१५	९	११
राजाचा खजाना.	१	५	१०
मित्रासह भेट.	१५	९	११
बापाचे भय आणि मृत्यु.	११	१५	११
मनीषेचें साफल्य.	१५	३	१४
राजाचा मित्र.	१	५	११
मित्राची स्थिती.	५	४	९

१२ व्या स्थानांतील प्रश्नसमूह	ध्रुवांक		
	प्र	द्वि	त्रि
भविष्यकाल.	३	१०	३
भूतकाल.	११	९	११
बंधु मोक्ष.	३	९	११
पशु विक्रय.	१२	१	१२
पित्याचा प्रवास.	३	९	३
हितमित्राचे भय.	८	१२	१
भावाचा प्रताप.	७	१२	६
बायकोचा रोग.	६	७	५
शत्रूचा संकेत.	५	७	१२
शत्रूबरोबर तंटा.	७	२	१४
साधकावस्था.	७	५	१२
भावाचे राजकार्य,	४	१२	१२
चतुष्पादांची प्राप्ती.	६	३	६
दुष्ट लोकांचा परिणाम.	१५	७	१२
शत्रुसी वैरत्व.	६	४	
दुष्ट लोकांची अवस्था.	५	७	२

१३ व्या स्थानांतील प्रश्नसमूह	ध्रुवांक		
	प्र	द्वि	त्रि
भविष्यकाल.	६	५	१४
भूतकाल.	३	२	१०
वर्तमानकाल.	१४	५	१०
साक्षीदारांचा खरेखोटेपणा	१०	४	७
आज्ञेंचे शाफल्य	४	७	१५
प्रश्नकर्त्याचे स्वरूप	३	११	१३
बातमीचा खरेपणा	३	११	३
विश्वासुकाचा विचार.	७	८	११
वैऱ्यांचे धन.	५	४	८
आईची स्थिती.	७	१५	१
मामाची स्थिती.	१२	६	५
बंधूचा लाभालाभ	५	९	३
मूलाची धर्मवृद्धी.	१०	७	१
पतीचे सुखदु:ख	४	१०	७
अ:इंचे सुखदु:ख.	५	९	६
बापाचा व्यापार व अधिकार	३	५	४

१४ व्या स्थानांतील प्रश्नसमूह	ध्रुवांक		
	प्र	द्वि	त्रि
कथन श्रव .	१४	१३	१२
देवता वृत्तांत.	३	९	६
कार्यकारण.	१	५	१
सवं ' आणि महाग	२	२	४
मित्र प्रताप	९	७	२
भावाचा वैरी.	४	३	५
व्याप.राकरिता प्रवास.	३	९	३
प्रवासात लाभ,	७	९	६
स्वजनांचा f चार.	६	९	७
सेवकाचा प्रवास.	४	३	५
बायकोचा मृत्यु व भय.	१२	७	४
बापाची इच्छा.	११	१०	३
हितमित्र.	१४	७	३
गुरूची आज्ञा.	४	७	३
राजाचा मित्र.	४	७	३
भावाचे संकट.	१	९	३


१५ व्या स्थान'तील प्रश्नसमूह	ध्रुवांक		
	प्र	द्वि	त्रि
समूहकरण.	५	३	९
न्यूनकरण.	५	२	
मलउपाय	५	३	९
उपद्रव.	१२	६	७
विद्याभ्याश.	२	५	२
पठण.	१२	२	७
राजाचा रोग.	१	९	४
मरणानंतरची स्थापणा.	१	६	१४
मित्रापासून लाभ	१	११	३
बापाचा वैरी.	४	११	१४
पंडिताचा विचार.	४	११	४
समीपचा प्रवास.	१	११	१५
स्वस्थानी स्थापना.	१२	५	४
स्वस्थलाचा विचार	१२	११	८
हिस्सा केला तर कसे.	३	१२	६
व्यापार.	९	१२	६

१६ व्या स्थानांतील प्रश्नसमूह	ध्रुवांक		
	प्र	द्वि	त्रि
कार्याचा परिणाम.	६	२	१४
या देशाचा लाभ.	१४	१०	९
कार्यं निरीक्षण.	३	९	१४
मित्राचे दुष्टत्व.	१२	३	५
कार्याचा समास	२	१४	४
स्वसुख.	९	२	७
त्याग.	१५	११	१४
वाईट लोकांचा विचार.	९	४	३
हितवादीचा विचार,	१२	१६	५
दुष्ट लोकांची वृत्ती.	३	११	५
पृथ्वीपतीची इच्छा.	५	११	२
हो वार्ता खरी काय ?	५	११	७
सर्व कार्यात दृष्टी	११	२	२
सर्व वस्तूंचा सिद्धांत.	१२	१५	५
हितमित्राचा रोग.	३	१२	६
अखेर मनीषेचे साफल्य.	५	१०	१०

एवं षोडशभावेषु विशेषः कथितोमयाः ।।
अन्यान्यपि च सर्वाणि सामान्यनेववर्त्मना ।। ४९ ।।

अर्थः— याप्रमाणे १६ हीं स्थानांतील प्रश्न समुदाय पाठकांच्या सोईसाठी सांगण्यात आले. याहीपेक्षां अन्य प्रश्न ज्योतिषींसमोर आल्यास उपकरणादि साहित्याने व बुद्धीबळानें देशकाल स्थितीचा विचार करून सांगावे.

भास २ रा



भाग ३ रा.

वर्ष, मास, दिनेत्यादि फलविचार.

ज्योतिष्याने सायनमेषराशीस प्रातःकाळी उठून धर्मांप्रमाणे स्नान संध्यादि कर्मे सारून आनंद मुद्रेनें इष्ट देवतेस व गुरूंस स्मरण करून १ ल्या भागांत सांगितलेला मंत्र सात वेळ उच्चारिल्यावर समस्त जागाकरितां अथवा प्रत्येक देशाकरितां अगर प्रश्नकर्त्याच्या सुखदुःखाच्या विचाराकरितां मध्यान्हाच्या पूर्वीच कुंडली निर्माण करून त्या वर्षांत होणाऱ्या फळाचा विचार करावा.

वर्ष फल विचार:— कुंडलीच्या १ ल्या स्थानांत शुभ शकल असल्यास शरीरास उत्तम सुख. पापी शकल असून निर्बली असल्यास देहास अत्यंत कष्ट होतील. ते शकल पापी असून बलिष्ठ असल्यास मध्यम सुख होईल. याच प्रमाणे १२ ही स्थानांचा विचार करून फल सांगावे. आतां शकुन क्रमानें स्वकीय स्थानाचे शकल असून पापी असलें तरी त्या स्थानासंबंधी फलवृद्धी होईल. आणि ते स्वकीय स्थानाचे शकल पूर्ण बलिष्ठ असल्यास त्या स्थानसंबंधाचे फल अधिक होईल.

रीत २ रीः— १ ल्या स्थानांत खारीज शकल असल्यास त्या स्थानसंबंधाचे विचारवृद्धी होणार नाही. ते दाखील शकल असल्यास वृद्धी होईल. आणि ते दाखील शकल पूर्ण बलिष्ठ असल्यास त्या स्थानसंबंधाचे फलाधिक्य. मुनकलीब शकल असल्यास त्या स्थानसंबंधाचे फल कमीं होईल. साबीत असल्यास त्या स्थानसंबंधाचे फलवृद्धी होईल. साबीत शकल निर्बली असल्यास त्या स्थान-संबंधाचे फल मध्यम होईल. आणि साबीत शकल पूर्ण बलिष्ठ असल्यास त्या स्थानसबंधाचे फल अधिक होईल. आणि त्या स्थानांतील शकले शुभ स्थानांत तकरार करीत असतील तर त्या स्थानाचे फल शुभ; आणि अशुभ स्थानांत तकरार केल्यास अशुभ फल, आणि मध्यम स्थानात तकरार केल्यास मध्यम फल असे जाणावे.

मास फल विचार:— कुंडलीच्या १ ल्या स्थानापासून १२ स्थानांपर्यंत असलेली शकले अनुक्रमें प्रति महिन्याची होत. त्या शकलावरून मासफलाचा विचार करणे तेः— १ ल्या महिन्याचा विचार १ ल्या स्थानांतील शकलानें २ ऱ्या महिन्याचा विचार २ ऱ्या स्थानांतील शकलाने याप्रमाणे १२ ही महिन्यांचा

विचार करावा १ त्या स्थानांतील शकल शुभ ग्रहाचे असून बलिष्ठ असल्यास त्या महिन्यांत शरीर सुखादि फले उत्तम. शुभ असून निर्बली असल्यास शरीर सुखादि फले मध्यम; ते निर्बली असून पापी ग्रहाचे असेल तर, त्या महिन्यांत शरीरास सुख न होता क्लेश होईल. आणि ते शकल शुभ स्थानांत तकरार करीत असेल तर, त्या महिन्यांत साधारण शुभ फल आहे. ते शकल अशुभ असूल मध्यम स्थानांत तकरार करीत असेल तर, तो महिना मध्यम. ते शकल दोन्ही शुभ शकलापासून झालेलें असल्यास, त्या महिन्यांत शरीरास सुख उत्तम अशुभ शकलांपासून उत्पन्न झाल्यास,त्या महिन्यांत अनिष्ट फल. मध्यम शकला. पासून उत्पन्न झाल्यास मध्यम. दोन्ही शुभ असून पापी शकलापासून उत्पन्न झाल्यास, त्या महिन्यांत शरीरसुख मिश्र रीतोनें होईल. निर्बलो आणि पापी शकलांपासून उत्पन्न झालेले शकल निर्बली असेल तर, त्या महिन्यांत सुख न होता नानाप्रकारची संकटें उद्भवून द्रव्यादिकांचा नाश होईल. आणि ते शकल निर्बली आणि शुभ अशा दोन शकलांपासून उत्पन्न झालें असल्यास त्या महिन्यांत शरीरसुखादि सर्व फले मध्यमपणे चालतील आणि ते शकल कोणत्या तत्वाचे असेल ते तत्व आणि तें कोणत्या स्थानांत तकरार करते तेथील स्थानतत्व या दोन्हीचे मित्रत्व असल्यास, त्या महिन्यांत शरीरास उत्तम प्रकारचे सुख होईल. शत्रुत्व असल्यास त्या महिन्यांत कष्ट अधिक होईल. मास शकल आणि मूल स्थानाचे शकल त्या दोन्हीचे मित्रत्व असल्यास शरीरसुखादि फले उत्तम. मास शकल आणि मूल शकल कोणत्या स्थानांत तकरार करते तेथील मूलस्थानाचे शकल या दोन्हीच्या गुणाकारानें येणारे शकल शुभ असल्यास त्या महिन्यांतील सर्व कामें शुभ आणि अशुभ असून निर्बली असल्यास त्या महिन्यांत बरीच संकटे उद्भवतील. त्या शकलाचे साक्षीस्थान जे असेल ते बली असल्यास तो महिना सुखानें जाईल. आणि साक्षीस्थानांतील शकल निर्बली असल्यास, तो महिना अनिष्ट. त्या साक्षीस्थानाचे शकल दोन शुभ शकलांच्या योगे झालेले असल्यास तो महिना सुखकारक. त्या शकलांचे तत्व आणि साक्षीस्थानांतील तत्व या दोन्हीचे मित्रत्व असल्यास अथवा दोन्ही एकच असल्यास त्या महिन्यांत सुख उत्तम होईल, आणि शत्रुत्व असल्यास कष्ट होईल. त्या मास शकलांचे साक्षी-शकल कोणत्या स्थानीं तकरार करील ते स्थान शुभ शकलाचे असल्यास त्या महिन्यांत अधिक शुभ. आणि अशुभ असल्यास अधिक कष्ट होईल. ते मास शकल कोणत्या स्थानांत तकरार करते तेथील स्थानतत्व आणि त्याच्या


साक्षीस्थानाचें तत्व या दोन्हींचें मित्रत्व असल्यास त्या महिन्यांत शरीरसुखादि फले उत्तम. आणि शत्रुत्व असल्यास नानाप्रकारची दुःखें उत्पन्न होतील. ज्या मासशकलावरून विचार करणेंचे आहे त्याच्या अधिपतीचे दुसरे शकल ती दोन्ही शुभ असल्यास त्या महिन्यांत अधिक शुभ. अशुभ असल्यास अनिष्ट फल. बलि असल्यास त्या महिन्यांत मध्यम फल. ही रीत एका महिन्याची झाली. याच-प्रमाणें १२ ही महिन्यांचा विचार आणि अनुधन वगैरे फलचक्राचा विचार करून उत्तर सांगावे ह्मणजे फल चुकणार नाही.

दशाफल ज्ञानार्थ साबीत कुंडली.


फांसे टाकून कुंडलीं निर्माण करून १३-१०-११-१४ स्थानांतील शकले परभारे घेऊन त्यावरून दुसरी कुंडली तयार करावी. त्या तयार केलेल्या कुंडलींतील १ लें आणि १३ व्या स्थानाचें शकल समान. २ आणि १० व्या स्थानांतील शकले समान. ३ आणि ११ व्या स्थानांतील शकलें समान. ४ आणि १४ व्या स्थानांतील शकलें समान आल्यास त्या कुंडलीस 'साबीत' असे नांव आहे. त्या कुंडलीत साबीत झालें नसल्यास त्याच कुंडलीतील १३-१० ११-१४ स्थानांतील शकलें घेऊन पूर्ववत् दुसरी कुंडली तयार करावी. त्यांतही साबीत न होईल तर पुनः करावी याप्रमाणें ६ कुंडल्यापर्यंतच हा हिशब जातो. प्रश्नकुंडली धरुन ६ कुंडलींत साबीत झालेंच पाहिजे. उदाहरणार्थ खालील प्रश्नकुंडली पहा. त्यावरून साबीत होण्याकरिता पुढें ४ कुंडल्या झाल्या. ह्मणजे पांचव्या कुंडलीत साबीत झालें आहे.

प्रश्न कुंडली १ ली.

ही फांसे टाकून तयार केलेली कुंडली आहे यांत साबीत झालें ह्मणून पुढच्या पानावर साबीत करण कुंडली तयार केली आहे.




साबीत करण कुंडली २ री.




मागे सांगितलेल्या प्रश्न कुंडलीत साबीत झाले नाही ह्मणून त्या प्रश्न कुंडलींतील १३-१०-११-१४ स्थानांतील (स्थले समजण्याकरितां अंक घातले आहेत) शकले घेऊन बाजूचीं दुसरी कुंडली तयार केली आहे यांतही साबीत झाले नाही ह्मणून खालील कुंडली पूर्व नियमाप्रमाणे तयार केली.

साबीत करण कुंडली ३ री.




दुसऱ्या कुंडलींतील १३-१०-११-१४ स्थानांतील शकले घेऊन बाजूस दाखविलेली तिसरी कुंडली तयार केली. या तिसऱ्या कुंडलीतही साबीत झाले नाही ह्मणून खालील ४ थी कुंडली पूर्ण नियमाप्रमाणे तयार केली.

साबीत करण कुंडली ४ थी.



तिसऱ्या कुंडलीतील १३-१०-११-१४ स्थानांतील शकले घेऊन ४थी कुंडली तयार केली तरी साबीत झाले नाही. ह्मणून पुढींल पानावर कुंडली तयार केली ती पहा.

साबीत कुंडली ५ वी.



चौथ्या कुंडलीतील १३-१०-११-१४ स्थानांतील शकले घेऊन ही बाजूची पांचवी कुंडली तयार केली आहे. यांत मात्र पूर्वोक्त रीतीस अनुसरून पाहतां १ ल्या स्थानांतील व १३ व्या स्थानांतील दोन्हीं शकले ०।० उकला. २ ऱ्या स्थानांतील व १० व्या स्थानांतील दोन्हीं शकले ०।०० नकी. ३ ऱ्या स्थानांतील व ११ व्या स्थानांतील दोन्ही शकले ०।०० फरहा. आणि ४ थ्या स्थानांतील व १४ व्या स्थानातील दोन्हीं शकले ० इज्जतमा याप्रमाणे समान पडल्यामुळे हिलाच साबीत कुंडली असे ह्मणावे.

साबीत कुंडलीचे फळ.

१ ल्या कुंडलीतच साबीत होईल तर, द्रव्यलाभ वगैरे होऊन सर्व प्रकारे शरीरास सुख होईल.

२ ऱ्यांत होईल तर, सर्व प्रकारे अतिशय सुख होईल.

३ ऱ्यांत होईल तर, त्या वर्षी धनप्राप्ती अत्यंत होईल.

४ थ्यांत होइल तर, त्या वर्षी सर्व फले मध्यम होतील.

५ व्यांत होईल तर, त्या वर्षी देहास अत्यंत कष्ट होतील.

६ व्यांत होईल तर, त्या वर्षी मृत्यु अगर मृत्युसमान कष्ट होतील.

कुंडलीदशा, मासदशा व सूक्ष्मदशा काढण्याची रीत व फले- ज्या कुंडलींत साबीत होइल, त्या कुंडलीचा अंक घेऊन त्या अंकाने ३६५ दिवस १५ घटिका ३१ पळास भागावे. आलेला भागाकार कुंडली दशेचा. त्या कुंडलीदशेस १२ नें भागून येणारा भागाकारच सूक्ष्मदशेचा.

उदाहरणः- वरील साबीत करण ५ व्या कुंडलीत झाले आहे, त्या पांचव्या

अंकानें (३६५ दि. १५ घ. ३१ प.) / ५ भागिले असतां ७३ दिवस ३ घटिका ६१/५ पळें आली हें दिवस कुंडलीदशेचें. या (७३ दिवस ३ घटिका ६१/५ पळांस) / १२ १२नें भागितां ६ दिवस १५ घटिका ३१ पळें ही सूक्ष्म दशेची आली. कुंडली दशेच्या शकलेस सूक्ष्म दशेच्या शकलेनें गुणून येणारे शकल सूक्ष्मदशेचें जाणावें.

आलेले शकल शुभ असून शुभ स्थानांत तकरार आणि बलिष्ठ असल्यास शरीरास उत्तम प्रकारचें सुख मिळून द्रव्यलाभ, शत्रुनाश आणि मित्रसमागम इत्यादि उत्तम फलें प्राप्त होतील. अशुभ असून शुभ स्थानांत तकरार करील तर मध्यम फल आणि अशुभ असून अशुभ स्थानांत तकरार व निर्बली असल्यास अनिष्ट असें जाणावें.

सोळा स्थानांत पडलेल्या शकलांचे फल—  हें १ ल्या स्थानांत पडल तर सन्माननीय गृहस्थांची भट होऊन श्रेष्ठ वस्तूंचा लाभ. २ ऱ्यांत खरेदीं विक्रींत लाभ होऊन उत्तम विचार व स्वतःचे द्रव्य खर्च होईल. ३ ऱ्यांत भाऊ बहिणीकरितां जवळचा प्रवास होईल. ४ थ्यांत स्वतःचे घराचा विचार आणि मिळकतीचा लाभ, बापाकडून आनंद व मित्राकडून सहाय्य होईल. ५ व्यांत मुलांची अगर मित्रांची सुवार्ता ऐकण्यांत येऊन रोग बरा होईल. ६ व्यांत सेवकाकडून नुकसानी, सेवक आणि पशू बंधांत राहणे, रोग बरा होऊन गुप्त गोष्ट प्रकट होईल. ७ व्यांत लग्न कार्य व पुत्रोत्पत्ती. ८ व्यांत सरकारांत स्वतःचा दावा चालेल. ९ व्यांत चांगल्या वस्तूंचा लाभ होऊन दूरचा प्रवास होईल व चांगलें स्वप्न पडेल. १० व्यांत राजा, अधिकारी अथवा श्रीमंताकडून बहुमान होईल. मनास आनंद होण्याजोगा आशिर्वाद आई देईल. ११ व्यांत विद्वानांचा आश्रय, सुख आणि आनंद. १२ व्यांत चतुष्पादांचा नाश आणि वैद्याकडून नुकसान. १३ व्यांत श्रीमंतांच्या आश्रयानें प्रवास व लाभ. १४ व्यांत मोठ्या गृहस्थाकडून अभय. १६ व्यांत सर्व कामांचा नाश.

ठ :– १ स्थानांत पडेल तर, पुण्यप्राप्ती आणि कार्यारंभ. २ अल्पकार्यात लाभ होऊन अधिक धनसंचय. ३ आप्तइष्टांकडून आणि जवळच्या प्रवासांत लाभ होऊन दुसऱ्यांची भेट होईल. ४ बापाची मिळकत स्वाधीनांत येऊन मालमत्तेची उत्तम व्यवस्था होईल, मित्रावर विश्वास ठेवू नये. ५ मुलांकडून अगर मित्रांकडून आनंद आणि धन प्राप्ती. ६ रोगोद्भव, दुःख आणि हानी. ७ लग्नकार्य, सेवकाकडून आनंद आणि कार्यात आळस होऊन वैरत्व होईल. ८ द्रव्यलाभ, उत्तम विद्या प्राप्ती, मित्राकरितां दुःख आणि रोगोत्पत्ती. ९ स्वप्न फल उत्तम ४५ दिवसपर्यंत द्रव्यलाभ. तसेच सराफी कार्यात लाभ. १० राज–कार्यात अनुमोदन आणि श्रीमंताकडून लाभ. ११ इच्छित कार्यांत आणि मित्रा-कडून लाभ. १२ कैदीची मुक्तता व पशुलाभ. १३ मोठ्या प्रयत्नाने विद्वज्जनां कडून सहाय्य. १४गमविलेल्या वस्तूंचा लाभ आणि नाहींसा झालेल्या माणसाची भेट. १५ वस्तु मिळून द्रव्यप्राप्ती होईल. १६ नाहीसा झालेल्या माणसाची भेट व पुष्कळ लाभ.

ठ :– १ ल्या स्थानात पडेल तर, व्यापाराकरितां प्रवास करण्याल अडचण येइल, परंतु थोडया दिवसानंतर माल आणिला तर लाभ होईल. २ जवळचा प्रवास आणि मालाची नुकसानी. ३ जवळचा प्रवास आणि भावाकडून दुःख. ४ शेत, घर वगैरे मिळकतीची हानी आणि बापास कष्ट. ५ मित्र आणि मुली–करितां दुःख. ६ सेवकांची हानी, रोगोत्पत्ती आणि गुप्त गोष्ट प्रकट होईल. ७नाहीसा झालेल्या माणसाचे स्थलांतर आणि स्त्री वियोग. ८हरवलेल्या वस्तूंचा लाभ, रोग नाश, चिंता. स्वतःच्या माणसाचा वियोग. ९ सत्र कार्यात आळस, वाईट स्वप्न पडेल, लाभाकरितां प्रवास केला तरी हानी होईल. १० अपमान, राज भय, आईकरितां दुःख आणि मोठ्या लोकांचा स्नेह. ११ राजाकडून लाभ आणि मित्राकडून हानी. १२ पशूंची हानी, कैद्याची मुक्तता आणि मित्राकडून दुःख. १३ मध्यस्थी आणि राजभय. १४ वतनाकरितां खर्च होईल परतु लाभ झाला नाही तरी इच्छित कार्यात अर्धं फल. १५ हानी. १६ लाभ हानी समान.

≡ :– १ ल्या स्थानांत पडल तर, देय चिंता, सर्व कार्यात आळस, लिहिण्या-वाचण्यांत भय, उगी राहणे, अति चिंता, व्यर्थ भटकणे. २ राजाकडून लाभ. ३ चिंता, भावाकडून लाभ, जवळचा प्रवास घडणे. ४ बापाकरितां दुःख आणि इच्छित कार्यं निष्फळ. ५ वकिलीचा अपवाद, पुत्रविरह आणि दुःख वार्ता. ६ रोगाधिक्य, चोरी मिळेल आणि कैद बंधमुक्त हाइल. ७ चोरी गेलेली वस्तु विलंबाने मिळेल. ८ रोग अधिक होईल. ९ विद्वजनांकडून लाभ आणि दूरचा

प्रवास. १० लिहिण्यावाचण्यांत भीती. ११ चांगले मित्रत्व आणि विलंबाने प्राप्ती होणें. १२ वैऱ्याची मालमत्ता स्वतःला मिळेल, कैद्याचो बंधमुक्तता होऊन पशुलाभ होईल. १३ व्यर्थ शब्दारोप येईल पण लगच निवारण, इच्छित कार्याचा लाभ आणि दुसऱ्याकडून द्रव्यलाभ. १४ अठरा दिवसानंतर सर्व कार्ये उत्तम होतील आणि थोडयाशा विलंबाने द्रव्यप्राप्ती. १५ स्त्रियेस कष्ट. १६ हरवलेला इसम आनंदाने येईल.

o o ‒ o :- १ ल्या स्थानांत पडेल तर, मित्रापासून लाभ. मनाची इच्छा एकाच दिवसांत पूर्ण होईल. २ ऱ्यांत मिळकतींची वृद्धी, पत्र येऊन अब्रू मिळेल. ३ ऱ्यांत मित्रलाभ, भावाचे म्हणणें खरे ठरून प्रवासांत लाभ होईल. ४ थ्यांत बापाकडून आनंद आणि माल मिळेल. ५ व्यांत मुलाकडून द्रव्यलाभ व मित्राकडून सुवार्तेचे पत्र येईल. ६ व्यांत अधिक प्रीती, रोग बरा होणे, प्रीतीपात्राकडून दुःख आणि कैद्याची मुक्तता. ७ व्यांत दुसऱ्यांकडून लाभ, नवऱ्याकडून अगर बायकोकडून प्रीती अधिक. ८ व्यांत मित्राकडून कर्ज होईल, मिळकत स्वाधीन होणार नाही, दुसऱ्याकरितां बायकोशी संभाषण. ९ व्यांत प्रवासांत इच्छित फलाचा लाभ, चिंता त्याग, उत्तम फल देणारे स्वप्न पडेल. १० व्यांत दुसऱ्याकडून कार्य होऊन लाभ होईल. ११ व्यांत मित्राकडून लाभ आणि राजकार्यात आनंद. १२ व्यांत मित्र वैरी होईल, कैद्याची बंधमुक्तता आणि पशु लाभ होईल. १३ व्यांत चाललेल्या दुःखांत सुख, प्रियपात्राची भेट आणि हरवलेला लवकर येईल. १४ व्यांत हरवलेला येणार नाही. १६ व्यांत सर्व कामें सुरळीत चालतील.

o ‒ ‒ o :-१ ल्या स्थानांत पडेल तर अहित होईल. २ व्यांत मध्यस्थीत लाभ, द्रव्य प्राप्ती, स्वतःचा माल कष्टानें येईल. ३ बंधूचा विरह आणि राजकार्याची चिंता. ४ नव्या मिळकतीची खरेदी, द्रव्य लाभ, काकाच्या कार्यास आरंभ आणि दुसऱ्या बायकोचा अम्मल चालेल. ५ स्त्री भीती, मित्र अथवा मुलाकडून संशय, हरवलेल्या वस्तूंचा शोध. ६ चोरी मिळेल, सेवकावर विनाकारण अपवाद येईल ७ लग्नाची जुळवण, कर्जाकरितां कैद. ८ मिळकतीचा दावा, कर्जाची वृद्धी, रोगमुक्ती, जागरण अधिक होईल. ९ प्रवासांत लाभ, रोग्याकरितां औषध देणें, खर्च झालेल्या पैशांची प्राप्ती. १० प्रवास, राजाचा अम्मल, दाव्याचे पैसे विलंबानें मिळतील आणि नष्ट वस्तूचा लाभ. ११ मुलांचे लग्न, रोगमुक्ती, मोठ्या

संभाषण. १२ हरवलेला संकटांत पडेल, वैऱ्याचा अम्मल, पशूंची वृद्धी, कैद्यास आणि रोग्यास अनिष्ट. १३ प्रवास होईल, चोरीस गेलेला माल मिळेल. १४ हरवलेला येईल आणि चोरीस गेलेला माल मिळेल. १५ रोगवृद्धी, द्रव्य लाभ १६ चाललेल्या मुकदम्यांत लाभ, कोशगृहाची वृद्धी आणि वादविवादांत जयप्राप्ती.

≡o :- १ ल्या स्थानांत पडेल तर, मालाची चिंता आणि सर्व कामें स्वाधीनांत येतील. २ भागीदारीच्या व्यापारांत लाभ, मालाची वृद्धी, बायकोकडून हानी. ३ भावाकारितां तंटा आणि दुःखाची वार्ता. ४ मिळखतीचा हिस्सा करण्यांत लाभ, हरवलेला येईल. ५ जारिणी स्त्रियेशी स्नेह आणि चोरी, ६ चोरी मिळेल. रोगाधिक्य, सेवक लोक वश होतील. ७ लग्नकार्यांत वृद्धी आणि संगनमत होईल. ८ मिळखतीविषयी न्याय, कर्ज मिळेल, रोगवृद्धी होईल. ९ प्रवासांत लाभ होणार नाही, पत्रव्यवहार, स्त्रियांचे अनुमोदन. १० हरवलेल्या वस्तूंचा लाभ, न्यायांत तकरार ११ मुलाचे लग्न, दिवाणी कामांत वृद्धी, मोठ्या मनुष्याकडून लाभ. १२ वैऱ्याचा अम्मल, कैद्याची मुक्तता आणि रोग मुक्ती, १३ प्रवासांत लाभ, चोरी मिळेल, बायकोसाठी दुःख. १४ द्रव्यलाभ, गेलेला मनुष्य स्वाधीनांत येणें. १६ स्त्रियेकडून सुख, भागीदारींच्या व्यापारांत लाभ.

o= :- १ ल्यांत ऊष्ण विकार, लढाईंत रक्तपात, भय आणि आरंभिलेले कार्य होईल. २ प्रवासांत लाभ आणि चिंता. ३ भाऊ बहिणीकडून आणि बायकोकडून सुख व समीपचा प्रवास, आळस. उद्विग्न, मिळकतीची हानी आणि जीवास अधिक त्रास. ५ सेवकाची सुटका, कैद्याची वाईट स्थिती, पशूंची हानी आणि शरीरास कष्ट. ६ आशिर्वादाच्या बलाने रोगनाश, भाऊबंदांकडून कार्यांत अधिक अम्मल आणि न्याय कार्यांत लाभ. ७ हरवलेला येईल, वाईट स्वप्न पडेल व हानी होईल. ८ राजकार्यांत हानी, मातेचा वियोग. ९-१०-११ राजाकडून हानी, मिळकतींसाठी दावा. वैऱ्याकडून नुकसान. १२-१३ चोरी गेलेली सांपडेल, वैऱ्याचा राग आणि कैद्यास दुःख. १४ वाईट वार्ता, हरवलेल्याची वाईट स्थिती आणि वैरी आपणास मारील. १६ राजा आपली मिळखत काढून येईल.

=o= :- १ ल्यांत रोग बरा होईल, प्रवासांत लाभ, चांगले स्वप्न पडेल आणि आरंभिलेलें कार्य चांगल्या चालून प्रकारे पूर्ण प्राप्ती होईल. २ सुवार्ता,

मित्राबरोबर प्रवास, मालाचीं वृद्धी आणि शेतांत द्रव्यलाभ. ३भागेदाराबरोबर आनंदानें रहावे आणि जवळच्या प्रवासांत लाभ. ४हरवलेल्याची बातमी मिळेल, रोग बरा होइल. मिळकतीची वृद्धी. ५ मुलाचे कार्य आनंदाने होईल. पत्र मिळेल आणि मित्राच्या आगमनाने आनंद होईल. ६पशु लाभ,सेवकाकडून आनंद आणि स्त्री वियोगानें दुःख, हरवलेल्या माणसाची भेट, लग्नकार्यांची सिद्धता आणि उत्तम मालाविषयी विचार. ८ मालापासून लाभ, रोग्याची वाईट स्थिती,मिळखतीसंबंधी तटां. ९ दूरचा प्रवास, चांगले स्वप्न पडेल, लोक आपल्या विचारास अनुसरतील. १० राजाकडून हानी, मोठ्या लोकाकडून लाभ, आणि प्रवासांत लाभ. ११ दिवाणी कार्यांत बळ अधिक. १२ पशूंची वृद्धी, प्रतिष्ठा आणि हरवलेल्या माणसाचा प्रवास अधिक होईल. १३ प्रवासांत लाभ. १४ सर्व कार्यांत लाभ, प्रवासांत इच्छित फल प्राप्ती. १६ सर्व कामें आनंदाने पार पडून लाभ होईल.

:- १ ल्या बलिष्ठाशी द्वेष, राजाकडून लाभ, शेतकींत लाभ, सर्व कामें चांगल्या रीतीनें चालतील. २ प्रत्येक कामांत लाभ,स्वतःचा पाल आनंदाने खर्च होईल, भागीदार आनंदात राहील. ३ लग्नाच्या बायकोसह जवळचा प्रवास. ४ राजाची भेट, मालमत्तेंची वृद्धीं, बापाकडून आनंद, एक मोठे काम आपल्याकडून होईल. ५ मुलाकडून अथवा मित्राकडून सुवार्ता, आणि मोठ्या लोकांत आदरसत्कार. ६ रोग चांगला होईल, पशु लाभ, कैद्याची मुक्तता, मोठ्या मनुष्याकडून लाभ आणि बंधमुक्तता. ७ लग्नकार्यांचे समारंभ, दुसरे लोक वैरत्व करतील. ८ राजभय, रोग बरा होईल, आणि एखाद्या कामांत हानीं. ९ राजाकडून लाभ. १० सर्व कार्यांत वृद्धी, राजा आणि प्रवासांत लाभ, चांगले स्वप्न पडेल. ११ राजा अथवा श्रीमंताकडून लाभ. १२ पशु हानी, दुष्मनाकडून अगर राजाकडून भय. १३ वाईट कामाचा शेवट, रोग चांगला होईल आणि प्रवास घडेल. १४ चोरी मिळेल आणि द्रव्यलाभ होईल. १५पुण्यप्राप्ती होईल सर्व कामें चालतील. १६ सर्व चांगले होईल.

:- १ ल्यांत सर्व कामे चांगली चालतील, विद्वानांकडून आनंद, मित्र अथवा राजाकडून लाभ. २ मित्राकडून पुण्य फलप्राप्ती. ३ जवळच्या प्रवासांत लाभ, भाऊ, मुलगी, राजा, श्रीमंत, काका, बहीण, जावई, सासरा यांच्याकडून लाभ आणि आनंद. ४ बापाकडून अभय, मालमिळखतींची वृद्धीं, अखेर चांगलें.

५ पुत्रोत्पत्ती, मित्राची भेट, सुवार्तायुक्त पत्र येणे. ६ पशु हानी रोगवृद्धी झाल्यास लवकर चांगले होईल. ७ लग्नकार्यात वृद्धी, स्त्रियेकडून लाभ आणि भागीदारीच्या व्यापारात लाभ. ८ वैद्यकीच्या कामांत लाभ, मोठचा माणसाकडून अभय, आपल्या आप्ताकडून त्रास. ९ चांगले स्वप्न पडल, लग्नकार्यात विघ्न. १० मान मिळेल, शेत मिळेल आणि स्त्रियांचा आशिर्वाद. ११ मित्राकडून अभय आणि लग्नकार्यात मोठचा लोकांची मदत. १२ मित्राकरितां मन दुःखी आणि कैद्याची मुक्तता. १३ स्त्रियेसी विनोदाचे भाषण आणि मित्राकडून आनंद. १४ मोठचा माणसाकडून अभय आणि हरवलेला माणूस लवकरच यईल १५ प्रवासांत लाभ आणि मोठचा गृहस्थाशी संभाषण. १६ आयुष्याची वृद्धी, भूमीलाभ आणि अझेल चांगला होईल.

1000 :- १ त्यांत मित्राकडून लाभ, पशूंचीं हानी. २ चोराकडून व वैऱ्याकडून हानी कोशगृहाची, घोडचाची आणि उंटाची हानी. ४ वैऱ्याकडून भय, मिळखतीचे नुकसान. ५ वाईट पदार्थांचा लाभ, पुत्रवियोगाचे दुःख आणि प्रियरात्राबरोबर सभाषण. ६रोग होईल, सेवक जाईल ७चोरी होईल. वैऱ्याशीं संभाषण आणि नष्ट वस्तूंचा लाभ. ८ऋणमुक्त होणें भय आणि रोगवृद्धी. ९पत्रव्यवहार, वाईट स्वप्न पडणें, विचेत खोटगिरीचा अपवाद आणि चोरांची भीती. १० राजाकडून कार्यहानी, नवा वैरी होईल. ११ वैऱ्यास आनंद आणि कैद्याची मुक्तता १२ वैऱ्याचा नाश. १३ वैरवृद्धी आणि कैद्याची मुक्तता १४मित्र वैरी होईल आणि रोग चांगला होईल. १६ वादविवादांत भय असून रोगमुक्ती.

0010 :- १ त्यांत जीवास आरामी परंतु संवादांत उद्वेग आणि चोरांचा विचार. २ राजाजवळ फिर्याद आणि द्रव्यलाभ. ३ बहीण भावाकडून दुःख आणि मोठचा गृहस्थाबरोबर जवळचा प्रवास. ४बापाकरितां दुःख आणि मोठी वार्ता ऐकण्यांत येईल. ५ पंधरा दिवस दिवसांत लाभ होईल, रोग बरा होईल आणि अन्यप्रकारे भय उत्पन्न होईल. ७ स्त्री चिंता. ८ मोठचा माणसाच्या मदतीने प्रवास होईल. ९ ऋणमुक्त होईल. १० राजाकडून अभय आणि सुरू केलेल्या कामात लाभ. ११ मोठ्या मनुष्याचे सहाय्य मिळेल आणि दिवाणी कामांत लाभ. १२ वैऱ्याचे भय आणि कैदी मुक्त होऊन पुनः कैदेत पडेल. १३ चोरी मिळल आणि दूर गेलेल्या मनुष्याची भेट होईल. १४ अभयाशीर्वाद मिळेल. १६ स्त्रियेकडून लाभ आणि रोग बरा होणें.

—०००:- १ त्यांत सर्व कार्यात लाभ, स्त्रियेकडून अभय मिळेल. २ मिळकतीची वृद्धी होऊन लाभ होईल. ३ बहीण भावांकडून लाभ. ४ माल मिळकतीची वृद्धी, बापाकडून आनंद, खरेदी विक्रीत लाभ होईल आणि ब्राम्ही मिळेल. ५ स्त्रियेकडून अभय आणि मुलाकडून काम. ६ रोगवृद्धी आणि कैद्याची मुक्तता. ७ लग्नकार्याची इच्छा. ८ प्रपंचात संकट येणार. ९ चांगले स्वप्न पडेल. १० आईबापांकडून लाभ, माल मिळकतीत मोठचा मनुष्याकडून लाभ. ११ मित्रा-कडून आपली इच्छा सफळ होईल. १२ मोठचा मनुष्याकडून अभय १३ मित्रा-कडून लाभ होऊन आनंद होईल आणि श्रेष्ठ लोकांकडून अभय. १४ पशुलाभ आणि कैद्याची मुक्तता. १६ सर्व कार्यें सुगम होऊन आयुष्य वृद्धी होईल.

—००—:- १ त्यांत आरंभिलेल्या कामांत लाभ होईल. २ व्यापारांत लाभ ३ समीपच्या प्रवासांत लाभ आणि भावाकडून लाभ. ४ बापाकडून आनंद, माल मिळकतीत चांगल्या रीतीनें व्यवस्था चालेल. ५ वैरी मित्र होईल आणि मुलगा आनंदांत राहील. ६ रोग्याला अधिक दुःख होऊन मरेल. ७ जवळचा प्रवास पडेल. ८ राजभय आणि रोगभय. ९ आईकडून आनंद लिहिण्यावाचण्याच्या कामात आनंद आणि मोठचा माणसाकडून लाभ. १० व्यापारापासून लाभ आणि राजाकडून विलबानें लाभ होईल. ११ दिवाणी कामांत आणि मित्रा-कडून लाभ. १२ वृथा प्रवास आणि पशूंची वृद्धी व हरवलेला मनुष्य सुखांत राहील. १३ रोगी बरा होईल आणि गमविलेली वस्तु मिळेल. १४ चाललेल्या कामांत मुलांकडून लाभ. १५ रोग बरा होइल, मिळकतीची वाढ, मित्रवियोग आणि भूमी लाभ, १६ मुलगा आनंदांत राहील.

००००:- १ त्यांत, मोठचा मनुष्याकडून अभय. २ मिळकतीची वाढ, दिवाणा-कडून आनंद आणि घरचा यजमान निरुद्योगी. ३ बंधु बहिणीकडून आनंद. ४ सर्व कामें चांगल्या रीतीने चालून मोठचा मनुष्याकडून लाभ होईल, पुत्राकडून लाभ होऊन प्रियपात्राकडून सुवार्ता येईल. ६ रोग चांगला होऊन पुन: उलटेल ७ बायकोबरोबर भाषण होईल. ८ घरांत आनंद आणि प्यायांत भय. ९ प्रवा-सांत लाभ, नानातऱ्हेची स्वप्ने पडतील. १० आईकडून लाभ, प्रवास आणि कामाची सुरवात. ११ मोठचा मनुष्याकडून इच्छा सफळ होईल. १२ रोगी अत्यावस्थेत राहील, कैदी मुक्त होऊन परत कैदेंत पडेल, १३ निरुद्योगी आणि

चिता. १४ व्यापारांत लाभ. १५ प्रवासांत लाभ. १६ रोग चांगला होऊन सर्व कामें चांगल्या रीतीने चालतील आणि अखेर निश्चयात्मक सुख मिळेल.

देशासंबंधानें वर्ष फल:— मागें सांगितल्याप्रमाणे साबीत कुंडली तयार करून ज्या कुंडलीत साबीत होईल त्या साबीत कुंडलीतील १ × १३, ४ × १४, ७ × १५, १० × १६. या स्थानांतील शकले परस्पर गुणून ४ शकले तयार करून ती चारी क्रमाने एकमेकांस गुणून एक शकल तयार करावे. ते शकल शुभ आणि बलिष्ठ असेल तर, त्या देशास उत्तम सुख मिळेल. उदाहरण:—मागील साबीत कुंडलीच्या १ ⚬ × १३ ⚬. ४ ⚬ × १४ ⚬. ७ ⚬ × १५ ⚬. १० ⚬ × १६ ⚬. या स्थानांतील शकले परस्पर क्रमानें एकमेकांस गुणून ही चार ☰ × ☰. ⚬ × ⚬. शकल तयार करून ती चारी क्रमाने एकमेकांश गुणून ही दोन ☰ + ⚬ तयार केल्यावर ती पुन: दोन्हीं गुणल्या कारणानें हे ⚬ शकल तयार झाले यावरून फल सांगणें ते:—

⚬ :— हे शकल येईल तर, देशांतील लोकांच्या शरीरास सुख, सर्व लोक शुभ कर्मांत आसक्त, कृषीकर्मे वाढून अन्नवृद्धी होईल परंतु ईशान्य कोनांत मात्र प्रति वृष्टी अगर अनावृष्टी होऊन उंदीर, किडें, पोपट अथवा शेताजवळ राजाचे तळ पडून हानी व भय, सेत्रक अथवा बैल वगैरे जनावरांकडून भय उत्पन्न होईल.

⚬ :— व्यापारांत अतिशय लाभ, पुण्य मार्गाकडें लक्ष्य, वृक्षांस अमृतासारखी मधुर फळें पुष्कळ होऊन तो लोकांना यथेच्छ खाण्यास मिळतील. देशांत अगर जगांत उत्तमोत्तम पदार्थांची वृद्धी, राजास सुख मिळून तो नीती कर्मांत तत्पर, प्रजापालनी दक्ष, संसारसुख यथेच्छ, कोणत्याही प्रकारचे उपद्रव न होता निर्भय. हे फल देशाच्या अगर जगाच्या पूर्व देशांत होईल.

⚬ :— लोकांची अंत:करणे उद्विग्न, पाऊस पडणार नाही, ग्रीष्म ऋतूंत उष्मा बराच होईल, राजा अन्याय कर्मी, प्रत्येक घरी आपसांत तंटे, राज्यांत लढाई, नीचांचे आणि चोरांचे प्राबल्य, पाणी आणि विस्तवाच्या योगाने वस्तूंचा नाश, धन हानी, साप, विंचु, कुत्रा वगैरे विषारी प्राण्यांचीं वृद्धी, आकस्मिक मरण ही फले नैऋत्य देशांतील लोकांना भोगावीं लागतील.

☰ :— पदार्थांची वृद्धी, सर्व लोक नीतीनें चालतील व त्यांना सुख होईल, किंचित् श्लेष्म विकाराची भीती, हे फल पश्चिम दिशावासियांना घडेल.

 :- धन वृद्धी, एकमेकांत लग्नकार्ये पुष्कळ, मंगलकार्ये होऊन प्रजेस सौख्य मिळेल, संतती व धान्यवृद्धी,परंतु मध्यतरी किंचित् महागाई, राजा न्याय कर्मात तत्पर, वेळोवेळी उत्तम वृष्टी होईल, रत्नपरीक्षकांची वृद्धी, जारांची वृद्धी, हीं फले सर्वभागी सामान्य असून काबूल,रूस मिसर वगैरे अन्य देशांत अधिक होतील


 :-धान्यादिकांची वृद्धी कमी, लोकांस नानाप्रकारचे रोग होतील, सर्व लोकांची मनें उदास, पाऊस कमी, अभ्रें फार, राजा अन्याय कर्मी, दास दासी लोकांना उपद्रव. हे फल मध्य व दक्षिण दिशेच्या लोकांस मिळेल.

 :-अल्पवृष्टी, धान्यादिक महाग, रोगराई विशेष, प्रत्येक कामाचा शेवट विलंबाने, आकाशांत अभ्रें फार, राजे लोकांत विनाकारण वैर, मोठया लोकांना कष्ट. ही फले पूर्व देशांत अधिक आणि मध्य देशांत सामान्य.

 :-पाऊस कमी चोरांची वाढ होऊन निर्भयपणें वागतील, राजा अन्यास मार्गी प्रवृत्त, सर्व लोक निर्बली, जनक्षय, सर्व कामे कठीण रीतीने पार पडतील, फल पुष्पांची वृद्धी, कांही लोकांना द्रव्यलाभ, नीच लोकांस अत्यानंद ही फले अग्नेय देशांतील लोकांना.

 :-प्रवाशांना सर्वतोपरी सुख आणि सिद्धी, पुष्कळ पाऊस पडेल, मिष्टान्न भोजनें, धनधान्यांची विशेषवृद्धीं, राजा सुखी राहून नीतिमार्गांत कुशल, शास्त्रानुसारे विद्यालाभ, पाण्याच्या सहाय्याने उपजीविका करणाऱ्या लोकांची वाढ. ही फले वायव्य देशांतील लोकांना.

 :-अल्पवृद्धी, व्यापारांत हानी, लोकांस राजदंडाचे भय, चोरांना आनंद आणि सुख, धान्यांचे भाव मध्यम, अभ्रें फार, समुद्रयानें व नौका बुडतील पूर्व देशांतील राजा बलाढ्य.

 :- प्रजेस सौख्य. विजय, हर्षोत्कर्ष होऊन अति द्रव्यलाभ, धान्यविक सवंग, राजा नीतीनें चालेल, वेळोवेळी सर्व प्रकारची वाढ, वृक्ष सुगंध आणि शीतल छायायुक्त राहून उत्तम फले देतील, सर्व लोक धर्मकार्यी तत्पर. ही फले पश्चिम देशांत अधिक आणि बाकीच्या देशांत कमी.

 :- पारतंत्र्यांत राहूनही थोडा लाभ, अल्पवृष्टी, नदी, ओढें, विहिरीत पाणी कमीं, शीतोष्ण सर्वी, मोठीं वादळें, जहाजें बुडतील, उष्णधिक्याने रोगोत्पत्तीं, दुसऱ्या देशाच्या प्रजेवर राजाचा अतिशय रोष, देशांत, नगरांत, गांवात दुर्धर रोग व्याघ्रादि हिंसक पशूंची वाढ होऊन पशूंची हानी.

०/०/—/० :—मेघांचा गडगडाट, उत्कापात, अल्पवृष्टी, लोकांना भीती. चोर, ठग वगैरे लोकांची वृद्धी, लोकांत अस्वास्थ्य आणि निराशा, धान्यादिक कमी, राजा अन्यायकर्मी, राजाचा वैरी वाढून मन उद्विग्न. ही फले पश्चिम देशांतील लोकांस

—/०/०/० :—सर्व लोक अत्यानंदांत राहून प्रत्येक घरी मंगलकार्ये उत्सुकतेने करतील. पुष्कळ पाऊस पडून पाण्याची वाढ,धान्य विपुल, झाडे अमृतासारखी फळें देतील, न्यायी राजा. ही फले पश्चिम देशांत अधिक व बाकीच्या देशांत कमी

—/०/०/० :— लोक आनंदित, शुभकार्यी लोक तत्पर, लेखकांची आणि कामदारांची वाढ, राजा ऐक्यमतानें चालेल, स्वेच्छाचारी लोकांस कष्ट, सुगंधीस द्रव्यांची आणि रत्नांची वृद्धी, धान्यें अधिक पिकून स्वस्त होतील, लोकांस अधिक धनप्राप्ती. ही फले उत्तर देशातील लोकांना.

०/०/०/० :—पूर्व देशांत अतिवृष्टी, वादळे व उल्कापात, चहाडखोरांना पुष्कळ लाभ होईल. खोटें बोलणाराचे सरकार दरबारी महत्व वाढेल, भूकंप होईल, ज्योतिषी लोक अधिक होतील ही फले वायव्य देशांतील लोकांना.

मास फल कुंडली:— मागे सांगितल्याप्रमाणें १, १३. ४, १४ ७, १५. १०, १६ स्थानांतील शकलें गुणून ही चार ☰ ☰ —/०/०/— ०/०/—/० शकलें तयार केली. यावरून पूर्ण कुंडली तयार करावी ती १ ल्या महिन्याची; त्या १ महिन्याच्या कुंडलीतील १-१३, ४-१४, ७-१५, १०-१६ स्थानांतील शकलें एकमेकांस गुणून दुसरी पूर्ण कुंडली तयार करावी ती दुसऱ्या महिन्याची. याप्रमाण १२ महिन्याच्या १२ कुंडल्या तयार करून फल सांगावे.

प्रतिदिन फल कुंडली:— वर सांगितल्याप्रमाणे प्रत्येक महिन्यांची कुंडली तयार केल्यावर त्या कुंडलींतील १×१३, ४×१४, ७×१५, १०×१६ स्थानांतील शकलें घेऊन पूर्ण कुडली तयार करून फल सांगावे.

सात दिवसांची फल कुंडली:— पहिल्या भागांत सांगितलेल्या नियमाप्रमाणें फासे टाकून कुंडली ७ स्थानापर्यंतच मांडून "आजचा माझा दिवस कसा आहे" या विषयी विचार करून त्या ८ स्थानांवरून सात दिवसांचेच फल सांगावे.

☰ हें १ ल्या स्थानांत पडेल तर, दोघां नवीन गृहस्थांचीं भेट होऊन चिंता दूर होईल व आनंद. २ त्यांत सुखाने दिवस जाईल. ३ अकस्मात एक नवीन गृहस्थ येऊन फायदा करील. ४ एकवार भेटलेल्याची पुनः भेट होऊन

कांबा कामाकरितां मित्रत्व जुळेल. ५ राजाच्या अगर श्रीमंताच्या भेटीने आराम वाटेल. ६ सन्मान मिळेल व सारा दिवस आनंदात जाईल. ७ सारा दिवस चिंतेत जाईल आणि द्रव्य हानी होईल.

हें १ ल्यांत, पडेल तर द्रव्यप्राप्ती व आनंद २ मनोषा पूर्ण होऊन हंसत खेळत दिवस जाईल. ३ दुपारपर्यंत उद्विग्न नंतर आनंद. ४ नूतन सुवार्ता येईल व फायदा होईल. ५ नष्ट वस्तुच्या लाभानें आनंद. ६ आणि ७ त पहिला प्रहर उद्विग्नतेत जाईल नंतर उत्तम सुख मिळेल.

हे १ल्यांत दुसऱ्याच्या अखत्यारीनें सुख वाटून, प्रतीं वाढून कांही चिंता उद्भवेल. २ सारा दिवस केलेले काम व्यर्थ होईल. ३ मूर्खाशी संभाषण केल्यानें मन उद्विग्न होईल. ४ अनिष्ट वार्ता ऐकल्यानें क्रोध उत्पन्न होईल ५ सारा दिवस सुख दुःख समान. ६ मूर्खाच्या सहवासानें मन उच्छंखल होईल व नीचांची सेवा करावी लागेल आणि कोणतेच काम हाती लागणार नाही. ७ सारा दिवस कोणतेच काम न होता चिंतेत वेळ जाईल.

हे १ ल्यांत, चिंतेनें मन व्याकुळ होईल. २ चांगले विचार चालतील तरी कोणतेच काम होणार नाही. ३ स्वस्थ मनानें लोकांबरोबर संभाषण होईल. ४ मनीषा सफल होऊन दिवस आनंदांत जाईल. ५ जुन्या वस्तूंचा लाभ, बाळ-मित्राची भेट, सारा दिवस गायनादि आनंदांत हंसत खेळत घालवील. ६ वस्तु लाभ, आनंद आणि इच्छित कार्य अर्धे घडेल ७ कोणा एकाच्या सहवासाने व्यर्थ श्रम होऊन मन दूषित होईल.

हे १ ल्यांत, आनंदांत व चैनीत सारा दिवस जाईल २ गायनादि आनंद क्रीडेत जाईल ३सगळा दिवस सुखांत जाईल. ४सर्व कामें निरर्थक होऊन खेळांत दिवस जाईल ५ सर्व दिवस चिंतेत जाईल ६·७ फायदा आणि आनंद होईल.

हें १ ल्यांत, भीती, दुःखकारक वार्ता आणि चिंता. २ मूर्खाच्या सह-वासाने मन दुषित होईल. परंतु चांगल्या माणसाचा स्नेह होऊन अन्न मिळेल. ३ सगळा दिवस व्यर्थ जाईल आणि दुष्ट वार्ता ऐकण्यांत येईल ४ बारा तासा-पर्यंत शरीरास आनंद होईल त्यानंतर चिंता उत्पन्न होईल. ५ प्रत्येक गोष्टीबद्दल मन दूषित होईल. ७ धनप्राप्तीचा विचार चालेल आणि चैनीत दिवस जाईल.

हें १ ल्यांत, सारा दिवस चिंतेत आणि वैऱ्याशीं संवाद, २ मन शांत राहून सर्व कामे आळसाने होतील. ३ नीचांकडून वाईट परिणाम घडून मनांत भीती

उपजेल. ४ पित्तप्रकोपामुळे सर्वांगांत खाज उपजेल. ५ व्यर्थ चिंता आणि कष्ट. ६ वहाडीनें मन कलुषित होईल. आणि आपल्या स्त्रियेशी संभाषण होईल. ७ सर्व कामें चांगल्या रीतीनें चालून सुख वाटेल.

=०= हे १ ल्यांत, तंटा होईल. २ केलेल्या कामांत यश मिळून अब्रू वाढेल. ३ मित्राची भेट, लाभ आणि आनंद होईल. ४ अधिकाऱ्याशी संभाषण होऊन केलेला करार मोडून चिंता उत्पन्न होईल. ५ कोणतेच काम न होता निष्कारण कष्ट होईल आणि दुसऱ्या लोकांबरोबर वाद होईल. ६ एका मनुष्यांकडून आनंद बाकीच्याकडून मनास दुःख ७ काम तडीस न जाता भीती उत्पन्न होईल.

=०= हे १ ल्यांत, चांगल्या मनुष्याची भेट होईल. परंतु मनास अकस्मात धक्या पोंचेल. २ इच्छा सफल होऊन सुवार्ता ऐकण्यांत येईल. ३ मन उदास राग आणि तंटा. ४ चांगल्या लोकांशी संभाषण होऊन सुख वाटेल. ६ मुलांशी स्त्रियेशीं संभाषण होईल आणि धनप्राप्ती होईल. ६ विचार वाढेल, द्रव्यलाभ होईल. पण शरीरास शीत विकार होईल. ७ सुख दुःख समान.

००= हे १ ल्यांत, सारा दिवस निष्काम, कोणतेहीं काम हाती न लागता व्यर्थ भटकावे लागेल. २ आप्तांची भेट होऊन मन उदास होईल. ३ आप्ता-कडून कांही एक काम न होता मन चंचल होईल. ४ चिंता आणि मेहनत ५ आनंद आणि फायदा ६ कांही गुप्त गोष्टीबद्दल मन उदास पण दुपारनंतर आनंद. ७ सुखदुःख समान.

=०० हे १ ल्यांत, अकस्मात् द्रव्यलाभ, सत्मान आणि वस्त्रलाभ. २ इच्छित फळाचा लाभ, शरीरास सुख आणि फायदा. ३ रोग उत्पन्न होईल. ४ वैद्याशी संभाषण व मित्राची भेट. ५ शरीरास सुख, चांगल्यांची भेट आणि विश्वासाच्या गोष्टी चालतील. ६ आनंद. ७ उदासीनतेमुळें कोणाशीच भाषण होणार नाही

=००० हे १ ल्यांत, मूर्खांच्या स्वाधीनात गेल्याने कोणतेच काम न होता नाच विचार चालतील. २ दुपारपर्यंत आनंद, नतर वाईट ३ दुष्ट वार्ता श्रवण ४ रोगो-द्भव आणि वैद्याशी संभाषण. ५ भय आणि चिंता. ६ दुष्टाच्या सहवासाने मन चंचल होईल व आपल्यावर आरोप येईल. ७ मित्राची भेट धन प्राप्ती आणि यश

०=०० हे १ ल्यांत, दुपारपर्यंत चिंता नंतर आनंद. २ नानाविध वार्ता ऐक-ण्यांत येऊन मोठ्या वस्तु घेण्यांत येतील ३ घोड्यावरची स्वारी होऊन गायनविद्या ऐकण्यांत येईल. ४ दुपारपर्यंत उद्विग्न मग शुभ. ५ तीन प्रहरपर्यंत

चिंता नंतर शुभ. ६ दुपारपर्यंत आनंद नंतर उदास. ७ सारा दिवस बेकाम, कष्टमय आणि उदास.

०००० हे १ त्यांत, स्वस्थ चित्त, द्रव्यलाभ आणि शरीरास सुख. २ सारा दिवस बेकाम आणि मन उदास. ३ आनंद, सुख आणि धनलाभ ४ एका गुप्त मनुष्याकडून अभय ५ आनंद आणि शरीरास सुख. ६ सारा दिवस पुण्य कर्मांत जाईल पण मन चंचल राहील. ७ दुसऱ्यांच्या अखत्यारीने मन उदास होईल परंतु संध्याकाळी अकस्मात् आनंद होईल.

०००० हे १ त्यांत गुप्त मनुष्याच्या भेटीनें अभय मिळेल. २ दुपारपर्यंत निरर्थक वेळ जाऊन नंतर एका चांगल्या माणसाची भेट होऊन मोठा फायदा होईल ३ गायन आणि वाद्य इत्यादि क्रीडेंत कालक्रमण होईल. ४ सारा दिवस निरर्थक आणि मन चंचल. ५ सुख दुःख समान ६ स्वतःचे पैसे खर्च होतील ७ दुपार पर्यंत अशुभ नंतर शुभ

०००० हे १ त्या स्थानांत पडेल तर लाभ होईल. २ एका गृहस्थाच्या भेटीनें आनंद होईल पण सुख दुःख समान. ३ दुपारपर्यंत अशुभ नंतर शुभ. ४ मनास शांती देणाऱ्या मित्राची भेट होईल परंतु सारा दिवस खाली. ५ मित्राची भेट होईल दुपारनंतर सुख. ६ सारा दिवस मन उदास. ७ धरलेले काम न होता उद्विग्न होईल.

एवं प्रोक्तं रम्लशास्त्रस्य तत्वं सर्वेषां वै ब्राह्मणानां हितार्थम् ॥
स्वल्पं सौम्यं शीघ्रबोधंत्वलभ्यं तस्माद्विज्ञैरक्षणीयं प्रयत्नात् ॥४९॥

अर्थः— ऋषी प्रणीत रमल शास्त्राचे हे अगोचर तत्व सर्व लोकांच्यां व विशेषे करून ब्राह्मणांच्या हिताकरितां शीघ्र बोध होण्याजोगे सांगितले आहे. तस्मात् बुध जनांनी हा अल्पसा व अलभ्य ग्रंथ मोठ्या प्रयत्नानें रक्षण करावा अशी नम्रपूर्वक विनंती करितो.

भाग तिसरा समाप्त.

॥ श्रीशांतेशार्पणमस्तु ॥